

# कथासरिता

शुभांगी पासेबंद

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# कथासरिता

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कथासरिता

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

# कथासरिता

लेखिका : शुभांगी पासेबंद

Address : 202,Anandi Bhuvan Veer Savarkar Marg, opp Maharashtra Vidyalaya. Thane (West) 400602.

मो.नं. 9869004712, 02225345992

मेल- scpaseband@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

ई प्रकाशन : २८ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कथासरिता

अर्पणपत्रिका

25/7/21

हे माझे 34वे पुस्तक

कथासरिता (कथासंग्रह)

कोविड योध्यांना समर्पित आहे।

शुभांगी पासेबंद

अनुक्रमणिका कथासंग्रह कथा सरिता


1. सांजकेसरी
2. दोन कथा
3. 2रॉंग नंबर
4. डबल करोना वॉरिअर
5. काव्याची गोष्ट
6. ब्रेकअप
7. पुनर्वसन
8. शर्माजी
9. वो औरत
10. मनकर्णिका
11. सागरकिनारे
12. गुणाई
13. करोडपती
14. गौतमी सापडली?
15. बेघर
16. अभिशाप
17. WhatsApp mother
18. मैत्रीण तुटली
19. जमणार नाही

20. चकवा

21. करोनाष्टक

22. पानगुहा

23. उत्तरायण

24. स्टेशनवर भेटलेला

25. पाच मुलांची आई

26. रुदाली

27. देव माझा

28. गडाख बंगला

29. कथासरिता.

सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.

# सांज केसरी

आम्ही दोघी जुळ्या बहिणी आहोत. माझे लग्न झाले आणि ताई बिन लग्नाची राहिली. मी काही आयुष्यात सुखाच्या गादीवर लोळते असे मुळी नाही. पुरुष राम नसतो, वाहून धावुन प्रेम पुरुष करत नाहीत. लग्न म्हणजे सोन्याचा मुलामा दिलेली कथील असते.

मी विवेकनिष्ठ मानसोपचार शिकले होते लग्न करणे महिने चक्रव्यहात शिरणे, अन जिथून बाहेर पडणे अवघड, असतेते होय. सुरावली गात लग्न लागतं तो सुरांत सुर संपवतो. नाकारणे हा हक्क बाईने नसतो. प्रेम मोडीत काढत असताना महिलांना यातना होतात. भूकेचा वैताग येवुन शरीराची पोटाची सहवासाची, वेळ काढू भूक मरते. बघीन बघीन नाहीतर जीव द्यायला समुद्र असतो. मला तरी घर आहे ताईचे काय?

ताईची कविता वाचली होती.

कबूल तुलाही हवा कधीचा निवारा

गर्द झाडांची साऊली चंदनाचा वारा पण पोरक्या उन्हात सांग कोणी पोळायचे, तू एकटीनेच जगायचे!

ताई कशी जगली असेल? आपल्याला घर आहे पण तरीही संध्याकाळी कातर होत. पुरुषांना यातना होतात का कोण जाणे.

सांज केशरी ऊन कोवळी

रंग प्रीतीचे उधली.

मुले शाळेतून आली चिंवचिवली पुन्हा खेळायला गेली. माझे आतपर्यंत काही हल्ले नाही. गाणी ऐकली मात्र रात्री मरगळ वाढली. बुजून केलेल्या जखमा ओलसर होत होत्या. प्रचंड डोहात बुडून मन बधिर झाल. ती लोकनिंदा ताईने कशी सोसली असेल?कसली तडजोड करून जपलेल आहे. ताईला तडजोड देखील जमली नाही, संधी नाही. जुळया बहिणी असूनही अविवेकी नशिबाने रडलो सुद्धा!

धंदो मंदीचे कारण सांगून नवरा पैसे मागे. घरी जेवणे हाच एकमेव खास कार्यक्रमाँ असे. सासरी बुद्धी सुमार! सुरत नू जमण, काशी नु मरण, सेठनु खमण प्रिय होते. पण निदान मला आधार होता. देवा मला क्षमा करू नकोस, मी बहिणीसाठी काहीही केलं नाही.

लग्न म्हणजे जीवनाचे सर्व काही नसते असे म्हणणे ठीक आहे, पण सांज केसरिया आली, कि नोकरीवरून एकटी घरी, खोलीवर परत येणारी ताई बघून वाईट वाटते. देवा मला जमेल तसा बहिणीला आधार देण्याचा सुविचार कायम दे.

***

# दोन कथा

पूर्वी सिनेमा बघून आल्यावर आपण पिक्चरची स्टोरी सांगत असायचो. तशा या दोन कथा आता सांगते आहे. या आठवड्यात काही निमित्ताने, भाषा न कळणारे पण तरी खिळवून ठेवणारे असे, दोन सिनेमे बघण्याचा प्रसंग आला. अजिबात भाषा कळत नव्हती. पण ते चित्रपट इतके सुंदर होते की मी पूर्णवेळ बघितले. त्यातील चित्रपटांच्या कथा मी मुद्दाम आज तुम्हाला ईथे सांगणार आहे.

पहिली कथा ही प्रेमकथा आहे. त्यात नायक नायिकेच्या प्रेमात पडतो. घरी सांगितलं कि विवाहाची बोलणी होतात. त्यावेळी ज्योतिषी कुंडली बघून त्यावरून सांगतो की या नायकाचे पत्नीचा मृत्यू होईल. त्यामुळे पत्नी/प्रेयसीला त्रास होऊ नये, आपल्या या प्रेयसीला त्रास होऊ नये, म्हणून ऐकतो. नायकाचे ते लग्न मोडले जाते. त्यानंतर जवळजवळ सहा एक वर्ष नायक अविवाहित राहतो. नायकाचे मित्र, ती प्रेयसी सगळ्यांची लग्न होतात. त्या नायकाच्या मनात काही वेळा स्त्रियांबद्दल आकर्षण निर्माण होतं पण ज्योतिषाने मृत्युदाता कुंडली असे सांगितले असल्यामुळे तो नायक गप्प बसतो.

“या कुंडली योगा च्यावर काहीतरी उपाय असावा, असेल का?”असं नायक मित्राला विचारतो. मित्रांसोबत तो एका ज्योतिष्याकडे जातो. तो नवा ज्योतिषी सांगतो की तुझं लग्न शास्त्रोक्त पद्धतीने एखाद्या झाडाशी लावून द्या आणि नंतर ते झाड तुझी पत्नी म्हणून समजले जाईल. त्यानंतर जर ग्रह शांत झाले तर तुझ नंतर 1 1/4 वर्षांनी लग्न होईल. घरी आई-वडिलांना सांगायची, या तरुणाला भिती वाटते. हा तरुण गुपचूप मंगळसूत्र आणतो माला तयार करतो. केळीच्या झाडाची रात्रीच्या वेळी जाऊन विवाह करतो. केळीच्या झाडावर/ पत्नी सम प्रेम करतो. त्या झाडाजवळ जाऊन बसतो/बोलतो. घरी आई वडिलांना वाटत सुपुत्र वेडा झाला आहे. नायक भल्याबुऱ्या प्रसंगात त्या झाडाचे रक्षण करतो. नायक विचित्र आचरण करत असतो. मात्र त्यानंतर नायक एका तरुणीच्या प्रेमात पडतो

ईतका की त्या नायकाला तिच्या वाचून रहावेना होते. नायक त्या तरुणीशी विवाह करतो आणि लग्न झाल्यावर तो नायक त्या झाडाचे जवळ जातो आणि त्या झाडांला म्हणतो,

“ तुम्हाला आज सवत आली आहे”!

त्यानंतर दुसरा सिनेमा मी जो बघितला. त्याची कथा सांगते. एक अतिशय वृद्ध गृहस्थ पाय फ्रॅक्चर होवून एका हॉस्पिटल मध्ये

भरती होतात. त्या हॉस्पिटलमध्ये आडवे झाल्यावर ते अतिशय भाबडेपणाने नर्सला सांगतात

" माझा रेडिओ बिघडलाय रेडिओ रिपेअर करून आणून दे. "ती नर्स रेडिओ रिपेअर करून आणून देते. पायाला फ्रॅक्चर झालेल्या या वृध्दाचे सेवेत असता, दरम्यान तिला वृध्द सांगतात की,

" माझा मुलगा वीस वर्षापूर्वी घर सोडून गेलाय. त्याचा शोध घ्यायचा आहे. तुम्ही कोणी मला मदत कराल का?" इस्पितळात एक समाजसेवक येत असतो. त्या समाजसेवकांच्या मदतीने हा वृद्ध एका पत्रकारांना, पुढे पोलिस, अन्य ऑफिसर ला भेटतो. पोलिस ऑफिसर त्या गुमशुदा नावाची 15 जण या काळात गायब झालेली शोधून काढतो. त्यातली काही मृत असतात, काही हरवलेले असतात काही जाणून-बुजून पळून गेलेले असतात. पण त्यात कोणताही मुलगा/ सुपुत्र ज्याचे वर्णन या वृद्धाने केलेल्या वर्णनाशी जुळत असते असा नसतो.

पुढे एक पत्ता सापडला. त्या घरी हा समाजसेवक वृद्धाला घेऊन भेटायला जातो. वृद्धाचा सुपुत्र या घरात राहत असतो. हा सुपुत्र लिंग बदल करुन मुलगी झालेला असतो. ही लग्न केलेली मुलगी, नवर्यासोबत खूष असते. एक कन्यारत्न दत्तक घेतलेले

असते. काही दिवस त्या सुपुत्रा च्या, आता कन्या झालेले अपत्याच्या घरी वृध्द राहतो. पण त्याला आपल्या मुलाने घरातून पळून जाऊन लिंग बदल करावा, लग्न करावे, मुलगी दत्तक घ्यावी या गोष्टीचा स्वीकार करावा अस वाटत नाही. वृद्धाला राग आलेला असतो. वस्तुत: व्रुद्ध त्या घरी, या नातीशी, जावयाशी काही बोलत नाही. आपल्या स्वतःच्या मुलाशी अपत्याच्या पतीशी बोलत नाही.

वृध्द परत जायचे ठरवतो आणि आपल्या मुलाच्या अपत्याच्या घरातून, त्या आपल्या घरातून सांगून बाहेर पडतो. मुलगी बनलेल्या मुलाच्या घरातून बाहेर पडताना जावई गाडी देतो. वृद्ध पक्क ठरवूनच निघाला. आपल्या घरी, गावच्या एकाकी घरी जाण्यासाठी, गावातल्या खेड्यातल्या घरी जाण्यासाठी! कारण अहंकार ! सोडायला आलेल्या जावयाच्या गाडीतून जात असता, विचार करत असताना, रस्त्याच्या किनारी एक भिकारी गात असतो. भिकारी असं गात असतो की

“ हा देह नाही म्हणजे मी केवळ शरीर नाही. मी म्हणजे आत्मा!परमेश्वराने मला स्वीकारलं. हो देवाने बनवलेला माणूस मी पण, मी म्हणजे आत्मा आहे !”

मुलाचं बालपणापासूनच मोठं होणं. त्याचं प्रेम लावणं. आता पत्नीचा मृत्यू आणि आता याच्यापुढे परत सोसावे लागणारे एकटेपण नजरे समोर येते. गैरसमज टाकुन वृद्ध आपल्या मुलाला मुलीच्या रुपात म्हणजे आपल्या सुपुत्राला सुकन्या म्हणून स्वीकारावं असा विचार करतो. मनात प्रेम हळव करू लागते.

पुत्राला निसर्गाने दिलेली वृत्ती, तो बदल वृध्द स्वीकारतो. वृध्द निर्णय घेतो आणि गाडीवाल्याला सांगतो

‘‘गाडी थांबव’’

किती वेगळी ही कथा आहे/हा चित्रपट ईथे संपतो.

दोन्ही तामिळ चित्रपट आहेत. सहज सांगितले

***

# रॉंग नंबर

जीवनात आपण फोन करत असतो. नंबर लागतो वा लागत नाही किंवा रॉंग नंबर लागतो. कोणाला तरी, बोलण्यासाठी संपर्क वाढवणे यासाठी फोन लावतो. तीव्र इच्छा म्हणून फोन लागतो. पण नंबर संवाद व्हावा म्हणून माणसांनी केलेला हा संवाद चुकतो. व्यक्ती चुकीची असते. गलत नंबर लागलेला असतो/नसतो. चूक मात्र काहीतरी असते. तर ही कथा मनोहर शिंदे चे रॉंग नंबरची आहे.

पंधरा सोळा वर्षाचा असताना, मनोहर शिंदे, आपले घर सोडून निघून गेला. वडिलांना कंटाळून मुलगा पळून गेला. बदनामी झाली म्हणून नंतर वडिल जास्त बिथरले. तसा तर उगाच भडकणारा या वडिलांचा स्वभाव खूप विचित्र होताच तो, नंतर अधिक बेकार झाला होता.

मनोहर, बहीण शोभा, सावत्र आई, वडिल चार जणांचे वरकरणी सुखी घर होते. खोपटा सारखी चाळ होती. घरी आईने अंड्यांसाठी कोंबड्या पाळल्या होत्या. मुल, मनोहर आणि शोभा कोंबड्यांशी खेळत. मात्र कोणी कोंबडी विकत मागितली, की मनोहर चे वडील/नवी आई ताबडतोब सुरीने त्या कोंबडीचा गळा कापून तिची पिस, कापून काढून विकायला, एक मिनिटात तयार

असत. पैसे मिळाले तर बास! जे मनोहरला अजिबात आवडत नसे. मनोहर या कोंबड्यांना अगदी लहानपणापासून जीव लावे आणि या कोंबड्यांची तो नाव ठेवे, लळा लागला असे. मित्र वत स्वतःच्या आवडीने नाव ठेवत असे. पंधराव्या वर्षी अशी किती प्रगल्भता त्याला असणार? पण या कोंबड्यांवर तो जीव लावत असे. त्याला एक त्याच्याहून मोठी शोभा नावाची बहीण होती. मनोहर आणि शोभा समुद्रकिनारी, बहुतेक वेळा संध्याकाळी फिरायला जात असत. ते गाव नलिबाग तसं साध होतं. तरी क्रेझी, वारंवार पर्यटनाची चटक असणारे काही जण या समुद्र किनाऱ्यावर यायचे. समुद्र किनारा अप्रतिम सुंदर होता. पुळणी वरून पुढे गेल्यावर, आधी निळे आकाशात, समुद्र पक्षी दिसत असत. त्यामुळे अगदी समोर समुद्र असेल( खाली उतरलो कि लाटा दिसतात ) याचा अंदाज येत नसे. मात्र थोड खाली उतरलं की, नजरेला स्वच्छ निळ पाणी, लाटा, पिवळट पांढरी दिसणारी रेती दिसे. समुद्रवेड्यांना मग समुद्राच्या मजेच्या, गहिरा मिठीतून बाहेर येणे जड जात असे.

समुद्रकिनारा गावाने, येणारे पर्यटकांना ‘‘खराब करु नका’’असे सांगून प्लास्टीकच्या कचर्या पासून, बराचसा वाचवलेला होता. मनोहर ची आई लहानपणीच वारली होती. वडिलांनी दुसरे लग्न केल्यामुळे, मनोहरला सावत्र आईचा खूप त्रास

होत असे, असे नाही पण सूर् जुळले नव्हते. दिवस बरे जात होते. मनोहरची सख्खी बहीण शोभा सोबत असे. तिच्यावर मनोहरचे खूप प्रेम होतं. अडनिड्या वयात मनात, स्त्री देहाचे आकर्षण निर्माण होतं. त्या दरम्यान त्याला थोडीशी बहिणीकडे चोरून बघायची इच्छा होई. पण नंतर वाटत असे, आपल चुकल. परत नजर वळे. पण ती आपली बहिण आहे असं मनाला बजावून मनोहर ते विचार दूर् लोटत असे. मनोहर ची सावत्र आई वयाने लहान आणि दिसायला सुंदर होती. एकदा मनोहरने तिला आंघोळ करताना, समुद्रकिनारी कोणाशी तरी बोलताना पाहिलं. कळत नसताना सुद्धा त्यांनी ती गोष्ट वडिलांना सांगितली. त्यावरून वडील आणि आई (सावत्र आई) चे भांडण झाल्यामुळे, सावत्र आई मनोहर वर डुख धरी. मनोहर शोभा, दोघा भावंडांचे मनात दुःख मूळ धरू लागले.

"मनोहरची आपल्याकडे बघण्याची नजर स्वच्छ नाही. मनोहर वाया गेला आहे. मनोहर रस्त्यावरच्या बायकांकडे बघतो. समुद्रकिनारी आंघोळीला येणाऱ्यांकडे बघतो. " असं सांगून मनोहरच्या सावत्र आईने मनोहरची भरपूर् बदनामी मनोहरच्या वडिलांकडे केली. मनोहरच्या वडिलांनी मनोहरला खूप मारलं. मनोहरला खूप मानसिक त्रास झाला आणि म्हणून मनोहर ने ठरवलं की या सावत्र आईच्या त्रासातून आणि वडिलांच्या त्रासातून स्वतःला वाचवायचं. आपण मुंबईला पळून जायचे.

रात्रीच्या वेळी घरातल्या सामानातील एक जुना फोटो, ज्यात नवी आई वडील बहीण आणि तो, असे चौघेजण समुद्रकिनारी बसले होते, तो फोटो, एक जुना शर्ट, अगदी जुन्या पद्धतीची सेलवर चालणारी अशी विजेरी आणि दोन-चार कपडे पिशवीत भरून मनोहरने घर सोडलं.

मनोहर द्विधा झाला. या जगात कोण bipolar नसते?प्रत्येक मनात, दोन माणसांचे, दोन रुपी मन असते. वरती दिसणारे मन आणि आतलं मन! सुप्त मन आणि जागृत मन !या दोन्ही मनाच्या 2waves मध्ये मनोहर नेहमीच हेलकावत पडलेला असे. मनोहर ला मनात कुठेतरी त्याला स्वतः च्या सख्ख्या बहिणी बद्दलचे आकर्षण वाटत होतं. ते पूर्णपणे अयोग्य होतं. त्याचे वडील ते वेडसर होतेच. वडिलांनी मान मुरगाळून आणि कोंबड्या कापत मारलेल्या, त्यांची पिसे सोललेल्या मनोहरने पाहिल्यामुळे मनोहरला वडील अतिशय दुष्ट वाटत. त्या सगळ्या मेलेल्या कोंबड्यांची भूत आपल्या वडिलांना त्रास देत असावीत, त्यामुळे वडील वेड्यासारखे करत असावे असा देखील मनोहरचा, केला गेलेला समज होता.

मनोहर घर सोडून पळून आल्यावर एका बोटीत चढला. आजरा शहरात एका ठिकाणी पेपर टाकायचं काम मनोहर करू

लागला. मनोहर हॉटेल मालकाचे इथे बाहेर पायरीवर झोपलेले असताना, हॉटेल मॅनेजर ने मनोहर ला आत बोलावले. आत निजू दिले. ते पर्यटकांना सोयीचे हॉटेल होते. हॉटेलचे मागे सुंदर समुद्र किनारा होता. गुहा होती.. समुद्रकिनारे साऱ्यांनाच आवडतात. मनोहर समुद्रकिनारी आवडे. समुद्रकिनाऱ्याचे प्रेम अतिशय मुरलेले असल्यामुळे आणि ह्या नवीन गावी तेथील, आजरा सिंधुदुर्गला देखील समुद्रकिनारा होता. कोकण किनारपट्टी होती. म्हणूनच नलिबांग पासून हे गाव एक दीड तासाच्या अंतरावर होते. डोक्यावर मासळी घेवून, नदी बघुन, समुद्रात फिरुन येणाऱ्या बोटी इथे देखील दिसतात. Old man and the sea, what is the best book which was taught to manohar in school. ते आठवे.

समुद्रकिनारी बसून बहीण शोभा ची आठवण काढणे, मनोहर ला आवडे. परत जावेसे वाटले. वडिलांची आठवण काढत, वारलेले आईची आठवण काढणे आणि सावत्र होती तरी ति मनोहर ची (सावत्र) आई होती. तिचे पण थोडीफार प्रेम मनोहरला असल्यामुळे मनोहर, नलिबांग कुटुंब, शाळा तिची आठवण काढत बसे. समुद्रकिनारी बसला की समुद्रकिनारी मासे पकडणारा कोळी भेटत. एका कोळी माणसाशी ही दोस्ती झाली. त्या कोळया ने मनोहरला घरातला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक मदत केली. कोळ्याची मुलगी कल्पना मनोहरला जीव लावे. आयुष्यात

मनोहर ने कधीही सामीष जेवण केलं नाही. कोंबडी मारताना वडिलांना बघितल्यामुळे, त्याला कोंबडी खायला आवडत नसे आणि माशांची तडफड बघितल्यामुळे मनोहर मासे देखील खात नसे.

मात्र मासे मिळवणे, पकडणे, ही काम करी. मीठ लावून ठेवणे, सुकवणे या सर्व कामात मनोहर मनापासून कोळी काकांना मदत करत असे. सिंधुदुर्गला आल्यापासून मनोहरने आपली केशरचना कपडे सर्व बदलून टाकलं. केसांची रचना बदलल्यामुळे आणि अचानक उंची वाढल्यामुळे, शिवाय वाण्याच्या दुकानात रोज वडापाव खाऊन मनोहर आरामात दिवस काढत होता त्यामुळे मनोहर छान दिसे. पूर्वीसारखा निदान भाताने पोट भरण्याची जबरदस्ती नव्हती. त्यामुळे मनोहर तब्येत छान झाली.

"जुने आणि नलिबांग चे पूर्वी मला बघणार कोणीही आता मला ओळखणार नाही. एवढा खूप म्हणजे मस्त बदल घडलाय"मनोहर स्वत शी बोले.

आजरा या गावाला घरुन पळून आल्यावर मनोहर हॉटेलच्या मालकाने राहायची सोय केली होती. तिथे सगळे मनोहर ला बाबू म्हणु लागले.

बाबुलनाथ कोळी नाव पडले. बाबू आणि कल्पना टोपली बनवायचे. मासे खारवायचे. जणू काही बाबू कोळी या नावाने मनोहर चा पुनर्जन्म झाला.

भाग-2

बाबू म्हणून पुनर्जन्म झाल्यावर या नवीन आजरा सिंधुदुर्गच्या खोपटामध्ये बापू कोळी ऊर्फ मनोहर मजेत राहू लागला. कधी कधी त्याला आईची आठवण येई आणि जुन्या घरी परत जावस वाटे. कारण नलिबांग गावाची ओढ त्याला अजूनही वाटे. किल्ला आठवे. शोभा शोधायला येणार, अशी खोटी आशा मात्र मनात कुठेतरी येई. पण विषाद कोंडून पण येई आणि तो परत नलिबागला, जाण्याचा विचार रद्द करत असे. Days don’t pass but years fly away. five years passed

भाग3

आजरा इथले गॉडफादर मानलेल्या या कोळयाला एक कल्पना नावाची तरुण मुलगी होती. काळी आणि ऊंच, वयाने सोळा वर्षाची असेल आणि मनोहरची या मुलगीशी मैत्री होती. ती तरुणी 14 वर्षाची होती आणि मनोहर 15 चा! आता ती 19 व तो 20 वर्षाचा झाला होता. दोघांमध्ये थोडेफार आकर्षण निर्माण झालं होतं. पण मनोहरच्या मनात स्वतःची सख्खी बहीण शोभा, गौर वर्ण

यांच्याबद्दल एक अनाकलनीय ओढ होती. त्यामुळे आपली पत्नी शोभासारखी दिसणारी असावी, असे विचार मनात येत असत.

“हा काळ जाईल, या काळया मुलीशी रॉंग नंबर आपण लावायचा नाही. ” असं मनोहर मनात म्हणे.

“आपण निराधार म्हणून तडजोड म्हणून कोळयाच्या मुलीशी लग्न करावं” असं देखील एकदा, एक मन मनोहर सांगत असे. पण दुसरं मन मात्र “आपल्याला बहिणीसारखी शोभा सारखी गोरी पान मुलगी आपली पत्नी हवी”असे सांगत आहे. समुद्रकिनारी बसल्यावर, समुद्राच्या पाण्याला आणि जमिनी वरच्या रेतीला एकमेकांची माया मिळत आहे असे मनोहर ला वाटे. पण सागर व किनारा त्यांच्यात जसे दोन स्पष्ट फरक असतात. तसेच वेगवेगळे विचार मानवाचे मनात येत असतात. दुविधा युक्त, द्विधा मन निर्णय घेऊ शकत नाही. समुद्र किनारी जायला मनोहर ला आवडत असे. कधी तो गुंफेत जावून बसे.

***

दैव जाणविले कुणी?एका रविवारी मनोहर घरी आला नाही. सर्व शोध घेतला. पाहणीत मनोहर दिसेना. पाहणीत मनोहर कुठेच सापडला नाही. पूर्वी पण मनोहरला शोधायला कोळयाची मुलगी कल्पना समुद्रकिनारी येऊन शोधत असे. कल्पना ची आणि मनोहर

ची मैत्री होती मात्र मनोहर च्या मनात कल्पना बद्दल असे आकर्षणाचे भाव नव्हते.

तर त्या एके दिवशी रात्री साडेअकरा वाजेपर्यंत मनोहर समुद्रकिनारी समुद्रात बुडणारा चंद्र बघत बसला. सर्वांना अज्ञात, ओळख नसलेल्या वेगळ्या जागेवर येऊन बसल्यामुळे बाकीच्या लोकांनी शोध घेऊन पण तो सापडेना. कल्पना तिचे बाबा, किती तरी लोक मनोहरला शोधत होते. मनोहरला याची कल्पना नव्हती. शोध घेत कल्पना त्या गुफेत, त्या जागेवर आली. मनोहर समोर दिसताच ती धावत आली आणि मनोहरला मिठी मारुन रडु लागली.

“काय म्हणून रडायला काय झालं?”मनोहर

“ अरे बाबा खेकडे पकडण्यासाठी आलास, रमलास. घड्याळात बघितलं का किती वाजलेत ?रात्रीचे बारा उलटून गेले. तुला मी रानोमाळ शोधलं. मनोहर तुम्ही आम्हाला न सांगता कुठे जाऊ नका. कस रे बाबू?” कल्पना त्याला म्हणाली.

“ मला तुझ्याशी दुसरे काही बोलायचं”मनोहर.

“ तुला मी पसंत नसेल तर तू बाबांना, तसे लग्न करायला नाही म्हणू शकतो. मनाविरुद्ध गोष्टी करू नकोस. तुझ्या मानाने मी काळी आहे, दिसायला सुंदर नाही म्हणून माझ्या बद्दल आकर्षण नसेल,

तर तू माझ्याशी लग्न करू नको. पण आपण मित्र म्हणून राहू या. पण तू परत आम्हाला सोडून जायच्या गोष्टी करू नको. बाबांना तर प्रलय आल्यागत झाले आहे. तुला शोधून शोधून त्यांचे पाय दुखायला लागले आहेत. आता घरी चल"कल्पना

मनोहर ला घेऊन कल्पना घरी गेली. कल्पनाच्या वडिलांना वाटलं की मनोहर सापडला. या दोघांनी प्रेम संबंध जुळवले आहेत, हे सांगायला दोघे आले आहेत.

"बाबा आणि त्याला जर आवडत नसेल तर तुम्ही त्याच्यावर माझ्याशी लग्न करायची सक्ती करू नका "कल्पना "मनोहर ?"कोळी काका.

"बाबा" कल्पना.

"काका शोध करून तुम्हाला त्रास झाला. मला शोधून तुम्हाला कंटाळा आला. मी समुद्राकडे बघत बसलो"मनोहर

"काही इच्छा नसेल, तर माझ्याशी लग्न करायचा आग्रह करू नका "कल्पना.

"बरं" असं समजूतदारपणे म्हणून कोळी काका गप्प बसले. तात्पुरता तर प्रश्न सुटला होता. मात्र ज्या वाणी काका कडे मनोहर वडापाव खायला रोज जात असे त्या वाणि काकांनी असं सुचवलं की मनोहरने शाळेत जावे.

"एकच शेवटचा मॅट्रिक चे वर्ष बाकी आहे. ते पूर्ण कराव" वाणी काकांनी कोळी काकांनी सांगितलं आणि मनोहरने मॅट्रिकचे शेवटचे वर्ष पूर्ण केलं. नोकरीसाठी कुठेतरी स्पर्धा परीक्षा दे, असं त्याला गावातले जाणते लोक सांगू लागले आणि मनोहर परीक्षा देऊ लागला. अभ्यास करू लागला. नोकरीसाठी अर्ज करू लागला. गावातली जी कोण मंडळी मुंबईला नोकरी करत होती, त्यांना देखील तो आपल्याला नोकरी मिळवून द्यावी, असा शब्द टाकू लागला.

मॅट्रिकच्या परीक्षेत मनोहर पास झाला आणि एका बँकेत शिपायाची नोकरी लागली. ही नोकरी मुंबईला होती. पण गिरगावातील एका ओळखीच्या, माणसाकडे शब्द टाकून, मनोहर ची मुंबईला राहायची सोय कोळी काकांनी केली. कल्पनाचे मनोहर ला निरोप देताना डोळे भरून आले होते, पण मनोहर आपल्यावर प्रेम करत नाही हे सत्य तिने स्वीकारलं होतं.

सुदैवाने मुंबईला नोकरी होती तरी मुंबईला पण समुद्र आहे, याच गोष्टीचा मनोहरला खूप आनंद झाला.

भाग तीन

मुंबईला आल्यावर मनोहर च नवीन विश्व सुरू झालं. जातीयवादी आडनाव वाटतं म्हणून मनोहरने एका मित्राच्या

सल्ल्याने कोर्टात ॲफिडेव्हिट करून स्वतःचे नाव बदलून घेतले. मनोहर खुबाळकर नावाने नवीन विश्व सुरू झालं. गाव सोडून नलीबांगला सोडून बरीच वर्षे झाली होती. तरीही कधीकधी संध्याकाळी समुद्रकिनारी बसल्यावर, मनोहरला नलिबाग आठवे. आठवणींचा समुद्र हा त्याला त्याच्या मनात गाज करी.

मनोहर ला सारखं वाटायचं व्यक्त-अव्यक्त यांच्या सीमारेषेवर मन आहे. दुसरे विचार करत मनोहर तासन्तास समुद्रावर बसे.

*wrong number part 3

या समुद्रकिनारी मनोहरला अशी मुलगी भेटली, जी शोभा सारखी दिसत होती. मनोहरच्या मनात पत्नी आपल्या बहिणी सारखी असावी हा भाव होता. या नव्या जीवनात आलेल्या मुलीबरोबर, मग मनोहर रमला. कधी मुंबईत कल्पना भेटायला यायची. हा, मनोहर सुद्धा आजरा ला शनिवार-रविवार सुट्टीचा जाई. कल्पना गिरगावला येई, जाई. दिवस चालले होते.

भाग 4

लग्न करायचं लग्न!आज या देशात तरुण-तरुणींना लग्न करायचं असेल तर सोपं नाही. गरज भरपूरच आहे पण सोय नाही. पूर्वी प्रत्येक लग्न, मध्यस्थ कुणीतरी नातलग यांचे मार्फत ओळखीतून जुळत असत. आता तर विवाह मंडळ आहेत पण

तरीही सोय होतेच असं नाही. बऱ्याच ठिकाणी अजूनही अशा संसार संस्था त अनेक गलत नंबर पण लागतात. लोक तात्पुरते समाजात, जीवनात येतात. विचार व्यभिचार करतात, संबंध ठेवतात सोडून देतात.

लग्न फसवणूक असु शकते. लोक प्रेम संबंध जुळवून सहजपणे मजा मारुन पुन्हा दूर करतात. सोबत राहून सोडून देतात.

ऑफिसमधल्या एका बाई बरोबर मनोहर चे जमले. संबंध वाढले. मात्र ही स्त्री, आशा नवरा वारल्यावर नवर्याच्या जागी नोकरी वर अनुकंपा तत्वाने बँकेत लागली होती. आशा मनोहर सोबत काम करत होती होती. तिला तिचा मुलगा सुद्धा होता. त्या स्त्रीवर प्रेम बसले. संबंध आल्यावर मनोहर ने विवाह बद्दल विचारलं, तर ती आशा दुसऱ्या लग्नाला नाही नाही करू लागली.

“बीज_वधुशी लग्न?नको. ”दुसरे मन

“वडिल दुसरे लग्न, पहील्यांदा लग्न असणारी शी करु शकतात तर आपण पहिल्या लग्नाच्या वेळी दुसरे लग्न असलेल्या लग्न का करू शकत नाही?”एक मन म्हणत होते.

“ तुझं प्रेम असेल तर ठीक आहे, तुझी इच्छा तुझ्या सोबत नाही मी लग्न करणार !”मनोहर

“आहे यात आनंद मान”आशा.

दोघे भांडू लागली. रुसणे मनवणे झाले, आशाने ब्रेकअप केला.

मनोहर समुद्रकिनारी बसल्यावर सर्व आयुष्य आठवत आढावा घेत बसला. बरेचजण आयुष्याच्या वाटेवर रॉग नंबर भेटले.

टेलिपाथी आणि नवल म्हणजे या दिवशी सुद्धा कल्पना त्याला ऑफिसच्या जागी, समुद्रकिनारी शोध घेत आली. मनोहर समुद्रकिनारी नाही म्हणून नाराज परत निघाली असता मनोहर अंधारात दिसला.

‘‘मन छोट करू नको. घरी चल’’कल्पना.

कल्पना सोबत मनोहर त्याच्या खोलीवर आला. फोनवर ईद साठी सुट्टी टाकून निघून आला. नलिबागला !तरी नलिबागला त्याला कोणी ओळखत नाही. सहज आलो सांगून तो परत फिरला. शोभाच लग्न झाले होते. ती मुंबईत होती. आजऱ्याला गेल्यावर मनोहर ने कोळी काकाना सांगितलं ‘‘मी कल्पना चे मन दुखवले. पण कल्पना शि लग्न करायला मी तयार आहे. ’’

कल्पना ने ठिक आहे असे सांगितले. कल्पना आणि मनोहर चा म्हणूनच साधेपणाने विवाह झाला.. कल्पना मनोहर सोबत

मुंबईला त्याच्या गिरगावच्या खोलीत राहायला आली आणि संसार सुरू झाला.

नव्या नवलाईचे काही दिवस झाले नंतर मात्र हा सर्व इतिहास माहीत असल्यामुळे कल्पना मनोहरला टोमणे मारु लागली. मनोहर ला परत आशाची मैत्रिणी ची आठवण येत होती म्हणून त्याने मैत्रिणीला फोन केला. मैत्रिणीने आशाने फोन उचलला व राँग नंबर म्हणाली. व्यक्ती रॉंग होती. नंबर बरोबर लागला होता. त्याला देखील राँग नंबर म्हणून म्हटलं जातं.

कल्पना शी भांडत संसार चालू आहे. मुलगी झालीय. पण कुणाचे कुणाशी पटत नाही. सर्व रॉग नंबर होते.

**

# कोरोना वारियर मैत्रीण

एका करोना वॉरियर ची कथा बघा

.

मी ज्योति, नोकरीवर जाते,. नोकरी चालू होती आणि लेखन देखील चालू होते प्रतीलीपी ॲप वर मी वेगवेगळया केलेल्या टूर वरती लेखन करत होते. त्यामध्ये कैलास मानस सरोवर झाले. काश्मीर लेह लडाख झाले. केरळ कन्याकुमारी झाले आणि आता मी गुजरात टूर टाकण्याच्या विचारात होते आणि अचानक मला दहा दिवसाचा covid-19 **-- येथील हॉस्पिटलचा दौरा दुर्दैवाने करावा लागला. त्या दहा दिवसाच्या दरम्यान शरीरावर आणि मनावर काय काय आणि कसे परिणाम झाले याचेच मग मी लेखन सुरू केले आणि आता ते वाचकांसाठी एक अनुभव म्हणून पाठवत आहे. तुम्हाला वाचायला आवडेल अशी खात्री

25 सप्टेंबर 2020

मंगळवारी डोकेदुखी होती. अंगदुखी वाटली, बुधवारी दिवसभर ताप आला. गुरुवारी सकाळी ब्लड टेस्ट आणि संध्याकाळी covid-19 ची टेस्ट केली. दिवस थोडा धाकधूक गेला. शुक्रवारची 25 सप्टेंबर तारीख उजाडली, तशी मी बरी

Asymptomatic होते. त्यामुळे मला असं काही टेन्शन वाटल नाही. सकाळचा नाश्ता नीट झाला, पण दुपारी स्वयंपाक उठत-बसत, कसातरी मुलाच्या मदतीने केला आणि आता जेवायला बसणार होते, तेवढ्यात लॅब मधून डॉक्टर प्रभू चा फोन आला. “मॅडम तुमचा करोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आहे” आणि ते शब्द एखाद्या तापलेल्या शीशा प्रमाणे कानात शिरले. क्षणभर काही सुचेना. पायाखालची जमीन सरकली. मटकन बसुन घेतले. त्यानंतर मुलाला करोना बद्दल सांगितले. मिस्टर नाईट करुन नुकतेच येऊन झोपलेले होते. त्यांना उठवुन मग त्यांनी सांगितले. मुलगा, मी आणि आमचे पतीदेव दीपक, प्रतिक्रिया म्हणुन सगळयांची रडारड सुरू झाली.

तिकडे ***- हिल हॉस्पिटलमध्ये छोटा मुलगा काम करतो, त्याला कळवले. तो पण रडू लागला. त्याने मला राहून राहून एकच सांगितले आई माझ्याच हॉस्पिटलमध्येच ॲडमिट व्हायला ये. इकडे तिकडे जाऊ नको! मी स्वतः येथे सेवा देईन, लक्ष देईन.

मी सुन्न झाले होते, घरातले सगळे सुन्न झाले होते. काय करायचे, काय कपडे भरायचे, कोणाला काही सुचेना. वातावरणात एक प्रकारचा गुढ तणाव भरून राहिला होता. मुलाने आणि मिस्टरांनी हाताला येतील ते कपडे बॅगेत भरून ठेवले.

तिघे जण कसबसं जेवायचं म्हणून जेवलो आणि रुग्णवाहिकेची व्यवस्था करायला आमच्या एरियातील माजी नगरसेविका*** यांना सांगितले. त्यांनी व्यवस्था केली पण तो गाडीवाला आता येतो, मग येतो म्हणत शेवटपर्यंत आलाच नाही. "आता बिग बाजार मध्ये आहे, आता ट्राफिकमध्ये आहे, आता सिग्नल ला आहे "असं करत त्यांने अजून आमच्या तणावात भर घातली. ते तीन-चार तास खूप टेन्शनमध्ये गेले. शेवटी अती ताणल्यावर मी पति देव त्यांना म्हटले

"आपली टुविलर काढा. मी दुचाकी गाडीवर बसून यायला तयार आहे. "मी

घरी फोरविलर आहे पण अशावेळी ते दोघे पॅनिक झाले होते. मुलगा म्हणाला, " आई या परिस्थितीत मी गाडी चालवू शकत नाही. आणि मुंबईच्या ट्रॅफिक मध्ये मनस्थिती ठीक नसताना बाबांना पण ते जमणे अवघड होते.

टू व्हीलर वर आमचा भरपूर विश्वास आहे. टू व्हीलर वरती आम्ही शिर्डी पर्यंत जातो. त्यामुळे पतिच्या गाडी चालवण्यावर विश्वास होता. शेवटी बॅग पायात घेतली आणि दोघानी मास्क लावून घेतले. मी स्वतःचा चेहरा रुमालाने बांधून दोघे ***-कडे निघालो. हॉस्पिटलात छोटा मुलगा माझा बेड वगैरे रिझर्व करून

वाट पाहत होता. त्याने बातमी कळल्यापासून एक घास देखील तोंडात घातला नव्हता. मी त्याला चार वेळा सांगत होते,

“बाळा मी चांगली आहे. तू खाऊन घे” पण त्याने ऐकले नाही. शेवटी जेव्हा मला ॲडमिट केले. त्यानंतर त्याने खाल्ले.

मी बेडवर विचार करत निजले. हा एक अनुभव आला. मंगळवारी कामावरून आले तीच प्रचंड डोकेदुखी घेऊन, मनात आले नेहमीप्रमाणे एलर्जी असेल, सर्दी असेल, त्यामुळे जास्त काही टेन्शन घेतले नाही.

आता मी डबल करोना वॉरियर आहे. एकतर मी स्वतः आरोग्य खात्यात नर्सिंग ऑफिसर या पदावरती काम करत असल्याने, मी कामावर जातच होते. मला स्वतःला ब्लड प्रेशर, डायबिटीज कोलेस्ट्रॉल या सगळयांच्या गोळया चालू आहेत. परंतु मी घरांमध्ये बसले नाही. मी विचार केला “मी या मुलींची परिचारिकांची लीडर आहे जर मी घरात घाबरून बसले तर मुली त्यात काय शिक्षण आदर्श घेतील?”. म्हणून मी कामावर जात होते. जवळ जवळ सहा महिने कोरोना फाईट करत होते. जे लोक मुंबईला राहतात त्यांना माहित असेल ठाणा ते मालाड या काळात किती कालावधीत, कसे ड्यूटीवर जाणे किती रिस्की आहे. परंतु मी माझ्या स्वतःच्या मनाने जात होते.

असो त्या दिवशी या कोरोना नावाच्या विषाणूने- राक्षसाने मला गाठलेच आणि माझ्या ध्यानीमनी नसताना अचानक मंगळवारी कामावरून घरी आले तीच प्रचंड डोकेदुखी घेऊन, जी प्रवासाने असेल असे वाटले. त्यादिवशी साधी पेन किलर, सिंपल मी ट्रीटमेंट घेतली. मला वाटले दुसऱ्या दिवशी बरे वाटेल.

दुसऱ्या दिवशी हा ताप आला. दिवसभर तापाच्या गोळया खाऊन निजले. पण ताप 103 डिग्री वगैरे अंगात होता. सगळे अंग प्रचंड ठणकत होते आणि बिछान्यातून उठण्याची देखील ताकत नव्हती. शेवटी कामावरच्या डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यांनी मला काही टेस्ट करायला सांगितल्या. सर मला म्हणाले

“जर या टेस्ट हाय आल्या तर उद्या एक्स-रे आणि सॉब करण्यास सांगितलं. ”बुधवारी दिवसभर मुंबईत धो-धो पाऊस पडत होता त्यामुळे बाहेर पडणे शक्य नव्हते. गुरुवारी मात्र सकाळी सकाळी जाऊन ब्लड टेस्ट केली. दुपारी त्याचा रिझल्ट काय आला. आणि मग सरांनी सांगितले आता एक्स-रे काढून घ्या आणि स्वाब करा. संध्याकाळी कश्याबश्या हालत मध्ये लॅब जाऊन covid-19 साठी स्वाब टेस्ट करून आले.

तरी पण आमच्या दोघांचे विचार सकारात्मक (पॉझिटिव्ह अप्रोच )होता.

“ रिपोर्ट निगेटिव्ह येणार, साधे व्हायरल इन्फेक्शन असणार”मी. हो असे वाटले सुदैवाने कफ खोकला काही नव्हता.

तो दिवस तसाच धाकधुकीत गेला.

पण रिपोर्ट कोरोना पॉझिटिव्ह आला.

मानवी मनाची गुंतागुंत वेगळी असते. टुव्हिलर वरून ऍडमिट व्हायला गेले खरी, परंतु थोड्या साठी बचावले. कारण ++++हॉस्पिटल, तिथे गेल्यानंतर अर्ध्या तासातच मला थडथड थंडी भरून आली आणि ताप देखील चढला.

जर ही गोष्ट रस्त्यात घडली असती तर फारच त्रास झाला असता. कारण ताप आहे म्हटल्यानंतर कोणत्याही रिक्षावाल्याने गाडीत घ्यायला बघितले नसते आणि पुन्हा एखादी अंबुलन्स येईपर्यंत तिथे रस्त्यात बसावे लागले असते. गरीबांचे, एकट्यांचे काय हाल होत असतील ना?घरातून निघताना मोठा मुलगा, सत्तावीस वर्षाचा मुलगा, मला मिठी मारून धाय मोकलून रडला.

“ आई लवकर परत ये तुझी वाट पाहतोय. मला बाईक बुक करायला तू हवी आहेस!” असे म्हणाला, माझ्या स्कुटर गाडी मागे धावत होता, मला फ्लाईंग किस देत होता. शेवटी मी मान फिरवली.

इतकेच काय घरातील आमचा पाळीव कुत्रा ब्रुनो तोदेखील काहीतरी वेगळे समजल्या प्रमाणे अस्वस्थ झाला होता. उगाचच आतबाहेर धावाधाव करीत कु कु करत होता.

यांच्यामागे स्कूटर वरती बसून मी हॉस्पिटल ला ॲडमिट व्हायला गेले तोपर्यंत मला काही वाटले नाही. जर कदाचित कारमधून गेले असते तर मला वातावरणाने डिप्रेशन आले असते. पण रुग्णवाहिकेत सोयी असतात.

पोहोचले, परंतु प्रत्यक्ष हॉस्पिटलच्या दारात नवर्याला बाहेर सोडुन आत जाताना, त्यांना परत जाताना बघताना दोन डोळयांची भाषा काय असते ती मला कळली. अक्षरशः आम्ही दोघे एकमेकाकडे एकटक बघत होतो. जसे काही एकमेकाला डोळयात साठवून घेत होतो.

“ पुन्हा बघायला मिळेल की नाही”मला असं वाटत होतं. त्यातच या माझ्या आजारपणाच्या दरम्यान ओळखीतल्या लोकांचे दोन-तीन घटना अशा झाल्या किती व्यक्ती हॉस्पिटल लास्वतःच्या पायाने चालत गेली पण नंतर त्याचे नख देखील दिसले नाही. त्यामुळे मनात एक प्रकारची भीती बसलेली होती. पुन्हा भेटू की नाही याची शाश्वती वाटत नव्हती. त्यांना सोडून माझा पाय निघत नव्हता. शेवटी मी त्यांना एक गच्च मिठी मारली आणि

“आपण पुन्हा एकमेकांना बघू का?” असं विचारलं दोघांच्या डोळयातून अश्रुधारा वाहत होत्या.

ते घराकडे वळले. नंतर मला म्हणाले “मी कसा रडत घरापर्यंत आलो मला कळले नाही “आणि मी वरती हॉस्पिटल ला ॲडमिट व्हायला गेले.

मुलांने ऍडमिशन प्रोसिजर पूर्ण करून घेतली. मला वार्ड पर्यंत सोडले. त्याला पण आत यायची परमिशन नाही. वार्डमधील रिसेप्शनला फॉर्म भरताना मला थडथड थंडी वाजून आली. त्यामुळे मी तेथील स्टाफला सांगितले वैद्यकीय भाषेत मी सांगितले

“ मला शिवरिंग(थंडी भरून येणे) होते आहे. ”मी झोपायला गेले त्यानंतर अनुभव फार वाईट होता. अंगात फणफणून ताप होता. डोकं दुखत होत. अंग दुखतं होत आणि मी अक्षरशः ब्लॅंकेट घेऊन देखील उडत होते. परंतु मला बघायला तीन तास कोणीही आले नाही.

नजरेची भाषा
त्या दिवशी माझा
covid-19 पॉझिटिव आला
आणि तुझ्या डोळयात
मला भूकंप दिसला

हॉस्पिटलच्या दारात
एकमेकांना सोडताना
आवरले नाही अश्रू पापण्यांना
मनाला जाळत होती शंका
याची देही याची डोळा
पुन्हा भेट होईल का?
नजरेत नजर गुंतलेली
न बोलता एकमेकांना
बरंच काही सांगून गेले
डोळे घळा घळा वाहताना!
न बोलता बोलत होते
साठवत नजरेत एकमेकांना
जुने क्षण आठवताना
त्याक्षणी नजरेची भाषा
तु पल्लवित केल्या
मनी जगण्याच्या आशा
म्हणून कोरोनावर करू मात
आले फिरुन तुझ्या संसारात
आले फिरून आपल्या घरट्यात!!

परमेश्वराचा हात जाणवला. जरी डॉक्टरी प्रयत्न असले. तरी त्यामागे परमेश्वरी अधिष्ठान लागते. परमेश्वराचा हात लागतो. तरच अशी मिरॅकल्स होतात.

मी हॉस्पिटल ला जाताना सोबत "हरिविजय" घेऊन गेले होते. माझा माझ्या कृष्णावर दृढ विश्वास होता. मी त्या देवाला सांगितले होते

"कृष्णा तू माझ्याबरोबर आला आहे आणि तू मला परत घरी घेऊन जाणार आहेस. "

मुळात आमचं सगळं घरदार, देव मानणार आहे. देवधर्म, कुळधर्म कुळाचार सर्व काही करणार आहे. सर्वांचा आमचा त्या जगनियंता परमेश्वरावर भरपूर विश्वास आहे. दृढ विश्वास आहे.

मी आजारी पडल्यापासून तिसऱ्या दिवशी मोठ्या मुलाने गुरुचरित्राचे पारायण मांडले. त्यासाठी सात दिवस उपवास पण केला

मिस्टरांनी देखील आमच्या गुरु घराण्यातील पूर्वजांचे त्यांच्या पोथीचे पारायण मांडले. आमचे गुरु घराणे आहे (आनंदमूर्ती रघुनाथ स्वामी) यांची कृष्णा तीरावर सांगली गाव ब्रह्मनाळ येथे समाधी आणि मठ आहे. माझ्या सर्व नातेवाईकांनी, इष्ट मित्रांनी,

माझ्यासाठी भरपूर प्रार्थना केल्या. मला अतिशय मानसिक सपोर्ट दिला. सर्वांनी एकच सांगितले

"ज्योतीताई तू फायटर आहेस. तू लढवय्या आहेस कोरोनाला जिंकून त्यावर मात करून घरी येणार. " असा मला विश्वास दिला.

मंडळी कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही परंतु एक दिवस अतिशय क्रिटिकल झाले आणि वाईट गेला.

असे तर मला रोजच ताप आणि थंडी एका ठराविक टायमाला येत होती. पण 27 सप्टेंबर रविवार या दिवशी खरोखरी काळ आला होता पण वेळ आली नव्हती. मला रात्रभर चित्र विचित्र दृश्य, आभासी दिसत होती. त्यामध्ये एक अतिशय उंच उंच दहा बारा फूटांचा काळा बुरखा पांघरलेला ड्रॅक्युला सारखा माणूस वाकून वाकून माझ्याकडे बघत होता. गुढ आणि सतत मला काहीतरी भीती वाटत होती. सकाळी पावणेपाचच्या सुमारास घरातील सर्वच माणसांना एक वाईट सेन्सेशन वाटत होते.

चार ठिकाणी असणारी चार माणसे परंतु त्यांना एकाच वेळी, मला तब्येतीला काहीतरी धोका असल्याचे सेन्सेशन वाटले.

मी मनापासून कृष्णाची आळवणी केली.

" कृष्णा! कृष्णा! तू मला घरी घेऊन जाणार ना?"

त्याच दिवशी संध्याकाळी मी खूप डिप्रेशनमध्ये गेले होते. अक्षरशः माझे मला, स्वतःला, मी वाचणार नाही असे वाटत होते आणि मी खूप रडत होते. फोन वरती मित्रांशी, मुलाशी, बहिणीशी, सर्वांशी बोलताना मी फक्त आणि फक्त रडत होते. पण काय सांगू तुम्हाला? मला स्वतःला तरी एक चमत्कारच दिसला आणि माझ्या उशाला श्रीकृष्ण देव रत्नजडीत सिंहासन टाकून बसले आहेत असे दिसले.

त्याच क्षणाला छोट्या मुलाला,

“आईला म्हणजे मला अटॅक आला आहे आणि तो मला सिपीआर देत आहे" असे स्वप्नात दिसले. दुसऱ्या क्षणी त्याला देखील कृष्ण दिसला.

मोठा मुलगा घरात एकाएकी दचकून जागा झाला. त्याला देखील असेच काहीतरी वाटून गेले. असो तुम्हाला विश्वास वाटो न वाटो पण हे माझ्या बाबतीत घडलं खरं.

25 तारखेला संध्याकाळी ॲडमिट झाले तो दिवस खराब गेला तीन तास मी थंडी तापाने उडत होते. सगळे अंग दुखून येत होते परंतु या कालावधी मध्ये कोणीही माझ्या रूम मध्ये फिरकले नाही.

कदाचित त्यांचा तो मधला ले पिरेड, ब्रेक असावा.

त्या दोन-चार दिवसात नशीब देखील खूप खराब होते. माझी रूम शेअरिंग पार्टनर होती. ती पण covid-19 ची पेशंट होती. तेथेच काम करणारी स्टाफ नर्स होती.

पण नवीन जनरेशन ला जराही माणुसकी कशाशी खातात ते माहीत नाही, असे मला वाटले. (सर्वच नवीन जनरेशन असे असते असे नाही) त्या मुलीने चार दिवसात एक शब्दाने देखील संभाषण केले नाही. मग तुम्हाला काय होते?असे विचारणे लांबच. तिच्या त्या अटीट्यूडचे मला फार वाईट वाटत होते. माझ्या नर्सेस अशा असू शकतात यावर माझा विश्वास बसत नव्हता. मी सारे आयुष्य, तेहतीस वर्षे नोकरी फक्त नर्सेस साठी, त्यांची बाजू घेऊन भांडण्यात घालवली. मी युनियनचे काम केले आहे. त्या नर्सच्या त्या वर्तणुकीने माझ्या मनाला फारच क्लेश होत होते.

असो. त्यानंतर रात्री डॉक्टर आले माझ्या वरती उपचार सुरू झाले होते, एक्स-रे झाला, दोन वेळा सिटीस्कॅन झाला. औषध उपचार सुरू झाला.

प्रत्यक्षामध्ये covid-19 या विषाणूसाठी कोणतीही खास ट्रीटमेंट किंवा त्याची गाईडलाईन उपलब्ध नाही. सध्या त्यावर steroid देतात. त्यांनी Antibiotics, steroids, tonics,

tamiflu या सर्व प्रकारच्या गोळ्या सुरू केल्या. शिवाय तापा वरती ट्रीटमेंट चालू होती.

प्रश्न फक्त एक होता, कोणती गोष्ट वेळेवर मिळत नव्हती. तिथे जाऊन तिथल्या नर्सेसला ओरडून, थोडीशी दादागिरी करावी लागे. शिवाय माझा मुलगा तिथेच असल्याने तो सतत आढावा घेत होता आणि एकंदरीत बऱ्यापैकी ट्रीटमेंट चालू होती.

मात्र संध्याकाळी पाच ते सात या कालावधीमध्ये ताप यायचा. त्याने पूर्ण शरीर पिळवटून निघायचे. एक प्रकारे मी त्या तापाची आणि त्या वेळेची धास्ती घेतली होती.

ज्या रुग्णांना मुळातच डायबेटिस ब्लडप्रेशर इत्यादी गोष्टी असतात, त्यांच्यासाठी covid-19मधून बरे होणे सोपे नाही. कारण steroid ट्रीटमेंटने ज्यांना शुगर नसते त्यांना पण शुगर निघते आणि डायबेटीस पेशंटची शुगर सतत वाढतच जाते. सतत दिवसभर वर खाली असते. शुगर सकाळी 200 असेल तर संध्याकाळी 500 निघते.

यासाठी सोपे उदाहरण म्हणजे आम्ही आदिवासी भागांमध्ये स्नेक बाईट चे पेशंट ट्रिट करायचो, त्यामध्ये अस होत एखाद्या पेशंटला इंजेक्शनचीच एलर्जी असते. पण रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी ते देणे गरजेचे असते अशा वेळी आम्ही एका

बाजूला स्नेक बाईट चे इंजेक्शन द्यायचो, तर दुसऱ्या बाजूला, इंजेक्शन टोचायचो. अशीच परिस्थिती डायबेटीस पेशंट ची होते. शुगर वाढली तरी त्याला steroid द्यावेच लागते आणि ती साखर कमी करण्यासाठी इन्शुलिन द्यावे लागते.

काही इतर नॉर्मल पेशंटसाठी ठीक आहे, ते सांगतात आम्ही पाच दिवस आराम केला. खाल्ले पिल्ले दूध घेतले, अंडी घेतली पण आमच्या सारख्या high risk रुग्णाला मात्र सोपं नसतं. अन्न

जेवण मात्र खाल्ले जात नाही. फक्त तुमच्या मनाची उभारी ठेवायची. मनाने खंबीर राहायचे आणि मला काही न होता मी पुन्हा घरी जाणार आहे, हे सतत स्वतःला बजावायचे.

त्यामुळे मी असा सल्ला देईन, हाय रिस्क रुग्णांनी आजार अंगावरती काढू नये, वाढे पर्यंत, दम लागेपर्यंत घरात बसू नये. ताबडतोब डॉक्टरकडे जावे. गोसावी

प्रेषक

**-

# काव्याची गोष्ट

एका सत्य घटनेवर आधारित ही काव्याची गोष्ट मी सांगते.

मी काव्याची आई सोल भाभी!मीही कथा सांगते. एक मुलगी अलका आणि एक मुलगा अभिराम असल्यामुळे परत मुलासाठी संधीं घेण्याची इच्छा माझ्या मनात नव्हती.

पण लवकरच अभिराम खूप आजारी पडला. डॉक्टर झाले. ईस्पितळ वार्या केल्या. तपासणी त लक्षात आलं अभिराम ला मेजर थॅलेसेमिया झालेला आहे. या आजारात रक्त तयार होत नाही. अभिराम माझा अति लाडका होता. पण त्याची वाढ होईना आणि तो गोरा पण पांढुरका दिसे. त्याला बोलले तरी थकवा येई. दरमहा रक्त देणे आवश्यक होऊ लागले. रक्तदाते रक्त द्यायचे. पण वेदना होत.

डॉक्टर म्हणाले

“25 लाख खर्च येईल. पण बोन मॅरो मिळाली तर अभिराम ठणठणीत राहणार आहे. बोन मॅरो देणारा डोनर दाता हवा होता. जाहिरात दिली. आमची घरच्यांची बोन मॅरोची तपासणी केली. रिपोर्ट आले. डोनर म्हणून आमचे बोन मॅरो चालत नव्हत्या. दुर्दैवाने मोठ्या बहिणीची किंवा ईतर मुलांची, माझी, यांची कुणाची सुद्धा

बोन मॅरो मॅच झाली नाही. ठीक आहे. अवयव दान संस्थांमध्ये मागणी केली आहे. बोन मॅरो देणार्या ची वाट बघत होतो. पण एक वर्ष दाता मिळाला नाही.

रक्त सुद्धा कधी कधी सहज मिळत नसे. रक्त द्यायला शिर सापडत नाही. रक्त दिल्यानंतर बाळाच्या वेदना बघवत नाहीत. एके दिवशी मी मनाशी निश्चय करून नवऱ्याला म्हणाले.

“आपण परत एक संधी घेऊ या. जे बाळ, सॅव्हर बेबी, होईल त्याची बोन मॅरो अभिजीतला वापरु या. अभिजीत साठी ते करायला हवे. ”मी

“बाप रे, अगं काय वेड्यासारखे बोलतेस. ते येणार बाळ थॅलेसेमिया मेजर जन्माला आले तर?”नवरा.

“गरोदरपणी तपासणी करून कळेल. आज डॉक्टर शी बोलु या”मी “अभिरामच्या वेदनांची, किंचाळयांची आठवण कर. वेडेपणा नकोय. नव्या बाळाच्या वेदना बघवणार नाही”. नवरा

“अभिराम ला जगवण्यासाठी मला ते रक्षक बाळ, सॅव्हॉर बेबी जन्माला घालण्याची गरज आहे. “मी

“बायको अग ऐक!नव्याने मरण यातना बघण्यासाठी मला ते नको आहे”नवरा

“गर्भात तपासणी केली, जर तो गर्भ थॅलेसेमिया मेजर असेल तर बाळ ठेवायचं नाही. गर्भपात करायचा”मी

“ मला नव टेन्शन जन्माला घालायचे नाही”नवरा.

“सरोगसी करायची”मी

नवर्याने नाही सांगितलं पण मी ऐकले नाही. डॉ सॅव्हॉर बेबी प्रयोगाला तयार झाले. वैद्यकीय विविध आधुनिक उपायांनी, सरोगसी ने एक महीला (गर्भाशिय )गरोदर राहिले. गर्भाची जीन तपासणी झाली. बाळ, ओके होते. मी अभिराम साठी ते सर्व केलं. मी चुकले नव्हते. मुलगी व्यवस्थित झाली होती. काव्या नाव ठेवले. सरोगेट मदरचे पोटी काव्या जन्मली. रक्षक म्हणून, बोन मॅरो हवी यासाठी काव्या जन्माला आली. अभिरामला वाजवण्यासाठी काव्याचे बोन मॅरो वापरण्यात आले. दवाखान्यात गोंधळाच्या प्रकाराने, वेदनेने, काव्या रडत होती.

पण अभिरामला बोन मॅरो मिळाल्यामुळे मला त्याचा आनंद वाटला. अभिराम ला बरे वाटू लागले.

ही सरोगेट मुलगी काव्या तब्येतीची बरी आहे. कितीही काही म्हंटले तरी समाजात मुलगा मुलगी भेद असतो.

आम्हाला मोठा मुलगा आणि मुलगी आहे. अभिराम साठी ही रक्षक बळी काव्या जन्माला आणली. मला अपराधी भावना वाटत नाही. आमच्या नोकरांकडे तिघ मुल वाढतात.

तुम्ही म्हणाल समाजात काय चालु आहे?पण असे करणारी काय मी एकटी आहे?डॉक्टरांनी सांगितलं अनेक जण हल्ली अशी मागणी करतात. हल्ली निती भिती ईथिक्स समाजाला जाणवत नाही. My choice म्हणतात. आता अशा अनेक अभिराम आणि काव्या वाढतील.

मुलगी पारंपरिक पद्धती नुसार बळीची बकरी बनते. अशा अनेक काव्या या देशात नकुसा म्हणून जन्माला येतात आणि बळीची बकरी बनतात.

काव्याची गोष्ट इथेच संपत नाही अनेक जण हल्ली त्या डॉक्टरांकडे त्या एका अपत्याला वाचवण्यासाठी दुसरी मुलगी जन्माला घालण्यासाठी येतात.

मुलगा जगायला हवा या विचाराने त्यांचे आई-वडील अनेक नकुसा काव्या जन्माला घालत आहेत.

माझे काहीच चुकले नाही. मी फक्त या सॅव्हॉर बेबी पद्धतीची सुरुवात केली.

# ब्रेक अप

सकाळी एका मैत्रिणीचा फोन आला. स्वघोषित टीकाकार होती. गॉसिप करत होती. कुठल्यातरी नटाचं ब्रेक अप झालं. ब्रेकप म्हणजे खरं तर किती दुखद गोष्ट असते. आमच्या काहीतरी प्रेमभंग झाला की माणसं घळघळा रडायची. कधी कधी हाताची नस कापून अथवा फास लावून मरुन जात. ऊगीच जग सोडून जायची. प्रेम भंगात दुःख त्याकाळी तीव्र असायची. प्रेमभंगाची गाणी,

चांदी की दीवार ना तोडी

प्यार भरा दील तोड दिया !

दोस्त दोस्त ना रहा,

प्यार प्यार ना रहा! ब्रेकअप काय त्या काळात ही गाणी ऊपयोगी पडलेली आहेत. या ब्रेक अप सोंग ने लोकं नैराश्य झटकत उठून ऊभी झाली आहे. पण आज ब्रेक अप कॅज्युअल स्वरूपाच्या रुपात आलां आहे. नंतर एका मैत्रिणीचा फोन आला तिने सांगितल, की नेहमी उपयोगी पडणाऱ्या आपल्या एका पेज 3, चतुर शाळा ची मैत्रीणीकडे आपल्याला गणपती साठी जायचं आहे. तिने पंधरा कोटीचे पेंटहाऊस घेतले आणि तिथे आज आपण जायला हवं. माझ्यासोबत कॉलेजमध्ये असलेली ही मैत्रीण जेमतेम काठावर

पास व्हायची. आता श्रीमंत कशी झाली होती आणि ती नवरा सोबत घेऊन मजेत राहत होती. मी बोर्डाच्या परीक्षेत पहिल्या नंबर वर आले होते. खूप चांगले मार्क पडलेले होते

. शिक्षणात मी कधीही नंबर सोडला नाही. सुवर्णपदक मिळालं होतं. पण मी नोकरी सोडून बसले होते आणि त्यामुळे सध्या वाचनालय व्यवस्थापक म्हणून किरकोळ नोकरी करते आहे.

काही गोष्टी बेत ठरवलेला असतो, त्याप्रमाणे घडतात. तर काहीही बेत न ठरवल्या गेलेल्या गोष्टी पण घडतात. बेत केलेल्या गोष्टी आणि बेत न केलेल्या गोष्टी दोन्ही कधी बिघडू शकतात आणि काहीतरी गडबड कुठल्याही क्षणाला घडू शकते.

आज सप्टेंबर 2020, करोनामुळे मानसिक ताण सर्वांवरच आहे हे कबूल करायला हवं. कारण की ते सत्य टाळून उपयोगाचं नाही. करोना सह 'न्यु नोर्मल' व. उगीच भ्रमात राहून चालणार नाही. वारंवार येणारे नैराश्य, मृत्यू याच्या आणि आत्महत्या च्या कथा आपल्याला हताश करण्याचा साहस दाखवतात. अशा वेळी कोणत्या विषयावर बोलायचं. कोणत्या विषयावर लिहायचं हा पण प्रश्नच असतो. गप्पांचा विषय काढायचा तरी कुठला आत्महत्यांच्या बातम्यांनी पाय गळून जातात. त्याच्याच वर तर आजचे सर्व न्यूज चॅनेल वरचे काम पण चालू असतं. श्वास प्रश्वासात

दम घुटतो. मन हैरान पण होऊ लागतं. सुनिल अशा घटना वाचल्या की वाटते जग कुठे चालले आहे. आपण भारतीय संस्कृतीच्या बढाया मारतो आणि आपल्या देशात ही अशा घटना घडतात. स्त्रिया सुद्धा विषारी असू शकतात. हे सर्व गप्पांचे विषय सतत मध्ये ऐकून माझं डोकं फिरलं होतं. बाईला त्रास असतो तो चुलत सासूचा म्हणजे चुलीचा!खायला काय करायचं. नाश्ता काय करायचं सर्व सर्व त्रास होतो. पाच महीने भांडी घासून आता तर हाताची बोट पण नख पण कुजायला लागली आहेत. अशा वेळी अगदी नाइलाज म्हणून घरचाच अगदी जवळच्या, चतुर ची व्यक्तीच्या घरी ठेवलेल्या गणपतीसाठी त्या दिवशी आम्ही नाईलाजाने गेलो. कधीतरी घराबाहेर पडायला हवं. गणपतीच्या कृपेने आजच सुरुवात करु या. असं ठरवून आम्ही दोघे बाहेर पडलो. आता सध्याला नटायला बोअर होतच आहे. नव काही कित्येक वर्षे खरेदी केली नाही. वाहन नाही अशी करोना मुळे आपली गोची केली आहे. पण जरा बरे कपडे घातले होते. मला सगळ्यांवरच टिका करायला आवडते आणि मला दोष काढायला, कुरकुर पण करायला आवडते. इतरांच्या घटनांची चर्चा सारी करतात. पण आता परिस्थिती वेगळी आहे. सिग्नल ला गाडी थांबली होती. आता मला स्वतःची द्या यायला लागली. अशा परिस्थितीत मी

आहे. करोना महामारीने सर्व जगाची जिरवली आहे, अस म्हणायचं. जणू काय निसर्ग आपल्याला सांगतो

"भाईगिरी करणार्या माणसांचा माज ऊतरवतो" कार जात होती. कार सिमेंटच्या जंगलांमध्ये घोडबंदर रोड ने गाडी चालली होती. दरवर्षीच्या गणपतीच्या गर्दीच्या मानाने ही गर्दी कमीच म्हणायला हवी होती. अशावेळी सिग्नलपाशी गाडीच्या काचेवर कोणीतरी टपटप केली. टकटक गॅगच्या, चोर, हल्लेखोर त्यांच्या अनेक कथा मला माहीत असूनही मी चुकून ती खिडकीची काच खाली केली. फाट् आणि माझे दुर्दैव की त्या बाहेर उभ्या असलेल्या माणसाने माझी चेन खेचुन घेतली. अर्थात ती चेन खोटी होती. पण त्यामुळे त्यानी ति चेन हातात घेतात, त्याला ते सोन खोटे असल्याचा कळल्याबरोबर त्याने ती माझ्या तोंडावर फेकली आणि मला शिव्या द्यायला सुरुवात केली.

इतक्या विचित्र शिव्या मी आयुष्यात काय कधीच ऐकेल्या नव्हत्या, अशा शिव्या त्या माणसाने मला दिल्या. चतुर ची, या नातेवाइकांच्या घरी पोहोचलो. गणपतीची पूजा नाश्ता झाला. याच्या त्याच्या भल्या चहाड्या करणे चाललं होतं. गोसिप जोरात होतं. हजर नसलेल्या व्यक्तीबद्दल वेडेवाकडे सांगितलं जात होतं. इतरांवर कायम टीका करणारी मी आज मात्र गप्प गप्प झाली होते.

जणू काय माझी पण जिरली होती. नाश्त्याच्या वेळी माझ्या शेजारी एक व्यक्ती एक्झिक्युटिव्ह कॉर्पोरेट ऑफिस मधला असावा असा बोस येऊन बसला.

“ मी तुम्हाला पूर्वी कुठेतरी पाहिले आहे आपण पूर्वी भेटलो आहोत का ?”त्या सरांनी मला विचारले.

“ काय सर तुम्हाला माझी मैत्रीण आवडली वाटतं, म्हणून ओळख काढायसाठी तुम्ही तिच्याशी असं फिल्मी डायलॉग टाकत बोलताय.

मैने शायद तुम्हें पहले भी कहीं देखा है !

अजनबी सी हो मगर गया नही लगती हो !वगैरे”चतुर ची

. त्यावर ते म्हणाले, ”यस, तस नाही मी खरंच त्यांना भेटलो, आठवत नाही पण मी यांना दोन वेळा तरी निश्चित भेटलो आहे”

माझा चेहरा साफ उतरला. गेल्या पाच वर्षात मी तीन वेळा या सराना त्यांच्या कॉर्पोरेट ऑफिसमध्ये भेटले होते. त्यांच्या कॉर्पोरेट ऑफिसचे एक छोटी से वाचनालय होते. त्या वाचनालयात लायब्ररियन म्हणून काम मिळावे, अशी माझी इच्छा होती. मी वारंवार विनंती करायला त्यांच्या ऑफिसमध्ये जात होते. दर वेळी ते लोक

“आम्हाला वाचनालय व्यवस्थापकांची गरज नाही” असं सांगून वाटेला लावत होते. त्यांनी मला पूर्वी लग्नाचे वचन देवून फसवले होते।श्रिमंत मुलगी बघून लग्न केले होते।तरीही आथठवत नाही म्हणत होते. लबाड, मला कुठे पाहिलं हे मला आठवत होतं, पण मी ते आता उघडपणे चारचौघात सांगू शकत नव्हते. देवाने आज माझी दुसऱ्यांदा जिरवली होती. जणू काही आज देवाने माझ्या घात वार ठरवला होता. नाश्ता करून पटापट साडेसातच्या दरम्यान मी सध्या जिथे काम करते त्या वाचनालयातील व्यवस्थापकांच्या घरी, आम्ही दर्शनासाठी पोहोचलो. वाचनालयाच्या परिसरात मागच्या बाजूला हे वृध्द व्यवस्थापक राहत होते. वाचनालयात दिवे चालू होते. मी सरांना विचारलं

“सर वाचनालय आजपासून चालू आहे का ?”

“हो गरीब लोक ज्यांना वर्तमानपत्र विकत घेता येत नाही किंवा ज्यांना काही पर्याय नाही अशा लोकांसाठी सोशल डिस्टंसिंग आणि मास्क आणि सर्व नियम पाळून वाचनालय चालू ठेवले आहे. अभ्यास करावा म्हणून विद्यार्थ्यांना पण बसता येते. पण कोणीच खर्च देत नाही. एक दोन व्यक्तीचे येतात. आता आमची वाचनालयाच्या बंद करायची वेळ झाली आहे".

“सर मी करते बंद !हरकत नाही” असं म्हणून मी वाचनालयात आत आले आणि भिंतीवरच्या खिळयाला लटकवलेल्या कुलूप आणि किल्लीचे जुडगा मी हातात घेतला.

“ कुणीतरी एक मुलगी वाचनालयात आली आहे. बघ गेली का? म्हणून नाहीतर तिला आतच ठेऊन चुकून कुलूप लावशील”सर मला म्हणाले.

“ नाही !नाही सर!रोज मी आत फिरून, फेरी मारुन पूर्ण बघते. ”मी सरांना आश्वासन दिलं. मी आत हॉल मध्ये कोण आहे का ?म्हणून बघायला एक चक्कर मारली. पटकन कोणी दिसत नव्हतं. मात्र पुसटसा रडण्याचा आवाज आला. अगदी कोपऱ्यावरच्या एका कपाटाच्या इथे, खाली जमिनीवर बसून, एक तरुणी रडत होती. ऊऊ ऊ, सू सू आवाज, रडण्याचा ऐकून मी चकित झाले. वाचनालयातील कोपऱ्यात कपाटाला टेकुन, इतर नजरेपासून लपुन ही तरुणी का रडते आहे?ब्रेक अप झाला होता का? मी त्या तरुणीच्या जवळ गेले. तिच्या खांद्यावर हात ठेवला. त्या तरुणीच्या हातात एक पुस्तक होतं. ते पुस्तक मला दाखवत ती तरुणी म्हणाली.

“मस्त आहे. मॅडम हे पुस्तक खूप खूप आवडलं !मला भावले. मी खूप खूप रडले. "त्या तरुणी सोबत माझ्या देखील डोळयात

पाणी भरून आलं. त्या कोपऱ्यात लावलेल्या त्या पुस्तकाची लेखिका, मी होते. लेखिका व्हायचं म्हणून जुनी नोकरी सोडून बसले होते. ईथे किरकोळ नोकरी करतेय.

“व्यवस्थापक मॅडम, तुमची कुठे ओळख असेल, तर एखादी नोकरी असेल, तर मला सांगा ना !काय आहे वाचन लिखाण या सगळ्या गोष्टी कल्पनेत सुंदर वाटतात, ठीक आहेत पण प्रत्यक्षात पैसा लागतो. जीवन जगायला नोकरी हवी असते.

कृपया बघा बघण्यात एखादी नोकरी असेल तर मला सांगा!”

“ठीक आहे” असे म्हणुन मी तिला टाळले. तिच्या सोबत वाचनालयाच्या दारातून बाहेर पडले. वाचनालयाच्या मुख्य दरवाज्याला कुलूप लावलं आणि व्यवस्थापकांकडे किल्ली द्यायला गेले. व्यवस्थापकांचे घरी मी निराशेत गणपतीचं दर्शन घेतले.

आज माझा ब्रेकअप झाला होता. माझ्या स्वतःच्या स्वप्नांची !स्वतःच्या असलेल्या कल्पनेशी!मला कोणी ओळखत नाही. शब्द बुडबुडे आहेत.. जगण्यासाठी पैसा हवा हे मी 2020साली शिकले. माझा ब्रेक अप झाला होता.

ब्रेक अप हर्ट्स

***

# पुनर्वसन

केरळमधल्या या ओळख चे व्यक्ती चे घरी, होम स्टे साठी बंगली भाड्याने घेतली, त्या घरी मी पोहोचले. दोन महिन्यासाठी भाडे दिलेली, ऑफिस तर्फे बुक खूप निसर्गरम्य जागा होती.

मी गेले होते त्या दिवशी, परिसरात गडबड होती. जवळच्या अरंबोळ मध्ये एक वडाच झाड, सत्तर वर्ष जुनं होतं. ते झाड रस्ता रुंदीकरणाच्या दरम्यान आणि पावसामुळे पडलं. इतर वगैरे वगैरे कारणं दिली जातात. पण झाड पुन्हा उभारायचे ठरले होते. जेसीबी चे मदतीने झाड सरळ उभे केले. बाहेर काय चाललंय ते बघण्यासाठी त्या जुन्या वडाच्या झाडाचे ढोलीतून, हाय क्लास चंदेरी साप बाहेर येऊन डोकावून गेला. साप दिसला आणि पटकन आत पण गेला. लोक घाबरले. थोड्या थोड्या वेळाने साप बाहेर येऊन तो परत जात असे. बाहेर काय काय चाललय ते बघत होता. पण त्या झाडाने उभे राहून हिम्मतीने, पानांची छत्री डोक्यावर घेतली. जेसीबी चा आधार घेऊन झाड परत उभे राहिले. छत्री सारखी फांद्या ची जाळी त्याच्या डोक्यावर आधार लावून चिकटवण्यात आली. हिरवी पानं नृत्य करू लागली. थोडेसे मलूल

झालेले झाड, टेकुचा हात धरून उभे राहिले. पोपट उडू लागले आणि झाडाचे पुनर्वसन झाले.

मीसुद्धा केरळमधल्या या गावी, नव्याने स्वतःचे पुनर्वसन करायला चालले होते. आयुष्यातील एक मोठी संधी माझ्या हातून निघून गेली होती. माझ्याकडून कोणी माझी संधी चोरली नाही, मी सोडली नव्हती, ती संधि माझ्या चुकीच्या निर्णयामुळे माझ्या अति चांगुलपणामुळे गेली. मी खड्ड्यात उडी मारली होती आणि फसले होते. इतर कोणी आपल्याकडून चोरी करून काही वस्तू घेतली, तर आपण शिव्याशाप देऊ शकतो. पण आपण पैसे दिले, परत देतो सांगून पण त्या काही कारणामुळे दिलेली ती वस्तू, पैसे ती व्यक्ती परत करीत नाही. कारण ही न देता टाळतो, देत नाही म्हणतो. तेव्हा जे होते तेव्हा जीव तडफडतो. ठीक आहे आजूबाजूला बिटींग दि बुश न करता मुख्य मी पॉईंट ब्लांक शुट करते. मी फंडातून काढून पाच लाख रुपये चुलत भावाला देवुन फसले होते. आता साठ वय झाल, निवृत्ती घेतली त्यामुळे मला पाच लाख रुपये कमी झालेली रक्कम फंड म्हणून मिळणार आहे. मला घर घ्यायचे आहे. पण पैसे नाही. नोकरी त एक वर्ष वाढवून देण्यासाठी अर्ज केला आहे. बघू.

त्यामुळे दुःख विसरण्यासाठी ऑफिसचा काहीतरी काम काढून मि, या केरळच्या हॉटेलात आले. हॉटेल सुंदर होतं.

कलात्मक होतं. पण म्हणावं तर खूप गोष्टींची गर्दी केली होती. खूप वस्तू खूप पुतळे गिचमिड होती. कुंड्या नी जागा अडवून घेतली होती. खास थीम असा काही मुख्य सब्जेक्ट अथवा त्याला ती आर्ट नव्हती. बॉडी पार्ट नृत्य न करता पसरावे तसं होतं. क्षितिजरेषा सरळ दिसत होती. सोबर रंगात पांढरे काळे रंगाचे ते कार्यक्रम होता. नजरेला शांत करत होती ती हिरवळ.

खोली ताब्यात घेतली. खोलीत सामान ठेवले. ऑफिसने एक वस्तू मशीन कुणा भाम नावाच्या कंपनी चे तरी गळयात विकायची, मशिनरी विकायचं काम दिल, मी घेतलं होतं. त्या केरळच्या भाम ऑफिसचा पत्ता शोधला आणि तिथे जायला निघाले. केरळचे रस्ते छान होते रस्त्यावर तर पेट्रोल पंपावर सुद्धा महिला काम करत होत्या. हसत खेळत बागडत होत्या लोक आनंदी होते. खूप श्रीमंती नव्हती मुंबईसारखा बघत राहावा असा फॅशन शो नव्हता. झकास कपडे नव्हते पण लोकांच्यात एक प्रकारचा आनंद होता.

मला आठवतंय, पूर्वी एक खन्ना कुटुंब, त्यातली मुलगी घरी भांडण झाले म्हणुन पळुन केरळला जाऊन राहिली होती. वेटर म्हणून काम केलं. इतके श्रीमंत घरची मुलगी पण तिथे खुशीत राहिली. नंतर कधीतरी पैशाची गरज पडल्यामुळे केली एटीएम कार्ड वापरलं आणि पकडली गेली. तिला परत आणण्यात आलं.

त्यावेळी तिला भेटायला मला आई घेऊन गेली होती. कारण की आईचे मनात भीती होती, आपली ही पोरगी असं काही विचित्र वागेल की काय?

मी तिच्याशी, खन्ना शी गप्पा मारल्या तेव्हा ती मला म्हणाली, '' जीवन म्हणजे काय असतं ते मला केरळाला जाऊन कळलं. लोक छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मानतात. वेलकम जिंदगी करतात. छोट्या छोट्या गोष्टींचे स्वागत करतात. तर आपल्याकडे मला जे मिळवायचं होतं, ते मिळाले नाही, सारखी चिडचिड करतात. कशातच आनंद मानत नाही. हाती सगळं असतानाही, ते नाही किंवा अजून हे हव होतं त्याबद्दल कुरकुर करत राहतात. ''ती

''थोडा आहे थोडे की जरुरत है जिंदगी फिर भी हा खूबसूरत है असं म्हणणारे लोक होते का?''मी

''हो!मला जीवन जगण्याची कला, शास्त्रीय संगीत आढळले. मी तिथे राहायचे म्हणत होते. ''ती.

''पण तस काही घडलं नाही. मला परत आणल''ती.

ती तरुणी नंतर परदेशी राहायला गेली तिच पुनर्वसन झाले, स्थलांतर केल्यामुळे पुनर्वसन होतं, असे भाव माझ्याही मनात बसले. म्हणून तर मी पुनर्वसन करण्यासाठी आज केरळला राहु

इच्छित होते. कामासाठी रेलवेने केरळा कोचीला आले होते. आई वडिलांचा मृत्यू झाला. मी निवृत्त होणार होते. त्या दरम्यान पैसे मला वाटले आधार मिळेल म्हणून मी दिले. पैसे दिले गेले होते. "आता मी रस्त्यावर पडली आहे भाऊ विचारत नाही. " अशा वाईट शब्दात माझ्या ऑफिसच्या मधले लोक माझ्यावर टीका करत असताना मी ऐकले. या ऑफिसमध्ये मी ईतकी वर्षे नोकरी केली. या ऑफिसमधल्या सहकाऱ्यांना मी वेळोवेळी मदत सुद्धा केली. त्या लोकांच्या मनात अविवाहित साठ वर्षांचे माझ्याबद्दलचे भाव ऐकुन, शब्दाने मनाचा तळ ढवळून काढले. मी हादरूनच गेले होते. आता निवृत्त होणार मी एकटी बाई, आई वडील वारलेले, भावाने आता दगा दिलाय. कठोर जगात काय करणार होते?

राहती जागा हवी तो एक प्रश्न तरी निदान सुटावा, एक वर्ष वाढवून मिळावे, किंवा अन्य काही तरी काम मिळावं. केअरटेकर म्हणून होस्टेलवर ठेवून घ्या व ईतर अश्या वेगवेगळया मागण्या मी माझ्या ऑफिस ला, माझ्या तर्फे करत होते. पण मला कोणीही दाद देत नव्हतं. गरज असलेल्या माणसांना मदत न करणे ही हल्लीच्या कॉर्पोरेट जगतातले पद्धत झाली आहे का ?कुठे दुसऱ्या गावी राहाव बदल म्हणून जावं म्हटलं तरी सगळीकडे पैसा हवा असतो. पैसा आणायचा कोठून ?हा पाच लाखाचा खड्डा घेऊन मी कुठे जाणार होते ?पाच लाख जर माझ्याकडे असते तर निदान महिन्याला पाच

हजार रुपये व्याज मिळाले असते. ते कुठेतरी भरून मी आता काही काळ तरी राहू शकले असते. पण सगळेच प्रश्न निर्माण झाले होते. साहेबांना खूप विनंती केल्यावर साहेब म्हणाले,

“भामाचे ऑफिस मध्ये, केरळमध्ये जा. काम झाले तर एक वर्ष वाढवून देता येईल. “

मी आशेने आले होते. केरळच्या हिरव्यागार हवेत फ्रेश वाटलं. सकाळी कॉफीचा वास, गवती चहाच्या फिनाईलने स्वच्छ धुतलेले वरांडे मन थोड आनंदी झालं. सकाळ तरी प्रसन्न होती. उदास वाटत नाही. समोरच काल उभारण्यात आले होते ते झाड ताजतवानं दिसत होतं. पोपट ओरडत होते.

मी त्या भामा ऑफिसमध्ये गेले. ऑफिसमधल्या साहेबाला माझ्या खर्चा ने त्याच्या पि ए सहला जेवण दिलं. कारण की हे एक कोटीचे मशीन विकले जाणे हे मला पुढे मिळणाऱ्या एक वर्षाच्या वाढीसाठी आवश्यक होतं.

अर्थात तिथे काय डोसा आणि कॉफी जास्त खर्च पण नाही आला आणि लोक साधी होती. त्यांनी माझं सगळं ऐकून घेतलं. मी कुठे राहते वगैरे चौकशी केली. आमच्याकडे नोकरीला या अशी सुद्धा एक प्रकारे सूचना दिली. बर वाटल.

पण ऑर्डर दिली नाही. एक महिन्याचा मुक्काम दोन महिन्यापर्यंत वाढला. या आठवड्यात ऑर्डर देतो पुढच्या आठवड्यात ऑर्डर देतो असं सांगत बरेच दिवस काढले. ऑफिस बॉस मला सांगितलं की, ''

तीस तारखेला शेवटचा दिवस आहे. त्यांनी ऑर्डर देवो न देवो तुम्ही परत या. तुमचा पुढचा खर्च आम्ही करणार नाही. '' त्यामुळे मी सामान भरलं. केरला कोचीला बाय-बाय करायचं ठरवलं होतं.. त्यामुळे मला असं वाटलं आता माझं देखील पुनर्वसन होणार.

“30चे आत, आठ दिवसात तुम्हाला राहायला परवानगी आहे. तुम्ही परत या. '' असं धमकीवजा पत्र मेलवर माझ्या ऑफिस नि मला पाठवले. मी लॅपटॉप घेऊन, त्या मामा कंपनी सरां ना भेटायला गेले. एक कोटीचे मशीन मला विकायचं होतं. त्यांच्या ऑफिसमध्ये पोहोचला.

“ आज तुम्ही मला निश्चित काही ते सांगा “मी

ऑफिसमधल्या सरां चे एकदम रूप बदललं.

“मॅडम एक कोटीची गोष्ट खाए वाटली का तुम्हाला ?तुम्ही परत येऊ नका. आम्हाला काय उत्तर द्यावे ते मेलने पाठवतो. मशीन रिकाम जाते. नवीन नको. आम्ही ऑफिसला मेल पाठवू. करोना

मुळे (2019)तोटा घेणाऱ्या कंपनीला चालू असलेल्या लोकांचे पगार देण होत नसताना, जागतिक मंदी असताना करोनाचा थैमान असतांना आम्हाला मशीन नको. ”

त्या लोकांची एक कोटीचे मशीन विकत घेण्याची थोडी शक्यता कमीच होती. पण मोठ्या मोठ्या गोष्टी करणारे सरकार कर्ज मिळेल अमुक-तमुक मिळेल सांगते. त्यामुळे मला वाटत होतं की कर्ज काढून ही कंपनी मशीन घेईल. पण त्यांनी मला निरोप दिला.

ऑफिसने सांगितलं की

" तुम्ही एकही दिवस कोची ला राहिलात तरी खर्च आम्ही करणार नाही. तुम्हाला निवृत्त करण्यात आलेले आहे. तरी आपण आपले पाच लाख उसने घेतले होते ते वजा जाता उरलेल्या रकमेचा निवृत्तीचा चेक घेऊन जावा. आपणास निवृत्त जीवनाच्या शुभेच्छा. दुर्दैवाने आम्ही आपणाला एक वर्षाचे पुनरुज्जीवन देऊ शकत नाही. धन्यवाद शुभेच्छा!

कॉर्पोरेट ऑफिस. या ऑफिसच्या नितीन सर्व बसत. जोड्यान एवढे मारायचं, खाली शुभेच्छा म्हणायचं.

मी परत निघाले. रिक्षा केली. होटेल मध्ये आले. वाटेत वडाचे झाड परत पडले होते. लोक जमले होते. आता मूळ सुकली होती.

“ ठीक आहे जुनी खोड टिकणे कठीण!”रिक्षावाला म्हणाला. वडाचे वृक्ष जुना झालेल्यांचा होता. मी वृध्द होते, ऑफिसला आमची गरज नाही. सामान घेऊन मी हॉटेलच्या बाहेर पडले. रस्त्यावर रिक्षा बोलवली होती. रेल्वे स्टेशनवर जाणार होते. अचानक माझं लक्ष त्या झाडाकडे गेलं. ते परत जमिनीवर कोसळलं होतं. तो साप ते पक्षी आता दूरवर गेले होते. त्यांची सगळी वेगळी घरटी होती. झाड पाने, सुकून गेली होती.

जुनी खोड आहेत ती कधी तरी जाणारच प्रत्येक गोष्टीच पुनरुज्जीवन यशस्वी होतं का ?पुनर्वसन दरवेळी सोपं असतं का?मी मुंबईला परत आले. मिळाले होते ठीक आहे ते पैसे घेतले. वृध्दाश्रमात आले.

माझ्या कष्टाचे 500000 त्या भावाला दिले तो मजेत आहे. मस्त ऐष करतो आहे. वरती मधला बांधून मजेत राहत आहे. आणि मी मात्र अवघडपणे एका वृद्धाश्रमात राहते आहे. पुनर्वसनाची वाट बघत आहे. इथे कुठे जेष्ठ नागरिक नोकरीला हवे अशी जाहिरात असते तिथे अर्ज करते. आशा वाटते आणि वाट बघत बसते येणाऱ्या नकाराची.

जिथे तरुणांना नोकरी नाही, तरुण बेकारीला कंटाळून आत्महत्या करत आहेत, त्या देशात माझ्यासारख्या साठी उलटून

गेलेल्या म्हणजे थोडक्यात जेष्ठ वेस्ट झालेल्या बाईला कुठून नोकरी मिळणार? मी सत्य मी स्वीकारले आहे. पुनर्वसन सोपं नसतं.

ज्या हॉटेलात केरळला राहिले होते त्या केअरटेकर बाई शी, अशी थोडी ओळख झाली होती. ती कधीकधी फोनवर गप्पा मारते. ती सांगत होती की ते वडाचं झाड आता पूर्णच मेलं आणि सरकारची माणसं आली. ते झाड तोडले. रस्ता साफ केला. मूळ आणि त्या झाडाची लाकडे तुकडे-तुकडे करून वखारीत जाळायला घेऊन गेली. माणसं काय आणि झाडं काय शेवटी अंत तिथेच होतो. पण मधल्या काळात आपण फुलंतो, पक्षांना आनंद देणं, आजूबाजूला सावली देतो. प्राण्याचे घराला हातभार लावतो. हरित वर्ण हिरव्या पानांनी मोहवने हेच जीवन असतं. जीवनाचा काही काळ आनंदात गेला त्यात मी आनंद मानते. जिथे मी आता राहते तिथे वृध्दाश्रमात माझ्या मुळांचा काही भाग रुजू दे. तिथे मला आनंद मिळू दे.

देवा आता पुनर्वसन मनाचं होऊ दे.

***

# शर्माजी

मी तरुणी होते. निमगाव ला नवीन नोकरीला लागले होते. तेव्हा शर्माजी वय 55 वर्ष, जेव्हा आमच्या ऑफिस मध्ये बदली घेवून साहेब होऊन आले तेव्हा त्यांच्या खाजगी जीवनाचे बद्दल बऱ्याच अफवा सुटल्या होत्या. म्हणजे असं की शर्माजींची, तरुण बायको सहा महिन्याच्या मुलाला रजतला घरात सोडून 24 वर्ष पूर्वी घर सोडून गेली आणि शर्माजी मुलाला रजतला कसंतरी आज 25 वर्ष वाढवले.

पूर्वी शर्माजी ऑफिस मध्ये येताना त्या मुलाला सोबत आणायचे आणि नोकर बडवेला, पैसे देऊन बाजूला झोळी बांधून, सांभाळून घ्या सांगितलं. रजतला बडवे ने त्याचे मुलांचे सोबत लाडावून वाढवलं. 25 वर्ष झाली, या निमगाव चे गावातून त्यांची बायको पळून गेली. आठवणी होत्या आणि या गावी त्यांना कायम राहण्याची इच्छा मात्र असल्यामुळे शर्माजी निमगावला आले. हे गाव तीर्थस्थान असल्यामुळे शर्माजींनी रिटायर झाल्यावर राहायला, बरोबर एकरकमी पैसे भरून हा बंगल्याच्या भाग विकत घेतला होता. शर्माजी यांचा मुलगा रजत त्यावेळी जो सहा महिन्याचा होता आता पंचवीस वर्षाचा झाला होता. रजत उंच पण

थोडासा बुद्धीहीन राहिला होता. त्याचे तो कमवी, खूप अति शिकला नव्हता, मॅट्रिक पास झाल्यावर घरी होता. तर त्या रजतला शर्माजींनी त्या बंगल्याच्या आत (आता घेतलेल्या ), तळमजल्यावर, १वेगळे प्रवेशद्वार असल्यामुळे त्यात रस्त्याच्या बाजूला एका खोलीत दुकान काढून दिलं होतं. किराणामाल आणि रोजच्या गरजेच्या वस्तूंच हे दुकान होतं. दुकान चांगलं चालत होतं निदान रजतला पोटभरीचा पैसा तरी मिळत होता. शर्माजी बोलता-बोलता सांगत, हे घर या मुलासाठी आहे. आणि त्या दुकानातून जे उत्पन्न येईल ते आणि माझ्या पण मिळालेल्या पैशाच्या व्याजातून हा मुलगा रजत उदरनिर्वाह करेल. त्या रजतचे लग्न करायची माझी इच्छा आहे म्हणून मुली बघतोय, लवकरच झालं तर चांगलंच आहे.

शर्माजी मुलासाठी स्थळ बघत असत. आणि ऑफिसमध्ये त्याची चर्चा देखील करत. शर्माजी ना निवृत्तीला तीन वर्षे राहिली होती. आमच्या विभागात कामाला आले आणि आमची चांगल्यापैकी ओळख झाली. स्नेह निर्माण झाला.

शर्माजी खूप देवभक्त होते त्याच दरम्यान, माझा पण विवाह होत नाही म्हणून घरी सर्वजण काळजीत असायचे. मी स्वतः देखील चिंतातुर असायचे. अशावेळी शर्माजींनी मला, ओम गं

गणपतये नमः, हा मंत्र रोज 108 वेळा म्हण असे सांगितले. वाट्टेल ते संकट असेल ते दूर होईल, तुला चांगला नवरा मिळेल. अशा गोष्टी शर्माजी तेव्हा मला सांगत होते.

मी तेव्हा नुकतीच नोकरीला लागले होते जेमतेम 20 वर्ष वयाची, मी नोकरी करुन शिकत होते. शर्माजी 55 वर्षाचे होते जगाचा भलाबुरा अनुभव त्यांना होता. भलाबुरा एकटेपणा त्यांनी बघितला होता. आणि त्यामुळेच मला ते नेहमी सांगायचे, अविवाहित राहू नको. मंत्र म्हणून आणि भरपूर व्रत करुन तू गणपतीची पूजा कर! तुला चांगला नवरा मिळेल. निदान तुझ्या आयुष्यात काय संकट असेल ते तरी दूर होईल. मी त्यांचे ऐकून घ्यायची. देवाची खूप व्रत करी. गणपतीची भक्ती करायला लागले रोज एका गणपती ला जायचे 21 दुर्वा वाहा, उपासना, फुल वाहे. का ?असो मी नियमित व्रत करत असे.

शर्माजी गप्पा मारत, त्याचप्रमाणे एकदा बोलता बोलता शर्मा जी म्हणाले की त्यांना पुनर्विवाह करायची इच्छा आहे. “सांगा साहेब “शीतल

“पूर्वी, जोडीदार हवाच म्हणून मी खूप प्रयत्न केला. एका बाईंच्या मी प्रेमात पडलो होतो. ”

“सर सांगा की मग काय झाल”शीतल

“मैत्रिणी होत्या का?”मी

“नाही. त्या बाईने सांगितले की तुमच्या मुलाला दूर ठेवा. मी तुमच्याशी लग्न करेल. मी त्या बाईचं ऐकलं. भावाकडे पुण्यात मुलाला ठेवलं. भाऊ महीन्यात दोन हजार रुपये दे म्हणाला. मी ठीक आहे म्हणालो. मुलाला पोहोचवायची सोय केली आणि परत नोकरीच्या बदलीच्या ठिकाणी रुजू झालो. लग्नाची तारीख काढली होती. पण सहज म्हणून एका तिन्हीसांजेला, रजतचे साठी मन उगीचच कातर झाल.

एक ऑफिस ची गाडी पुण्यात जावून, लगेच परत येणार होती. आणि मग मी ठरवलं की मुलाला भेटून येऊ. गाडीने मला वाटेत सोडल. बस मिळाली आणि काय झालं की मी हडपसरला भावाकडे, पोहोचलो. भावाच्या दाराची भरपूर गर्दी जमली होती. आतून मुलगा रडण्याचा आवाज येत होता मी लोकांना विचारलं, “काय झाल?”

“अनाथ मूल आहे”एक

“पण गर्दी का केलीये? काय झालं ?”मी

“या मुलाला कोंडून निघून जातात. ”तिसरा

मी माझ्या मुलाला परत आणायचे ठरवले.

भाऊ आणि वहिनी सिनेमा हून परत आले.

“ तुमच्या वहिनीला मी स्वतः दवाखान्यात घेऊन गेलो होतो. ”भाऊ खोट बोलले.

पण त्यामुळे मी पुण्यातून, माझ्या मुलाला सोबत घेऊन आलो. ज्या मुलीशी विवाह जुळला होता, तिला काही माझ्या मुलाला सांभाळायचं नव्हतं.

मी तिला म्हणालो “ माझ्या मुलाला मी कुणाकडे ठेवू शकत नाही. जेमतेम अडीच वर्षाचा आहे. सख्या भावाने जर असा वागवल ?तर इतर लोक माझ्या मुलाला कशी वागवतील?”मी

“ तो तुमचा प्रश्न आहे तुम्ही कुठे ठेवणार?का शर्माजी होस्टेल वर ठेवा नाहीतर कुठेही ठेवा. हा मुलगा जर तुमच्याजवळ येथे राहणार असेल तर मी तुमच्याशी लग्न करणार नाही. बघा. ”असं सांगून माझ्याबरोबर सात जन्म सोबत देण्याचे, आणाभाका घेतलेली ती तरुणी निघून गेली. मी परत एकदा एकटा झालो.

त्यानंतर एक भावाच्या बायको म्हणजे वहिनी कडून, एका तरुणीचं स्थळ सांगून आलं, ती तरुण विधवा होती. आम्ही गावाकडे जाऊन ही मुलगी बघून आलो. ‘पसंती झाली आहे, घर बघायला येते’त्या निमित्ताने ती माझ्या घरी आली. त्यावेळी माझा मुलगा हॉलमध्ये टीव्ही बघत होता. त्या काळीसुद्धा ज्या घरात टीव्ही असत, त्यात माझं घर होतं. येताच तिने माझ्या रजत कडे

निरखून बघितल. रजत बनियन सुद्धा काढून, फक्त खाली छोटीशी चड्डी घालून हॉलमध्ये बसला होता. टीव्ही बघण्याच्या नादात, त्याच्या ते लक्षात सुद्धा आल नाही. मात्र या तरुणीने माझ्या मुलाकडे विचित्र नजरेने बघितलं. रजतला कळत नव्हतं. पण माझ्या मुलाकडे ती विचित्र नजरेने बघतेय, हे मला उमगले. अनामिक भिती भरल्यामुळे मी घाबरलो. आपण लग्न करणार आहोत, हे रजतला घातक आहे. हे मला जाणवलं. देवा माझ्या मुलाला वाचव देवा माझ्या मुलांना वाचवा !अशी मी प्रार्थना करू लागलो. त्या मुलीला मी लगेच नकार दिला. त्यावेळी माझ्या वहिनीने आणि माझ्यासाठी स्थळ आणणारे त्या लोकांनी, माझी खूप बदनामी केली.

" त्याला कोण उर्वशी मिळणारे? हा स्वतःला शहाणा समजतो. "अशाप्रकारे माझ्यावर टीका केली. पण मला माझ्या मुलाचा आयुष्य बरबाद करायचं नव्हतं.

वीस वर्ष मी नोकरीत, खान पान, मुलाला वाढवणे, घर चिंता करणे ह्यातच घालवले. काही विवाह मंडळात नाव नोंदवले. बीजवर बाप आहे आणि अधिक स्पष्टपणे मुलाला दूर ठेवणार नाही हे वाक्य पण घातले. पण एकही स्थळ सुयोग येत नव्हतं. तरुणी अपेक्षां त बसायच्या नाही. शिक्षण नसायचं बुद्धीची एक पातळी

नसायची. अशा मुलीबरोबर लग्न करून माझ्या मुलाला सासुरवास व्हावा असं मला वाटत नव्हतं. त्यामुळे माझं लग्न झालं नाही

आता या बंगला घेतलेले, निमगावला आल्यानंतर मी एक सतारीचा क्लास जॉईन केला आहे. क्लासला ईथे माझ्यासोबत येणाऱ्या, एका सुमनबाई नावाच्या बाईबरोबर माझी थोडी मैत्री झाली आहे. सुमनबाई आणि मी एकत्र फिरतो. यात्रेला जातो. सुमनबाई कोणे एके काळी नटी होती प्रसिद्ध होती. पण Old days are gone, असे ती म्हणाली. तिने पण बीजवराशी विवाह केला होता आणि विवाह झाल्यावर, नवा नवरा, सुमनताई ला बंगला माझ्या मुलाच्या नावावर कर म्हणून मागे लागला. ती नवर्याला म्हणाली, की माझी प्रॉपर्टी माझ्या नावावर आहे. ती वास्तू, तुमची मूल, पहिल्या लग्नाचा मुलगा, बायको, या गोष्टी वेगळ्या आहेत. मी ती प्रॉपर्टी देणार नाही. त्यावरून सुमन ताई चा नवर्याशी वाद झाला आणि सुमन ताईने घटस्फोट घेतला होता.

सुमनताई या बंगल्यात एकट्याच राहत होत्या. मला प्रॉपर्टीची आशा नव्हती. मला सहवास सुख देणारा, भावणारा पार्टनर हवा होता. आता या वयात जास्ती शरीराची भूक पण नव्हती, पण कोणीतरी कंपनि असावी असं वाटत होतं.

सहवास आणि कंपनी यांनी आपल्या मुलाला जाच करू नये, हे सुद्धा वाटे. मी मुलाच्या लग्नासाठी स्थळ बघत होतो. रजतचे विवाहाच्या ठरवायला सुद्धा मदत होईल, अशी माझी अपेक्षा होती. सुमनताई दीड शहाणी आहे, असं त्या सोसायटीमध्ये म्हणजे बंगल्यांच्या कॉलनीमध्ये ऐकले होते. लबाड आहे असं म्हटलं जायचं. सुमनताई माझ्या बरोबर मंदिरांमध्ये स्पेशल गाडी काढून जायला वगैरे फिरे. आमची तशी मैत्री चांगली होती. लोक आमच्याकडेच, तशा संशयाने त्या नजरेने बघायचे. पण मला कधीही तिला लग्ना बद्दल विचारायला हिम्मतच झाली नाही.

त्या महीन्यात मला न विचारता माझ्या घरच्यांनी माझं लग्न ठरवलं. मला फारसा आवाज नव्हता. असे काही तो काळ मुलींना मनापासून पसंती विचारायचा नव्हता.

घर सोडून आणि लग्न होऊन मी मुंबईला आले. शर्माजी सरांचे पुढे काय झालं मला कधी कळलेच नाही. मी त्या निमगाव पासून पूर्णपणे स्वतःला शक्यतो डिलीट केले. का आणि कशी अलिप्त झाले या गोष्टीच काही नवल वाटतं. वाटत की मी त्या गावाला इतकं का तोडले, लोकांना का सोडलं?आठवणी जाग्या होतात पण मी दुर्लक्ष केलं.

पंचवीस वर्षांनी पुन्हा एकदा मी निमगावला गेले. गाव बदललं होत. तरीही मला शर्माजींशी गप्पा मारल्या तर.. असे वाटले. शोध घेत, आम्ही शर्माजींचे बंगल्याच्या आवारात पोहोचलो.

शर्माजींना आनंद झाला. गप्पा मारत बसलो.

“शुभांगी, तुला बरेचसे प्रोब्लेम आला मग तू घरच सोडले अस कळले. तू माझ्या घरीच राहायला येऊ शकत होतीस. मला लेकीच्या सारखी होतीस. जाते सांगायला यायचेस. ”शर्माजी

“शर्माजी तुम्ही कसे आहात. मुला सुनेसह बरे आहात ना?”

“हो, माणसाची सत्ता फक्त 3×6 च्या पलंगावर असते. म्हातारा झालो. आता तेवढी जागा पुरते. तरुण पणी हाव असते. हे हवे, मोठे घर घ्यायचे आहे. आता शरीर म्हणते, विश्रांती साठी एक पलंग हवा. ”शर्माजी

“शर्माजी, लग्नाचे बेताचे पुढे काय झाले?एकटाच उरलेत. लग्न झाल्यावर एकटेपणा सरतो असे नाही. स्वातंत्र्य संपतच असे असते पण एकटेपणा संपतोच अस नाही. लग्न म्हणजे काही जादू नाही. पण सोबत होते. सांगा पुढे कसं घडले”मी

*

शर्माजी दूर बघत कथा पुढे सांगू लागले.

मी सुमनताई ला लग्न करण्याची विनंती केली नाही. मला भिती होती कारण मी नाव जपत असतो.

आज सुमनताई बद्दल, कधीकधी मनात येतं _

‘हमसे आया न गया तुमसे बुलाया न गया असे असेल? तिची अपेक्षा असेल का मी बोलावं? पण सर्वजण सांगत कि ती मुहफट अशी आहे. त्यामुळे मी विचारले आणि तिने थोबाडीत मारली तर माझी बदनामी होईल असे वाटे. शिवाय समोरासमोर बंगला असल्यामुळे, तिथेच राहणे भाग असल्यामुळे वाईट पणा नको. म्हणून मी तिला कधीच लग्न करण्याचे बाबत विचारलं नव्हत.

त्याच दरम्यान ज्या आपल्या निमगावला असलेला बडवेने माझ्या मुलाला, रजतला सहा महिन्याचा असल्यापासून सांभाळल होते, त्या बडवेला कॅन्सर झाला. अगदी शेवटचे दिवस बाकी असताना तो मला म्हणू लागला, “जर माझा मृत्यू झाला तर माझ्या पत्नीशी तुम्ही विवाह करा, ”बडवे ला चार मुले होती त्याची चार मुल नी माझा एक, एकूण पाच मुलाचे अंगावर पडेल. बडवे ची बायको थोडीशी नखरेल पण दिसायला होती. ती कुरूप होती. माझे पण वय पुष्कळ झालं होतं, पण पुरुषाला कुठल्याही वयात असलं तरी बायको सुंदर हवी असते. खरे तर तिने सेवा केली असती. माझ्या घरात राहिली असती. खाण्यापिण्याची ददात मिटली

असती. मुलासाठी स्थळ बघायला सोबत आली असती. पण तिची मुलं आणि माझा एक, अशा एकूण 5 मुलांचे करण्यात माझ आर्थिक बळ संपले असते, त्यामुळे मी गप्प बसलो. मी त्यावेळी काहीच बोललो नाही. बडवे वारला. बडवे वारल्यावर बडवे ची पत्नी माझ्याकडे यायची, घरी मदत केली, पण मी कधी त्याच्याकडे त्या नजरेने पाहिले नाही. मी चांगला मित्र म्हणून राहिले. सुमनबाई बद्दल माझ्या मनात भावना निर्माण झाल्या व त्यां मी व्यक्त केल्या. बडवेबाई बद्दल माझ्या मनात भाव निर्माण झाला नाही. तसं बरंच वाटलं. ”ऑफिसातून निवृत्ती ने सुटलो. बाॅस म्हणून बुजगावण होतो.

आता या बंगल्यांचे सोसायटीत लोक ओळखत, मला अंकल म्हणू लागले होते. माझी स्टाईल, काळाकुट्ट हेअर डाय, नी त्या वर चमेलीच तेल, टीप टॉप पांढरे कपडे, बूट सुद्धा पांढरे रुबाब होता. काळ बदलला, रजत गाजे पण साधा होता. मी रोज बागेत जात होतो.

मी निवृत्ती नंतर ठीक राहत होतो. मुलासाठी, रजतचे लग्न करावा म्हणून वधुशोध चालू होता. मुलगा रजत तीस वर्षाचा झाला होता. मला काळजी वाटत होती. स्थळ सांगून येणे बंद झाले होते. माझ्याकडे कामाला असलेल्या मोलकरणीला मी म्हणालो, “ तुझे

मुलीशी, माझे मुलाचे रजतचे लग्न करून देतो, चालेल? ‘‘ती थोडीशी काही काळ, तरी कुरकुरली. पण तिला काही प्रश्न निर्माण झाल्यावर, या विवाहाला ती हो म्हणाली.

मला आनंद झाला. मी दोन-तीन ज्योतिषांना कुंडली दाखवली. कुंडली मिळवून घेतली, शांती केली आणि यशोदा माझ्या घरी सुन होऊन आली. मुलाच मार्गी लागलं. सुनेला मी एक पिको फॉल करायचे मशीन घेऊन दिलं. मुलाचे किराणा दुकानात बाजूला त्या फॉल पिको च्या मशीनवर सुनबाई फॉल पिको काही काम करू लागली. माझ्या मुलाचा संसार तर मार्गी लागला. एखाद्या वेळी दैवी कृपा होईल, मला नातवंड मिळेल. त्यानंतर मी सुखाने डोळे मिटेन असे मी म्हणतो. अर्थात मुलाचे एकटेपण फिटलं. मुलाला रजतला सोबत कोणीतरी मुलाची काळजी करायला पत्नी आहे, याचा आनंद मानतो. मुलाचे लग्न झाले याबद्दल तरी मी देवाचा खुप खुप आभारी आहे. अजूनही मी वेगवेगळे मंत्र आणि पूजा करतो. वाटते की जीवन फार अवघड नसतं, पण सोपे कधीच नाही. कधीच देव भेटला नाही.

मी देवाला याबद्दल विचारणा करतो. मुलाच मुल, मला नातवंड बघायला मिळावे, ही इच्छा होते. पण माणुस ठरवतो ते देव तसेच करत असतो अस नाही. देवाची इच्छा कदाचित निराळी

असावी. अजून तरी मुलाला काही मुल, मला नातवंड झालेले नाही. मी संध्याकाळी बागेत जाऊन बसतो. तिथली लहान लहान बालक माझ्याशी खेळायला येतात. मनातल्या मनात विचार यायला लागतात. नातवंड हवं होतं. सुने बरोबर रजत लग्न करून स्थिर आहे हेच खूप झालं.

तेव्हा मी सुमनबाई लग्नाबद्दल विचारायला हव होत का? बडवे बाई बरोबर लग्न करायला हवं होतं का ?पहिल्या प्रेमीकेचे सह विवाह करायला हवा होता?शिकताना मुलाला चांगलं भारी हॉस्टेलवर ठेवून, मजेत दिवस काढायला हवे होते का ?

माझ्यातल्या एकटेपणाला अंत नाही. माझा त्रास संपलाच नाही. तरी देवाने माझ्या मुलाला सुखी केलं, यातच मी आनंद म्हणतो. देवळात जावून जेव्हा मी कायम हात जोडून प्रार्थना करतो. देवा हा एकटेपणा फार वाईट असतो. माझ्या मुलांना सुखी ठेव.

माझ्या मुलांना सुखी ठेव. तू कशी आहेस शुभांगी?''शर्माजी

''माझ्या मुलाचे लग्न झाले आहे. मी ठीक आहे. ''मी

'' शुभांगी ओम गं गणपतये नमः, म्हणून जप करतेस ना?''शर्माजी

''हो, मी देखील प्रार्थना करत आहे, देवा माझ्या मुलाला सुखी ठेव''मी

शर्माजी च्या घरुन परत येताना मला सुमनताईचा बंगला दिसला. सुमनबाई एकट्याने अंधारात बसल्या होत्या.

मनात आले. देव काही जणांचा एकटेपणा का संपवत नाही.

***

# वो औरत

मंत्री आणि सचिवांनी भरलेल्या दरबारात, महाराज श्रीयुत नूर गजेब चर्चा करीत होते मात्र आज त्यांचे चित्त लागत नव्हते. आज त्यांची नातवंड येणार होती. त्यांच्या लाडक्या मुलाच्या मजहरच्या मृत्यूनंतर आजपर्यंत त्यांनी घराण्याला दुसरा वारस मिळण्याची, आतुरता लपवली. मजहरची औरत होती, दोन मुले होती. मजहरच नव्हता. पण त्यांनी वाट बघितली होती. एका बेसावध क्षणी युद्धभूमीवरील, नाईलाजाने केलेल्या तहामध्ये नुर गजेबाने एक तडजोड केली होती. त्यामध्ये आपली लाडकी नात नाझनीन आणि नातू परवेज त्यांना, वीस वर्षे, राजपूतांच्या राज्याकडे अमानत म्हणून सुपूर्त करावे लागले. राजपूत ही जमात अशी ही, साधी नुर गजेबाच्या कल्पनेत, एक अविकसित, मागास, कळाहीन, भोंगळ भटकी जमात होती. राजपूतांनी केलेल्या प्रजेची प्रगतीची नूर गजेब यांना, सचिव यांना, फारशी माहिती सुद्धा नव्हती. वीस वर्षे आपली नात नाझनीन आणि नातू परवेझ ह्यांना नुर गजेबाने राजपूत राज्याकडे ठेवले. या राजपूत लोकांनी आपल्या दोघा नातवंडांना त्रास तर दिला नसेल, पण गावठी आणि अशिक्षित ठेवले असणार, असा समज नुर गजेब यांचा होता. आपल्या नातवंडांवर, हिंदू

संस्कार केले असतील की काय अशी शंका आली. नाझनीन औरत असल्याने, वेगळा सुद्धा संशय नुर गजेबाला आला. आज राजदरबारात चर्चेत, नुर गजेबांचे अजिबात लक्ष लागत नव्हते. अचानकपणे एक दासी अंतर्गृहातून बाहेर आली. तिने सचिवांकडे काहीतरी सांगितले. चिंताग्रस्त चेहऱ्याने आणि जड पावलांनी नूर गजेब आपल्या मुलाच्या मजहराच्या समाधीच्या दिशेने चालू लागले. आज वीस वर्षांनंतर नातवंडे राजमहालात परत आली होती. नुरगजेब, राज्यवेशीवरिल समाधीपाशी आले तेथे तहातील अटीनुसार नाजनीन आणि प्रवेश बसलेले होते.

नवल म्हणजे नाजनीन पूर्णपणे इस्लामिक होती "अल्लाची मर्जी की, त्या राजपुताने माझ्या नातीला बिघडवले नाही, तिला वाईट मार्गाला लावले नाही, कि हिंदू संस्कार पण केले नाही" नुर आपल्या सचिवाला म्हणाले.

" गावोगाव जिप्सी प्रमाणे फिरणाऱ्या त्या राजपुतांनी आपल्या नूरजहानची लाडकी कन्या नाजनीनला, दासी अथवा बटिक बनवले नाही. याबद्दल त्यांचे आभारच मानायला हवे. "प्रधान

"अवश्य अवश्य, ताबडतोब खलिता तयार करा" नूर गजेब म्हणाले.

“ माझा मझहर जिवंत असता तर या नातवंडांसाठी मी एवढा जीव टाकला असता का? मला नातवंडांना बघून एवढा आनंद झाला असता का? मजहरला या मुलीला बघून, ही नापाक झाली असणार, नाझनीनला ठार मारावे, औरत है, असे मनात आले असते का”

सचिव गप्प बसले.

“मी ह्या मुलीला पवित्र कसे मानू? औरत है. इस्लाम धर्म शिकली नमाज पडते, पण ही पवित्र असेल का?”ॉ

“महाराज मजहरच्या मृत्यूनंतर, आपल्या घराण्याला हे दोघच वारस आहेत. जे काही झाले असेल ते झालं तिला आपण आपल्यात सामावून घ्यायला हवं. ”प्रधानांनी सुचवले. नाजनीनला राजमहालात पाठवण्यात आले एक आठवडाभर नुरगजेह ताणतणावात होते. मात्र नाजनीन सर्वांमध्ये मिळून मिसळून गेली. तिने धर्माच्या इज्जतीची राज राखली. नुरगजेब खूश झाले. आपल्या इस्लाम धर्माचे अभिमानी रूप त्याच्या नजरेसमोर आले. शत्रुला सुद्धा माझ्या नातीला, इस्लाम शिकावासा वाटला. या अल्ला, मेरे गरीब नवाज तेरा रहम, असे म्हणत, नुरगजेब दर्ग्यात नमाज पडण्यासाठी चालू लागला. संभाजी महाराजांना शत्रूच्या तावडीत केल्यावर, अतोनात त्रास देण्याचा सिलसिला लागता

होता. मात्र नुरगजेबची नात, मजहरची मुलगी नाझनीन हिला शत्रूंनी अतिशय चांगल्या संस्कारात आणि आदराने वागवले होते. नाझनीनने ते चांगले ग्रहण केले. अमर कोशातील कथा वाचाव्यात तशी ही एक नवलकथाच, नुर गजेबाला वाटली. सचिवाला सांगून नूर गजेबाने, नाजनीनला भेटायला बोलवले. विचारले.

“बेटा तिथे तू वेळ कसा घालवायची?काय काय वाचायची?”

“ अब्बाजान मी स्त्री मुक्तीबद्दल रहस्यमय कथा, आत्मचरित्र हास्य, हलकेफुलके विनोदी वाचायचे. तसे या कथांमध्ये खूप आनंद असे. मानवी मनाचे प्रतिबिंब, भावना, वडिलांचे प्रेम चर्चा, मूड, त्यांच्या संस्कृतीच्या गोष्टी, निसर्गरुपके इतिहास, धक्का देणारे शेवट, उत्तम निसर्ग आणि उत्तम भव्य, उत्तुंग शी व्यक्तिचित्र मी तेथे वाचली. अब्बाजान, मी तिथून पूर्ण विचारी हून परत आले. ”नाझनीन उत्तरली.

समाधानाने नुरगजेबाने आपल्या दालनात पाऊल टाकले. सचिव त्यांची वाट बघत होते. सचिव नूर गजेब यांना, प्रधान यांना मुजरा करुन म्हणाले, ” महाराज परवेजबद्दल वाईट बातमी आहे “

महाराज एकदम चकित होवून आपल्या बसल्या, आसनावरून उठून उभे राहिले.

“काय झालं?”

“जहांपनाह परवेजला राजपुतांनी त्रस दिला नाही, मजेत ठेवले. पण तिथे सुद्धा दारू पिऊन, अय्याशी करीत पडलेला असायचा. सर्व व्यसन त्यांनी केली आणि इथेही तो तसाच, दारू पिऊन दिवसभर वेळ काढत असतो. अतिशय दुष्ट झाला आहे. जहांपनाह, तो माझीसुद्धा मुंडी उडवायची धमकी तो मला देतो. शत्रूच्या घरी त्याला वीस वर्षे ठेवून, आपली चूक झाली असावी. तो पूर्ण वाया गेला आहे. ”

“त्याला सुधारण्यासाठी आपल्याला आजपासूनच प्रयत्न करायला हवे. आवश्यक सचिव तुम्ही मोठ्या सरदारांना आणि दर्ग्यामधील प्रमुखांना या कामी लावा. परवेजला सुधारण्याचे सर्व प्रयत्न करा. ”महाराजांनी आद्न्या केली.

“जशी आज्ञा” असे म्हणून सचिव बाहेर निघून गेले. माझी मुलगी जिला बिघडवणे, शत्रुपक्शाचे, राजपुतांना सहज शक्य होतं, ती, औरत जातीची, पवित्र राहून परत आली. मात्र माझा परवेज, माझा नातू, विलासी झाला. राजपुतांनी अतिशय आनंदात आणि सुखसोयीत ठेवलं होते, तो असा बिघडावा ?किंबहुना एकाच प्रकारच्या परिस्थितीत आणि एकाच शत्रूकडे राहूनही या दोघांवर असे वेगवेगळे परिणाम का व्हावे? दुःख झाल्यावर पुरुष, दारूच्या व्यसनांच्या आहारी जातो. स्त्री मात्र त्या कठीण परिस्थितीत सुद्धा

ठाम, पणे न डगमगता आपली वाट, शोधत, स्थिर होते. स्त्रीला सन्मान द्यावा, याच भारी लायकीची आहे, खरोखर स्त्री महान आहे. समाजात उगीच स्त्रीला कमी लेखलं जातं. औरत देवी है, असं म्हणत नुरगजेब आपल्या महालातील, पूजा घराकडे चालू लागले.

*****

# मनकर्णिका,

मनकर्णिका च्या या मोहा तलावापाशी मी जेव्हा पोहोचले तेव्हा माझा मुड गेला होता, डोक पारच फिरलेले होते.

माझ्या मित्राने, अमनने मला शिमल्याला भेटायला बोलावलं होत.. पंचायत अशी कि मुळी आमची ही कॉन्फरन्स होती. त्या कॉन्फरन्ससाठी मी माझ्या ऑफिस तर्फे आले होते आणि तो मित्र अमन सहज म्हणून मला कंपनी द्यायला तिथे येणार होता. पण प्रत्यक्षात माझी मिटिंग लवकर संपल्यामुळे मी त्या अमनच्या हॉटेलवर पोहोचले. तेव्हा अमन मला व्ही आय पी महत्त्व भागात दुसऱ्याच कामिनी बरोबर हॉटेलच्या लाँजमध्ये गप्पा मारत असताना आणि खदखदुन हसताना दिसला. मला खूप जलन झाली. नी रागाने आणि फसवणूकीने तिरमिरीत, रागारागाने एकटीच बाहेर पडले. लोकल गाईड सोबत घेतला. पारच किल्ला बघायला रिक्षा केली. किल्ला वरवर बघितला आणि मनकर्णिका च्या या तलावापाशी आले.

संतापाच्या भरात खूपच दूर निघून आले होते. मुक्त फिरुन अंधार पडल्यावर कंटाळा पण आला होता. पण मनकर्णिका च्या नदीचा मोहा तलाव खूप सुंदर होता. तिची कथा पण वेगळीच आहे.

सीतेच्या कानातील कर्णफुले त्यातील मणी, त्या जागी जंगलात हरवला. रामाला सीता म्हणाली. माझा लाडका मोती आहे तुम्ही शोधून द्या. शोधासाठी म्हणून रामानी मग मणी दिसावा म्हणून इथे बाण मारला. तलावा मध्ये पाण्याच्या तलाव तळाशी सीतामातेला तिचा मणी, खाली सापडला. त्यावरून या तलावाला नावच, मोहा, मनकर्णिका अस पडले. निरीश झालेली बराच वेळ तिथे बसले. जवळ चौकशी माणूस माझ्या जवळ आला. हा वर जोडलेला जो तलाव आहे ना दोनच मिनिटांच्या अंतरावर, तिथे जर आपण आपलं नाणं फेकला तर आपली इच्छा पूर्ण होते. ''तो

" तुम्हाला माहिती असेल रोममधल्या ट्रेवी काउंटरमध्ये नाण टाकल कि आपल्याचा सुंदर गर्लफ्रेंड किंवा बॉयफ्रेंड मिळतो. ''मी

"तसा या ईथे आहे. ''तो.

मी त्या गृहस्था बरोबर त्यावरच्या तलावापाशी गेले. पर्समधला एक रुपयाचा कॉईन काढून मान वर करुन, नाणी भेट तलावात टाकला. त्याच वेळी या शिख गृहस्थाला कुणाचा तरी फोन आला म्हणून तो तिथे मला सोडून गेला. मला भयंकर राग आला.

" काय हे आयुष्य कुठलीच गोष्ट कधी मनासारखी होत नाही. मित्रमैत्रिणी टिकत नाहीत. शेजारी विचित्र भेटतात. आपला काय

स्वभाव वाईट आहे?कि आपल नशीब वाईट आहे ?मी स्वगत बडबडले.

रागारागात मी तिथे बराच वेळ बसले त्याचवेळी अनामिक ऊर्मीने मी त्या तलावाच्या जवळ गेले. तलावात जेमतेम दीड फूटच मावेल एवढेच पाणी होते. मी त्या तलावात उतरले आणि त्या तलावातील सारी नाणी, ताराही गोळा करून माझ्या पर्समध्ये टाकून घेतली. त्यात पाण्यात उभी असताना तो गृहस्थ परत आला आणि मला ओरडू लागला.

“अ हो! हे पवित्र पाणी आणि तुम्ही पाय देतात. बहिऱ्या “

मी त्या मनकर्णिके च्या भेट तलावातून बाहेर आले.

“तरी बर ह्या गृहस्थाने मी आतली नाणी वर उचललेली बघितली नव्हती”मी स्वगत बोलले.

मी माझ्या रूमवर आले. आतमध्ये येताच फोन वाजला की, निरोप होता की माझा तो मित्र, अमनचा की “अतिशय मनापासून मी कामात गुंतलो होतो, तुमच्या शोध घेत हॉटेलवर आलो होतो. ”.

पण मी त्याला न भेटल्यामुळे तो परत गेला. तो माझी काळजी करत होता आणि त्या मित्रांनी मला त्याला परत फोन करायला सांगितलं होतं. मला राग आल्यामुळे मी काही लक्श दिले नाही.

हॉटेल मधुन फ्रेंच फ्राइज आणि पुलाव मागितला. भरपूर खाल्ल्या आणि रागारागात संपूर्ण अंधार करुन झोपुन गेले. सकाळी मला माझ्या बहिणीचा फोन आला. तिला मी घडलेल्या सर्व घटना सांगितल्या. माझी बहीण माझी मैत्रिणीच आहे.

"तुम्हाला ईच्छा पूर्ण व्हावी म्हणून नाणी टाकतात. आपण त्यातली परत काढली तर? तुम्ही नाणी टाकून काढली तर अपशकुन होईल. "बहीण म्हणाली.

"जा परत ती नाणी परत पाण्यात टाकुन ये"बहीण

"बापरे अरारा, आता कधी जाऊ मी? मी कुणाकडे तरी देते. अकरा वाजताच सिमला मध्ये विमान आहे, मला वेळ नाही. " मी.

कुणाजवळ देवु म्हणून नंतर विसरले. विमानात पर्समध्ये दिसले. काय मी परत अंधश्रद्धा घेऊन वावरते आहे. अस स्वगत म्हणाले. असो. असं झाले. मी विमान पकडून मुंबईला आले.

मुंबई विमानतळावर माझा हा मित्र आला होता. मी अनुभवलेला ब्रेकअप, आता मला काय दुःख झाले यावर, मी बोलले नाही. माझ्या मनाचे हाल झाले ते न दाखवता मी त्याच्याशी वरवरचा कसा आहेस? काय काय आहे ?असं बोलले.

"मी निरोप ठेवला होता. "तो

" हॉटेलमध्ये निरोप मिळाला नाही"मी.

मी ठीक ठाक असं दाखवलं, मात्र घरी परत येताना, मी त्याच्या टॅक्सीने न जाता स्वतंत्र टॅक्सी करून घरी आले.

दोन दिवसांनी माझा टीव्हीवर एक किरकोळ सा, छोटा सा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाची तयारी मला करायची होती. रोल किरकोळ होता पण ठीक होता. पण त्या कार्यक्रमात मला खूप यश मिळालं. टीव्हीवर मला सगळयांनी बघितलं आणि नवल म्हणजे तीन जण माझ्या पत्ता शोधत माझ्या घरी आले. अ, ब, क म्हणु या.

त्यातील एकजण म्हणाला, ''युआर स्वीट''बाकी दोघांना बघत म्हणाला, '' तुम्ही बाहेर बसा. '' अ नी, मला सांगितलं की, तो नवोदित कलाकार आहेत आणि त्यांना स्वप्नात मी दिसले आणि तो माझ्याशी लग्न करू इच्छितो. त्यांने सिनेमातल्या सारख माझ्यासमोर गुडघे टेकून मला लग्नासाठी प्रपोज केलं.

“काही तरी जादू घडली आणि मी तुमच्या प्रेमात पडलो. तुम्ही माझ्या स्वप्नात आला आणि तुम्ही प्रत्यक्षात पण भेटला. '' अस तो बोलू लागला.

“ मी विचार करून तुम्हाला सांगते'' असं, उत्तर त्याला देऊन मी सटकले. ब आणि क असेच बोलले. ड नंतर भेटला.. मी ऑफिसमध्ये आले तर चौथा, ड, जण वाट बघत होता. बॉडीबिल्डर होता. स्लीवलेस सारख किरकोळ काहीतरी घालून तो

सर्व बाजूंनी स्वतःच्या अंगाचा मसल्स दाखवत होता. मात्र मला तो पॉलिश्ड वाटला नाही. त्यांनी सुद्धा सांगितले, मी त्याच्या स्वप्नात आले. अचानक मी एवढ्या लोकांच्या स्वप्नात कसे गेले याचा मला आश्चर्य वाटत होतं. मी घरी यायला निघाले. तेव्हा बसस्टॉपवर उभी असताना एक श्रीमंत वृद्ध गृहस्थ समोर आला आणि मला म्हणाला की, मी आपली त्याच्या स्वप्नांची राणी दिसते. मी त्याच्याशी लग्न करावं. तो त्याची सर्व प्रॉपर्टी देणार होता.

“मी तुमच्याशी लग्न करून सर्व नावावर करून, न्यायालयीन लग्न करणार आहे"तो म्हणाला होता. मी हादरले दिवस तर भयानकच गेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसमध्ये गेले तर भरपूर पुष्पगुच्छांच्या टोपल्या टेबलाभोवती पडलेल्या होत्या. सर्व पुष्पगुच्छांवर अलंकार यांचेकडून सप्रेम भेट असे लिहीलेले होते. माझ्या बॉसला राग आला. त्या ओरडु लागल्या.

“ हे काय सगळीकडे फुलं पडलेली? ऑफिसमध्ये काम करा. कार्यालयातून जा. सर्व बुके गोळा करायला मी नोकऱाला समजावुन ती सगळी फुल बाहेर ठेवून दिली.

“हा अलंकार कोण?” असं त्याला विचारलं. त्या नोकरांनी सांगितलं की कोपऱ्यावर दुकानदार आहे. त्याच नाव अलंकार

आहे आणि तुम्ही येण्यापूर्वी चार वेळा येऊन गेला. तो अलंकार फ्लोरिस्ट सुद्धा माझ्याशी लग्न करू इच्छित होता. पुष्पगुच्छ वाढतच चालल्याने चिंता सुद्धा वाढत होती.

मी बहिणीला फोन केला.. सल्ले. मी रात्री माझ्या बहीणीला मला होणारा हा त्रास सांगितला. त्यावर तिने तिचा नेहमीचा अंधश्रद्धेचे सल्ला, तेच उत्तर दिलं.

"ताबडतोब तू त्या मन कर्णिकांच्या मोह तलावातील नाणी परत टाकून ये"

"अग काय, नाण्यांचा, त्या नाण्यांचा या घडणाऱ्या घटकांचा संबंध काय?"मी

" हेतू तुझ्या चाहत्यांना विचारून बघ. कदाचित संबंध लागेल. "मी माझ्या सर्व चाहत्यांना फोन केला आणि विचारलं किती कधी सिमला मनकर्णिका, मोह तलावाकडे गेले होते का? त्यांनी मनकर्णिका तलावात इच्छा पूर्ण व्हावी म्हणून नाणे टाकले होते का?"

नवल म्हणजे खरोखरच हे सर्व जण मन कर्णिकांच्या तलावात गेले होते आणि यांनी चांदीची सोन्याची कथीलाची लोखंडाची विविध, शिवगंगा प्रकार नाणि, त्या मनकर्णिका तलावात टाकली होती. मी हादरले. या लोकांनी त्यांनी टाकलेल्या नाण्यांचे चे वर्णन

केलं होतं ते मी तलावातून गोळा केलेल्या नाण्यांशी हुबेहुब मिळते जुळते होते. मी बहिणीला परत फोन केला.

"काय करू ह्या सर्वांनी टाकलेली ती नाणी आहेत. मला हे नाण्यांचं काहीतरी करायला हव"मी

"आता या सर्व चाहत्यांना नकार देवुन सुद्धा, त्या जागी तू या सर्व चाहत्यांना घेऊन जा. मनकर्णिका यांना घेवून परत जा. तीथे ही नाणी टाकली कि प्रश्न मिटेल"बहीण.

बहिणीचा सल्ला ऐकुन मी या सर्व मित्रांना फोन केला आणि सांगितले की मला मनकर्णिका जायचे आहे. आपण सर्वजण माझ्यासोबत चलता का ?हे चारही मित्र तयार झाले, ते चार जण आणि मी आम्ही पाच जणांनी खास गाडी ठरवली आणि मन कर्णिकांच्या दिशेने निघालो. हे चारही जण मला म्हणाले, "आमच तुझ्यावर प्रेम आहे. तू आम्हाला हा मान आता दिला नाही, तरी मदत करु. म्हणत आले. गाडी मध्ये मैत्री झाली. सर्व प्रार्थना करून मनकर्णिका नाण टाकल्यामुळे आपल्याला, सर्वांना आपल्या जीवाचा जोडीदार नक्की मिळेल. मनकर्णिका पोहोचले तेव्हा माझा मित्र अमन, त्यांच्या ऑफिसमधल्या तीन मैत्रिणींसह तिथे आलेला होता. मी तडफडले. पण ही सर्व, सोबत आणलेली नाणी मी मनकर्णिका च्या त्या गार मोह तलावात टाकून दिली. मनकर्णिका

देवीची माफी मागितली. लगेच सर्व मित्रांच्या नजरा बदलल्या. निर्मळ झाल्या. हे मित्र मला मिसेस अमन म्हणु लागले.

“ आपण आता मित्र राहु या “ असे ही मित्र मंडळी म्हणू लागली. मात्र, अमन आणि मी, आमची मात्र नजर बदलली होती. अमनच्या सोबत आलेल्या मैत्रिणींसोबत माझ्या या चारही मित्रांनी मैत्री करून घेतली होती. ते लोक परत यायचं नाव घेत नव्हते.

“आम्ही ईथे वस्तीस राहणार “असं म्हणून ते तीन अधिक टीममध्ये एक अधिक एक मजेचा जोडपी, अशी जोडपी मनकर्णिका हॉटेलात राहिली. मी आणि अमन, सिमल्याहुन ट्रेनने, अनियमित पणे मुंबईला परतलो. कारण कि आमची काम होते. परतल्यावर काही दिवसांनी अमनने रीतसर रित्या माझ्या घरी येऊन मला मागणी घातली आणि मी होकार दिला.

मनकर्णिकांच्या नाण्यांनी किंवा कुठल्या कारणांनी माहिती नाही पण जीवाचा जोडीदार मिळायची इच्छा पूर्ण झाली.

**

# सागर किनारे

समुद्राचा आकर्षण कुणाला नुसतं? सगळ्यांनाच असते. त्यातून मी हा कोकणात वाढलेल्या कुटुंबातला त्यामुळे ती समुद्राची गाज ऐकू आली की मला खुप बर वाटत. कधीकाळी मी नोकरीसाठी मुंबईला गेलो तेव्हा सुद्धा मी समुद्राच्या जवळ जाई. शंख कानाशी धरून ती समुद्रासारखी येणारी गाज ऐकत असे. समुद्राचे मला खूप प्रेम होतं. असं म्हंटलं तर मला रोजच समुद्रकिनारी जाऊन रहायला आवडेल, लाटा बघायला आवडेल. आता राहतो ते नारगाव तसे समुद्राच्या जवळ, थोडे दहा मिनिटे चालत इतक्या अंतरावर होते. त्यामुळे आठवड्यातून दोन दिवस तर मी नक्कीच समुद्रावर जायचो. गावी आई व नवर्‍याला सोडलेली बहीण होती. पूर्वा ताई!

ताई गायची. सागर किनारे दिल ये पुकारे, तू जो नहीं तो यहां कुछ भी नहीं है.

समुद्रकिनारा मला खूप आवडायचा. गाव खूप निसर्गरम्य होतं नारळी पोफळीची झाडं होती. मुंबईला गिरगावात एका मामांच्या घरी बाळू म्हणून काही किरकोळ काम करायला त्याच्या कुबलाच्या हॉटेलात राहिलो होतो. खायला प्यायला देत असत बाहेर

पथारी पसरून झोपावे लागायचं. पण गल्लीत खूप मारामाऱ्या सोडावॉटरच्या बाटल्या एकमेकांची मारायचे. त्या काळात दहीहंडी दरम्यान मला पायाला थोडा मार लागला. मग मी सगळं सोडून कोकणातल्या माझ्या गावी परत आलो आईने माझ्या साठी बघितलेल्या मुलीशी लग्न केले. मुलगी चांगली होती. माझ्या शिक्षणाचा आनंद होता त्यामुळे ती शिकलेली नव्हती यात मला काही वाईट वाटलं नाही. घरात काम करायची. बरी होती. घरात मोठ्या बहिणीचं पूर्वीचे लग्न झालं होतं पण काही कारणांनी ती नवऱ्याला सोडून इकडे आली. ती घरी तशीच होती.

मैंने चांद सितारों की तमन्ना की थी!

मुझको रातों की स्याही के सिवा कुछ ना मिला, हे गाण म्हणून रडत बसायची. घरातला जुना रेडिओ ती ऐकत बसे. जवळपास दुसरी घर नव्हती. रात्री कोपर्यावरचे होटेलातून गाणी ऐकू येत. ताई चे वाटोळे झाले कारण हुंडा दिला नाही, म्हणून सासुसासरे त्रास देत. हुंडा दिला नाही, याची तीन कारणे होती. एक घरात पैसा नव्हता. दोन होता त्यातला पण स्वतःसाठी राखून ठेवायचा होता. तीन स्वतःच्या मुलांना सगळे द्यायचं होतं मुलाचे साठी राखीव होत. पण मुलीला मात्र कसंतरी घराबाहेर पाडायचं होतं. मुलींना आहे ते देवून कटकट मिटवायची होती.

ताई चा सासरा वारंवार येई. “लेकीला चार बांगड्या घाला. मुलीला नेतो” असे सांगत असे. उमलत्या फुलांसारखी पूर्वी ताई त्याकाळी खूप सुंदर दिसत असे. ताईचा स्वभाव पण शांत होता. भावनाप्रधान अतिसुंदर गाणं म्हणायची. लांब शेपटा घालून चालायला लागली की गाव टकमक बघे. त्यामुळे दृष्ट झाली. माझ्या लग्न जमण्यात अडचण नको, त्यामुळे असेल मी म्हटलं

“आई तुझ्या बांगड्या दे. तर प्रश्न मिटेल” त्यावेळी आई म्हणाली

“तुझ्या बायकोला काय घालणार?”

“हो, बरोबर आहे”मी. त्यामुळे काडीमोड झाला. तरीही बर्याच घरी ही केस होती. पण आजही गळयात पोत होती. त्यामुळे गावात पुढे कोण वाईट नजरेने बघत नसत. वेगळे पण कारण कि गावांमध्ये कोकणी दुखणी ही सर्व प्रकारची विचित्र असायची. बरीच माणसं तरुण पोरगी पटेल म्हणून तिच्याकडे वाईट नजरेने बघायला हपापलेली होती. गो नि दांडेकर यांनी त्यांच्या यशोदा या कादंबरीत वर्णन केल्यासारखे कोकण ची जमीन या नारगावची पुळण सुंदर होती. पण गावातले खोत, पर्यटक, पुरुष आणि बरी माणसं मंदिरातले पुजारी समुद्रकिनारी भटकणारे रिकामटेकडी पोरं सगळेजण त्या कथेत वर्णन केल्यासारखे बायकांच्या बाबतीत

हपापलेली असावी. ताईची तशी काही भानगड कानावर आली नाही आणि मी पण तिच्यावर लक्ष ठेवून असतो. गावात कोपऱ्यावर एकच वाणी बाईच हॉटेल होतं. बाई हुशार होती आणि तिच्या हाताला चव होती. आणि घरी माझ्या बायकोला स्वयंपाक करायचा कंटाळा येत असे. माझी बायको आणि माझी बहीण दोघींची सारखी भांडणं होत असत. सकाळी नाश्ता बनवायचा कंटाळा करी. लवकर जर स्वयंपाकाला लागतील तर आनंद होता.

नवल म्हणजे माझी बायको आणि माझी आई यांच मात्र चांगल्या पटायचं. पण ताई आणि माझी बायको यांची भांडण चालू असायची. आज स्वयंपाक करायचा आहे त्यावरून वाद सुद्धा होई. एकदा राडा झाला असता मी ताई ला सांगितलं.

“ ऐक पूर्णा ताई! एक तर लग्न होऊन तू दुसऱ्याची झाली आहेस. बाहेर दुसरी जागा, घर बघ. शहरात नोकरी बघ”पण ताई भित्री होती. मुंबईत काकांचे मदती ने राहायला हरकत नव्हती पण कोणी मदत केली नाही. ताईला चोचले. का असे?पण सगळ्यांनी एकत्र येऊन काहीतरी उपाय करणे टाळावे? त्यानंतर काही काळाने ताई चा आवाज कमी झाला. मी पण गप्प बसलो. बायको बडबड करत असे. ताई रडु लागे आणि मी बायकोला म्हणत असे

“ अगबाई भांडण करू नको रक्तदाबाचा त्रास होईल “पण बायकोचं चालू राही. काय करायचय?ताई पूर्णा बघत होती. तिच्या मनात काय होतं मला कळेना झाले. तर असो. घरात तर काय डाळ भात खाऊन दिवस काढत राहिलो. बायको मच्छी तुकडे फुकट/ विकत कधी मिळाले तर तळण करायची. बायको त्या दिवशी मात्र खुश असायची. बाकी परवडेल ते भात खात असु. थोडी कमाई त्यातच सगळं भागवत असे. सगळया गावांचे पुरुष वाणी बाईचं मालिनी च्या दुकानात पापलेट किंवा माझ्यासारखे एखादा तुकडा सुका बोंबील वडापाव खाऊन वेळ घालवायला यायचे. मी पण तेच करत असे. गावच्या याच्या / त्याच्या बातम्या कळत असत.

असेच एका दिवशी त्या दुकानात वडापाव खात असताना तिथे आलेल्या अमीर नावाच्या पर्यटकाने मला बोलावून घेतले आणि मला एक हसरा पाहुणा भेटला. अमीर गोड बोलला. समुद्राच्या पाण्याला येणारी भरती बघायला मी अमीर सोबत समुद्रावरचा पुळणी वर गेलो. “गावात तरुण सुंदर मध्यमवयीन अशा बायका आहेत का ?माझ्या काकाला हवे. बीजवर आहे, त्याला लगीन करायचं आहे. ”असा हा माणूस मला विचारत म्हणाला.

“गावात सुपर गरिबी आहे. गरिबी होती. आतापर्यंत मुली लग्नाच्या झाल्या होत्या. हुंडा! आणि नकळतच मी त्याला ही माहिती पूर्ण दिली. त्या माणसाने मला शंभर रुपये दिले. शंभर रुपये मला बापरे !कोकणी माणसाला महत्त्व शंभर रुपयाचे किती असते. सर्व माहिती जाणून घेऊन अमीर गेला. परत कधीतरी भेटेल आणि परत शंभर रुपये देईल आणि उरलेल्या बायकांची माहिती काढून घेईल असं मला वाटलं होतं पण त्यानंतर अमीर गावात कधीच दिसला नाही. बायका आहेत का ?फसायला काय झालं ?त्याने सर्व बायकांची माहिती काढून घेतली. सवयीने मी तोंड उघडलं. तुम्ही काहीही बोलू लागता मनात नाही म्हटले म्हणून तरी असं काहीतरी असतं. इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या. पाहुण्याची माहिती न करता मी बोललो. समुद्राच्या किनारी भीती वाटते ना !पाहुणा गोड बोलुन चावी मारुन, अधिक नवीनन माहिती काढून घेत होता. त्या अमीरच्या डाव्या हाताला सहा बोलत होती.

एकच दिवस तो माणूस माझ्या सहवासात राहिला होता. माझ्याबरोबर खूप त्याने गजाली केलेल्या. इकडची तिकडची माहिती काढली गाव ची सगळी माहिती काढून घेतली.

“गावाचं सर्वात सुंदर कोण ?गावातल्या सगळ्यात श्रीमंत घर कोणती?त्या कोणत्या बंगल्या पडिक आहेत. अजून सुद्धा सर्वात

श्रीमंत कोण कोण?या श्रीमंत माणसाकडे घरात पैसा आहे का/ बँकेत आहे? दागिने घरात आहे कि लॉकरमध्ये आहेत?सांगा ना!''

" नानुशेठ नगरसेवक दोघ लई भारी आहे. पैसा!नाही काही ठेवलेत लॉकरमध्ये, पण घरात पण असतील. ''मी

"सोनार आणि त्याबद्दल सांगा''अमीर

माणसाने खूप इकडच्या-तिकडच्या बाता केल्या. शंभर रुपये दिले मला चहा आणि वडापाव खायला दिला.

" कधी भेटाल पुन्हा. या ना'' मी त्याला म्हणालो.

" तुम्हाला भेटू असंच कधीतरी!''अमीर शंभर रुपये म्हणजे काय झालं. माणसाला पैसा किती मोठा वाटतो.

पंधरा दिवस मी अमीराला पाहण्याचा खूप शोध घेतला. वाणीनीच्या चहाच्या टपरीवर जाऊन वाट बघायचो. पण अमीर काही भेटला नाही.

पण त्यानंतर एक विचित्र घटना घडली सगळयात श्रीमंत माणूस असं वर्णन केलं होतं त्यां नानुसेठ, माणूस कडे चोरी झाली. दागिने सोना चांदी पैसा रोकड चांदीची भांडी ऐवज चोरून नेला. घरच्या माणसांना बांधून ठेवलं. मारेकरी तोंडावर फडके बांधून आली होती. पोलीस आले कुत्री बोलवली. पण पोलिस व. चोरट्याचा शोध घेऊ शकली नाही. नोकरांना पोलीस मारत होते.

चौकशी करत होते. बाईमाणूस लई लोक जमली होती. पण कोणीच काही बोलत नव्हतं. परत पोलिसांनी कुत्रा मागवला. कुत्र्याच्या मार्फत माग घेतला पण फक्त वाणिनीच्या चहाच्या टपरी पर्यंत कुत्रा पोचला पुढे पोचला नाही. त्यानंतर परत एक मोठा कुत्रा माग वला. समुद्रकिनारी पर्यंत जाऊन आला. या गावाला सात ठिकाणी वेगवेगळ्या ठिकाणी समुद्रकिनाऱ्याला जाण्याचे रस्ते होते. सात ही ठिकाणच्या रस्त्यावर धाब्यांवर पोलिसांनी शोध घेतला पण कुठेच शोध लागला नाही. कदाचित समुद्रातून बोट मार्गाने चोर निघून गेले असावे.

एक महिना उलटला सगळ्यात श्रीमंत म्हणून मी नानूसेठ त्यांचं नाव सांगितलं होतं आणि त्यानंतर सगळ्यात किंमत पुजारी नंतर नगरसेवक झाला होता त्याचं नाव सांगितलं होतं. या नगरसेवकाच्या घरी पुन्हा दरोडा पडला. मला अमीरचा संबंध असावा असे वाटले. संशय आहे, मात्र पोलिसांना मी बोललो नाही. मी समुद्रकिनारी विचार करत जाऊन बसलो.

माझी काहीतरी मोठी चूक होती. शंभर रुपयाच्या मोहात मी बरीच माहिती दिली होती. कदाचित माझ्या सारख्या इतर कोणाशी अमीर बोलला असेल. अन्यत्र कोणी मूर्ख असेल त्यांनी अधिक माहिती दिली असेल. जसे कि घरात लग्नानिमित्त खूप दागिने

काढून आणले आहेत वगैरे. बिचारा मी थोडा शांत झालो. घरी आलो. बायको रडत म्हणाली.

“ मुंबईला जाऊ या या खेड्यात काही भविष्यकाळ उरलेला नाही. कधीतरी अस होता होता आपण उपासमारीने मरून जाऊ. घरी लुटायला तर काही नाही. ते आईच्या हातातल्या बांगड्या देऊन पूर्वा ताई ला घरात जाऊ द्या यला हव होते. ”बायको

“सोनं मोडून घेऊन येऊ या. खोपट विकून या घरातून जाऊ या. ” आई.

मुंबईला अमीरला पाहुण्यांना मी या नगरसेवकाचा देखील नाव सांगितलं होतं. त्यामुळे नानुशेठकडे आणि पाठोपाठ नगरसेवकाकडे दरोडा पडावा, यात अमीर पाहुण्याचा काहीतरी संबंध असावा असं मला वाटलं. त्यानंतर एकदा मी पौर्णिमेला समुद्रकिनारी पूजा करत असतांना मला अमीर पाहुणा दिसला. तसेच कोट टीप टॉप त्याच्याबरोबर कोणीतरी बाई होती. पण मी त्या बाईला बघता येण्यापूर्वी, नीट निरखून बघण्या पूर्वी ती बाई गायब झाली. मुंबईच्या किनाऱ्यावर

मुंबईला जाणाऱ्या बोटीच्या दिशेने तो गायब झाला. याचा अर्थ तो मुंबईचा असावा आणि त्यानेच बातम्या काढून गावात चोरी केले असावी असे मला जाणवले. मला भीती वाटू लागली,

पण मी कुणाला काय सांगणार? मी किती सामान्य माणूस होतो आणि सांगून अमीर ने माझा काटा काढला असता. आठवडा गेला. मात्र त्यानंतर एकदम धक्कादायक घटना घडली. अलका गावातून गायब झाली. शोध घेतला गेला. पैसा फारसे नव्हते. त्यानंतर कल्पना नाहीशी झाली. अमीर मुळे हे होत आहे असं मला वाटतं

पाठोपाठ अनेक तरुणी गायब झाल्या. या गावात चर्चा होऊ लागली. प्रशासन तर नेहमीप्रमाणे सुस्तं झोपलेल होत. पण थोडीफार खबर पसरली. त्या खेड्यात तालुक्यात नगरसेवकाच्या घरी दरोडा पडल्यामुळे, विरोधी पक्षांमध्ये वगैरे थोडीफार खळबळ माजली. मात्र पुढील चौकशी करत नव्हते.

मला अमीरला सगळ्या तरुणींची जी नाव सांगितली होती, त्या बघितल्या कि भीती वाटते. मी पाहुण्या अमीरला माहिती सांगितली होती, ते आठवुन भीती वाटते.

दहा दिवस गेले आणि एक दिवस अतिशय विचित्र घटना घडली माझी बहीण गायब झाली.

मी समुद्रकिनारी पाहिलं होतं बस कंडक्टर सगळे ओळखीचे होते. त्यांच्यामध्येही नाही. ताई मुंबईच्या दिशेने कुणाबरोबर तरी गेली असावी अस वाटून शोध घेतला. या गावातल्या गल्ली रस्ते समुद्राकडे जातात आणि सातही रस्त्याने वेड्यासारखा बहिणीचा

शोध घेत समुद्राच्या दिशेने भटकत राहिलो. समुद्रकिनारी जाऊन बसलो. काय करावे मला कळेना. पाहुण्याला मी गावातल्या बाकीच्या बायकांची माहिती दिली होती, पण माझ्या बहिणी बद्दल माहिती कुठून मिळाले?याचा अर्थ ईतर जण अमीर ला बातमी देत होते.

मी पण माझी बहिण म्हणून सांगत नव्हतो ते इतरांनी सांगितलं. गावात सात आल्या होत्या आणि समुद्राच्या जवळ एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत दिसत नसते.

यातून जाऊन बहिणीचा शोध घेतला. या शोधासाठी सारखा समुद्रकिनारी जाई. माझी आई पण खूप खकाणा करायची.

“सांगत होतो तिची तिचे लग्न करून देवा. पण तो तुम्हाला सगळ्यांना खानदानाची पडली होती. मोठ श्रीमंत उतु चाललं होतं. माझी लेक कशी असेल?तीला कोणी विकली असेल? तिला कोठ्यावर नेल असेल?”आई “गावातल्याच अर्ध्या डझन मुली गायब झाले आहेत. “मी

“सर्व सरकार गप्प बसलय. ××××ल्या. तुम्ही तरुण पोरं शेपूट घालून बसले आहात. बायको भोगत मजा मारत पडले आहात. ”गावचे गुरुजी.

सार्यांनी खूप बडबड केली. मी पूर्वा ताईला सर्व ठिकाणी शोधलं. पोलीस स्टेशन मध्ये पण जाऊन ताईला शोधा अस सांगितलं. सर्वत्र शोध चालूच होता. आठवड्याला मी पोलीस स्टेशनात जाऊन पोलीस इन्स्पेक्टर ला सांगायची. पोलीस इन्स्पेक्टरने मला विचारलं,

“ तुम्हाला कुणाला संशय आहे का?” त्यावर मी पाहुण्याचं नाव एकदा शेवटी घेतलं. पाहुण्याचं नाव अमीर, गाव मला काहीच माहिती नव्हतं. मात्र अमीर मुंबईहून येतो आणि तेव्हा येऊन गेल्याच्या दुसऱ्या दिवशी काहीतरी गडबड गावात होते. ”मी असा संशय पोलिसांनी व्यक्त केला.

घरी पोचेपर्यंत मला माझ्या जीवाची भीती वाटू लागली. पण घरी नव संकट होत.

आधी बहीण आणि आता बायको गायब झाली होती. आई वेड्यासारखी करत होती. दिवस दिवस न खाता-पिता बसून राहायची. माझ्याकडून आयुष्यभराचे पाप झालं होतं. शंभर रुपये देऊन माझ्याकडून सगळी माहिती काढून अमीर ने लुबाडणूक केली आहे. ईतर घरच्या लग्न न जमणाऱ्या, नवरा नव्हता अशा बायका जोपर्यंत सोडून पळून जात होत्या तोपर्यंत मी गप्प बसलो होतो. माझीच बहिणी बायको गायब झाल्यावर मी हादरलो आणि

पोलिसांच्या पाठीमागे शोध वाढवा म्हणून टोचू लागलो. की माझ्या बहिणीला आणि बायकोला पोलिसांनी काही कोणावर संशय आहे का असं विचारताच बोलल“.. आहे अमीरचा”

मी पाहुण्याचा, समुद्राच्या किनारी पाहण्याचा उल्लेख केला.

“ अशी चौकशी करतात का?पर्यटनाला लाखो लोक या गावात येतात. त्यातल्या कुणी असेल. ”साहेब

“ नाही साहेब मला काहीतरी वेगळेच वाटते. बरं त्या माणसाची काही वेगळीच लकब होती. हाताला सहा बोट होती. तेवढी एक विशेष आहे”मी.

कुणी आईला बघे. मी वडापाव खाल्ला आईला खायला पार्सल दिला. असेच चालू आहे. पोलीस अजूनही शोध घेत आहेत. ना बहिण सापडली, ना बायको सापडली. आई घरात शांत कोपऱ्यात बसून असते. समुद्रकिनारी जाऊन बसते. मी आपला किरकोळ काहीतरी काम करून उचापत्या, वर चौकशी शोध करत फिरतो. वाणिनिच्या त्या दुकानापाशी वडापाव खातो. आईसाठी काही घेतो आणि दिवस काढतो.

जर पहिल्यांदाच मला संशय आला होता पण मी दुर्लक्ष केलं. तेव्हा सांगितलं असत तर काही मदत झाली असती का? मी जर

एवढी खूप महत्त्वाची, अमीर ला सहा बोट आहेत ही खूण, हे सांगतोय तरी पोलीस का शोध घेत नाहीत?

एका मोठ्या नेत्याच्या आत्महत्येचा फियास्को पूर्ण देशाने काय जगाने बघितला. त्यामुळे पोलिस आता काय शोधणार? मला बहीण गेली तेव्हा मी गप्प बसलो कारण ती एकटी होती. पण माझी बायको गेल्यावर मी सावरुन गेलो होतो आणि तिचा शोध घेऊ ईच्छित.

मी समजतो की माझी बायको मला कंटाळली असावी.

‘‘साहेब बायकोला, माझ्या बहिणीला शोधा’’

फोटो/ फलक घेवून पूर्वाताईचा शोध लागावा यासाठी मी वारंवार पोलीस स्टेशनला खेटे घातले. पोलिसांच्या मागे लागलो. त्या माणसावर अमीर चा मला संशय येतो त्याचे वर्णन सुद्धा. त्याच्या डाव्या हाताला सहा बोट आहेत ही खूण सांगितली.. खरतर जगात किती थोड्या लोकांना डाव्या हाताला सहा बोट असतील तेवढ्या वर्णनावर पोलीस शोधू शकत होते. कदाचित गावातल्या इतर सुद्धा हरवलेल्या तरुणीचा शोध लागला असता. पण पोलिसांनी पण मनावर घेतले नाही घेतलं.

मी सुद्धा शोध घेऊन घेऊन रस्त्यांवरून जाऊन, सागर किनारी बायको चा शोध घेतो. दोघी परत आल्या नाहीत.

त्यानंतर मात्र अजूनही नारगावातून तरूणी गायब होत आहेत. सर्व समुद्र किनारे मी शोधुन झाले.

***

# गुनाई

माझं नाव गुनाई काणे. तशी मी गोरी सुंदर घारी आहे. सुखी कुटुंब, आशा नावाची खास मैत्रीण, मी तृप्त आहे. मी नृत्याचे विशारद आहे. नृत्याचे क्लासेस घेते. ईतरांचे प्रश्न पडत नाही. मी बरी माझे घर बरे. अजुन विवाहा ची वाट बघते आहे. मी पेशाने वकील आहे. सनद घेतलीय. माझी वहिनी पण वकील आहे. गेली काही वर्षात मी व वहिनी ने एकाच जेष्ठ वकीलाकडे प्रॅक्टीस केलीय. पण मला हल्ली निराशाजनक वाटते. अशा त्या काही वेळी, संध्याकाळच्या वेळचा फावला वेळ घालवण्यासाठी म्हणून नृत्याचे वर्ग घ्यायला सुरुवात केली. गुणधारा नृत्य वर्ग मी सुरु केले आणि मला कळल कल्पनेपेक्षाही खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सर्वत्र स्वागत प्रशंसा होऊ लागली. अक्षरशा तीन वर्षापासून ते 70 वर्षापर्यंतच्या स्त्रिया, नृत्याचे क्लास साठी धावपळ करत येऊ लागल्या. काही तरुण मुलं पण यायची. मात्र मुलींची संख्या मोठी होती.

लवकरच माझ्या लक्षात असे आले की मी तर वकील म्हणून नावारुपाला आलेली नाही. नृत्य, त्याच्या वर्गात मला अधिक लोकप्रियता मिळालेली आहे. माझा छंद असल्यामुळे मला आनंद

मिळतो आहे. आणि पैसा भरपूर मिळतो. चारचौघात गुणधारा क्लासचे नाव होतं. आई-वडिलां सोबत मी त्या घरी रहात होते भावाचं लग्न झालं होत आणि भाऊ आणि वहिनी स्वतंत्र घर करुन राहायला मागु लागले. माझे वहिनी बरोबर पटत नाही. वडील चिडचिड करायचे.

"कशी गुणाई, बिन लग्नाची राहील. हे स्थळ नकोस ते स्थळ नको काय चाललंय?येईल त्या मुलाशी तडजोड करून लग्न करून घे. "पण मला असं वाटायचं मला अधिक चांगला मुलगा मिळावा. लग्न व्हायचं अस राहून गेलं त्यात एक दिवस वडिलांना मित्राला सांगितलं ऐकलं

"बिन लग्नाच्या मुलीची जबाबदारी अंगावर पडते की काय?हीच्या मुळे मुलगा स्वतंत्र राहतो. आम्हाला नातीचे सुख मिळत नाही " वाईट वाटलं. मी माझी स्वतंत्र राहणार होते. बिल्डींग मध्ये नवा फ्लॅट घेतला. आईवडील आपणहून माझ्या घरी राहायला आले. त्यामुळे वडिल त्यांनी माझ्याबाबत असं बोलावं याचं मला वाईट वाटलं. त्याच दरम्यान मला एका गुजराती तरुणाने लग्नासाठी मला विचारले. विवाहासाठी प्रपोजल मांडलं होतं. मुलगा चांगला होता मी त्याच्यासोबत गुजरातला जाऊन घर पाहुन आले. त्या मित्राचे घर खूप सुंदर होते. त्याला माझी कला

आवडायची. त्याने मला गुजराती लोककला, नृत्याचे काही प्रकार देखील शिकवले. राणीनी बावडी हे नृत्य मी बसवले. गुजराथी मासिक तर्फे बक्षीस मिळाले. मी खुशीत होते. मी घरी आले. मला आता लग्न करायच होत.

पण दुर्दैवाने घरी आल्यावर असं लक्षात आलं. आई वडील दोघांना मी भावाकडे पोहोचवले होते. तिथे खूप भांडण झालं. ते दोघे माझ्यासोबत राहायला पाहत होते

ते या लग्नाला विरोध करत आहेत. त्यांना मुलाकडे जायचं नाहीये. ते म्हणत होते की आम्हाला देखील तुझ्यासोबत सासरी ने. गुजराथी असु दे.

मुलाच्या घरची कटकट होती. मुलाला कुणी हिम्मत दिली नाही आहे. त्यामुळे

“मी तुझ्या सोबत लग्न करणार नाही” असं मी माझ्या या गुजराती मित्राला सांगितलं. माझी मैत्रीण आशा मला या निर्णयावर रागवत होती.

“ अगं तुझे वडील स्वार्थी आहेत. असं करू नको. तुझ आता वय पुष्कळ वाढले आहे. तुझी पंचेचाळीशी वेशी ओलांडली आहे. याच्यापुढे तुझ कधी लग्न होईल? या लग्नाला नकार देऊ नको. संधी सोडू नको. ”आशा

“आई वडील त्यांचे कसे होईल?”मी

“त्यांचे ते बघतील. तुझा भाऊ यांना सांभाळेल नाही तर कुठेतरी ठेवेल. भेटायला जा, गुंतू नकोस”आशा “मला असं वाटत कि ते मरतील”मी

“मजेत होते. अगं पुढे आयुष्य उतारावर लागले की तुझ काय?संध्याछाया भिवविती हृदया म्हणून तू एकटी करत करत कसे जगशील?श्री संधी सोडू नको मुलगा चांगला आहे भाऊ आणि वडील वगैरे बघून घेतील. सगळं जग स्वार्थी असते” आशा मला वारंवार समजावत होती. पण मी तिच्याकडे दुर्लक्ष केलं. माझा क्लास होता माझी बक्षीस होती मला परदेशी अमेरिकेला नृत्यासाठी जाण्याची संधी आली होती त्यामुळे मी हे लग्न मोडले याचं दुःख विसरून परत कामाला लागले. पण माझ्या मनात मात्र त्यां गुजराथी मंचाच्याबद्दल प्रेम आणि आकर्षण रूजून राहील. अनेक नृत्ये नाटिका मी गुजराती लोक कशाबद्दल बसवू लागले. घरी आई-वडिलांनी “मुलगा आणि सुन तुझ्याशी पटत नाही म्हणून वेगळे आहेत. आम्हाला तु सांभाळ” माझ्या अंगावर जबाबदारी येऊन पडली होती. परत परत गुजराती मित्राने मला लग्नाबद्दल विचारले. मी माझ्या आई-वडिलांना आग्रह करत होते

माझा मित्र एकत्र कुटुंबाच्या घरातला होता. या लग्नाला विरोध होता. तरी पण ऑलरेडी त्यांच्या घरात सभासद वृद्ध होते. अतिवृद्ध सुद्धा होते. त्यात माझ्या आई-वडिलांना तो कुठे घेऊन जाणार होता? पण तो काळ वेगळा होता. वृध्दाश्रमांचा नव्हता. मग मला सुद्धा तेवढी प्रगल्भता नव्हती. तरी काही दिवस कंपनियन किंवा केअरटेकर म्हणून ठेवून मी लग्न करून जावु शकत होते. पण मी संधि सोडली.

नृत्य साथीला होते. वेगवेगळया सरकारी कार्यक्रमात सत्कार होत होता आणि मी अहंकाराने खोटी पीस लावून बक्षिस घेऊन नाचत होते. मोठे मोठे सत्कार समारंभ होत. मी प्रगती करत होते.

राजपुत्र येईल वाट बघत होते.

या अहंकाराने मी खोटी मोराची पीस लावून नाचत होते. आता थोडसं सौंदर्य उतरू लागलं होतं पण मेकअप च्या मागे लपत होते. मी 48 वर्षाचे झाले होते. माझ्यासाठी आता कुणीही स्थळ बघत नव्हतं. माझ्या लग्नाचा विचार करत नव्हतं. माझ्या विद्यार्थिनींमध्ये एखादी विचारी विद्यार्थिनी

“मॅडम तुमचं लग्न होईल” असं काहीतरी समजूत काढणारे विषय काढून मला एखाद्या ज्योतिषाकडे एखाद्या गुरु कडे घेऊन जाई. असले अनेक ज्योतिषांनी काही सांगितलं.

मी निराशेत आहे. दाखवायला मी ठीक आहे. मी आता 48 वर्षाचे झाले होते. माझ्या या गुजराती मित्राने लग्न करून घेतलं होतं. त्याला एक सोडून तीन मुल झाली होती. सगळया मैत्रिणी आपापल्या मार्गाला लागल्या होत्या. काही वर्ग मैत्रिणींच्या मुलांची पण लग्न झाली होती.

पण मी नृत्याचे बाबत रमे. स्टेजवर सजे त्यामुळे त्यांच्यावरील नाचात मी खूप सुंदर दिसे. खूप सुंदर नाचताना दिसे. शिष्याना शिकवे. त्या तरुणी छान नाचत. त्यांचे सोबत मी खूप सुंदर नाचत असे. आई-वडील राहत असलेल्या फ्लॅटचे रिडेव्हलपमेंट झाले. त्यावेळी आई-वडिलांनी सगळं काही मुलग्याला दिलं. सेवा माझेकडुन करून घेतली. या आई-वडिलांवरील अतिप्रेमामुळे मी अविवाहित राहिले होते. पण त्यांना मात्र माझं काळजी उरली नाही. प्रेम नव्हतं त्यांनी सर्व प्रॉपर्टी आणि दागिने मुलगा सून आणि नातिला दिले. भावाच्या मुलीचे, या नातीच सुद्धा लग्न झालं होतं. आता सगळे जण जोडीजोडीने वावरत होते. मी मात्र एकटी होते. तसा विचार केला तर मनाने सर्वजण एकटे असतात. फार थोडी कुटुंब एकमेकांशी मनाने बोंड झालेली असतात. पण सोबत राहातात. ते एकमेकांच्या सहवासाची सवय झालेली असते.

“अजूनही लग्न कर. तडजोड कर. आयुष्यात संध्याकाळी कोणी खायला देत नाही. आणि तुम्ही मृत्यू येणार नाही. ”आशा

“ त्यामुळे काय होईल?प्रेम सोडून द्या मिळेल”मी

“ऐक. तडजोड करा. अन्यथा लग्न होणार नाही. ”आशा

तरुण सुंदर कोवळ्या मुली त्यांना पाहतांना मी कधीकधी बायपोलर होऊन जाई. कधी त्यांच्यावर खूप चिडते, तर कधी त्यांच्या खूप प्रेमाचा वर्षाव करते. माझ्यासोबत काहीतरी विचित्र घडते. हे मला जाणवलं मी परत गुरुंकडे गेले. गुरुनी मला पर्याय अनेक प्रकारे समजावून सांगितले.

पण शेवटी मी एकटीच राहिले. सर्व जणांना जोडीजोडीने मजेत गीत गात वावरतांना बघून मला वाईट वाटतं. पण मी दोष कुणाला देणार ?माझ्या त्या वेळेच्या आई वडिलांच्या स्वार्थाला ?भाऊ वहिनींच्या हलकटपणाला? माझ्या मित्राच्या मूर्खपणाला? माझ्या स्वतःच्या दुर्दैवाला ?

मी आता मी त्रेपन्न वर्षाची झाले आहे. नृत्याचा क्लास घेते आहे.

संध्याकाळ झाली की मन खिन्न होतं

संध्या छाया भिवविती हृदया

ढळला रे दिन ढलला सखया

संध्याछाया भिवविती हृदया !

असं म्हणत मी खिडकीत गॅलरी च्या बाहेर तिन्हीसांजेच्या प्रकाश पाहत असते. तो अंधार बघत उसासे सोडते. जीवनाच्या संध्याछाया आता मला भिववु लागल्या आहेत. गुणधारा नृत्याचे कार्यक्रम क्लासेस ईतर एक बाई चालवते.

***

# करोडपती

" कौन बनेगा करोडपती" या खेळांमध्ये भाग घेणे हे आमच्या खेडेगावातील एक फारच महत्त्वाचं काम मानले जाते. kBC show ग्रेट मानला जातो. मोठ्या मोठ्या शहरात क्लासेस आहे जिथे “कौन बनेगा करोडपती” या शो ला जाण्यासाठी कसे अर्ज करावे?काय करावे फी भरावी मग शिकवल जात, तयार केलं जात होतं. त्या खेड्यात सगळे सगळ्यांना ओळखणारे होते, पण कुणीच कुणाला मान देत नव्हतं. होते ते सगळे गाई-म्हशींच्या मिळणाऱ्या दुधावर, मजुरीवर केसरी मिळणाऱ्या शेतीतले उत्पन्नावर किंवा किरकोळ कमाईवर दिवस काढणारे खर्चाची भगवा भगव करणारे होते. कुणाला ब्रँडेड कपडे नव्हते. पण एक मात्र नक्की की गावात सगळ्यांनाच खूप मोठी मोठी स्वप्ने होती.

कुटुम्बियांना मुलगा झाल्यावर इतर काही प्रश्न पडत नसत. तो आनंद विचारायलाच नको. मुलाचे लग्न होताना सून, लहान गाव सोडून बाहेर ची करोडपती मिळवावी. अन्य धर्माची जातीची मिळाली तरी चालेल पण दहेज देणार हवी आणि लॉटरी लागावी असं स्वप्न सगळ्या मुलांच्या आया बघायच्या. माझ्या आईने पण

ते स्वप्न बघितलं होतं आणि त्या वयात जी स्वप्न असतात त्यानुसार मी करोडपती व्हायचं ठरवलं होतं.

लग्न झाल. पण नोकरी काही नव्हती. एकदा करोडपती झालो कि सगळीकडे नाव झालं की मग चांगली मुलगी दुसरी पण मिळाली असती. ईथे चालत आणि त्या मुलीची करोडोंची जायदाद पण मिळाली असती. जर आपण आयुष्यात स्वप्न बघितले तर यश मिळवले समजा.

टीव्ही वर पण तर फिल्म मध्ये खेड्यातून आलेला नट श्रीमंत बनलेला बघतो ‘‘कोण बनेगा करोडपती ‘‘च्या हॉट सीटवर अभिताभ बच्चन बघून मला ग्रेट वाटे. आपल्या गाववाल्यांनी तिथे बघून हीरो झाल्यासारखं वाटतं.

मी करोडपति शो साठी अर्ज केला होता. मला कुठलीतरी लॉटरी लागली किंवा लक होते. मी KBC साठी मुंबईत पोचलो. काही काळ पडद्यावर दिसलो.. माझ्या गावात एकदम लोकप्रिय झालो.

‘‘पुढच्या वेळी तुम्ही केबी शी शोला जाल तेव्हा मला सोबत घेऊन का ‘‘असं सांगून गावातली अनेक लोक घरी येऊन आम्हाला मस्का मारु लागले. त्याची उपयुक्तता काही नाही झाली, आईला

महिन्याला दोन दोन किलो साखर चहा करायला लागू लागली आणि खर्च येऊ लागला.

मी स्पर्धेत परीक्षा देत होतो, पण सारखे येणारे पाहुणे शिवाय मला कुठल्या ना कुठल्या शाळेत प्रमुख पाहुणा म्हणून कुठल्यातरी कार्यक्रमात उत्सवाला बसायला म्हणून, गर्दी खेचण्यासाठी, म्हणून भाषण द्यायला लोक बोलवु लागले. त्यामुळे माझ्यावर अहंकार चढला. अभ्यासात लक्ष उडाले. अभ्यास करुन परत होट सीटवर पोचलो.

कोण बनेगा करोडपती त मी यावेळी एक लाख जिंकले. माझा गावी सत्कार करण्यात आला. त्यानंतर एका पाठोपाठ कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण येई. नृत्य शिकवणारे वर्ग नाट्य शाळा नाटक शिकवणारी कॉलेजेस वेगवेगळया ठिकाणी, समारंभात परीक्षेत व. यावेळी मला आमंत्रण मिळू लागल आणि मी जात असेल तिथे विद्यार्थी माझ्यासोबत खास फोटो काढून घेत. तसेच माझी खूप स्तुती केली जाई. मला सुख वाटे आणि मी खूप खूष होऊन जाई. मी सिनेमा काढणार आहे असे सांगितले. पैसा एक गाय काही घरदुरुस्ती बँकेत ठेवल्यावर संपलाय.

त्यामुळे माझे घरी माझ्या बायकोशी वाद वाढू लागले. एका चित्रपटात दिलीप कुमार

" साला मै तो साहब बन गया" म्हणून कसा नाचतो कसा मी दारूची बाटली हातात घेऊन नाचत असे. लोक हसत. मी दारु पिऊन पडे. अनामिक भीती वाटत होती पण मला मात्र बरे वाटे. घरात विरोध होईल असं वाटत नव्हतं पण झाला. बायको मला अजिबात शोभत नाही अशा भ्रमात मी होतो. आई गाईच्या दुधाचा रतीब चार घरी दूध टाकून राबत राही. गाय घेतली होती, त्याच्यावर घर चालवत होती. बायको एका घरी स्वयंपाक करायला जात असे. कसे तरी पोट चालू होतो. मला सगळी व्यसने लागली होती. सिनेमा त काम मिळाले तर बरे म्हणून तरुण तरुणी भेटायला येत. माझी तब्येत बिघडू लागली होती आणि आता मी परीक्षा घ्यायला नाव काढत नव्हतो. मला कारकून व्हायचं नव्हतं. आता मी करोडपती झालो होतो. तेच तेच गाणे व आणि तिथेच सिरीयल झोप येई पर्यंत बघतो. तेच तेच गाढवासारखे नाचतो आणि तिथेच पडे पर्यंत पीत बसतो.

" परीक्षा देत नाही नोकरी करत नाही" म्हणून बायको भांडण झालं. मुलगी पण आता मोठी झाली होती पण मी मुलीची जबाबदारी घेत नव्हतं. कसेतरी दिवस चालले होते. एके दिवशी मी माझ्याकडे जे शेत कसेबसे होते तिथल्या एका सुकलेल्या निंबोणीच्या झाडाखाली खाट टाकून रात्री तिथेच मी शेतामध्ये बांधावर निघालो. झाडावर असलेले अफूची बोंडे खाणे हे

गावामध्ये काही नवीन नाही. तसं तर कुठेच नवीन नाही. ते खाऊन झोपून गेलो. मध्यरात्री जाग आली. यावेळी मला खायला काहीच नव्हतं. लाल डोळ्यांची वटवाघळ फिरत होती. भीती वाटणे. थरथर संपेना. फोन वाजला.

" काय मजेत सर्व चालू आहे ना ?"त्या फोन करणारी ने मला विचारलं.

" 15 हजार देणगी द्यावी. तुम्ही आम्हाला वर्षाच्या नृत्य मुशायरा ला द्या. " असे ती.

"तुम्हाला सांगू पैसे संपले"मी

तो लागट आवाज बोचला. मला एकदम कपाळात गेलं माझ्या पोटात सकाळपासून काही नव्हतं. मी आजारी होतो. घरी खायला पैसे नव्हते. घरी मी भांडत होते. करोडपती चा रोडपती झालो होतो.

मी त्या पत्रकारांना सांगितलं.

" माझ्याकडे सगळे पैसे संपले आहेत माझ्याकडे गाय आहे. पैका देणार नाही. माझेच दूध विकणे आणि त्याच्यावर पोट चालू आहे. आमच्याकडे पैसे नाही. "मी

मी तो फोन ठेवून दिला. मला बरं वाटलं मी त्या खाटेवर निघून राहीलो. सकाळी चहा प्यायला घरी आलो. दूध काढायला काम

करायला घरात आईला मदत करू लागलो. मला माझी किंमत कळली होती. घरी येणाऱ्यांचा ओघ कमी झाला. फुकटे कमी झाले आणि मला मुख्य पाहुणे म्हणून बोलवत पण नाही. त्यामुळे काम नाही. मी एक बँकेची कारकुनाच्या पदा ची परीक्षा दिली. अगदी वय संपत आलं होतं. बायको आणि आई नी रडून भरीला घातलं, म्हणून ती परीक्षा मी दिली. सुदैवाने निवड झाली तिथे सुद्धा "अहो तुम्ही करोडपती आहात? तुम्ही करोडपती?" असं मुलाखतीला विचारत होते. त्यावर मी त्यांना घरातली सर्व परिस्थिति सांगितली.

"आणि सेलिब्रेटी होणं हे पडद्यावरच खोटं असतं, प्रत्यक्षात पोट भरणे महत्त्वाचं असते"मी

नोकरी चालू आहे. आता मी बँकेत कारकुनी करतो याचं मला अजिबात वाईट वाटत नाही. मी आता करोडपती व्हायचं स्वप्न अजिबात बघत नाही.

***

# गौतमी सापडली?

मी आनंदीबाई, वय 70 वर्षे, आज ही कथा सांगते आहे. तसं आमच्या घराण्यात वेड हे पूर्वापार काळापासूनच, थोड्याफार प्रमाणात दिसत असे. मी माझ्या नवऱ्याशी लग्न केलं, तो माझा आत्येभाऊ होता. त्यांच्या घरी थोडासा गतिमंदता प्रकार होता. काळे कुटुंब सारे शेती करत. आजोबा त मतिमंदता होती.

माझी आई, तशी बुद्धीची बरी होती. त्यात आमचे चुलत आजोबा वगैरे पण कुपोषित होते. मी नॉर्मल जन्माला आले. गरोदरपणात मातेची उपासमार, आबाळ त्यामुळे वाढ खुंटली होती. नजर वेडसर वाटत होती. लोक असे म्हणायचे की सारखं सारखं चुलीपाशी काम करून अग्नीशी संबंध येऊन काळे घराणे तसे झाले. भट्टी पेटवून द्यायची, ती राख माणसांच्या डोक्यात गेल्यामुळे ही माणसं रागिट झाली. ते म्हणण्यात काही तथ्य नाही पण एकूणच आमच्या घराण्यात वेड आहे, हे जातित पसरविले गेल होतं.

माझ लग्न झाले. माझा मुलगा राम सातवी इयत्ता शिकला. माझ्या मुलाला मी लग्नासाठी मागणी करायला जाई. कारण नवरा विचित्र वागे. मी बोलणी करी. मी बऱ्याच मुली बघितल्या, पण

त्या पोरी किंवा घरचे लग्नाला कारण सांगत नाही म्हणत. नकारघंटा यायच्या.

मग ही इंदु मिळाली. माहेर वडिल गरिब, सात मुलीतली एक होती. तिथे दिवस-रात्र काम करायची. ईथे करते. कशाला नाही म्हणायची नाही. उलटून सुद्धा बोलायचं नाही, बोलत नाही. लग्न झाल्यावर वर्षाच्या आत रामला मुलगी झाली. खूप आनंदाने गौतमी, / मालती नाव ठेवलं. पण मला पण आता भिती वाटत होती की जे घराण्यातील वेड आहे ते त्या मुलीत पण येईल की काय? कारण त्या मुलीचे डोळे असे कधी तरळायचे. मालती दिसायला सुंदर होती. हे घराण्यातला आलेले वेड सोडलं तर या घरी बाकी कशातच नाव ठेवायला जागा नव्हती. या दरम्यान नवर्राचे वेड वाढले. तो घर सोडून गेला. वाट बघितली पण आला नाही.

गौतमी /मालती वेडसर होती. फिट येई. मालतीला सातवीपर्यंत पास झाली की गळयात काळी पोती बांधण्यापूरते तरी कुणाशी तरी लग्न लावायचं. जगली आणि नांदली नाही तर मुलीला /माझ्या नातीला मालतीला आयुष्यभर सांभाळायचं असं मी ठरवलं होतं. गोरी पोरगी. दिसायला देखणी, आकार घेतलेली होती आणि व्यवहार ज्ञान सोडलं तर बाकी ती पूर्णपणे व्यवस्थित होती. परेलच्या या चाळीचे खोलीत आमचे मालकाने(नवर्राने)

घेतलेल्या खोलीत आम्ही राहत होतो. माझा मुलगा राम सून इंदू, मी आणि ही जन्माला आलेली गोरी गोरी बाहुलीसारखी देखणी, पण किंचित डोक्याने कमी असलेली मालती ! शाळेत ईतर मुली वेडी वेडी चिडवतात म्हणून मग तिने शाळेत सोडून दिली. मालतीशी थोडफार बोलले तर तिच वेड काही कळायचं नाही. चालताना, जेवण जेवताना बघितले कि पटकन लक्षात यायचं की बुद्धी कमी असेल. सुंदर पण व्यवहार तिला अजिबात कळत नसे. ती आमच्या चाळीच्या आसपास वावरत असे. आजूबाजूच्या पुरुषांच्या नजरेपासून मी तिला नेहमी राखत असे. बहुधा ती गप्प बसे पण कधी आवरेना अशी फिट येई. मी, लेक राम सुन ईंदु कसून तसे तिच्या पाठी पाठी राहत असू. काही दिवस मतिमंदांच्या एका दुरवरच्या शाळेत पण घालून बघितलं. शाळा खूपच लांब होती. खूप लवकर निघावे लागायचं आणि घरी परतुनी यायला उशीर होत असे. घरी परतून आल्यावर मालती शांत असे. तुम्ही म्हणाल शाळा चालू ठेवायला हवी होती. शाळेतून परत आल्यावर मुकाटपणे मालती चाळीच्या दारात वाळत असलेल्या कपड्यांच्या घड्या करायची आणि ते घरात घेऊन यायची.

गौतमी मालती मस्त पोळ्या लाटायची. जे देवु ते जेवायला खायला घेऊन ते खायची. थोडावेळ काहीतरी टीव्ही बघायची. रात्री गपगार निघायची.

मालतीला गतिमंद मुलांचे शाळेत मी न्यायचे. दोघी लवकर निघायचो. मी तिला शाळेत, तिथे बसवायचे, मग त्या शाळेच्या बाहेर बसून कुचाळक्या करायचे. मिश्री लावायचे. शाळा सुटली कि परत मालतिला घेऊन परत यायचे. त्या शाळेतल्या एका शिपायाशी मी गप्पा मारत बसे आणि शिपाई काम सोडून माझ्याशी गप्पा मारत असे. माझा नवरा गायब होऊन बरीच वर्षे झाली होती, पण मी कधी इकडेतिकडे पाहिलं नव्हतं. मुलाच्या संसारात आणि नातिच्या प्रेमात आनंद मानला होता. मात्र या शिपायाशी अशी माझी जवळीक होतेय हे उमगले. शिपायाची माया, सहानुभूती खोटी आहे असं माझ्या मनाला जाणवत होत. मी हे नात संपवल. शिपायाला दूर तोडलं आणि मालतीला पण त्या शाळेत नेणं बंद केलं.

मला आज वाटत, मी चुकले. मालती एकदम देवभोळी होती. खरं तर असं म्हणतात की अति हुशार आणि अति बुद्धिमान लोक देवभोळे वेडे होतात कारण की अशा पौराणिक गोष्टी मधल्या चित्रविचित्र आणि गुंतागुंतीच्या घटनांनी ती आकर्षित होतात. हुशार देवा वरती विश्वास ठेवतात. काय कारण असेल ते असो पण मालती खूप देवभोळी होती. रोज सकाळी उठून देवळात जायची. मात्र तिच्यावर नजर ठेवून सगळीकडे मी सोबत जाई किंवा माझ्या लेकाला पाठवि. कारण देवळांमध्ये सुद्धा पुजारी भक्त यातील कुणी

तिचा गैरफायदा घ्यायची मला भीती वाटत असे. चाळीचे बाजूला एक किराणा मालाचे दुकान होतं. मालती तिथे थोडावेळ दूरवर बघत स्टूल वर जाऊन बसे. म्हातारा वाणि तिला गोळी खायला देई. तिथून थोडे पुढे चालत जाऊन एका राजकीय पक्षाचा ऑफिस पर्यंत ती जात असे. त्या राजकीय पक्षाच्या ऑफिसच्या दारात पारशी म्हातारा आणि तिला गोळी/पाव खायला देई. तिथून थोडे पुढे चालत जाऊन एका राजकीय पक्षाचे कचेरीपर्यंत मालती जात असे. ''त्या राजकीय पक्षाच्या ऑफिसातला म्हातारा तिला गोळी खायला देई तो वाणी, यापासून दूर राहत जा'' असे मी मालतीला सांगे.

तिथून थोडे पुढे चालत जाऊन एका राजकीय पक्षाचे उभ्या पुतळ्या पर्यंत मालती जात असे. त्या राजकीय पक्षाच्या ऑफिसमध्ये काही ना काही किरकोळ कार्यक्रम बारा महिने चालु असत. तिथे तिच्या हातावर जो ठेवला जाईल, तो खाऊ खाऊन गौतमी/ मालती परत येई. तिथे मधु नावाचा एक गडी होता. मालती वयात आली. परेलला वस्ती वाढली. मालती उफाड्याच्या अंगाची, तरुणी झाल्यामुळे 24 तास त्या सुंदर मुलीच्या मागोमाग मला फिरावं लागायचं. तिला खाऊ देणाऱ्ा वाणी म्हातारा होता तरी मला त्याची भीती वाटायची.

“भय इथले संपत नाही” अशीच परिस्थिती होती/आजही आहे. बाजूच्या गल्लीत राजकीय पक्षाचे ऑफिसमध्ये कुणीतरी मधू नावाचा मुलगा होता, जो वारंवार गौतमी /मालतीच्या पाठोपाठ घरी येई. तो खरं तर लग्न करू शकत होता का?पण टपोरी गड्याला मुलगी दिली तर, असं आपल्याला कसं वाटेल? कि फिरुन घेत नंतर नाही म्हणेल अशी भीती मला आणि माझ्या मुलाला वाटली.

“मालतीची लग्न करतोस का?”लेकाने मधुला विचारले.

“घरी विचारतो “मधु

मग मधु एक दिवस त्या ऑफिसमध्ये, घरी येण्याचा बंद झाला. कुठेतरी गोव्याला जाऊन राहिला, असे लोक म्हणतात. मुलगा आणि सून मालतीची राखणदार म्हणून फिरत असायचे. मालतीची पाळी सुरू झाली. मालती अतिशय सुंदर दिसायला लागली. तिचं गर्भाशय बाहेर काढायचं ऑपरेशन करून आणावं असं वारंवार मुलाच्या मागे लागले. पण माझा मुलगा म्हणायचा

“ नाही काढायचे. तिचं लग्न होईल. तिचं लग्न होईल. ” मात्र मला सतत काळजी वाटत राही. कारण हल्लीच्या काळात या मुलीशी भानगड करायला मुले तयार होतात पण लग्न करायला कोणी तयार नाही. मी मालतीचे केस बारिक कापून घेतले. पण तरी मालती सुंदर, तशीही विकेशा मग अतिशय सुंदर दिसू लागली.

रात्री सुद्धा मालतीला माझ्याजवळ निजे. मालतीला बगलेत घेऊन मी झोपत असे. मात्र एका रात्री मी झोपले तेव्हा माझ्या बाजूला मालती होती. पहाटे मी लघवी ला जायला उठले तेव्हा सुध्दा उत्तम निजली होती. मात्र नंतर मी चहा प्यायला उठले तेव्हा मालती जागेवर नव्हती. रानोमाळ मालती चा शोध घेतला. मालती गायब झाली होती. मालतीला कोणी पळवलं? मालती कुठे गेली? काहीच शोध लागला नाही.

पोलीस स्टेशनवर फोटो घेऊन तक्रार नोंदवली. सगळीकडे शोधलं पण मालती सापडलीच नाही. माझा नवरा पण वीस वर्षांपूर्वी असाच एके दिवशी गायब झाला होता, तो परत कधी आलाच नव्हता. मालतीला हात झटकायची, तोंड वाकड करायची सवय होती. मालती असा हात झटकून, तोंड वाकडं करून दुसऱ्याला तुच्छ लेखण्याचे सारखी ॲक्शन करी. त्या कृतीने मला अतिशय कपाळात राग जात असे. खूप राग येई. असे वाटते कि ती मला हाकलत होती. मालती कडे बघून मला वाटे की ही पण माझ्या नवऱ्या सारखीच किंचित वेडसर जन्माला आली. पुढे पूर्ण वेडसर होईल. गायब झाली. का अशी झाली असावी. माझ्या नवर्ाला झाला होता तोच दुभंग आजार मालतीला पण झाला असावा. कधी खूप छान वागे. त्या आनंदातच हसत, नटे. कधी आवरेना होई, फिट

येई. परेलच्या या चाळीतली गंगाबाई मुली विकण्यासाठी कुप्रसिध्द आहे. ती मला म्हणाली.

“तुझ्या मालतीला धंद्यात घाल”ती अशी बडबड करत असे. तिने मालती ला पळविले असेल का? कुठल्यातरी नटीला म्हणे बारा मदतनीस आहेत. मला धुणे भांडी घासायला मदत नाही. जग अस आहे. आम्हा गरिबांना कोण कुठली मदत करणार? भांडी घासायची कपडे धुवायचे चाळीत बाहेरच्या नळावरून पाणी भरायचे, त्यातही मतिमंद मुलगीला सांभाळायची ?कसा आपला देश कळत नाही. खातो तो तुपाशी नाहीतर उपाशी! मला हळूहळू मनात येत असे, मालती जन्माला आली नसती तर बरं. असं माझ्या मनात येऊ लागलं होते. त्यात तरुण मुलं, हौशे नवशे सुंदर दिसणाऱ्या मालती साठी आमच्या घराभोवती घिरट्या घालू लागले पण मालतिला त्यातलं काही कळत नव्हतं. सरकारी दवाखान्यात गर्भाशय काढायचं ते ऑपरेशन मोफत पण होतं. मी मुलाच्या मागे लागले. सुनेला म्हटले.

“ सूनबाई याच्या मागे लाग, गौतमी/मालतीच गर्भाशय काढायचे ऑपरेशन करून घ्या. तिला पाळीच्या वेळी व्यवस्थित येत असेल पण मला पुढची भीती वाटते”

पुढे मी ज्याला घाबरले ती घटना घडली होती. मी पण माझा नवरा घर सोडून निघून गेल्यावर बरे वाईट दिवस बघितले होते. अनेक लोक माझ्या मागे लागायचे. मला पण काही वेळा ते गोड वाटले, पण नंतर खूप भीती वाटत असे. एक बाप्या भेटला, ती व्यक्ती माझ्या बापासारखी होती पण ती देखील माझ्याशी शरीर संबंध करायला लागली, तेव्हा मला खूप भीती वाटली. देह आनंद मिळतो, पण त्याचे वाईट परिणाम फक्त बाईलाच भोगावे लागतात. गरोदर राहिले तर, काय करायचं ?जोखीम म्हणून मी त्या माणसाशी पूर्ण संबंध तोडले. मी त्या प्रकरणातून सुटले. मालती ला कसं वाचवायचं काहीच कळत नव्हतं. अन आता मालती गायब झाली.

मी वासनेतून तशी सुटले. माझा नवरा वेडसर होता. वेड आनुवंशिकतेने आले आहे. मुलगा जरा बरा आहे, पण कधीतरी अशी वेळ येते की जिथे मुलात रामात पण वेडसरपणाची झाक डोकावून जाते. राम सरकारी नोकरीत शिपाई म्हणून कामाला लागला, पगार मिळतो आणि रविवारी सुट्टी असे. नोकरीत लोक समजून घेत.

माझा नवरा गायब झाला. पण त्या नवर्यासारखी, माझी नात मालती सुद्धा तशीच गायब का व्हावी. माझ्याकडे एकदम असा हात कोणी झटकून मला तुच्छतेने पाहिले की कपाळात जायचं.

असं वाटायचं, 'कोयती काढून गळा कापावा'. मालती ही सुंदर दिसायची. "लाडकी लाडके" म्हणून मी तिचे कौतुक करायचे. कधी खेकसायचे. पण कधी मला मालतीच्या बद्दल खूप राग येत असे. मालती घर सोडून गायब झाली, घर शांत झाले.

लवकरच माझ्या मुलाने पुढची संधी घेतली आणि माझ्या मुलाला आणि सुनेला पुढचा मुलगा झाला. हा नॉर्मल असावा. मुलगा राजा पाच वर्षाचा झाला. मुलगा नॉर्मल झाला असे वाटत होते. गौतमी/मालती गायब झाली होती. कुठे आहे?मधु बरोबर?कोठ्यावर?एखादे हॉटेलात मजूर?

पाच वर्षात अध्ये मध्ये आहे माझा लेक गौतमी/मालतीची लापताची, त्यावेळी नोंद केलेली तक्रार प्रत, तर त्या वेळेचा फोटो घेऊन पोलीस स्टेशनच्या खेटे घाली. पोलीस स्टेशनला पोलीस इन्स्पेक्टर ला भेटे, वाणी दात काढून हसायचा. त्यानंतर मी गप्प बसले. मी त्या राजकीय पक्षाच्या ऑफिसमध्ये जाऊन देखील सांगायचा प्रयत्न केला. ते लोक म्हणत.

" अहो आता काय करणार. ही मुलगी मालती मंद होती. सुंदर होती कोणाबरोबर, मधु बरोबर, प्रेम प्रकरण झाल असेल. पळून गेली असेल" असे म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष करायचे. पाच वर्षानंतर

लेक निवृत्त झाला. साहेब वॉचमन म्हणून नोकरी देणार होते. बदलापूर ला तिथेच खोली दिली. परेलची चाळ सोडून गेलो.

पैसा मिळाला. नवी खोली घेतली. परेल ला फारसे जाणे होत नाही. मात्र एक वर्षानंतर मैत्रिणींना भेटायला मी त्या जुन्या चाळीत परेलला गेले. त्या चाळीचे जागी टॉवर होणार आहे. चाळीतल्या लोकांना पर्याय म्हणून समोरच्याच एका चाळीत पाठवण्यात आलं होतं. मी तिथे गंगाबाई नावाचे शेजारणीशी, तुळशीपाशी बसुन गप्पा मारत असताना गंगाबाई म्हणाली.

“आनंदीबाई, तुम्ही राहायचा त्या खोलीच्या खाली खणल्ल्यावर दोन मृतदेह सापडला. एक 39 वर्षाच्या पुरुषाचा होता. पार माती झालेला होता आणि दुसरा 15 वर्षे वयाचे मुलीचा सापडला. एक लोखंडी खांब पण भेटला. मालतीचा असेल का?”. मी गंगाबाईला शिव्या द्यायला सुरुवात केली. मी त्या मैत्रिणीशी भांडण करायला सुरुवात केली.

“ काहीही बोलते! माझी मालती जिवंत येईल परत. आता तर किती सुंदर दिसत असेल. वाटल्यास मधुबरबर लगीन वगैरे केलं असेल, पण आहे कुठेतरी जिवंत आहे. ”अशी बडबड करून घरी परत आले.

माझी मालती कुठेतरी असेल जिवंत असेल असं मला वाटत होतं. कशीतरी पाय ओढत ओढत, मी घरी आले. घरी आल्यावर लेकाला सुनेला असं सांगितलं की

" गंगाबाई सांगत होती आपण राहतो त्या वेळी जमिनीत गाडलेली आता काढलेली दोन प्रेत सापडली. माती झालेलं होतं. एक वीस वर्ष जुन असून, उकरून काढलेलं ते दुसरं प्रेत मातीत जे सापडलं तो सांगाडा मुलीचा आहे. तो पाच वर्ष जुना आहे. त्या गंगाबाई तो आपल्या मालतीचा असावा असं लोक म्हणतात, अस म्हणत होत्या. " मी माझ्या मुलाला सांगितलं. माझा मुलगा काही बोलला नाही. सुन इंदु म्हणाली

" आई गोव्याला कुठे तरी आपल्या गौतमी/ मालतीला कुणीतरी बघितलं म्हणून! मधुमालती नावाचा एक बंगला आहे आणि त्या बंगल्यात आपली मालती एका तरुणाबरोबर लग्न करून राहते. मधु असावा असा अंदाज आहे. मला कालच पोलिसांकडून कळल. पाच वर्षापूर्वी पोलिसांनी तिला मुंबईला तेजस एक्सप्रेस मध्ये चढताना व्हिडिओमध्ये / सीसीटीव्ही फुटेजमध्ये पण पाहिले आणि ती गोव्याला राहते आहे. आपण उद्या गोव्याला जाऊन तिचा शोध घेऊ या. "

मला नवल वाटलं पण मी गप्प बसले. दुसऱ्या दिवशी लेक म्हणाला

" मी आणि माझी बायको इंदु जावून घेऊन येतो. तुला दगदग होईल. "

"ठीक" मी उत्तर दिलं.

मी गेले नाही, कारण मला फक्त माहिती आहे गौतमी/मालती कुठेच सापडणार नाही.

मालती देवळात तीळ तांदूळ घेऊन जायची. वेळी शंभर प्रकारचे उपास करायची. सोळा सोमवार साठी तलावात आंघोळ करून ओलेत्याने देवळात जायची. त्यावेळी तिचा कुणीतरी गैरफायदा घेतला. मालती गरोदर आहे हे मला बरोबर कळलं. मी पूर्वी सांगत होते! मुलाला म्हणत होते कि तीचा गर्भाशय काढू या, मुलांनी ऐकलं नव्हतं. आता काय करावे मला कळेना. मी भांडण करणारी प्रसिद्ध होते. मला अधिक बदनाम होणे नको होतं. त्यामुळे पहाटे मी मालतीचा गळा दाबला. रात्रीच्या वेळी परेल ला मोठ्या मोठ्या श्रीमंत आणि भारी भारी लोकांच्या सोसायट्यांची काम त्या काळी चालू होती तिथे एक खड्डा उघडा पडलेला मी सकाळी पाहिले होते. नातीला शाळेत घेऊन जाताना बघितला होता.

मालतीला मी तिथे गाडायचे ठरवले. पण वॉचमन होते. मी चाळीत मालतीचे देहाला गाडले.

आता पाच वर्षे झाली. मुलगा आणि सून नातवाला आता फारच जपत असत आणि मला त्याला शाळेत घेऊन जाऊन परत आणायला पण सांगत असत. आपल्यावर जळूनच कुणीतरी गौतमी/ मालतीला गायब केलं असं त्यांना वाटतं होत. तर त्या गंगाबाई कडून परेलतून येताना तो खड्डा मी बघितला होता.

मी रात्रीच्या अंधारात खून केला होता. गौतमी /मालतीला या खड्ड्यात पूरले. वरती माती टाकली आणि परत खाटेवर येऊन झोपले. घरच्या सगळ्यांबरोबर मालती हरवली म्हणून शोधायला गेले. पोलिसांकडे गेले. शोधायचा प्रयत्न केला. आता मुलगा आणि सून गोव्याला गेले असले, तरी जी मुलगी सापडली आहे ती गौतमी/मालती नाही.

मुलगा आणि सून गोव्याला जाऊन दे. मी मुलाचा मुलगा सांभाळत बसले.

मुलगा सून गोव्याला जावून आली. दोघांनी जाऊन मधुमालती बंगल्यात शोध घेतला नि पोलिसांच्या मदतीने ही गौतमी/ मालती सारखी दिसणारी कोण मुलगी आहे तिचा देखील शोध घेतला. मात्र ती मुलगी मालती नव्हती. नाराज होऊन मुलगा

आणि सून तिथून परत मुंबईला आले. आमच्या जुन्या चाळीत सगळीकडे हे माहिती होते. मालती सापडली, मालती येणार म्हणून जुन्या चाळीतली लोकसुद्धा चौकशी करत होते. मुलगा आणि सून परतले.

“गौतमी/मालती सापडली नाही काय करायचं जाऊ दे. ”लेक.

मी रडु लागले. गौतमी/मालती परत येणार नाही हे फक्त मलाच माहिती होतं.

***

# बेघर

मुलगा हवा म्हणून लोक नवस करतात. मुलगा व मुलगी आई-वडिलांना सारखीच असतात, असा भ्रम आपण पुस्तके वाचून जपत असतो. तर अस मी राधा सुपेवार ! दादा सुपेवार आणि मी त्यांची छोटी मुलगी राधा आम्ही सुपे वार हवेलीत आनंदात राहत होतो.

माझे वडील गायक कलाकार होते माझा मोठा भाऊ शहरात राहत होता माझ्या वडिलांची मी वरकरणी दाखवायला लाडकी होते पण मुलगा आधिक लाडका होता आणि त्यात माझ्या मतान कोणीही दुमत करणार नाही. कारण समाजात वरवर मुलगी लाडकी दाखवली तरी मुलगा अति लाडका खोडकर असतो. ऋतू येती ऋतू जातील

फक्त संचिताचे सार

मागे राहील राहील असे गाणारे माझे वडील प्रसिद्ध गायक होते. मिळणारी बिदागी, आईचे स्त्रीधन पैसे व छोटीशी नोकरी याच्यातून मिळणार्या पैशांनी माझे वडील दादा सुपेवार यांनी हवेली बांधली. ती बनवायचे वेळी तो खर्च भरपूर झाला होता. आम्ही मुलं, मी शिकत पण होते भाऊ पत्नी सह मुंबईत राहतो. त्यामुळे

वरच्या मजल्यावरच्या चार खोल्या बागुल नावाच्या माणसाला दादासुपेवारांनी भाड्याने दिल्या होत्या. बागुलला त्या घरात कोणी घुसवलं मला आठवत नाही. पण एरवी जात परिचय वगैरे समजून घेऊनच दादा भाडेकरू द्यायचे. तो काळ दलालांमार्फत घर भाड्याने देण्याचा नव्हता. बागुल घरात शिरला पण एका वर्षात बागुल वाकोडा झाला. म्हणजे बागुलबुवा मुलांना घाबरायला जसे वापरतात, तसा बागुलबुवा सर्वांना भीती वाटेल असे वागू लागला. तो आमच्या वरच्या मजल्यावर राहत होता. तो खालून बागेतून जाताना झाडाचे शेंडे तोडून जाई. चांगली लागलेली झाड उपटून टाकत असे. उगीचच त्रास देण्यासाठी विजेचा फ्युज काढून नेई. असेही त्याकाळी फ्युज बसवून द्यायला पण माणूस मिळणे अवघड होतं. कारण की ही सुपे वर हवेली गावाबाहेर होती. बागुलबुवा सततच भांडण करीत. तसे भाडे देणे टाळत असे. शिवाय त्याकाळी स्वतंत्र वीजे ची मीटर नव्हती. दिवसभर हा दिवे पंखे लावून राही. बागेत काही जळत ठेवत असे. त्यामुळे आम्हाला खूप वैताग येऊ लागला. दादा चिडचिड करू लागले. दादांचं उतारवय झाल्यामुळे गाण्याचे कार्यक्रम मिळेना. बागुलबुवा रोज भांडण करी. भाडे देणे टाळी. तारीख सांगे. लोकांना हसत म्हणे, “ बघा म्हाताऱ्याला पकवलं की नाही. ”

माझं माझ्या वडिलांवर खूप प्रेम होतं. जीवनात घडमोड, काही अपुरे राहणं, प्रेम, अपघात हे होत असतात. Unfinished love should bring meaning in life! माझा मोठा भाऊ शहरात राहत होता. त्याला व त्याच्या बायकोला एकत्र कुटुंबाची कटकट नको होती. भावाला पण एक मुलगी होती पण स्वतःच्या बहिणीवर दादांचे मुलीवर त्या मुलीबद्दल असलेल्या प्रेमाच्या 1% प्रेम देखील नव्हते. तो आपल्या बहिणीवर म्हणजे माझ्यावर प्रेम करत नव्हता. त्या मुलीबद्दल असलेल्या प्रेमाच्या एक शतांश प्रेम देखील तो आपल्या बहिणीवर म्हणजे माझ्यावर करत नव्हता. आई वारली. घर असल्यामुळे मी आणि दादा कसेतरी राहत होते दादा म्हणायचे भावाला की, “ आम्ही मुंबईला तुझ्याजवळ राहिला येतो” पण भावाला आम्ही नको होतो. एके दिवशी दादांचे व या बागुलबुवा चे मोठे भांडण झाले. त्याचे कारण असे झाले की बागुलबुवा कडे रात्री तीन वाजता एक पाहुणा आला. जोरजोरात गाणी गात येऊन त्याने दादांच्या खोलीच्या खिडकीशी त्याची स्कूटर लावली आणि रात्रभर बागुलबुवा कडे सर्वजण नृत्य करत राहिले. त्या गावचा सण होता. बागुलबुवा कडे चित्रविचित्र माणसे पाहुणे म्हणून येऊ लागली. रात्री उशिरापर्यंत राहायला लागली. रात्रभर गोंगाट नृत्य चालू राहू लागले आणि भांडणं वाढू लागली. माझा आणि दादांचा मित्र परिवार कमी होता. याउलट बागुलबुवा एका शाळेत नोकरी

करत असल्यामुळे विद्यार्थी पालक या संबंधित परिचय झाल्यामुळे बागुलबुवा चा परी परिचित संख्या मोठी होती. या लोकांना

" सुपेवार हवेली मी विकत घेतली आणि उलट दादा सुपवारांना भाड्याने ठेवले" असे बागुल सांगू लागला. एकदा दादा रागात बागुलबुवा स्पष्ट शब्दात

" हे घर सोड. तोंडी एक महिन्याची नोटीस देतो, जागा सोडून जा" असे सांगितले. पण बागुलबुवा ने दुर्लक्ष करून सर्वांना सांगायला सुरुवात केली की, " दादा सुपेवारांना मुलगा विचारत नाही त्यामुळे वेड लागले आहे"Bad currency circulates करून बातमी पसरली. छोट्या गावात काय आणि शहरात काय, काही जणांना, भांडण हीच मोठी करमणूक असते. Bad currency circulates and quarrels escalate या न्यायाने सगळीकडे आमची बदनामी होऊ लागली. दादा वैतागून सर्वांना सांगू लागले की

"आम्ही हे घर विकून मुलाकडे राहायला जाणार आहोत मुंबईला राहायला जाणार आहोत" या उलट बागुल सांगत असे की

"आम्ही हे घर, हवेली विकत घेतली आहे. " भाडेकरूच्या त्रासामुळे घर मालकावर बेघर होण्याची वेळ आली होती. आम्हाला त्या घरात सुख लागेना झालं होतं. भाऊ दागिन्यांसाठी

माझ्या वडिलांची दादांची भांडू लागला. आईचा मृत्यू झाल्यावर आईचे दागिने कुठे गहाण टाकले? तो माझ्याशी भांडण करू लागला. खरं तर ही हवेली बांधली तेव्हा माई चे सगळे दागिने विकले होते. पण त्याला ते पटत नव्हतं. भावाला वाटत असे. हे घर विकून पैसा गोळा करून सासुरवाडीला पसार भाग घावन तर दुसऱ्या वेळी त्याला वाटते की आपलं हे घर सुपे वारांची खानदानी मालमत्ता आहे ते आपण जपावी. मात्र ती बहिणींना वाटणी न देता हडप करावी. त्रासाने दादा अधिकाधिक जिद्दीने पेटून अधिकाधिक चिडचिड करू लागले होते. बागुलबुवाला ते घर सोडा घर सोडा असे मागे लागले होते. व अज्ञात अशुभाची चाहूल त्यांना लागली होती. घरातील गृहसौख्य संपलं होतं आणि बागुलबुवा नावाचा राक्षस आमच्या मानगुटीवर बसला होता. विकृत आणि मालका सारखा वागत होता. दादा वृद्ध होते आणि मी स्त्री होते आणि आमचा मोठा भाऊ आमच्या बाबत उदासीन होता. शत्रुपक्षाला जणू काही जाऊन मिळाला होता. त्यामुळे बागुल आम्हाला मला अधिकाधिक त्रास देऊ लागला.

ऋतू येतील ऋतू जातील
भोग सरल सुख येईल!

असं गाणारा हळवा माणूस दादासाहेब सुपेवार संगीत विसरला होता. दादा उद्वेग करू लागले होते. माझं शिक्षण चालू होतं, पण नोकरी मिळत नव्हती. शिवाय माझ्यासाठी कोणी स्थळ सांगुन आली की बागुलबुवा काही तरी त्यांना वेडेवाकडे जाऊन सांगत असे. नात्यात आणि गावात भांडण तर जग जाहीर होत असतात. घरमालक आणि भाडेकरू ची भांडण जगभर सगळीकडेच होतात. पण या भांडणांचा त्रास भाडेकरूंना व्हायचे ऐवजी आम्हाला मालकांना होऊ लागला.

आमचे एक काका होते ते दादांना सांगायचे की एक पोलिसात तक्रार करून ठेवा. पण मोठा भाऊ म्हणाला काही गरज नाही आणि त्याने ते नाकारलं. त्यावेळी मला सुद्धा पोलीस स्टेशनला वगैरे जायला कसंतरीच वाटलं, म्हणून मी पण तक्रार करायचं लक्ष दिले नाही. खरं तर आमचे काका दादांना घेऊन जाऊन तक्रार करू शकत होते. पण सगळ्यांनी जबाबदारी नाकारली. त्यावेळी मी कॉलेजला जात होते. मुलींना तुच्छ लेखण्याची चूक सुपेवार कुटुंबाची परंपराच होती. दादा सुद्धा प्रेम दाखवायचे पण त्यांचा ओढा मुलाकडे होता.

तो दिवस मला आठवतो मी मनाशी म्हणत होते आजचा दिवस छान आहे. मी पूर्ण युनिव्हर्सिटीत पहिले आले होते. मनाचा

मोर जणूकाही केतकीच्या बना मध्ये नाचत होता. गंमत जंमत करत आम्ही सगळया मैत्रिणी कॉलेजमधून चालत घराच्या दिशेने आलो. माझा स्वभाव गोष्टीवेल्हाळ असल्यामुळे ‘चला गप्पा मारूया’ म्हणून गप्पा मारत बसलो होतो. रोजच्याच वाटा आज अमृत वाटा वाटत होत्या. शाळा कॉलेजच्या दिवसांचे शंख-शिंपले आठवत होतो. आठवणींचा कोलाज जमवत होते. खूप आनंदात मी घरापाशी आले.

तर त्यां एके दिवशी मी जेव्हा कॉलेजमधून घरी आले, तेव्हा बघते तर काय? तर दारासमोर लोकांची खूप गर्दी जमली होती. मी घाबरले आणि धावत फाटकातून आत आले आणि बघते तर काय दादा जमिनीवर पडले होते आणि बागुलबुवा दादांना त्या वृद्धाला बुटाचे पायांनी तुडवत होता, मारत होता. दादा वार चुकवत होते, पण त्यांच्या नाकातोंडातून रक्त येत होते. बागुलबुवा बुलडॉग सारखा होता. माझे वडील वृद्ध आणि अशक्त बारकुडे होते. दादांच्या पायात चप्पल सुद्धा नव्हती आणि हा मात्र बूटाने मारत होता. लोक जणू काही गंमत बघत होती. खेड्यातील माणसे कोणाच्याही मदतीला न येणे ठरवण्या इतकी शहराळलेली आहेत. पण गावचा स्वभाव मूळ गावकीचा म्हणजे गावातल्या कुचाळक्या करण्याचा स्वभाव मात्र त्यांच्यातून गेला नाही. तमाशा बघायला जमा झाले होते त्या आजूबाजूला जमलेल्या लोकांकडे मी मदतीची

याचना करू लागले. कारण की नशा केलेला, वेड लागल्यासारखा, तो बागुल आमच्या दादांना लाथाबुक्क्यांनी तुडवत होता. पण लोक माझे न ऐकता गप्प बसले. बागुलबुवा थोड्यावेळाने थांबला. गर्दी पांगली. मी दादांना उचलले घरात नेले. पाणी पाजले. डॉक्टरना बोलवले. डॉक्टरने इंजेक्शन दिले. दादांचे अंगावरचे सदरा पंचा होता तो रक्ताने माखलेला होता. सरळ रक्ताने माखलेला पंचा टॉवेल घेऊन मी सरळ पोलीस स्टेशन गाठले. घडलेली घटना सांगितली मात्र त्या इन्स्पेक्टरने तक्रार लिहून घेतली नाही. वर " जाऊ द्या "अस उत्तर देत, " तोंडी समज देतो" असं सांगून मला चक्क टाळलं. खेड्यातल्या इकडच्या बातम्या तिकडे पोहोचवणाऱ्या, बातमीदार अशा रिकामटेकड्या लोकांनी, मात्र बागुलबुवा ला सांगितलं की मी( राधा )पोलीस तक्रार करायला गेली आहे. ते ऐकून बागुलबुवा पोलीस स्टेशनला गेल्यावर आणि वकील सोबत नेले असल्याने तिथे त्याने दादांवर थेट क्रिमिनल केस केली. दादांना घेऊन मलाच पोलीस स्टेशन वर जावं लागलं. हा वृद्ध गृहस्थ दादा सुपे वार, बागुलबुवा सारख्या तरुण आणि दांडग्या माणसाला कसा मारू शकतो?खर तस करु शकतो का? याचा विचार सुद्धा कोणीही केला नाही. मी तक्रार नोंदवायला गेले, त्यावेळी मी सरकारी दवाखान्यातून डॉक्टरांचा दाखला, नेवुन जखमांची तक्रार करावी, असा सल्ला कुणीच दिला नव्हता.

त्यामुळे चोराच्या उलट्या बोंबा म्हणून दादां वरच भाडेकरूला मारहाण केली अशी तक्रार नोंदवली गेली.

Call the dog mad and kill him. It was such a case.

कटकटी ला कंटाळून दादा सुपेवार "बेटा (मोठ्या भावाला) ही हवेली विकायची" असं म्हणू लागले.

"भाऊ व बहीण तुम्हा दोघांसाठी ही वाडी आहे. मी तुमच्यासाठी समान वाटे करीन. " असं देखील म्हणाले. पण भावाला वहिनीने आणि तिच्या घरच्या वकील कुटुंबाने, काहीतरी वेगळाच सल्ला दिला आणि दादांकडून आपली सुपेवार हवेली मला दीड दमडी सुद्धा न देता हडपुन जायचा प्लान सगळ्यांनी मिळून केला.

"आमचे दादा वेडे झाले आहेत त्यामुळे दादांनी ते घर विकण्याचा प्रयत्न केल्यास ते ग्राह्य धरू नये. " असा अर्ज मोठ्या भावाने त्याच्या सासऱ्याच्या मदतीने कोर्टात केला. पेपरात बातमी छापली गेली. मग नोटीस येते. केस बोर्डावर आली. दादांना वेडे ठरवून टाकावे असे ठरले. हा या संपूर्ण कलियुगातील जगाच्या दृष्ट पणाचा कळस होता. साक्षीपुरावे मानणारे लोक जगात आहेत ना! ते साक्षीपुरावे खरे आहेत का खोटे आहेत? ते फार थोडी लोक बघतात. दादा त्या गावात माननीय होते. लोक शाळेत नेहमी

दादांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावत. त्यांना उद्घाटन सोहळा असला कि बोलवायचे. माझा स्वतःचा भाऊ म्हणजे दादांचा लाडका मुलगा पण खूप हुशार होता. आदरणीय व्यक्तिमत्व होता. पण तोच खलनायक बनून गेला होता.

“बघा बघा वेडे ठरवतो दादासाहेबांना!” वहिनी मला म्हणाल्या.

“अहो, माझे वडील वेडे झाले आहे हे खोट आहे. ते सिद्ध करायला तुम्हाला कोणीही साक्षीदार मिळणार नाही. माझे दादा ठीक आहेत. ” मी वहिनींना म्हणाले. काल हेच वाक्य कोर्टात वहिनींचे वडील मला म्हणाले होते.

मला खात्री होती एकही साक्षीदार मिळणार नाही. ती केस डिसमिस रद्द होईल आणि दादा वेडे नाही असं सिद्ध होईल. पण एका ऐवजी पाच साक्षीदार समोर आले. त्या पाच साक्षीदारांनी अन्य दोन साक्षीदार सुद्धा आणले होते. केस मजबूत बनली होती. पुरावे दाखल होत होते. दादांना वेड्यांच्या इस्पितळात ठेवावं असा पण अर्ज होऊ लागला. ते पाच साक्षीदार जण बघून मी हादरले.

दोन जण श्री बागुल त्यांची मुलगी ईशा होते. तिसरी मुलगी समोर राहणारी एक गरीब मुलगी होती जिला दादांनी खूप आधार दिला होता. नंतर चौथी ती मंगल नावाची मुलगी आणि पाचवा

एक भांडण कर नावाचा भाडेकरू जो पूर्वी आमच्या घरात राहायचा, अन्य तत्सम दोन अशी वेगळेवेगळे माणसे साक्षीदार मिळाल्याने दादांना वेड ठरवलं गेलं. हवेली भावाच्या ताब्यात गेली. त्याने ती विकली फुकली. पैसे घेऊन तो सासुरवाडीला राहायला गेला. बेघर मात्र मी झाले. आणि या जगात असं म्हटलं जातं की मुलगा आणि मुलगी यांना समान हक्क आहे. बेघर होण्याची वेळ मुलीं वरच का येते? काय चूक होते?समच येते? नाना चे एक चित्रपटातील वाक्य आहे

" एक मच्छर इंसान को *** बना देता है. "एक दुष्ट समाजाला ***बनवतो.

आता मी अनाथ महिला वसतिगृहात राहते. भाऊ सगळं घरदार विकून बायकोच्या माहेरी म्हणजे स्वतःच्या सासुरवाडीला राहायला गेले आहे. सुपे वार हवेली विकली. त्याठिकाणी बार अँड रेस्टॉरंट झालेले आहे. हे बार अँड रेस्टॉरंट कोण चालवतं ?कुणाच्या मालकीचा आहे? कोण त्याचे मॅनेजर आहे ?सांगायची गरज आहे का? रेस्टॉरंट बागुलबुवा चालवतो.

बार चे ईव्हेंट, बाकी अर्थव्यवहार त्याची मुलगी ईशा बघते. डिस्को नृत्य क्लास चालवते.

‘ आपलंच नाणं खोटं होतं. आपल्याच भावाच्या वागणुकीत खोट होती. ’ असं मी माझ्या मनाला समजवायचा प्रयत्न करते. हे माझं नशीब होत. अस म्हणून गप्प बसते. दादांचे वेड्याच्या इस्पितळात काय हाल आहेत? ह्याच सविस्तर वर्णन, हवेलीच्या आजूबाजूला राहणारे ते गावकरी, भाडेकरू एकमेकांना सांगून गॉसिप चा आनंद मिळवतात.

एका हिंदी चित्रपटात नायक म्हणतो “मेरी माँ ने ईस बिल्डिंग मे ईंटे ऊठाई है. इसे मै ही पुरी खरिदुंगा” यातलं काहीही प्रत्यक्ष आयुष्यात माणूस करू शकत नाही. मी करू शकले नाही.

सूड वगैरे आता संपले आहे. आता विसाव्याचे क्षण, उगवता सूर्य आशा प्रकाश नवचैतन्य देतो. हिरवा आनंद देतो. हिरवी आनंदाची भेट म्हणून झाडं पाने हलवून हलवून स्वागत करतात. फुलं मंद सुगंध देतात. या महिला आश्रमात जे काही लिहीले आहे, हे माझं नशीब असं मी मानते.

नशीब म्हणून मी ते माझे बेघरपण स्वीकारलं आहे. तरी लोक मुलगा हवा म्हणून नवस करतात.

**

# अभिशाप

आमच्या काळची पिढी मी आता 65 वर्षाची आहे म्हणजे ही आमची पिढी त्याची खूपच दुर्दैवी म्हणायला पाहिजे आमच्या पिढीला समाजात झालेले खूप चित्रविचित्र बदल बघावे लागेल पूर्वीच्या काळी पत्र पोचवून म्हणजे तर महा त्रास होतो तार केली जाईल आणि ती बहुधा मृत्यूची बातमी कळणारी असे आणि रडारड सुरू होईल बाळंतपण अवघड होती नंतर नंतर फोन आले फोन नंबर इमेल आले खूप खूप झपाट्याने संदेशवहन होऊ लागले आणि प्रगती झाली या सगळ्या प्रगतीच्या आम्ही साक्षात साक्षीदार होतो आणि आजही गोंधळलेल्या परिस्थितीत आहोत तर ती माझीच गोष्ट आहे मी रमा आज माझे वय 65 आहे तेव्हा शिक्षण घेतलं तेव्हा आमच्या या जातीतली शिक्षण घेतलेली एकमेव मुलगी होते मला चांगली नोकरी लागली त्यावेळी सुद्धा मला पगार फारसा नव्हता सोनं 900 रुपये तोळा होतं माझा पगार होता पा चशेपर्यंत.

त्याकाळी लग्न ठरवून म्हणजे मोठे दिव्य असे खटल्याची घर असत आणि आमच्या समाजातील इतर झोपडीवजा बारक्या बारक्या खोपटा मधून पांडे टाकून पाणी टाकून लोक करायची त्या

काळात आमच्या समाजातला वकील झालेल्या एकमेव माणूस मला नवरा म्हणून मिळाला मला जेव्हा विवाहानंतर बऱ्याच वर्षांनी हा मुलगा झाला खूप आनंदाने त्याचं नाव अभी असं ठेवलं आणि अभी गोरा आणि सुंदर होता सर्वजण माझ्या सुखा वर जळले हेवा करु लागले अभी जन्माला आला आणि माझं जीवन पूर्णत्वाला गेले.

तस आमचं कुटुंब पारंपरिक पद्धतीचं होते. शिक्षण घेतलं नव्हतं. पालावर शेतावर राहायला जात. फक्त माझा नवरा वकील होता आणि सुशिक्षित होता. वडिलांपुढे कामावर सरकारी नोकरीत होते. पण सहा भावंडाची घर होते. आई पारंपारिक होती. त्यामुळे आईला असं वाटायचं की मुलींची लग्न होऊन त्यांनी घरसंसार करावा. इज्जत हवी तर मुली आपल्या सासरी बऱ्या शोभतात. असा तो समज बर्याच घरी होता. खरं सांगायचं तर मुलगा जन्माला यावा म्हणून जन्माला घातलेल्या आम्ही मुली फक्त बायप्रॉडक्ट होतो. आई-वडील कुणीच आमचे लाडकोड करत नव्हते. दादा चे कौतुक करत. त्यामुळे तोच मुलगा श्रेष्ठ असा विचार माझ्या मनात होता. नवरा तापट असल्यामुळे “मुलगा झाला हो” म्हणून मी खूप आनंले. अभी देखणा आणि खूप हुशार होता. मी त्याला घेवून बसे. मी त्याला सांभाळणे व घरात मोठ्या मुलीला सांभाळण्यासाठी व घर काम करायचं यासाठी मुलगी ठेवली. मी डिपार्टमेंटला काम

करायचं. दमायचे. मुले वाढवणे आणि आपल्या घरात काही मदत होण्यासाठी मीरा नावाची मुलगी आणली. ती काम करी.

मोठे घर घेतले. वाटत होते ठीक आहे, पण माझ्या नवऱ्याची माझी खूप भांडण सुरू झाली. मी माझ्या ऑफिसमधल्या एका मैत्रिणीला म्हणाले.

" हल्ली आम्ही नवरा-बायको वाद आहे. तू माझ्याबरोबर देवळात स्वामी सल्ला घ्यायला येशील का?"

दोघिरट्या मधल्यावेळची सुट्टी बघून गेलो. स खेळत्या मठात केलो स्वामी आले स्वामींनी मला उपाय म्हणून मठाला 21 प्रदक्षिणा घालायला सांगितले आहे एकविसाव्या प्रदक्षिणेच्या वेळी तर मी इतकी दमले, मला चालता येईना. कसेतरी दोघी ऑफिसमध्ये आलो. आणि ऑफिसमध्ये पोहोचले तर काय झालं मी बेशुध्द होऊन पडला. मी बोलण्याच्या शुद्धीत नव्हते. साहेबांनी मैत्रिणीला केबिनमधे बोलावून घेतले. माझ्या मैत्रिणीने सांगितलं (त्यांना )

"आम्ही बाहेर गेलो होतो. देवळात काम होते. "ती

"कळलं तुम्ही बाहेर गेला होता पण कुठे गेला होता?" माझ्या मैत्रिणीने सांगितले.

“स्वामी मठात! कारण की रमा नाराज आहे. असे बाहेर गेलो होतो. तिथे आम्ही फेऱ्या मारल्या आणि त्यामुळे उशीर झाला. ”ती

“ तुम्ही उशिरा आला म्हणून मी तुम्हाला रागवत नाही. पण एका बाबतीत मी तुम्हाला राग येणारे बोलतो. देवदेवळे करून प्रश्न सुटतात का ?आपल्या ऑफिसच्या पॅनेलमध्ये 100 दवाखान्यात, मोठी मोठी हॉस्पिटल मध्ये, मन हॉस्पिटल मध्ये फुकट सोय आहे. समुपदेशनाने काही परिणाम झाला तर तुमची नवरा बायकोची भांडणं कमी होतील. ”सर

“तुझी मैत्रीण काय म्हणते”नवरा

“मन हॉस्पिटल ला दाखवा म्हणाली”मी.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला गेल्यावर माझी मैत्रीण मला म्हणाली.

“ मोठ्या साहेबांचं असं म्हणणं आहे की तुम्ही देवळादर्ग्यात जाऊ नये. आहे त्या प्रश्नाचे वर शास्त्रीय पद्धतीने औषधोपचार करावे. ” त्यानंतर आमच्या ऑफिसमधला एक त्या दरम्यानचे धर्माचा साहेब आला होता. मोठ्या अधिकारावरचा हा साहेब माझ्या जवळ आला आणि म्हणाला

“ मैडम जी! मुझे आपसे कुछ कहना है !मेरी मां कभी भी औरतों को घर के बाहर मंदिरों किसी जगहों पर जाने नहीं देती. मै

किसी की बुराई नही करना चाहता. सुझाव है! आप की ना किसी की बुराई करो, लेकिन आप ये अंधश्रद्धा बंद कीजिए"

मी सिरियसलींी ऐकून घेतलं त्यानंतर सरळ एका डॉक्टर कडून दाखवून औषधोपचार सुरू केले. थोडीशी आमची घरातील भांडणे कमी झाली. पण किरकोळ, ग्रहणाची कर उरावी तशी भांडणं मागे कटुता उरली. दरी तयार झाली होती. मी गुडविल काढून घेतले. अभीसाठी जगु लागले. अभी आजारी पडे. त्यानंतर माझी एक मैत्रीण मला म्हणाली. आपण एका योगासनांच्या क्लासला जाऊ या.

त्या योगा क्लास ठिकाणी कुटुंबाची पार्श्वभूमी काय? प्रॉब्लेम आहे का ?अशी चौकशी केली. त्या बाईंनी माझ्याशी जरा बऱ्यापैकी मैत्री केली आणि बावळटासारखे मी तिला माझे प्रश्न सांगितले. त्यावर ती सुद्धा अंधश्रद्धाळु निघाली. ती मला म्हणाली.

"बाकि ह्यात एक व्यक्ती राहते तिला अध्यात्मिक शक्ती आहे. आपण तिच्याकडे जाऊ"

मी म्हणाले

" आहो मला ऑफिस बुडवायचं नाहीये. माझी रजा संपली आहे. अभी ची तब्येत बरी नव्हती. "ती म्हणाली

“ठीक आहे आपण सात वाजता जावु” संध्याकाळी सात वाजता क्लास सुटल्यावर आम्ही दोघी बाहेर पडलो. ठरवलं होतं त्या बाबाजीचे घरी गेलो. बाबूजी खाली पसरलेल्या गादीवर कळकट चादरीवर बसला होता. प्याला होता. या सुद्धा बाबाजीच प्रकरण याच वेळी संपलं. पण एक प्रकारे मला ज्योतिषांकडे जाण्याचा छंदच लागला होता. त्यानंतर मग ऑफिसमधल्या मोठ्या साहेबांनी बोलावले.

“तुम्हाला एका शक्तीने बोलवलं आहे. ते म्हणजे एक तेजःपुंज बाबा आहेत. रघुनाथ महाराज यांच्याकडे जाऊ या “रघुनाथ महाराज कडे गेलो.

रघुुनाथ महाराज त्यांनी मनी पूजा केली. नंतर सांगितलं की

“ तुमचं कुटुंब शापित आहे आणि त्याचा त्रास तुम्हाला नवरा बायकोला आणि अभीला होतो. असे मणीने सांगितलं आहे. एक मोठी दुर्घटना तुमच्या घरात घडली होती. तुम्हाला खरं सांगतो. खोटं वाटत असेल तर तुम्ही तुमच्या घरातल्या माणसांना या गोष्टी विचारू शकता. ”ते.

“ कोणती दुर्घटना?”मी

“ तुमच्या कुटुंबात पूर्वजांपैकी एका स्त्रीकडे ननंदेचा मुलगा पाहुणा म्हणून सुट्टीसाठी काही दिवस गेला होता. शिक्षणाचा

त्याकाळी आनंद होता. पण जेवण सुटेल तर, या ठरलेल्या कारणाने त्या पुतण्याला तुमच्या नातेवाईकरोहिणी नावाच्या स्त्रीकडे पाठवण्यात आलं होतं. हा पुतण्या अतिशय वाईट व्रात्य होता. रडे आणि सारखा भूक भूक करत असे. तुमच्या घरी गरिबी, खूप फडफडते काय मिळणार ?आणि पदार्थ ते काय करणार? बिस्कीट खाऊ हवा हवा अशी कारण काढून हे बालक भांडण करत असे"ते

"अहो बालक ते ते हट्ट करणारच ना माझा पण मुलगा हट्ट करतोच की !बरं पुढे काय झालं?" मी

" या बालकांच्या त्रासाला रोहिणी कंटाळली होती. भल्या पहाटे उठून जात्यावर दळून सगळ्यांचा स्वयंपाक करावा लागायचा. शेण उचल. नवरा पण त्रास देई. मूल जन्माला नाही. त्याचा त्रास,, खटल्याचं घर होतं. त्यामुळे तिनी त्या बालकांनी कुरकुर करायला लागल्यावर तिने त्या बालकाला उचललं आणि मातीच्या पाण्याचे रांजणात खाली डोकं वर पाय असं बुडवलं. बालक ओरडत होता. पण रोहिणी वहिनी, त्यांनी त्या रांजणावर दगडाची मडक्याचे खापराचे झाकण ठेवून दिले आणि परत निजली. मरण झोप अशी काही लागली होती. "ते

"बाळ वाचले का?"मी

“छे! झोपेतून जागी झाल्यावर तिला जाणवलं की आपल्याकडून चूक झाली. ते रांजनावरिल झाकण काढलं आणि त्या बालकाला बाहेर काढल. ”ते

“ त्यावेळी नणंदेला पण मरण झोप लागली होती. दचकुन झोपेतून जागी झाल्यावर नणंदेला जाणवलं की आपल्या बालकाला धोका आहे.

“बालक निमगावला पाठविले, ही माझ्याकडून चूक झाली. मी सकाळी येथुन जाईन. मी माझे बालक परत आणते” नणंद नवर्‍याला म्हणाली. ते दोघे निमगावला निघाले. ईथे रोहिणीने रांजनावरिल झाकण काढलं आणि त्या बालकाला बाहेर काढलं. त्यावेळी ते बालक मृत झालेले होतं. रोहिणीने ओरडत आणि जोरजोरात रडायला सुरुवात केली. बाजूला झोपडपट्टीतून कुटुंब नव्हती. पण त्यातून कोणीतरी आलं. साप चावलाअसे काहीतरी वेगळेच कारण दाखवलं गेल. पण खून केलेला होता. ”ते

“ पण सत्य हे आहे की ह्या गृहिणीने त्या बालकाचा खून केला होता. पण चुकून. ”मी

“त्या बालकाचे शाप तुमच्या कुटुंबाला त्रास देत आहेत. यावर उपाय म्हणजे एक दगडाची शिळा करून त्याच्यावर बालकाचे चित्राचे ठसा करा. निमगावलाव त्या बालकाच्या चित्राची शिळा

तुम्ही तुमच्या शेतात प्रस्थापित करावी. हा पर्याय आहे. त्या बालकाचे शीळेपाशी दिवा लावावा आणि पूजा करत जावे. तर तुमच्या घरचा वंश वाचेल. ‘माझा जीव वाचवला नाही?’ म्हणत हा बालक तळतळाट करतो. आणि त्यामुळे तुमच्या कुटुंबात कोणीही पुरुष वाचत नाही. ”ते

“ यात पुरुष वाचण्याचा काय संबंध आहे ?”मी त्या ज्योतिषाला तोंड वर करून शहाणपणा करून विचारलं.

“ अहो तुम्ही सुशिक्षित या गोष्टींना अंधश्रद्धा म्हणता. पण त्या क्ष गृहिणी, रोहिणीची चूक भोवते. बालकाला बळी हवा. खायला हव. हे खर आहे का?असा मुलगा होता का?बुजुर्ग कोणी जीवंत आहेत ते सांगू शकतात. ”ते.

विश्वास नसलेल्या मला

“तुम्ही जाऊ शकता”ते म्हणाले. तिथून मी बाहेर पडले. बाहेर पडल्यावर मी असलं काही करायचं नाही असं ठरवलं होतं. पण घरी पोचले तर अभी तापाने फणफणलेला होता. मला भीती वाटायला लागली त्या माणसाचे भविष्य आठवड्याने हादरले. दोन दिवस मी विचार केला आणि अभीला उचलून मी त्या बाबा कडे गेले. बाबा ने दहा हजार रुपये मागितले. मी हातातली बांगडी मुकाट्याने काढून दिली. बाबाने दगडी शिळा बनवून घेतली. दगड,

मूर्ती ओबडधोबड होती पण बनवली. अभीचा ताप उतरत नव्हता. शिळा जड होती. मी स्पेशल गाडी काढली. मात्र अभी तापला होता. खेड्यात निमगाव अभीला, सोबत न घेता, रघुनाथ बाबांबरोबर गावी जाऊन स्थापना काय ते करायचे ते ठरवले.

केली तालुक्याच्या निमगाव फाट्यापासून गाडीला रस्ता नव्हता. गाडी तिथपर्यंत पोचली. त्याच्यापुढे कितीतरी चालत जावं लागत होतं. दीर आले होते. गैरसोय होऊ नये म्हणून तर मी गाडी केली.

पजा केली आणि सर्व पूजा करून घेतली. प्रसाद घेण्यासाठी सर्वजण जेवायला बसले. मला माझ्या जावेची खूप भीती वाटायची. कारण माझी जाऊ काहीतरी अघोरी प्रकार करते अस माझ्या मनात कायम असे. ते लोक असूया ठेवतात आणि मला मुलगा झाला आणि अभीचा जन्म झाला याबद्दल तिला माझ्याबद्दल प्रचंड हेवा वाटून राहिला होता. असे निदान मला तरी वाटत होतं. म्हणून खरंतर मी आभील आणले नव्हते. मी लग्न झाले तेव्हा पण पहिल्यांदा निमगावला जायला तयार नव्हते. पण मी तेव्हा दुर्दैवाने निमगावला गेले. आता परत अभीसाठी आले. मला निघतांना जावेने ओटी भरली. प्रसाद बांधून दिला. गाडीने निमगाव हून चांदवड कडे निघालो. गाडीत एक घाण वास येवु लागला. मी

त्या भाड्याने केलेल्या गाडीचे ड्रायव्हरला थांब सांगितलं. ‘‘बाबा तुमच्यासाठी सांगते, काहीतरी आहे. वास येतो. गाडीत अत्तर होतं ते लावले. पण अचानक मला जाऊ बाईंनी दिलेली ओटीची पिशवी ठेवली होती, त्यांच्या विचित्र वास यायला लागला. जळाल्यासारखा वास सुरसुरा सारखा आवाज येऊ लागला. मी ड्रायव्हरला परत गाडी थांबवायला सांगितली आणि त्या पिशवीतुन आवाज येत होता ती उघडून पाहिलं. माझ्यासोबत आलेल्या बाबांना ते दाखवलं. काहीतरी विचित्र होत. बाबा म्हणाले

‘‘बाजूच्या जंगलात जाऊन ती पिशवी टाकून दे. ’’मी ते फेकले. त्यानंतर एका लिंबाच्या झाडाखाली बाबांनी गाडी थांबवली आणि त्यांनी मला मला सात फेरे करायला लावल्या. त्यानंतर गाडी चांदवड पर्यंत आली.

‘‘ चांदवडचे देवी पाशी जाऊ आणि काय इडापिडा आहेत ती इत्यादी देवाला वाहु. ’’मी

‘‘मला फक्त माझ्या मनातलं ऐकु दे’’ बाबांनी ईच्छा व्यक्त केलं.

‘‘ देवी माझ्यावरची, अभीवरची पीडा तुझ्या जवळ घे आणि माझं रक्षण कर ‘‘असं मला देवीला सांगायच होतं. देवीच्या दाराशी

गाडी थांबवली. चांदवडच्या देवीला असं खाली वीस-पंचवीस पायऱ्या उतरून जावे लागते. गाडी थांबल्यावर साडी नीट घालत असताना माझ्या लक्षात आले की माझी साडी पूर्ण रक्ताने माखली आहे. पाळी सुरू झाली होती. मी देवीला जाऊ शकले नाही.

" मी पुढे येऊ शकत नाही. ईथे राहणार आहे. "बाबा

"गाडी तुमच्यासाठी केली. सोय केली"मी

"अभीच व्यवस्थित होईल. सर्व व्यवस्थित होईल. मी इथल्या देवीच्या मंदिरात सिद्धिप्रिया ला साधना करणार आहे आणि मी इथेच राहणार आहे तुम्ही मुंबईला परत जा. "बाबा

" अहो बाबा तुम्ही येणार म्हणून गाडी काढली. "मी

" ठीक आहे. पण मी येत नाही घडलेल्या घटनांमुळे मला असं वाटतं की तुमझ्या शापमुक्ती साठी मी जे प्रयत्न केले आहे त्यात मला त्रास होऊ शकतो. म्हणून मी इथे राहणार आहे. पण तुझ्यावरचे संकट दूर होईल. बरं वाटेल. पुढील वर्षी परत या मंदिरात पूजा करायची. "बाबा

" ठीक आहे ठीक आहे"मी पुटपुटली. घरी आलो. अभीची तब्येत बरी होती. मी मुंबईला घरी परत आले. अभी ठीक होता. पण नवऱ्याचे डोकं फिरलं होतं नवऱ्याने भांडायला सुरुवात केली.

“ गाव हिंडायला जाते अंधश्रद्धा पाहते. मुलांची काळजी नाही. पोराला रडायला सोडून कुठे चालली होते. बाधा तुला लागली होती. ”वगैरे वगैरे !

तरी बरं पहाटे तीन वाजता निघून, मुंबईहून निघालो होतो. भांडण खूप खूप भांडण झालं. आभी सगळं ऐकून घेत होता. सात वर्षाचा मुलगा तसं त्याला काही फारसं कळत नव्हतं. सांभाळण्यासाठी ठेवलेली मीरा त्याला मांडीवर घेऊन बसली होती.

“आई निजलीस. ”अभी रात्री म्हणाला. मी त्याला अधिक जवळ घेतलं. ऑफिसमधून येताना आईला भेटायला गेले. आईला विचारलं.

“ आई असं त्या एका व्यक्तीने सांगितलं की रोहिणी नावाच्या बाई मुळे सात वर्षाचा बाळ पाण्यात रांजणात बुडवून मारला गेला. ते खरं आहे का ?त्या शापाचा त्रास मला होतो. आभी त्याची तब्येत वारंवार बिघडत असते. ”मी

“ तू आलीस भेटलीस बरं झालं. फोन पण करत जा कुणाच्या तरी जवळ मन मोकळे करत जावं. मनात साठलेली मळमळ बाहेर पडली तर मन शांत होतो. मला माहिती आहे तुझा नवरा तुला त्रास देतो. ”आई

“खून झाला का?”मी

“अग, पूर्वीच्या काळी पण असं होतं. सासुरवाशीण स्त्रिया कंटाळलेल्या असत. त्यांना झोप अन्न मिळत नसे. खायला प्यायला मिळत नसे. अशा वेळी त्या दुर्दैवी रोहिणी कडून काही गुन्हा झाला असू शकतो. अनेक सासुरवाशिणीला पूर्वीपासूनच असा त्रास असायचा. झोप मिळत नसे. खायला मिळत नसे. सासू-सासरे त्रास देत, नवरा जवळ घेत नसे. वांझ म्हणून म्हटलं जाई. मग त्या अस काही करतात.

होते चूक. ”आई

मी घरी आले. सर्व ठीक झाले. अभी पूर्ण पणे ठीक आहे.

पण एक दिवस माझी कन्या वय बारा वर्षे घरातून गायब झाली.

एका संतानाचा बळी निमगावचे बोलाई शिळेने घेतला. 22 abhishap double on 19 also. delete

***

# व्हॉट्स ॲप मदर

Skype हल्लीच्या दिवसात मुलं परदेशी किंवा परगावी राहणाऱी असणे हे खूप कॉमन झाले. त्यामुळे हल्लीच्या आया व्हॉट्स ॲप मदर म्हणजे मुलांना फक्त व्हाट्सअप च्या फोनवर कधी काही वेळा व्हिडिओ कॉल मधून बघणाऱ्या WhatsApp मदर असतात.

तर या कथेत मुलगा आईला भेटणार म्हणून आई खुश झाली होती.

“खाऊ बनवू नको आई काय बावळट पणा?स्वीगी वर सगळं विकत मिळते”सुपुत्र

“हो WhatsApp, स्काइप मुळे मुलं आईला, आणि आई मुलाला बघून ओळखते तरी!”मी मनाशी म्हटलं. “आई गावी तिथे ग्लॅमरस काहीच नाही. काळजी करु नको. आम्हाला इथे सर्व मिळते” तो म्हणाला “आईची माया प्रेम ते मिळतं ?”मी विचारलं.

“ सर्व फिल्मी, श्यामची आई, श्यामची मम्मी, प्रेम फेम डायलॉग असतात” तो म्हणाला.

“ सगळीकडे फोन घेऊन जा. मी करीन फोन !”तो म्हणाला.

“ वर्षातून दोन वेळा फोन करतोस, ”आई

“ मी जुलैत अहमदाबादला एका ट्रेनिंग वर्कशॉप ला येणार आहे” तो म्हणाला.

“ तिकीट खरेदी केली की सांगतो” तो म्हणाला.

“आई मी घरी येण्यासाठी इच्छुक नाही!” तो म्हणाला.

“ ये रे!भेट! घरी नको वाटल्यास येऊ! ते जुनं पडकं घर तुला आवडत नाही ना! मी एअरपोर्टवर भेटेल. ”मी

“तू एअरपोर्टवर ये”तो मला म्हणाला.

“ चालेल”मी म्हणाले.

डोक्यावरून हात फिरवला तरी बरं वाटत. तो भेटला. परत विमानतळात गेला. काचेला नाक लावून मी दूरपर्यंत बघत राहिले. दहा वर्षांनी आलाय, पण घरी येत नाही. करोना काळात जगू की मरू? तो परत भेटेल का? आई व मूल हल्ली स्काइपवर किंवा व्हाट्सअप व्हिडिओ कॉल वरच भेटतात.

WhatsApp mother!.

**

# एक मैत्रीण तुटली

“अजून एक मैत्रीण तुटली. ” मी नवऱ्याला म्हणाले

“ सकाळी सकाळी तोंड पाडून का बसली आहे असं मी विचारणार होतो”

“काय झाले?”जेव्हा मला नवऱ्याने विचारलं तेव्हा मी त्याला उत्तर दिलं.

“ अजून एक मैत्रीण तुटली” नवऱ्याने थोडी सहानुभूती दाखवावी अशी माझी अपेक्षा होती. पण कसलं काय तो माझ्यावर खेकसला.

“ तुझ्या मैत्रिणी तुटण्याचा नंबर आता खूप मोठा झालाय. काय झालं? कशावरून भांडण झाले आता या मैत्रिणीशी? ही मैत्रीण तर त्या तिकडे अमेरिकेला परदेशी आहे ना!”नवरा

हो ती परदेशीच आहे पण ती माझ्याशी फोनवरून भांडली. ”मी

“ भांडली? काय बोललीस तू तिला?”नवरा बरसला.

“काय झाले, ही मैत्रिण अजून सहा महिन्यांनी भारतात येणार आहे. पण या मैत्रिणीचा कोणीतरी नातेवाईक अहमदाबादला

आला. त्या अहमदाबादला येणाऱ्या नातेवाईकांसोबत तिने पंधरा किलो सामान, काचेची भांडी, जुने गरम कपडे, एअर फ्रायर असं सामान पाठवले. ते तो नातेवाईक ईकडे पाठवेल. मी जायचे आणि ते 15 किलो सामान कुरिअर च्या ऑफिस मधून घेऊन यावं आणि माझ्या घरी ती येईपर्यंत सहा महिने ठेवावं. अशी या मैत्रिणीची अपेक्षा होती. ” नवरा गप्प झाला.

“ तू मग तिला काय म्हणाली?”नवरा

“मी सांगितलं की माझ्या घरी माझ्या बिल्डिंगमध्ये दहा केसेस आहेत. आमच्या बिल्डिंगला लिफ्ट नाही. त्या कुरिअर ऑफिस पर्यंत मी जायचं किंवा तो कुरियर वाला खाली आला तरी आपली वेळ सोय जमायला हवी. अमेरिकेतून ईथे तिथे फिरून आले ते पार्सल मी घरात ठेवायचं ?ते फुटो नये म्हणून काळजी घ्यायची आणि ही मैत्रीण, सहा आठ दहा महिन्यांनी येईन. व्हिसा ऑटोमॅटिक रिन्यू साठी होत आहे. त्यामुळे ती कधी भारतात येईल. त्यानंतर जेव्हा ती येईल तेव्हा हे सामान मी तिला देईन”मी

“ती घ्यायला येणार?”नवरा.

“मी जायचं किंवा ती म्हणते की एअरपोर्टवरून ती परस्पर माझ्या घरी येईल. माझ्या घरी राहील. दोन चार दिवस झाले कि मग ते सामान घेऊन तिच्या घरी जाईल. मला तेवढी रिस्क घेणे नको

वाटलं आणि मी तिला सामान पाठवू नको म्हणाले. त्यावर ती माझ्याशी भांडते"मी

"बचत करायला अशी सुरुवात केली"नवरा

"आमचा वार्तालाप असा झाला. "मी

" मला वाटते रागवू नको पण मी स्पष्ट नाही म्हणते"मी

"तू काय मैत्रीण आहेस का कोण आहेस? एवढ्या छोट्या कामात तुला मदत करण होत नाही. पंधरा किलो सामान अस, ते तुझ्या एवढ्या मोठ्या घरात आल तर काय होत. तुला काय करायचंय? सामान तुझ्या घरी कोपऱ्यात पडून राहिल. ते सामान काही तुला दूध-भात मागणार नाही. काय तुला त्या सामानाला जेवण द्यायचं नाही. तुला ठेवूनच घ्यायला पाहिजे. "ती

" नाही ग मला जमणार नाही. माझ्या बिल्डिंगमध्ये त्यांनी खाली आणलं तरी ते उचलुन मला वर आणावं लागेल. ते सामान उचलून नेण्याचा मला कमरेला त्रास होईल. तुझ्याच बिल्डिंगमध्ये कुणाकडे का ठेवत नाही?"मी

" मला त्या लोकांकडे ठेवायचे नाही. ठेवायला नालायक लोक आहेत. ते उघडून बघितल आत काय म्हणून?तिकडे नको. उलट तुझ्या घराशी मी ते/ तू ते लगेच घेऊन येऊ शकते. "ती

"मला जमत नाही"मी

"मला काय गं माझे भरपूर नातेवाईक आहेत. माझी भाची तुझ्या घरापासून चार घर पलीकडे राहते. तिथे ती सहज ठेवून घेईल. पण मग तुझा काय उपयोग?"ती

" असं नसतं तर ती ठेवून घेते, ती वयाने तरुण आहे. तुझी भाची ठेवते तर तिच्याकडे ठेव. माझ्या कशाला मागे लागते. "मी

" नाही नाही, असं काही चालणार नाही. पहिला हक्क तुझा! मी तुझ्याशी मैत्री कशाला केली? तुझा काय फायदा?"ती

" मला या करोनामुळे नको. मी काहीच मदत करू शकत नाही सॉरी!"मी

" हे बघ मी तुला, तुझ्या नवऱ्याला मला एअरपोर्टवर घ्यायला या सांगितलं होतं. म्हणजे माझे उबेर चे पैसे वाचतील. त्यालाही तू नाही म्हणते. आता तू माझं वजन पार्सल सांभाळत ठेवून घ्यायला पण नाही म्हणते. तू माझ्या कधीच उपयोगी पडत नाही"ती

" असं नाहीये. मी तुला आता अमेरिकेला साडेनऊ हजाराचे औषध दुकानातून विकत घेऊन, कुरिअर करून पाठवलेले. आता हे करोनामुळे आता या गोष्टी नको वाटतात. थोडेथोडके पैसे वाचवण्यासाठी तू हे प्रयोग करून आम्हाला काही झालं, तर मला त्याचा त्रास होईल म्हणून मी नाही म्हणते"मी

“ आम्हाला पैसे लागतात. त्रास होऊ नये माझ्या दुसऱ्या एका कामाच्या वेळी सुद्धा तू मला साक्षीदार म्हणून सही करायला नाही म्हणाली होतीस. ”ती

“ माझा काही प्रश्न असेल. मला नव्हती करायची सही. ”मी

“ तुला माझं सामान घ्यावच लागेल. नाहीतर आपली मैत्री संपली असं समज. ”ती.

तिने मला जोर जोरात बडबड करून आरडाओरडा करायला सुरुवात केली मी फोन कट केला.

असा वार्तालाप झाला. तो मी नवऱ्याला सांगितला. त्यावर नवरा मला म्हणाला.

“ जाऊदे, सोड! होत राहतात अशा गोष्टी सोडून दे. ” मी पण मनाला समजावले. प्रत्येक नात्याला पण हल्ली मला असं वाटतं, औषधांना असते, ती तशी एक्सपायरी डेट असते. त्या एक्सपायरी डेट नंतर ते नात नाट्य घडुन संपून जातं. माझ्या परीने असं मला वाटतं.

तिने परत फोन करून विचारलं,

“ ठेवणार आहेस का ते पार्सल? ते ठेवले नाही तर आपली मैत्री तुटली. ”ती

मी परत “नाही” असं उत्तर दिलं. सत्यात काय घडले ते सांगितलं, तर अजून एक मैत्रीण तुटली.

**

# जमणार नाही

एकमेकांची जमणार नाही, काम करणे जमणार नाही, इथे येणं जमणार नाही, ते जमणार नाही अशा विविध कारणांनी आपण बऱ्याच वेळी गोष्टी टाळतो. जमणार नाही या शब्दात नकार देत असतो. नक्की कशा कशाला हा नकार असतो ?

तुम्हाला मी जी गोष्ट सांगणार आहे त्यातला हा नकार समोरच्या व्यक्तीच्या मैत्रिणीच्या हाताला, नात्याला दिलेला नकार होता.

मला बऱ्याच मैत्रिणी भेटतात आणि यथावकाश ती मैत्री तुटत पण असते. तरीही नेहमीप्रमाणे मी दुखावलेल्या मैत्रिणीची ही गोष्ट सांगते अस समजायला हरकत नाही.

मला बऱ्याच मैत्रिणी मिळत राहतात आणि त्या यथावकाश तुटतो पण राहतात. तर आशाची माझी मैत्री झाली ती मी जेव्हा करून घरात पडले आणि मला घरातच राहावे लागलं तेव्हा झाली. आशाचा परिचय, आमचा संवाद पंधरा वर्षांपासून होता. आशा आमच्या जवळपास राहत होती म्हणून आशाला मी ओळखत होते. smart old lady!

थोडाफार कधीतरी भेटणं बोलणं, शेअर रिक्षाने जाणं किंवा माझ्या गाडीतून मी तिला लिफ्ट देणे. माझ्या बँकेत आशा आली असताना काहीतरी काम करून देणे. एवढी आमची ओळख होती. मात्र लवकरच जेव्हा मी घरात पडले, बेड रेस्ट घेत होते तेव्हा ती रोज माझ्या घरी येऊ लागली. माझ्या घराच्या जवळच राहत होती. यायची, गप्पा मारत होती. तरीपण वयोमानाने पंच्याहत्तरीच्या वर वय होतं. त्यामुळे हातात काठी घेवून चालायची. पण काठी टेकत टेकत माझ्या घरी ती मला भेटायला यायची. मी आजारी होते पण तरीही तिला माझ्याकडून बनवलेले काहीतरी खायचं असायचं. काही नाही होत थोडावेळ उभी रहा. पदार्थ कर. हे कर, ते कर अस करून ती मला कधी पोहे कधी माझ्या प्रकारची खानदेशी खिचडी कधी कोथिंबीर वड्या असं काय काय करायला, काम करायला लावायची.

मला सहवास पाहिजे, गप्पा पाहिजे. मला खोटे प्रेम दाखवलं तरी मी भुलून जाते आणि नंतर मला पण त्रास होतो हे मला माहीत आहे. ती यायची तोपर्यंत बाकीच्या मैत्रिणी मला सांगायच्या

“ अगं जेवणाच्या डब्यात खर्च वाचवला. चिकट भिक्षुकीण तुझ्याकडे फुकट खायला येते. ”असं माझ्या ग्रुपमधल्या बाकीच्या मैत्रिणींनी मला सावध केलं. पण मला त्यांचे हे विचार सुद्धा

अतिशय कोत्या मनोवृत्तीचे लक्षण वाटलं. एक वृद्ध स्त्री माझ्या घरी, आठवड्यातूनचार-पाच वेळा येऊन गेली तरी त्यांनी काही माझ्या घरचे धन कमी होणार नव्हतं. फक्त प्रश्न हा होता की मला काम पडायचं. आशा एकटीच तिच्या घरी राहायची पतीचा मृत्यू झाला होता आणि मुलं स्वतंत्र राहत होती. त्यामुळे आशाला मी रोज फोन करायचे. ती मला फोन करायची. एक दिवस तिचा फोन नाही आला. मला फार काळजी वाटली. मी रात्री तिच्या घरी साडेनऊला भेटुन ती ठीक आहे ना बघून आले.

"एवढं काय ?मूर्ख आहेस तू एवढं काय गुंतायचं"आशा.

पण मनातल्या मनात तिला कुठेतरी आनंद झालेला दिसला. आणि हे मी माझ्या मनात मान्य पण करते की मी मूर्ख आहे आणि मी नको त्या व्यक्तींमध्ये गुंतून पडते मला पटकन ओढ माया निर्मान होते.

Yes, I am an emotional fool

त्यानंतर ती अशी येण कमी-कमी झालं. त्यानंतर तिला दुसरी एक मैत्रीण मिळाली. माझ्या एका अन्य मैत्रिणीने मला सांगितल.

"अ ग तीला सवय आहे.. अस ती चिकटली तर ती एखाद्या व्यक्तीला एक वर्ष खूप चिकटते. आणि नंतर तिचं भांडण होतं काय

होतं त्या व्यक्तीपासून दूर् जाते. एक वर्ष एक वर्षाच्या वरती स्वर्गातून देव आला तरी आशाच पटणार नाही”

त्यानंतर आशाने एक पेईंग गेस्ट ठेवली. आशाच त्या मुलीशी चांगलेच गुळ पिठ जमलं होतं. दोघी रानोमाळ फिरायच्या. मध्ये सहली करायच्या आणि मला तर त्या काळी तिने जवळजवळ तोडूनच टाकलं होतं.

जून कट घरांमध्ये राहून कंटाळा येतो म्हणून स्वतःचे घर विकत न घेता आज पर्यंत तरी आशा भाड्याच्या घरात राहिली होती. त्या आठ महिने झाले की घर बदलायचं. नवीन कुठेच बिल्डिंग दिसेल तिथे घर घ्यायचं. अशी आशाची राहणी व्यवस्थित होती. यापूर्वी एकदा खारकर आळीत राहायची तेव्हा मी तिच्या घरी गेले होते. खूप सुंदर घर होतं व मी म्हटलं

“किती छान आहे. मोठ, नव खुप भाड असेल?”मी

“ तस नाही म्हणे. घर मालक म्हणे इथे भूत होतं म्हणून लोकं यायला तयार नव्हती. लककन् पण सावली हलायची. कुणीतरी कोपऱ्यात उभा आहे असा भास व्हायचा. रात्री भांडी पाडायची. मी म्हटले मी काही घाबरत नाही आणि फुकटात मिळतय, म्हटल्यावर मी राहायला आले. रात्री बघितलं तर घुशी फिरत

असायचा आणि त्यामुळे भांडी पडत होती. सावली हल्ली म्हणजे सुद्धा काय त्यात काही नव्हतं. तिथे मी मजेत राहिले. ''

आशाला एकदा रात्री फोन उचलत नाही म्हणून मी बघायला गेले असता, आशा दाराशी बेशुद्ध पडलेली आढळली. मी उचलून तिला दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी सांगितलं की यांना काहीतरी खाण्यात आलं आहे विषबाधा झाली आहे. आशाने शुद्धीवर आल्यावर सांगितलं कि :

''एक साधू आला होता. तो म्हणाला मी शेगावला जाणार आहे. मला शंभर रुपये द्या. मी त्याला जुनी घातलेली चादर दिली. पण पैशासाठी हटून बसला. शेवटी मी त्याला शंभर रुपये दिल्यावर त्यानी मला हा प्रसाद दिला आणि तो प्रसाद मी खाल्ला आणि मला पुढचं काहीच आठवत नाही. घरात चोरी करण्यासारखं काहीच नव्हतं त्यामुळे साधूने काहीच नेल नाही. दागिना खोटा होता, त्यामुळे चोरी करू शकला नसेल. पण त्यावेळी मात्र केवळ माझ्यामुळेच आशाचा जीव वाचला होता. अर्थात त्याबद्दल तिच्या मनात कृतज्ञता शून्य होती. मला च गप्पा मारायला कोणी तरी, तोंड वाजवायला बोलायला लागतं म्हणून मला थोडं थोडं तिची आठवण येऊन वाईट वाटायचं. मात्र एका रात्री आशा माझ्या घरी हजर झाली.

“एवढ्या रात्री का आलीस?”मी

“ माझ्याकडे होती ती पेईंग गेस्ट बांगडी चोरून पळून गेली”आशा

“अग ती डॉक्टर होती. तुझी पेईंग गेस्ट डॉक्टर होती. तु घरी शोध. रात्री पोलीसात नको” मी तिला समजूत घालून परत पाठवलं. त्यानंतर तिला मी फोन केल्यावर ती माझा फोन कट करी किंवा फोनच घेत नाही. कदाचित मी तिच्याबरोबर रात्री पोलीस स्टेशन वर गेली नाही म्हणून राग देखील आला असावा. असेल ते असेल. सहा महिने उलटले. पण त्यानंतर ती तो विषय टाळून माझ्याकडे वारंवार येऊ लागली. खायला जेवायला बसायला, लाडू बनवायला अमुक-तमुक कारणाने ती मला भेटू लागली. एक दिवस ती मला म्हणाली.

“ तुला माहिती मी मध्यंतरी तुझ्याशी का बोलत नव्हते?”

“ नाही ते नाही तू मला सांगितलं नाहीस. मी बऱ्याच वेळा तुला विचारायचा प्रयत्न केला. ”मी

लोकांनी मला तुझ्या बद्दल वाईट सांगितलं”आशा

“ असं काय वाईट सांगितलं की तुला पूर्ण संबंध तोडावे वाटले. आता या वयात आणि सत्शील बाईबद्दल लोक काय सांगणार?”मी

“लोक सांगतात. गॉसिप करतात. लोक तोंडाला वाटेल ते येईल ते सांगतात. ”आशा म्हणाली.

“ सांगायला तर लोक तुझ्याबद्दल सांगतील आणि माझ्याबद्दल सांगतील, आपण दुर्लक्ष करायचं” माझ्या या वाक्यावर ती म्हणाली “सांगू का तुला लोकांनी मला काय सांगितलं? पण… ”

त्यावर मी म्हणाले

“सांग की!”

मला पण उत्सुकता वाटली की एवढी जवळची मैत्रीण, तिला लोकांनी माझ्या बद्दल असं सांगितलं तरी काय? कितीदा माझ्याशी

“ सांगेन तुला कधीतरी सांगेन. तुला कधीतरी बोलेन”असं करून आशाने सांगितलं नाही. त्यानंतर ती गोष्ट झाली (भैटेना झाली. गायब झाली. घरी येत नाही)

आशाबाईंनी शेवटपर्यंत मला कोणी काय सांगितलं आणि ती अचानक मध्ये माझ्याशी बोलणं का थांबवते, काय कारण होते हे कधीच सांगितले नाही. ग्रुप मधल्या सध्या काही मैत्रिणी अशा असतात त्या आपापसात पाठीमागे वेडेवाकडे सांगत फिरतात. उदाहरणार्थ ती म्हणते की ‘ही पैसे मागते. ती पैसे घेतलेले परत करत नाही. बाहेर जेवायला गेल्यावर ती नॉनव्हेज खात नाही म्हणून

ती कमी कॉन्ट्रीब्युशन देते. नाव ठेवते. भांडण वाढते’अशा प्रकारे सांगणारे लोक पण असतात. त्यामुळे त्यासाठी तिने मला तोडलं असेल किंवा याहूनही भयानक कोणी काय तरी रिप्लाय केला असेल देव जाणे. पण आशा नी मला कधी सांगितलं नाही की ती अशी मध्येमध्ये माझ्याशी अस का वाटते ?

उगाच का ती मला म्हणायची ‘तुझं माझं जमणार नाही’. ‘आपण मैत्री बंद करू या’

“ ठीक आहे तुझी इच्छा”मी

त्यावर तिची अशी इच्छा होती की मी तिला वारंवार विचारावं असं का म्हणतेस ?की तुझं आणि माझं जमणार नाही? आपलं जमू शकतो. असं लिहू नकोस, असं म्हणू नको की आपलं जमणार नाही.

माझ्या मैत्रिणींनी मला सांगितलं तिची अशी अपेक्षा आहे की तू तिला विचारावं की तिने मला असं का लिहिलं की आपलं जमणार नाही. पण हळूहळू तिच्या आज चिकटलं, उद्या तोडलं, मैत्रीचे नाटक करण आणि नंतर परत भांडणे या गोष्टींचा मला इतका कंटाळा आला होता की यावेळी मी तिला विचारलं नाही की आपलं जमणार नाही असं का म्हणतेस?. आता यावेळी मात्र आशा खरच घोष्ट झाली म्हणजे तिने मला फोन करणे बंद केले आहे. ती

मला भेटेना. मला फोन करून वापरुन, बोलावून घेणे सर्व सोडून दिले.

चार महिने गेले आणि एक दिवस मी किराण्याच्या दुकानात गेले असतांना किराणा दुकान वाला मला म्हणाला.

“या बाजूच्या घरातल्या आशाबाई तुमची मैत्रीण होत्या?”

त्यांनाही आशाने काहीतरी सांगितलं असावे अस मला वाटले. आता हा पण काहीतरी, याने माझ्या बद्दल वाईट सांगितलं अशीच गोष्ट मला सांगणार मी जाणल.

मी म्हटलं

“हो माझी मैत्री होती” त्यावर त्याने

सांगितलं.

“ रहती थी”

“काय?” मी म्हणाले.

“ चार-पाच दिन पहले उसका मौत हो गया”किराणावाला.

“ क्या ?”असे मी म्हणाले. तो किराणा वाला सांगू लागला. बाजूची एक सामान्य घेणारी बाई म्हणाली.

“आशाबाई एकटी राहु लागली होती. सगळ्यांशी भांडायची. कुणाशीच पटायचं नाही. तीन-चार दिवस बाहेर दिसल्या नाही.

त्यामुळे तीन-चार दिवसांनी वास यायला लागल्यावर त्यांच्या मुलाला फोन करून बोलवुन घेतलं. पोलीस आले. ”ती बाई

“ खोली उघडली तेव्हा कळलं कधीतरी पलंगावर मरून पडल्या होत्या. काय झालं, काय झालं काय नाही. ”किराणावाला.

“आम्ही समोरच राहतो आम्ही त्यांची खोली घ्यायचं ठरवलं होतं पण आता भितीच वाटते. पण त्यांच्या मुलांनी हीची पुस्तक, कपडालत्ता, सामान सगळ्या सह खोली विकायला काढली आहे. ”ती बाई.

“ चार-पाच दिवस नाही झाले तर आई मेल्यावर, झील बघा खोली विकायला निघाला. काय ही हल्लीची मुलं असतात”किराणा नोकर बोलला.

मी काहीच बोलले नाही. सामान घेवुन गणपती देवळात जावून गप्प बसले. तुझं माझं जमणार नाही असं आशा का म्हणाली आणि माझ्याबद्दल कुणी काय वाईट सांगितलं? अनुत्तरित प्रश्नांना सोबत घेऊन मी तिथून परत आले. आयुष्य इतकं छोटं असतं. उद्या काय घडणार हे कोणालाच माहीत नसतं. तरीही बायका एकमेकींशी अशा विचित्र का भांडतात?वाद छल आणि उगीच अस का वागतात ?याचे उत्तर मी अजूनही शोधते आहे. केवळ मला त्रास व्हावा म्हणून आशाने मला तोडून टाकलं. मला त्रास तर

झालाच पण नुकसान तिचं पण झालं. जर कदाचित तिने माझी मैत्री तशीच चालू ठेवली असती तर...

ती फोन उचलत नाही म्हटल्यावर मागच्या वेळी जशी मी तिच्या घरी गेले तशी यावेळी पण गेले असते. जर आजारी असती तर दवाखान्यात ॲडमिट केलं असतं आणि कदाचित तिचा प्राण पण वाचला असता. आपलं जमणार नाही असं माणूस ठरवतो, तेव्हा त्याच्या मनात नक्की हेतु काय असतो?नियती ते ठरवत असते.

विश्लेषण जमणार नाही.

***

# चकवा

चकवा हा एक गूढ शब्द आहे. या शब्दात ती फसवणूक अंतर्भूत असते. चकवा काय हे सांगताना, असं म्हणतात की रात्री-अपरात्री जंगलात एखादी व्यक्ती भेटते की आपल्या व्यक्ती सारखा आवाज काढून आपल्याला हाक मारते. आपल्याशी जवळीक साधत असते. आणि जंगलात आपण त्या व्यक्तीशी गप्पा मारत मारत आपले नीयत जागेपासून भरकटत जातो. नंतर कधीतरी आपण चकव्या बाहेर निघुन गेलो जर आपल्या सुदैवाने तर आपल्याला जाग येते. चूक समजते आणि कळेना होते कि इथे कसे आलो आहोत?सुदैव नसेल तर माणूस हरवुन जातो. चकवा म्हणजे काय ते अनुभव ग्रामीण भागात, जंगलात ऐकायला मिळतात.

मी आज मला आलेले सातव्या बद्दल चे दोन अनुभव सांगणार आहे. आम्ही एकदा औरंगाबादला सहलीला गेलो होतो. अचानक ठरल्यामुळे गावाबाहेरील एका available so so हॉटेलमध्ये मुक्काम ठोकला. पाच दिवस आम्ही ह्याच हॉटेल मध्ये राहिलो आणि आजूबाजूचा परिसर बघितला. पाचव्या त्यादिवशी परत येताना आम्हाला हॉटेल सापडेना. त्यात त्याच हॉटेलच्या जवळपासच्या रस्त्यावर आम्ही दीड तास फिरत होतो. पाच दिवस

या हॉटेलमध्ये आपण राहिलो ते हॉटेल न सापडणे म्हणजे नवलच होते. दीड तासानंतर आम्हाला हॉटेल सापडलं. एका वाटसरूला विचारल असता, त्यांनी सांगितलं की

" हे काय हे समोरच तर हॉटेल आहे. "

म्हणजे ते हॉटेल जवळपास होते. हॉटेल समोर होते, पण काय घडले देव जाणे. आम्ही पाच जण होतो. ठीक आहे एखादी व्यक्ती चुकले, की रस्ता विसरेल, दुसरी विसरेल पण शक्यतो ड्रायव्हर लोक तर कधीच हॉटेल किंवा रस्ता विसरत नसतात. त्यांना त्या जागा बरोबर लक्षात राहतात. तरीही आम्हाला पाचही जणांना दीड तास ते हॉटेल सापडत नव्हते. ज्या या हॉटेलमध्ये आपण आठवडाभर राहिलो ते हॉटेल सुद्धा न सापडणं हा पण एक प्रकारचा चकवा होता. चकवा संपला आणि आम्हाला हॉटेल सापडलं. बॅगा उचलून आम्ही बाहेर पडलो. तुम्ही अंधश्रद्धा म्हणाल, पण हा अनुभव मला आला.

दुसरी चकवा ची घटना मी तुम्हाला सांगणार आहे ती सुद्धा अशीच 35 वर्षापूर्वीची आहे.

त्यावेळी माझी एक मैत्रीण रोजी कोल्हापूर राहायची. काल अकाली रंजी अचानक (एक जुनी मैत्रीण) मला 35 वर्षानंतर भेटली. त्यावेळी रंजीत कुटुंब कोल्हापूर राहत होते. कोल्हापूरच्या

पुढे काळम्मावाडी धरणावर दूधगंगा नावाच्या गावात माझी बहीण त्यावेळी राहत असे. मी पूर्ण आज पर्यंत चे आयुष्य माझं नाशिकला राहायला होते.

त्या दिवशी प्रथम गेले होते. त्यामुळे मी कोल्हापूर सुद्धा पूर्वी पाहिले नव्हते. ताई दूध गंगेला राही. ग्रामीण भागातील दूध गंगेचे दिवस ताई उपयोगी. त्या गावा बद्दल, दिवसांबद्दल ताई नेहमी सांगे. मला पुर्वी जाणे जमले नव्हते.

माझे वडील नुकतेच वारले होते. दुख विसरायला मात्र या मैत्रिणीबरोबर, पुढे बहीणीकडे दूध गंगेचे गावी दहा दिवस राहायचे ठरवून मी रंजी बरोबर सांजवेळेला कोल्हापूरला आले. रंजीव ची गाडी होती. तिने मला कोल्हापूरच्या एसटी स्टँडवर सोडले, नि सांगितले.

“ की तू पुढे जा”. त्यामुळे एवढे फोन नव्हते. कोल्हापुर ते काळम्मावाडी, धरण, दूधगंगा निवासस्थानी जायला सोयी यातायात साधन देखील नव्हते. मी पत्रानी माझ्या बहिणीला मी येते आहे असं कळवलं होतं. आयुष्यात पहिल्यांदा ते दूध गंगेचे दिवस उपभोगावे म्हणून मी आज आले होते.

तिथे मी प्रथम आंबोळी खाल्ली.

तोपर्यंत मला ते डोसे वाटायचं आणि त्याचं सुद्धा खूप अप्रूप असायचं. कोल्हापूरला रंजीने मला एस टी स्टॅन्ड वर सोडलं. तिथे मी बसले. तिथे एक अतिशय वृद्ध माणूस सुपारी विकत असायचा. त्याची सुपारी म्हणे पुढे खूप प्रसिद्ध झाली. आता तो कुठे असेल (35 वर्षांनी) काहीच कल्पना नाही. पण एक वृद्ध गृहस्थ सुपारी विकतो?त्यांना बघून मला पोटात खड्डा पडला. नुकतच माझ्या वडिलांचं निधन झालं होतं. त्यामुळे मला त्या वडिलांच्या प्रेमाची आठवण आली, अभाव जाणवला, ईतका की माझ्या डोळ्यातून पाणी वाहू लागलं. मी एकटी रडत बस थांब्यावर थांबले होते. पण सुदैवाने त्या दिवशी, थांब्यावर काही कामानिमित्त माझ्या बहिणीची एक परिचित व्यक्ती देवकर वहिनी भेटली. दूध गंगेचे दिवस देवकर बाई काढत होती.

“ का ग तू इथे ?ताईला कळवले आहे ना, की इतक्या रात्री तू येणार आहे. दादा घ्यायला येणार आहे का?लवकर अंधार पडतो”देवकर

“हो कळवले आहे. ”मी

“बर. आता यापुढे आपल्या काळम्मावाडी ला जायला बसला बरीच उशीर आहे. चल आपण थोडी गावात खरेदी करून

येऊ. मला थोडी खरेदी करायची आहे" ती माझ्या बहिणीची मैत्रीण, देवकर वहिनी मला म्हणाली.

"बस चुकून चालणारी नाही"मी

"हो परत येवु"देवकर वहिनी मला म्हणाली.

आम्ही सायकल भाड्याने घेतली. आणि आम्ही दोघी त्या बस थांबा ठिकाणाहून, त्या सायकलवर एका दुरवरच्या अंतरावर मार्केट गेलो. तिथे माझ्या बहिणीच्या या मैत्रिणीने देवकर वहिनी ने, आतले कपडे, एक चांगल्यात दुकानातली चप्पल, खरेदी केली. कोल्हापूरची कुठलीतरी बेकरी प्रसिद्ध आहे म्हणून त्या बेकरीतून बटर, टोस्ट, खारी, नानकटाई बऱ्याच वस्तू त्या मैत्रिणीने खरेदी केल्या. तिच्यासोबत मीसुद्धा बहीणीचे मुलांसाठी, खायला, ब्रेड ई. व पहिलीच्या मुलांसाठी पुस्तके या वस्तू खरेदी केल्या.

" या बाजूच्याच घरात एक परिचित राहतात. चल, 2मिनिट जाऊ या" ती देवकर वहिनी(बहीणीची मैत्रीण )मला म्हणाली. त्यामुळे आम्ही त्या मैत्रिणीकडे गेलो. त्या काळी फारशी सुबत्ता नसे. महीन्यात अखेरीला पैसे कुणाकडे नसायचे. त्यामुळे परीचिता कडे गेल्यावर चहा मिळाला. नाश्ता मिळाला तरी बरं वाटत असे. बचत वाटत असे. त्या परिचिताकडे आम्ही गेलो होतो. तेव्हा दोघी घामाघूम झालेलो होतो. दमलो सुद्धा होतो. मी पण प्रवास करून

दमले होते. ज्या मैत्रिणीने मला बस स्टॉप वर सोडलं ति खरी श्रीमंत घरची होती. तिच्या घरात भरपूर फळफळावळ, खाऊ, मिठाईचा साठा व. खादाडी पडलेली होती. पण तिने मला दोन फळं सुद्धा, काही पण सोबत बांधून दिली नव्हती. भूक लागली होती. आंबोळी खाल्ली होती पण वाढत्या वयात भूक लागते. त्यामुळे या परीचिताकडे चहा पोहे तरी मिळतील असं वाटलं होतं. तो काळ चहा पोह्यांचा होता. सायकल बाहेर लावून, आम्ही दोघी त्या व्यक्तींच्या घरी दारात गेलो, तेव्हा त्या व्यक्तीने आम्हाला ओळखलंच नाही. कारण की तो काळ टिकल्या लावायचा नव्हता. कपाळाला आम्ही दोघीनी गंध लावलं होतं, जे घामामुळे आणि तोंडावर पाणी मारल्यामुळे निघून गेले. आम्हाला पाहील्यावर त्या बाई म्हणाल्या “बापरे मुसलमान बायका आले आहेत” माझ्या मैत्रिणीने ओळख करून दिल्यावर त्या म्हणाल्या,

“ अगबाई तुम्ही होय, या या!” मात्र त्यांनी कसेतरी करत उकळत असलेला चहा दिला. तिथे मी तोंड वगैरे धुतलं थोडे फ्रेश झालो. पण चहा च्या पुढच नाश्ता द्यायची ईच्छा नव्हती. चिवडा दिसत होता. पण ते द्यायची त्यांची इच्छा नव्हती. वेग आणि गती पण नव्हती.

“आम्हाला गंगावेश वरून पुढची बस पकडायची होती” माझ्या बहिणीच्या मैत्रिणीने वारंवार तसं सांगितलं आणि सुचवलं सुद्धा की त्या काहीतरी नाश्ता करतील. पण त्या हालेना!निघालो पण त्या लोकांना काही द्यायची इच्छा नव्हती. आम्ही नाईलाजाने निघालो. आम्ही पोचेपर्यंत आमची बस चुकली होती आणि आम्हाला पुढे जायचे होते. उगीच गैरसोय झाली होती. आता टेम्पो पकडून जायचे, टेम्पोला पण पैसे द्यावे लागणार होते. शिवाय टेम्पो आमच्या बहीणीचे घरी, जिथे हे दूध गंगाचे क्वार्टर्स म्हणजे वस्तीगृह निवासस्थाने होती तिथून थोडे अलीकडे सोडणार होती. ऑलरेडी आम्ही भरपूर दमलो होतो पण पर्याय नव्हता. रात्री-बेरात्री कुठे राहणे शक्य नव्हतं. मग माझ्या त्या, बहीणीचे मैत्रीणीनी मला सांगितलं.

“चल जाऊया आपण! या टेम्पोने जिथे सोडतील तिथून पुढे चालत चालत जाऊ या”मी भयंकर दमले होते. पण मला पर्याय नव्हता बहिणीकडे जाऊन मुक्कामाला पोचल्यावर माझं मन शांत होणार होतं. त्या टेम्पोने आम्ही दत्तमंदिर नावाच्या एका स्टॉपवर उत्तरलो. दोघी दुखी बायकाच होतो. पण सुदैवाने देवाची पाठराखण म्हणा किंवा माणसं तशी चांगली होती त्यामुळे आम्हाला काही भीती वाटली नाही. त्या दत्त मंदिराच्या पायरीवर बसलेले असतांना, एक पांढरी साडी नेसलेल्या बाई तिथून आल्या.

आम्हाला नवल वाटलं की एवढ्या रात्री ही बाई?पुजारीण, गुरवीण पण बाई? मी विचार केला, तिची पण बस चुकली असेल किंवा काही कारण असेल.

“ मी या परिसरात सगळयांना ओळखत. मी कोल्हापूरला नोकरीला जाते आणि काळम्मावाडी माझे कुटुंब असल्यामुळे जा ये करते. दूध गंगेचे दिवस गैरसोय होते आणि ताई तुम्हाला कधी पाहिल्याचे आठवत नाही” देवकर बाई त्या बाईला म्हणाल्या.

“ या मंदिराचे काम वगैरे बघते. मी सोमा गुरवीण आहे. ईथे राहायला आले आणि पुढच्या देवळापर्यंत तुम्हा सोबत येते. सोबत होईल”असे म्हणून भेटलेली बाई, पांढऱ्या कपड्यातली आमच्या सोबत गप्पा मारत चालत होती. गजाली करत होती. मंदिरात दत्ताला नमस्कार करून चालायला सुरुवात केली. गप्पाना सुरुवात केली. अंधार त्यामुळे आम्ही दोघी खूप अशाही घाबरलो होतो. धरणाचा परिसर असल्यामुळे सर्वत्र निबिड जंगल होतं. तो जुना काळ काही आजच्यासारख्या चकचकीत ट्यूबलाईट च्या प्रकाशाचा, रस्ता वर्दळ यांचा, मोठ्या मोठ्या उंच दिव्यांचा नव्हता. मिणमिणता दिवा कुठेतरी असायचे. रस्त्यावर पद पद पथदिवे वगैरे प्रकार अजिबात नव्हता. त्या जंगलात ती बाई म्हणाली.

“ विजेरी आहे ना तुमच्याकडे?” त्यावर देवकर बाई म्हणाल्या

“ हो आहे की!” देवकर वहिनीनी विजेरी लावली. विजेरीच्या प्रकाशात पांढरी साडी घासलेली काळीकभिन्न सोमा गुरवीण आणि आम्ही दोघी चालू लागलो. त्या बाईची थोडी भितीच वाटत होती. अवधूत अवधूत अस देवकर वहिनी मध्ये मध्ये म्हणत असे. सोमा गुरवीण पण चालत होती. तिची सोबत आम्हाला पुढच्या लक्ष्मी च्या देवळापर्यंत झाली.

“लक्ष्मी च्या देवळात मी दिवाबत्ती करते तुम्ही पुढे जा”मला म्हणाली

महालक्ष्मीच्या देवळात पूर्ण गुडुप अंधार होता. दिवाबत्ती नव्हती.

“काय बाई दिवाबत्ती करते म्हणाली पण तिच्याकडे काहीच नव्हत. आणि डोळयात बोट घातले तरी दिसणार नाही असा अंधार होता. ”देवकर

सोबत च्या देवकर वहिनीची पुढची वाट पायाखालची होती म्हणून त्या म्हणाल्या.

“सोमा ताई आम्ही जातो” लक्ष्मीच्या वीजेरी बंद झाली. देवळात काडेपेटी पेटवून बघितले तर त्या गुरवीण बाइ अचानक कुठे गायब झाल्या. आत गुरवीण कुठे आहे, हे देवकर वहिनी बघू लागल्या. देवळात एक लक्ष्मीची मूर्ती होती आणि मोठा देव होता.

एक लक्ष्मीची मूर्ती होती आणि मोठा नजरेत भरावा असा देवळात एक लक्ष्मीचा तांदळा( मूर्ती )होती. आणि मोठा नजरेत भरावा असा सिंह होता. त्याचे डोळे चमकत होते. मी वडिलांच्या दुःखामुळे आणि विविध प्रसंगामुळे दुख घेऊन गेले होते. त्या देवीला मी म्हणाले

"कशाला ग देवी तू हा सिंह पाळलाय. शत्रूंना खात नाही. शत्रूचा नायनाट करत नाही नुसती अशी बसतेस. कशी तू वाघजाई देवी? कोंबडी पाळायची होतीस ना ?जर माझ्या शत्रूंचा तू नायनाट करू शकत नाहीस तर तू देवी कशी?" मी रागाने त्या देवीला मनातल्या मनात म्हणाले.

देवकर वहिनी ची काडेपेटीची काडी विझली होती. तो तेवढा प्रकाश सुद्धा नष्ट झाला आणि नवल म्हणजे त्या अंधारात ती बाई गायब झाली. मी आणि देवकर वहिनींचे हात पाय थंड झाले. देवकर वहिनींना ती वाट माहितीची होती म्हणून देवकर वहिनीनी माझा हात घट्ट पकडला आणि आम्ही भराभर चालू लागलो

टिमटिम एक दिवा दूरवर दिसत होता. त्या दिव्यावर नजर लावून देवकर वहिनी मला म्हणाली. " हे बघ त्याच्या तो दिवा दिसतोय ना तिथून तिसरे घर तुझ्या बहिणीच आणि पाचव घर माझं आहे. चल भरभर जाऊ या. ती बाई भूत होती" आम्ही त्या

दिव्याच्या थोड अलीकडे आलो. तिथे माझी बहीण मेहुणे आम्हाला घ्यायला आले होते. रात्री साडेबारा वगैरे वाजले होते. मुले घरात झोपली होती.

“ किती हा उशीर किती हा उशीर” अस ते दोघ मला म्हणायला लागले. “टेम्पोने मागे सोडले. बस चुकला. बस चुकल्यामुळे टेम्पो ने याव लागल आणि टेम्पोने अलीकडेच सोडलं. पुढे चालत आलो”काय घडले देवकर वहिनींनी माझ्या बहिणीला सांगितलं. आम्ही दोघी बहिणी एकमेकींच्या गळयात पडून वडील वारल्याबद्दल दुःखाने डोळयातून पाणी काढू लागलो.

“असू दे चल आता घरी गरम-गरम जेवून घे” बहिण मला म्हणाली. घरी जाऊन तोंड हात पाय धुतले. दुखरे पाय शेकले. देवाला हात जोडले. देवकर वहिनी त्यांच्या घरी गेल्या. आम्ही सगळया जेऊन निजलो. दूध गंगेचे घरी पहीला दिवस होता. सूर्य वर येई पर्यंत झोपलो. सकाळी उठल्यावर माझे मेव्हणे म्हणाले

“ अमावस्येचा आलात. त्या दत्ताच्या देवळात कुठेतरी गोष्टीतल्या आकृती, गुरवीण भूत वगैरे फिरते. असं काय तुम्ही करायचं? ती रात्र झाली तर तिकडे थांबायचं कुठेतरी!” त्यानंतर पूर्ण कॉलनीत, या दोघींना, रात्री गुरवीणीचे भूत दिसली असल्याची चर्चा सुरू होती. तोच विषय तोच विषय! पण सुदैवाने गुरवीणीने

आम्हाला त्या रात्री सोबत केली. गुरवणीने आम्हाला काहीही त्रास दिला नव्हता. उलट त्या निबीड अरण्यात सोबतच केली होती. दूध गंगेचे दिवस, हवा, फळ छानच होती. ईथे माणसं साधी होती. भात खाऊन राहत होते. आत गावात ते वावरत. फारसे पैसे नसायचे म्हणून पुढे असलेल्या त्या दुकानात पण जाणे टाळायचे. घरातल्या घरात वावरत असायचो. धरण खूप सुंदर होतं. कप बशी, पाहिल्यासारखेच चारी बाजूंनी डोंगर आणि मध्ये आत ते गाव वसलेलं होतं. आता तर तो भाग फारच सुशोभित केला आहे. त्या काळम्मावाडी धरणाच्या भूमिपूजन करायाला स्वतः श्रीमती इंदिरा गांधी जी आल्या होत्या. दहा दिवस राहून परत जाण्याचे दिवस आले. दूध गंगेचे दिवस संपले. परतीच्या वेळी दिवसाउजेडी जायचं ठरलं. लवकर जायला बस नव्हती. टेम्पोने आम्हाला जिथे सोडलं. तर त्या स्टॉप पर्यंत जावं लागत होतं. मेव्हणे जीप वाले त्यांना आणि बहिणीला ती जागा दाखवली जिथ पासून, देवळापर्यंत सोमा गुरवीणीने आमची सोबत केली होती. दत्त मंदिराचे समोर टेम्पो पकडली. टेम्पोत माझ्यासोबत बहिण मेव्हणे पण आले होते. त्यांना कोल्हापूरला काही किरकोळ खरेदी करायची होती. ड्रायव्हरला आम्ही आलो होतो ते बरोबर आठवले. तो म्हणाला “ ताई त्या दिवशी एवढ्या रात्री पोचल्या. अहो तुम्ही चकवा होवून अडकला

असता. पुण्य होत तुमचं, खूप पुण्य होतं म्हणून तुम्ही वाचला" "अरे त्यांना सोमा गुरुविण दिसली होती"मेव्हणे

" बापरे कडकडीत अमावस्या होती. पण सोमा गुरुविन काही त्रास देत नाही. एकटा वाटसरू भेटलं तर ती सोबतीने चालते. वाटसरू जर वाईट असेल तर त्याला चकवा होतो आणि तो रात्र रात्र त्या जंगलात रस्ता शोधत फिरत राहतो"ड्रायव्हर सांगत होता.

त्यादिवशी आम्हाला जी भेटली ती सोमा गुरुविण होती. आत्मा होता? हवा होती? का काय होते? कधीही कळलं नाही. अंधश्रद्धा म्हणून नाही पण खरोखरच ती व्यक्ती आम्हाला भेटली होती. त्यानंतर बऱ्याच जणांनी, कोणी व्यक्ती, गुरवीण स्त्री तिथे राहते का ?याची चौकशी त्या दोन्ही मंदिरात जाऊन केली. पण त्या गुरवणीचा शोध लागला नाही. त्या दिवशी आम्हाला चकवा भेटला होता का? तेही सांगता येणार नाही. त्या गुरवीणीचं, त्या भयाच्या तावडीतुन आम्ही वाचलो आणि सुखरूप घरी पोहोचलो हे मात्र खरं आहे.

अंधश्रद्धा म्हणू का काय ?आम्ही सुखरूप पोहोचलो त्यानंतर माझ्या बहिणीची बदली कोल्हापूरला झाली. आमचा काळम्मावाडीचा संबंध संपला. दूध गंगेचे दिवस सरले. काही

कळले नाही समजणार नाही असे घडले होते. नंतर परत कधीही त्या भागात जायची वेळ आली नाही.

रंजी बरोबर हा विषय निघाल्यावर आम्ही देवकर बाईंना फोन केला. देवकर बाई म्हणाल्या "आता तशी त्या भागात वस्ती झाली असली तरी दत्ताचे देऊळ होते लक्ष्मीचे देऊळ अजूनही अंधाराने भरलेली असते आणि गूढ वाटतं. त्या दिवशी आपल्याला सोमा गुरवीण भेटली यावर, खरचं तुला आणि मलाच विश्वास बसेल. किती भयानक होती ना ती रात्र! आम्हाला पण भूत दिसल्या, त्याचे भीती आणि त्या घडलेल्या घटनेची साक्षीदार तू आणि मीच आहोत ना! आजही तो दिवस आठवला की अंगावर काटे येतात" देवकर वहिनी म्हणाल्या.

आज त्या घटनेला पस्तीस वर्ष झाली पण अजूनही त्या बाईचा चेहरा आठवतो. ती घटना आठवते ते जंगल स्मरणात होते. ती बाई देवळात होती. फसलेली अडलेली असेल. ती सोमा गुरवीण सोबत होती की चकवा होती? अजूनही हा प्रश्न समोर आला की, मी उत्तर शोधत बसते.

चकवा म्हणजे काय?

**

# करुणाष्टके

करोना महामारी च्या काळातील आठ लघुकथा म्हणून मी लेखाचं नाव करोनाष्टक दिले आहे. फार वर्षांपूर्वी एका प्रसिद्ध लेखकाची करूणाष्टक नावाची कादंबरी होती. त्यात अशी कथा असते की त्या कुटुंबातील आठही अपत्य जीवनाच्या वेगवेगळ्या संकटातून जाऊन दुर्दैवाची बळी ठरतात. त्या आठ करूण कथा त्या कादंबरीत होत्या. मी आज आठ कथा सांगणार आहेत त्या सुद्धा अतिशय करूण आहेत. पैसा आणि माणुसकी, नातेसंबंध, स्वार्थ या सर्व विषयांवर विचार करायला लावणार्या आहेत.

एरवी वेगळे पण या परिस्थितीत माणूस वेगळा वागतो. नेहमी मोठ तत्वज्ञान झाडतो पण वेळ पडली की स्वतःचा स्वार्थ बघतो. माकडीन सुद्धा जेव्हा पाणी डोक्यापर्यंत वाहायला लागते, तेव्हा पिल्लांना पायाखाली घेऊन उभी राहते. तशाच वेगवेगळे प्रकारच्या आणि विचित्र कथा या करोना काळात दुर्दैवाने ऐकायची वेळ आली.

माणुसकीचा गहिवर, आम्ही तुम्हाला मदत करू, नातेसंबंध, मातेचा महिमा, पुत्र कर्तव्य, श्रावण बाळ अशा कथा आणि शब्दांनी आपल्या संस्कृतीचे कोडकौतुक बारा महिने केलं जायचं.

पारंपारिक भारतीय संस्कृतीच्या मोठेपणाच्या गोष्टी करणारे असेही करोनाचे असे बारा महिने आपल्या आयुष्यात आलेत.

पानिपत झाले आणि ते करोना संहार युध्दात वेदना कधी संपतील याची सुद्धा कल्पना नाही. या महामारीत, त्यावेळी परिचित व्यक्तींकडून ऐकण्यात आलेले अनुभव, माझे स्वतःचे अनुभव आणि माझ्या स्वताच्या देखील काही चुका, स्वार्थ बघणे या 8 गोष्टीत आहे.

Eight types of eight tragedies

1)लॉक डाउन डिक्लेअर करून दोनच दिवस झाले होते. मी स्वतः सगळयांना सांगायचे लॉकडाउन होऊ शकते, सामान भरा. पण ते लॉकडाउन इतकं कठोर, इतके काळ होईल, इतका सिरिअस होईल असं मला कधीच वाटलं नव्हतं. त्यामुळे माझ्या घरात सामान नव्हतं. माझ्या खालच्या मजल्यावर राहणाऱ्या बाईचा तरुण मुलगा, शाळा-कॉलेजची काम, मैत्रिणींना भेटणे बँकेत जाणे या कारणाने लॉक डाऊन होतं तरीही घराबाहेर पडत होता. त्याला मी माझ्यासाठी औषध आणून दे असं सांगितलं. ज्येष्ठ नागरिकांनी घराबाहेर पडू नये अशा सूचना आरोग्य विभागाकडे दिल्या होत्या. त्यामुळे मला बाहेर जाता येत नव्हतं. नाहीतर इतक्या वर्षात कधीही आम्ही आमचं कोणतेही काम शेजारीपाजारी कुणाला सांगितलं

नव्हतं. भरवस्तीत घर असल्यामुळे सगळे जवळ मिळते. आम्ही जाऊन घेऊन यायचो. आज ह्या मुलाला हे काम सांगितल्यावर त्याची आई आम्हाला म्हणाली

" आमच्या मुलाला सांगु नका. त्याला करोना भय नाही का? तुम्ही तुमच्या मुलांना परगावी/परदेशी पाठवलं आणि आमच्या मुलाला गडी समजता? काम सांगता ?पडा की घराबाहेर! नशिबात असेल तर करोना पाश आवळयाचा तर तो कसा होईल. पडा घराबाहेर. "

पंचवीस वर्ष एकाच सोसायटीत राहणारी आम्ही माणसं एकमेकांना करोना मुळे परकी झालो.

2) याच्या पुढची गोष्ट आहे ती आमच्या सोसायटीतली आहे. वरच्या मजल्यावरील एका स्त्रीचा अपमृत्यू झाला. करोना च्या भितीमुळे तिच्या कार्याला कुणीही जायला तयार नव्हते. चार लोकं सुद्धा नव्हती. अर्थात हल्ली शववाहिका बोलावून त्यातूनच नेतात. पूर्वीसारखे अंतयात्रा वगैरे बघत प्रकार नसतात. पण तिचं ते एकाकी जाणं सुद्धा मला खटकलं. योग्य प्रकारे तिला अंत्यसंस्कार, माझ्या मते मिळाले की नाही, असेही माझ्या मनात येतं 3)

पुढचा तिसरा प्रसंग मी सांगते ते आमच्या घरापासून जवळच चरईमध्ये एक महिला एकटीच घरी राहते. हल्ली बऱ्याच घरी ज्येष्ठ

महिला /पुरुष एकट्याच राहतात. कारण बऱ्याच घरी ज्येष्ठाना एकटेच राहणे सकारण नशीबी येत. घरी ज्येष्ठ महिला एकटी राहत होती. कारण स्वतःचं घर असतं वृद्धाश्रमात आयुष्य, एका पलंगावर पडण्यात काही अर्थ आहे का? असे सांगून हा विचार करून ही स्त्री घरी राहत असे. फार तर फार रात्री सोबत कुणीतरी येई. या स्त्रिया घरी राहत असतात फार तर फार रात्री सोबत बघु म्हणत या काकु घरी राहत. फार तर फार रात्री सोबतीला झोपण्यासाठी ब्युरोमधून एखादी बाई बोलवण्याची पद्धत होती (आमच्या शहरात बऱ्याच घरी ही पद्धत आहे )आणि त्यात चूक पण नाही. त्यातलीच ही आशा नावाची वृध्दा घरात एकटीच राहत होती. तीन-चार दिवसांनी घरातून वास यायला लागला म्हणून पोलिसांना बोलावलं. आशाचा मृत्यू कधी झाला कुणाला कळल नाही. करोना मुळे लोक कुणाच्याही घरात डोकावणे हल्ली टाळत असतात

करोना मुळे लोक कुणाच्याही घरात जाण, काम, मदत हल्ली टाळत असतात.

4 चौथ्या घटनेत एक स्थूल स्त्री तिला आजारपणामुळे दवाखान्यात न्यायचं होतं. ॲम्बुलन्स वाल्यांनी खूप पैसे सांगितले. त्यामुळे तिला रिक्षातून न्यायचं ठरलं. त्या रिक्षातून ती मावत सुद्धा

नव्हती. तरी इकडून तिकडून दाबत असं करून तिला रीक्षात कोंबून कोंबून बसवलं होतं. आपल्या आईच्या सुविधांची काळजी घेण्यासाठी पैसे खर्च करावे असे मुलांना वाटत नव्हतं?

5) पुढची पाचवी गोष्ट!तपासणी घरी पॅथोलॉजी चेक करणे, काळजी घेण्यासाठी पैसे खर्च करावे असं मुलांना वाटत नव्हतं?अशीच पुढची पाचवी गोष्ट सांगते. माझ्या मुलाच्या मित्राचे वडील एका प्रतिथयश इस्पितळात डॉक्टर म्हणून काम बघतात. करोना महामारी जेव्हा पसरली तेव्हा ते कामावर जात होते. त्यांना कोरोना झाला. त्यावेळी या डॉक्टर साहेबांना त्यांच्या पत्नीला आणि त्यांच्या दोन मुलांना

"या सोसायटीत राहू नका. तुम्ही हॉटेलात राहायला जा" असं सांगण्यात आलं. आजारी माणसाला किती गोष्टी लागत असतात. सुविधा आणि विश्रांती साठी लागणाऱ्या कितीतरी गोष्टी ते घर आपल्याला पुरवत असतं. अशा वेळी ती लोक हॉटेलात राहायला गेली. कारण सोसायटीने प्रचंड विरोध केला आहे. प्रचंड त्रास दिला. त्या लोकांनी हॉटेलमध्ये काही दिवस काढले. डॉक्टरांच्या कामाचे काळात आणि करोनाच्या परिस्थितीत भाड्याने घर घेऊन कुठे राहणार ?ते सुद्धा सोप्पं असतं का?कसे काढले असतील त्यांनी दिवस? स्वतःच्या घरात राहायचा पण हक्क त्यांना नाही?

करोना वॉरियर्स म्हणून त्यांचे कौतुक करतो पण त्या लोकांनी जे सोसलं ते फक्त ही सेवा देणारे डॉक्टर आणि नर्सेस जाणतात.

6) कल्याण मध्ये नर्सेस आणि डॉक्टराना

“ जे मुंबईला कामाला जातात त्यांनी मुंबईलाच राहावं, त्यांनी कल्याण आणि बदलापूर शहरात पाय टाकू नये” असंच सांगितलं गेल होतं, कारण की या लोकांमुळे करोना आमच्या घरांत पसरेल हा गैरसमज होता. असे ते लोक कोरोना वॉरिअर शी भांडत होते.

7) सातवी गोष्ट सांगणार आहे ती बघण्यातली आहे वाचण्यात आली आहे. पुण्याहून एक तरुण चालत पुण्याच्या जवळच्या शंभर किलोमीटर अंतरावरच्या आपल्या घरी गेला. त्यावेळी त्याच्या आई वडिलांनी त्याला घरात घेतल नाही.

“ आलास ठीक आहे. पण तू जर पॉझिटिव्ह पॉझिटिव्ह आला असशील तर ते आमच्या करीता रिस्क असते. आम्हाला करोना नको. तू सेंटरमध्ये जा”

म्हणून या आईवडिलांनी मुलाला घरात घेतलं नाही. शास्त्रीय दृष्ट्या वैज्ञानिक दृष्ट्या योग्य आहे, पण ते वाचून माझ्या पोटात तुटलं. 8)आठवी गोष्ट परिचितांच्या घरातील आहे. मायलेकी पॉझिटिव झाल्या आणि नवल म्हणजे लेक तरुण असूनही लेकीची तब्येत जास्त बिघडली. आई पेक्षा अधिक बिघडली, कोरोना

व्हायरस अधिक सहन करावा लागला होता. ती कामावर जात होती. तिला या आईला दोघींनाही घरात औषधोपचार करण्यात आले. त्यांना कोणातरी नातेवाईकाकडे जाऊन राहावे, डबा मिळावा, वेळच्यावेळी खायला-प्यायला मिळावे व विश्रांती मिळावी आणि तब्येत अधिक बिघडल्यास घरात कुणीतरी असावे म्हणून आपल्या अगदी जवळच्या नातेवाईकाकडे शहरातील घरी जायचं होतं. पण त्या शहरातल्या नातेवाईकांनी या दोघींना सांगितलं,

" तुम्ही इथे येऊ नका तुम्ही इथे आलात तर तुम्ही दोघी तर आजारी आहात. मी माझी बायको आणि माझा मुलगा यांना धोका होऊ शकतो"त्यामुळे त्या दोघी बायकाही तिथे औषधोपचार घ्यायला सुरुवात केली होती.

8)मिशन बिगीन अगेन ला सुरुवात केली होती. एके दिवशी अचानक फोन न करता, न कळवता, माझे एक जवळचे नातेवाईक मला भेटायला आले.

" अगं बरेच दिवस झाले तुझी आठवण येत होती. मला तुला सव्वा वर्षे बघायला मिळालं नाही म्हणून आले". त्यांना असं वाटलंच नाही नाही कि मला भीती वाटते. ईतरांना भीती आहे. मला पसरायची भीती वाटते.

“मला भीती वाटते. मी दार उघडत नाही” मी त्यांना घरात घेतलं नाही. मौन पाळले. चूक कुणाची कुणाचं बरोबर ?वैज्ञानिक दृष्टिकोन कोणता? दैव जाणिले कुणी ?होणारे न चुके जरी, येईल ब्रम्हा तयार आडवा!

कठीण समय येता कोण कामास येते? देवाकडे सगळा हिशोब असतो परतफेड करावी लागते. तुमचं चुकलं असं सुद्धा मला सांगण्यात आले. वरील सर्व परिस्थितीत कुणाचं चुकलं ?काय चुकलं ?किती चुकलं? हे सर्व प्रश्न उरतातच. करोनामुळे माणसांवर हे सर्व वाईट प्रसंग बघायची वेळ आली. करोना, ही भीती आणि त्याचं सर्वाधिक संसर्गजन्य असणे, यामुळे माणूस माणसापासून दुरावत आहे. राजकारण्यांचे वेगळं काहीतरी चालू असतं. व्यापारी त्यांचं काय अन्य चालू असतं. मध्येच काही तरुणांच्या कथा चालू असतात. गुन्हे होत असतात. यामध्ये पुर्ण मजा, काही घटना, नववर्षाचे स्वागत आणि सिनेमा सगळे चालू आहे. पण कुठेतरी सगळेच बेस्वाद झालेले आहे.

“आपण इतरांना मदत केली नाही तर आपल्याला पण कोणीही मदत करणार नाही” हे सत्य आहे. विज्ञानवादी दृष्टिकोन हवा आहे, पण माणुसकी?सारे सत्य आहे तर काहीतरी कुठेतरी चुकत आहे.

“लस शोधली. लवकरच लसीकरण सुरू होईल. कोरोनावर विजय मिळवता येईल”का.

“ याचा आनंद फार काळ टिकू नये”ख.

मग नवे असे वाद सुरू झाले.

कोरोनामुळे देहांची हानी झाली आहे. समाजव्यवस्था नातेसंबंध अर्थव्यवस्था या सगळयांची हानि झाली झाली आहे. या वर्षी हे करुणाष्टक वाचून मला असं लिहावेसे वाटतं की

“देवा माझ्यावर पुढच्या कथालेखनात करोना ताणा बद्दल लिहायची वेळ आणू नको”.

“कोरोना बाबा आता तू आवरते घे”.

“देवी अग अजून एक वर्ष करोना गेला नाही तर करुणा शतक लिहीण्याची वेळ येऊ नये असे वाटते. वाचव.

Go Corona go please go

***

# पानगुहा.

पाणबुड्या गावातील, या खारटन भागाला पानगुहा म्हणत, मूळ शहर, गाव, वस्तीपासून दूर हा भाग, एकाकी होता. होता. जेव्हा भूकंप झाला डोंगर, मधोमध व्ही आकारात, कापला गेला. या डोंगराच्या आतून एक तलाव बाहेर आला आहे. या तलावात गरम कोमट पाणी रस्त्यांमुळे आजूबाजूचा थकून आलेल्या वाटसरू इथे नक्कीच थांबतो. आसपास शेळ्या मेंढ्या गाई अशी अशा प्राण्यांचा वावर असतो. त्या बाजूला अंबामाता, मंदिर आहे. एक पडका, पण रुबाबदार आश्रम आहे. अंबू बाबा तसेच सुशिक्षितच आहेत. गावात कोणी आजारी पडलं तप हा डोंगर पायाने तुडवत, या कोठी पाशी येतात. बाबा त्या रुग्णाला काही तरी मुळी अथवा त्यांच्या जवळच असलेली गोळी औषध म्हणून देतात. लहान बालकांना अंबू बाबा चांगली चांगली गाणी, लिखाण, शारीरिक शिक्षण शिकवतात.

प्रियतमेचे गाण गातो, मी पानगुहेत राहतो. असं प्रियतमा ची गाणी, नावाने प्रसिध्द असणार, लोकगीत शिकवतो. वस्तीवर ही प्रियतमा देवी आहे. कारण त्या तलावाच्या बाजूला बनशंकरी देवीचं देऊळ आहे. अंबू बाबा वेगवेगळ्या कथा, आश्रमात

आलेल्या लहान मुलांना सांगतात. मात्र रात्रीच्या वेळी हा आश्रम पूर्णपणे बंद असतो. एका दिवशी सकाळी मी मॉर्निंग वॉकला गेले असता, बाळ रडण्याचा आवाज आला. मॉर्निंग वॉकच्या रस्त्यापासून, आश्रमाची जागा दोन किलोमीटर अंतरावर आहे. मी इथे रोजच फिरायला जाते मात्र त्यावेळी एका झाडाच्या झुडपा, मागे, गुपचुप एक बाळ टाकून पळून जाणारी तरूणी मला दिसली. मी घाबरले. पळत पळत घरी परतले. दिवसभर डिस्टर्ब राहिले. ते बाळ कोणाला सापडले का? देव मंदिरी, आश्रमात नेले का ?मला काही कळायला मार्ग नव्हता.

बाळ टाकून जाणाऱ्या मुलीला, मी ओझरतं बघितलं होतं आणि त्या मुलींनी सुद्धा मला बघितले होते. चोरटे पण तिला होतं. तोंडाला तिने ओढणी बांधली होती. ती तरुणी पळत परत पाणबुड्या गावात शिरली.

मी अस्वस्थतेत दिवस घालवला. ते बाळ मी उचलायला हवे होते का?माझे पोट भरायची मारामार होती. मी पंचांत बांधलेले बाळ मी कुठून तरी आणले. गावातल्या भोचक, बायकांच्या चर्चेचा विषय बनु शकत होते. बाळ मला, सापडले, तरी ते मिळून माझी सुद्धा बदनामी होऊ शकत होती. मी45 वर्षे वयाची, एकटी

जगणारी, 30 वर्षांची, वाटणारी, प्रौढ कुमारिका होते आणि त्या गावातील एका पडक्या खोलीत एकटीच राहात होते.

त्या संध्याकाळी, घठ बाई घरी आल्या

“ एका विद्यार्थिनीला शिकवणी देण्यासाठी, त्या घरी येण्यासाठी, बाई पाहिजे. 2000 मिळून देतील” मला आमंत्रण आले. पोटापाण्यासाठी मला काही तरी करावे लागे. शिवण, शिकवण्या ई. हातावर पोट होते. संध्याकाळी मी हातात मोठी छत्री, पिशवीत बाकीचे सामान घेऊन, त्या बंगल्याच्या दाराशी पोहोचले. बाई म्हणून विशेषत: स्त्रीला कायम पिशव्या, बॅगा, थैल्या घेऊन वावरावे लागते. कारण संसार खरेदी भाजीपाला सगळी कामं तीच करते. मी तर एकटी होते. त्या बंगल्याशी पोचले तेव्हा बागेत एक जाळी लावलेल्या, पिंजऱ्यामध्ये झेब्रा सारखे प्राणी ठेवलेले होते. थोड्या अंतरावर पाहिलं की झेब्रा वाटत, मात्र जवळ जाऊन बघितलं की, गाढव आहे हे कळे. नवल हे की, मला मात्र या गाढवांना झेब्रा सारखा रंग दिला आहे, हे कळले.. मी तिथे रेंगाळतेय पाहताच घरातून आजी ओरडली. “आत या, शिकवणी आत घ्यायची आहे. प्राणांची नाही”असं एक वृद्ध स्त्री ओरडली”या श्रीमंतांना, असे काहीही बोलून आपला अपमान करायला आवडत. ते करतात. या पैसेवाल्यांना इतरांचा मूड,

इतरांची मनस्थिती इतरांचा आत्मसन्मान, पंचर करायचा हक्क मी दिलाय. काय करणार, पोटासाठी अशी किरकोळ काम करून मी या छोट्या गावात जगते आहे. माझ्याकडून लोक वेगवेगळी कामं करून घेतात. शिवाय मला अस्वच्छ ठरवतात, माझी टर उडवतात माझ्यावर मेमे बनवता.

याच आजीच्या नातीला शिकवायचं म्हणजे खरं तर महाभयंकर काम असणार. अस माज्या मनात येऊन गेले, पण मला पर्याय नव्हता. मी घरात शिरले. बाहेरच्या खोलीत एका पलंगावर मी बसले. आत टिपटॉ हॉल, श्रीमंती नव्हती. पण ठीक वाटले. एक म्हातारी बाई आतून बाहेर आली. जणू काय तिथे म्हाताऱ्यांचा वावर होतो. मला सांगू लागली, “ बघा आयुष्य कस? जमिनीचा कस तोच राहतो. आम्ही दोघी, माय लेकी, कलाकार आमची मुलगी कलाकार, आमची नात सुद्धा कलाकारच आहे. भूतकाळ संपत नाही. मुलं नातवंडं पतवंडं मुलं, सगळयांच्या रूपात तोच तोच भूतकाळ पुन्हा परत घडत राहतो. त्याच त्याच घटना वारंवार होत राहतात. मूल होण, न होणं हे सुद्धा पुन्हा पुन्हा रिपीट होत राहते. प्रियतमा शिकवणी घ्यायची आहे. ”

जीची शिकवणी घ्यायची तिला आतून बोलावण्यात आलं. ती घेऊन माझ्यासमोर बसली “मॅडम, माझे नाव प्रियतमा मला

तुम्ही शिकवायचा आहे. शाळेचा अभ्यास करून घ्यायचा आहे. तब्बेत बरी नव्हतीआजारी पडून सात, महीने मी शाळेत गेले नाही. तो बुडलेल्या अभ्यास भरून काढायचा आहे''. माझ्या लक्षात आले की, ती मुलगी माझ्या नजरेला नजर देत नाही आणि तिच्या डोक्यावर अंधार होता आणि ती खिडकीकडे तोंड करून बसल्यामुळे मला चेहरा दिसत नाही.

''कामावर दुपारी तीन वाजता यायचं. चहा नाश्ता आणि रात्रीचं जेवण मिळेल. सर्वात अभ्यास करून घ्यायचा. दोन हजार रुपये दिले जातील. मंजूर आहे का?'' आजीने मला विचारलं. आज्जींनी मला पुन्हा विचारलं मी होकारार्थी मान हलवली. नाही तरी माझ्याकडे पोटापाण्याचा प्रश्न मोठा होता.

'' कधीपासून सुरू करता ?''आजीने विचारले

''मी तर आजपासून पण तयार आहे'' मी उत्तर दिलं. हॉलमध्येच कोपर्यात, टेबल आणि खुर्ची होती. अजून एक खुर्ची लावण्यात आली टेबलवरचा दिवा लावण्यात आला. ती मुलगी माझ्या समोर येऊन बसली. मला बघून ती अधिकच चपापली.

ती मुलगी प्रियतमा ती छोटी तरणी, होतीजी सकाळी झुडपांमध्ये बाळ टाकून पळून जाताना मी बघितली होती. अनैतिक संबंधांत जन्मला आलेले, मूल पान गुहेजवळ टाकून आली होती.

काय की काय कारण होतं? का तिच्यावर वाईट प्रसंग घडला होता? तिचे प्रश्न तिलाच माहीत. तिच्या मजबुरीतून सुटण्याचा मार्ग तिने शोधला. तशा हल्ली मुली सुद्धा खूप व्यावहारिक झाल्या आहेत. माझ्यासमोर येऊन बसत प्रियतमा म्हणाली, “मला काविळ झाली होती. सात महीने शाळेत जाऊ शकले नाही. माझा सगळा अभ्यास भरून काढा. मी मॅडम मनापासून अभ्यास करीन. मला माझे झालेले नुकसान भरून काढायचेय. तुमची तयारी आहे?”. प्रियतमा कडे मी रोज जाऊ लागले. तिचा अभ्यास घेऊ लागले. तिची परीक्षा जवळ आली होती. त्या दिवशी सकाळी मी परत मॉर्निंग वॉकला जात असताना, मला तोंड झाकून प्रियतमा आश्रमाच्या दारातून लपून छपून बाहेर येताना दिसली. काय घडत असेल? प्रियतमा का या आश्रमाच्या दिशेने जात असेल? अंबू बाबा तिचे कुणी लागत असतील का? त्या आश्रमात नक्की काय घडत होतं? या, पाणबुड्या गावातील बंगल्यावर नक्की काय घडत होतं? त्या दोन वृद्ध स्त्रिया आणि प्रियतमा तिघी बायका या बंगल्यात गेली, वर्ष दोन वर्ष का राहात होत्या?उलगडा न होणारे अनेक प्रश्न घेऊन मी अंबू बाबांच्या आश्रमाचे दारात थबकले. तर काही क्षण, प्रियतमा या आज्या अंबू बाबांच्या आश्रमात पोहोचल्या अंबुबाबा आश्रमात आजपर्यंत मी कधीच आले नव्हते आणि अंबू बाबांना सुद्धा कधीही बघितले नव्हते.

“चला दर्शनाला “आजी मला म्हणाल्या. अंबुबाबा मला बघून चपापले. मी पण बुवांना, अन्य सेविका, आश्रमातील युवकांना बघून चपापले कारण अंबू बाबा म्हणजे तीच व्यक्ती होती. जिने मला धोका दिला. काही वर्षांपूर्वी, वीसेक वर्षापूर्वी अंबुबाबाने मला देखील फसवले होते. अन्य गावीच्या आश्रमात, तो एकनाथ बाबा नावाने राहायचा, तेव्हा सेवा कर सांगून, पण देह भोगून फसवलं. पैशाचा पाऊस पाडणे सांगून भावांना आमीष दाखवले. मला आश्रमात वारंवार बोलावले होतं. एकनाथ बाबा, पळून गावातून लापता झाले होते. पण मी बोलु शकले नाही. मी पण कशीतरी, काहीतरी करुन मोकळी झाले.

आज वीस वर्षांनी बाबा परत समोर आला. रात्रभर मी तळमळत होते. अंबुबाबाचा, रहस्यभेद, भांडाफोड करावे का?पहाटे, कधीतरी डोळा लागला.

सकाळी उशिरा जाग आली. गंगुबाई दार वाजवत होत्या. मी दार उघडले.

“मॅडम अंबुबाबा, गाव सोडुन निघुन गेले. चिठ्ठी लिहीलीय, ’देवाचा आदेश म्हणून गाव सोडुन जात आहे’. लई भारी बाबा होता. पैशाचा पाऊस पाडायचा म्हणे. ”गंगुबाई रंगवुन सांगु लागल्या.

“गंगुबाई अंधश्रध्दा ठेवु नाही. ”मी गंगुबाईला समजावले. पण तिला ते पटले नाही.

मला माहिती आहे अन्य कोणत्या तरी गावी, कुटी बांधून राहुन, काही अंबाबाईला येणार्या, अंध भक्तांना, कोणा ना कोणा तरुणीला अंबुबाबा, अन्य नावाने फसवत असेल.

आपला देश अंधश्रद्धेतून कधी बाहेर येणार? कुटी बनवून, अन्य गावातल्या मुलींना, फसवत असलेला बाबा आढळला तर कृपया फसु नका.

***--

# उत्तरायण

पूर्वार्ध आणि उत्तरार्ध हे जीवनाचे दोन भाग असतात. वार्धक्य हे उत्तरायणाने येणार असतं, जे अटळ असते. आम्ही दोघी मैत्रिणी एकाच वेळी या ग्रेस वृद्धाश्रमात आलो.

त्यावेळी मला माझ्या स्वतच्या घरी राहवेना. माझी सासू येणार होती, त्या भीतीने मी नवऱ्याला विचारलं, “दोन महिने मी वृद्धाश्रमात जाऊ का ?तुम्ही आणि तुमची आई आनंदात राहा!”

“ हो चालेल” असं दुष्टपणे नवरा म्हणाला. सासूचे जाचामुळे मी दोन महिने, मला वृध्दांचा अभ्यास करायचा आहे, प्रोजेक्ट करायचे आहे, हे कारण सांगून वृद्धाश्रमात आले.

दोन महीने होत आले. ईथे गायन भजन शिकवल जाते.

भिजवले असे सुरांनी,
सात आनंदात न्हाले.
संगीताच्या संगतीत,
मीच रे संगीत झाले.
तन मन जरी व्याधीग्रस्त,
दुःखी मी राहणार नाही.

मुग्धले गंधार पंचम,

मुग्ध बोलले सा म ध नी!

असा संगीतोपचार या वृद्धाश्रमात दिला जातो. निसर्गोपचार आश्रम वृद्धाश्रम व एक कॉलेज हे एका संकुलाचे आत आहे. एक बरं वाचनालय आहे. आश्रम चांगला आहे.

" नैराश्यावर सहल, भाषण, संगीतोपचार उपयोगी आहे का ?मूड नाही. काहीतरी खाऊ या का ?"मी माझ्या नवमैत्रिणीला स्वातीला म्हणाले.

" अहो सारखे खाऊ नका, "स्वाती म्हणाली.

" अगं थकवा येतो पाठ दुखते" मी "माझे जीवन कम्प्लीट कवडीमोल झाले. पण मी आनंद मानते ना, तू सुध्दा मान!" स्वाती.

" टेन्शन येतं. उत्तरायण, नकोसेपण हे सत्य आहे हे कळतं, पण वळत नाही" मी

"त्या आलेल्या योगा सरांनी काय उपाय सांगितला आठवा बघू! तीन सॅड, तीन सर्वसाधारण, तीन उल्हासित करणाऱ्या अशा गोष्टी अथवा गाणी एका पाठोपाठ एक 28 मिनिटे ऐका. रडू नका नॉर्मल रहा किंवा हसा! मूड बदलेल. आठवते ना?" स्वाती मला म्हणाली.

“ हृदयाच्या ठोक्याची अनियमितता विसरभोळेपणा यावर संगीतोपचार उपयोगी पडतो, अस म्हणत. “मी.

नवी वृध्दा आली होती. कथा सांगत होती. हो तिची तीच कथा आहे आणि माझीही तीच कथा आहे. एका नव्या आलेल्या बाई कडे बोट दाखवत स्वाती म्हणाली

“सासु सुना, दोन स्त्रिया, पण दोघींमध्ये मात्र एक मोठी भिंत आहे. पुरुष मजेत राहतं आहे”स्वाती. मॅनेजर बाई आम्ही बसलो होतो त्या गप्पा मारायच्या कट्ट्यावर येऊन बसल्या आणि म्हणाल्या

“सर्वांच्या कथा त्याच असतात जात्यातले रडतात. सुपातले हसतात. जीवनशैली, समाज, पद्धत इतक्या झपाट्याने बदलत चालली आहे. तीस वर्षांपूर्वी शहरात एखादा वृद्धाश्रम असे. आता वृध्दाश्रम संख्या 40 पट वाढून वाढती झाली आहे “मॅनेजर मॅडम म्हणाल्या.

“तू तर दोनच महिने राहणार आहेस!” स्वाती मला म्हणाली.

“अगं आश्रमातील वृद्धांना टाकताना ‘काही दिवस राहा’, परिस्थिती बदलल्यावर बोलावून घेऊ, असं सांगितलं जात. गोड बोलून आणि फसवून येथे टाकलं जातं” वृद्धाश्रमाच्या मॅनेजर बाई मावळत्या सुर्याकडे बघत म्हणाल्या. “एवढा मोठा आश्रम हा

बंगला कोणीतरी वृद्धाश्रम बांधण्यासाठी दान केला “स्वाती म्हणाली.

“ या वृद्धाश्रमाच्या व बाजूच्या बंगल्यात एकच भिंत कॉमन आहे. त्या बंगल्यातल्या लोकांची इच्छा होती की कोणतेही अन्य व्यक्तीचे घर, शेजारी येऊ नये. तरी, पण आश्रमाच्या माईंनी वाणी बाईनी हा बंगला बांधला. त्या बाजूच्या बहिणी नी शाप दिला की ‘तुझे घर ओसाड पडले’. काळी बाहुली जादू टोणा करून, कसलेसे अत्तर बनवले होते. ते बंगल्याच्या दाराला लावले. माईंनी त्या प्रकारांना घाबरून बंगला वृद्धाश्रम वाल्यांना विकला. कदाचित त्यामुळेच असेल, कुटुंबाने नाकारलेले वृद्ध इथे येतात. पण निदान ईथे कमी खर्चात राहू शकतात. अगदी स्वस्तात विकला. हा बंगला /वाडी दान दिली. ” आशाबाईंना मॅनेजर बाई सांगू लागल्या.

“ तुम्ही मॅनेजर म्हणून कशाला आलात?” स्वातीने मॅनेजर बाई त्यांना विचारलं.

“ गप्प बसा, काहीच्या काहीतरी काय विचारतेस?” मी म्हणाले.

“सांगते की! मी सुद्धा दोन महिन्यासाठी आले होते” मॅनेजर बाई सांगू लागल्या.

“ ईच्छा असेल तर सांगा”मी. मॅनेजर सांगु लागल्या.

“ माझा मुलगा म्हणाला: “आई काही दिवस वृद्धाश्रमात राहा. मुलांची परीक्षा झाली की तिला बोलावुन परत बोलावून घेतो. तोपर्यंत अभ्यासासाठी, मुलगा त्याला स्वतंत्र रूम हवी आहे. ” मी हो मिळाले. मी या वृद्धाश्रमात का आले? कि मीच मैदान सोडून पळून आले. ”मॅनेजर.

आमची वृद्धाश्रमात, जवळपासची संध्याकाळी फिरायला जाण्याची लाडकी जागा म्हणजे तलवार विहीर होती. मात्र तिथे पोहोचणं सोपं नसतं. रस्ता चुकतो चकवा होतो. असं म्हणून आम्हाला घाबरवलं जात असे. त्या तलवार विहिरीच्या जवळ खाली 41 पायऱ्यांवर शंकराचं मंदिर आहे. त्या रस्त्यात चौकात सुशीला मिसळ मिळते. ती मिसळ खात आम्ही तिघीजणी थांबलो.

“ पुढे काय झालं मॅडम” सरला मॅडम आणि आशाने विचारलं.

“तू विचारलं तर सांगते. पुढे असं झालं की स्वतंत्र खोली ची मुलाला सवय झाली. माझ्या नसण्याची त्या घराला त्या कुटुंबाला सवय झाली. मी इथेच राहावं असं सुनेने सुचवलं. सुनेच्या माहेरच्यांनी आश्रमाला महिन्याला खर्चाचे पैसे द्यावे लागू नये, म्हणून येथे मॅनेजर म्हणून मला नोकरीला लावून दिलं. त्यामुळे मला तिथे खोली आहे. राहायाची सोय झाली आणि वृद्धाश्रमाचा खर्च द्यावा लागत नसे. हळूहळू त्या सर्वांनी संपर्क कमी केला. मला

इथेच राहावे लागले. वृद्धाश्रमाचा जमाखर्च, जागा, फोन मॅनेजमेंट देणग्या सर्वकाही मी बघते. धंदा म्हणून रोज आश्रमाकडे बघणारे, मालक आहेत, त्यामुळे मला थोडा पगारही मिळतो. माझी चांगली सोय होते. ” त्या मॅनेजर बाई म्हणाल्या.

आश्रमातील जागेत मी मन रमवले. दोन महिने झाले होते. मला दोन महिने झाल्यावर ही नवरा काही घ्यायला आला नाही. सासु बाईबरोबर छान पणे त्या घरात रुळला होता. सासुबाई नी घरात पाय रोवले होते. देवाने त्या दोघांनाही चांगल्या आरोग्यवान देहाचे वरदान दिले होते. मला मात्र तब्येतीचे प्रश्न निर्माण झाले होते. मला इथेच राहावे लागेल याची तयारी मी मनाने आणि शरीराने केली. दोन महिन्यानंतर इतर बायका म्हणू लागल्या

“ सांगत होतो ना, कि दोन महिन्यासाठी म्हणून बोलतात, इथे आणतात आणि कायमची टाकतात”आशा.

मी आता इथेच राहणार, इथेच राहणार अशी कुजबूज बायकांनी माझे पाठीमागे, सुरु केली होती. शाळा असो कॉलेज नोकरी असो नाहीतर वृद्धाश्रम, त्यात बायकांना पाठीमागे एकमेकींच्या कुचाळक्या करायची सवय, थोडी तरी असते. इथे पण होती. अजून एक महिना उलटला पण मला नवर्‍याचा फोन येईना आणि कोणी मला परत न्यायची पण गोष्ट काढेना.

कारण काय कि.

पण एके दिवशी माझा नवरा मला घ्यायला आला. सामान उचलुन मी परत माझ्या घरी आले. काही सामान त्या ग्रेसच्या आश्रमाला दान करून टाकलं. सासुबाई दुसऱ्या मुलाकडे गेल्या. सर्व मुलांनी चार-चार महिने सासुला सांभाळायचे ठरवलं. कारण की सगळ्यात सुनांनी कुरकुर केली. एक जाऊ म्हणायची

“ राहा तुमच्या आई बरोबर मी माहेरी जाते” त्यामुळे सगळ्या मुलानी चार चार महिने सांभाळायचं ठरलं. मात्र मुलीला हिशोबात धरलं नव्हते. मग मात्र एका एका जावेने आणि दीराने हट्ट धरला. भेटून चारही भावंडांना आईला तीन-तीन महिने सांभाळायला हवं असं ठणकावून सांगितलं. त्यामुळे सासूबाईंची वाटणी चार महिने आयोजित होती, त्या ऐवजी तीन महिने झाली होती. घरी मी माझ्या घरी आता तरी राहते. पण आतून मधून वृद्धाश्रमात खाऊ आणि खोबरेल तेल देते. त्या मैत्रिणीला भेटायला जाते. माझी मैत्रीण आशा त्या ग्रेसच्या वृद्धाश्रमात राहते. नवरा वारला याची खंत करत असते.

“अग मुल विचारणार नाही हे माहीतच होतं पण हा नवरा मला एकटीला सोडून गेला” आशा सांगते.

“ मॅनेजर बाई कशा आहेत. आज दिसत नाहीत?” मी विचारलं.

“ बरे आहेत वय वाढलं पण आता सर्वजण इथे रुळल्या”. आशा म्हणाली.

“ तू कशी आहेस “मी विचारलं.

“ अगं सुरुवातीला खूप रडायचे. मुलांची माफी मागायचे. नंतर मी ठरवले, रमले. पण ग, कधी पण सारखं सहलीला जावस वाटतं. जाते तशी मी वर्षातून दोन वेळा जाते. बरं वाटतं “आशा म्हणाली.

“ मी तर सहलीला देखील जाऊ शकत नाही गं! तब्येत साथ देत नाही. ” मी आशाला म्हणाले.

“ मी परदेशी मुलाकडे सहा महिने जाऊन आले. मज्जा आली. ” मीरा नावाची अन्य महीला म्हणाली.

“ चालायचंच आयुष्य आहे तोपर्यंत जगत राहायचं. मज्जा करायची. मानायची”. आशा म्हणाली.

तिची कथा, माझी कथा, तुमची कथा काही वेगळी आहे का? मूलभूत धागा तर तोच आहे. कि हे या कथांमधील काही निराळ आहे? अर्ध्या सत्या मध्ये आपल्या कथा आहेत का? आनंद वन, श्रमसाफल्य, सावली, माहेर, मैत्रबन, गणगोत, गोतावळा अशा नावाने आपण सुंदर सुंदर बंगले तर बांधले आहेत. आपल्या

उमेदीच्या काळात हौशी ने ते सजवले सुद्धा आहेत. पण पुढे उत्तरायणात आपण कुठे राहतो हे आपल्या स्वतःच्या इच्छेवर अवलंबून नसून ते देवाने आपल्या नशिबात लिहिलेल्या कथेवर अवलंबून असते. कुटुंबासाठी खूप खस्ता खाल्ल्या ते लोकसुद्धा कधी नकोसे होतात आणि ताठयात राहणारे बिनकामाचे लोक आपल्या स्वगृही आनंदात राहतात. या स्टेबाबत काहीही नियम नाही. काय पूर्वी घडले असेल ?आज काय घडतंय आणि उद्या काय घडणार आहे? हे सर्वस्वी दैववादी असतं? की तिची कथा ही आहे प्रत्येक तिची कथा आहे. ती तशीच कथा आहे? आमची कथा आहे की आपली कथा आहे? सासुबाई ची तब्येत चांगली आहे चारही मुलांकडे आलटून-पालटून आनंदात राहतात. प्रत्येक ठिकाणी त्यांना स्वतंत्र खोलीची पण सोय होते.

मला मात्र कधीकधी पोटातून भयानक भीती वाटते. मला तरी एकच मूल आहे. त्या मुलाचं घर पण खूप लहान आहे.

माझं उत्तरायणात कसं होईल?

**

# रेल्वे स्टेशनवर भेटलेला

रेल्वे स्टेशन वर खांबा मागे बसलेला म्हातारा, त्या दिवशी मला म्हणाला,

“ मला तुम्हाला काही सांगायचेय. बोलु? ठीक आहात ना! मी तुम्हाला रोज त्या लोकल ट्रेन ने जाताना बघतो. सांगू का तुम्हाला?” माझ्या हो नाही उत्तरा ची वाट न बघता तो मला म्हणाला,

“ एकदा काय झालं सांगु?पण गाडी आली”तो

एवढ्यात धडधड धडधड आवाज करत गाडी आली, पण मी त्या गाडीत चढले नाही. पुढच्या गाडीची वाट बघत बाकावर बसले. त्या म्हाताऱ्याने त्याची कथा मला सांगितली. त्याने मला ओळखलं नाही तरी मी त्याला ओळखले. परक्या त्या व्यक्तीजवळ आपली बाजू सांगावी तशी त्याने त्याची कथा मला सांगितली.

“ माझं चुकलं!” तो म्हणाला.

“ मला वाटत, प्रत्येकाच्या आयुष्यात चुकत असतं. ” मी त्याला समजावलं “मी तुमची एक कथा तशी वाचली होती. त्या तिथे पलीकडे! त्यावरूनच मला असं वाटलं की मी माझी कथा सांगावी”तो म्हातारा.

“ फक्त एक दिवस मी थांबले असते शहाणपणा केला असता तर आज माझी कथा वेगळी घडली असती. होडी पार झाली असती. हे मनातल्या मनात आक्रोश पक्षी का फडफडतात? माझे अज्ञान, मी मूर्ख, आता क्षमा मागून उपयोग नाही. कारण तीस वर्श मागे जाऊ शकत नाही. मी पुन्हा तिच्याकडे जायला हवे होते. एकदा काय झालं, चुकलंच बघा. ”तो म्हणाला.

“ नक्की काय झालं त”मी विचारलं “मला दीपस्तंभ मिळाले नाही, असंबद्ध गोष्टी व संबंध राहीले. तू ऐकते आहेस ना!” त्याने मला विचारलं.

“ हो एखादी व्यक्ती जीवनातील बेपत्ता झाली तरी आपण बोलणे जगणे थांबवु शकत नाही. पण इतरांना या जगी त्या तुझ्या नसल्याने काहीच फरक पडला नाही. बरोबर आहे माझा भाऊ मला म्हणाला होता, काहीच फरक पडत नाही! आज तीस वर्षांनी वाटते की ईतर कोणाला फरक पडतो न पडतो पण मी ते मी चुकलो. शहाणे झालो पण काही काळाने पुन्हा रस्ता चुकला. ”तो

“होते मूर्खासारखे वागले मी! वर्तमानकाळ भूतकाळ होतो आणि ही भूतकाळाचा भूत खेळत राहतात. माणस आणि सोबत हरवत नाही, लोक बदलतात. ”मी

“दुर्दैवी होतो, माझा ब्रेकअप झाला” तो म्हणाला.

“ माझ्या पण कथेत तसंच वाक्य आहे. बघा हे, तो निघून गेला मी थांबवलं नाही. वाट पाहिली पण मी परत जायला हव होत, घाईन त्याच्या दाराशी जाऊन, विनंती करायला हवी होती. तो लहान होत होत दूर गेला. त्याच्या घरच्यांनी मला स्वीकारलं नाही. ते घर त्यांचं होतं. त्यांना मी त्यांच्या घरी नको होते. आजही मला सगळे आठवते. शब्दांची नखे नको त्या लोकांनी रुतवली. ” मी “वरकरणी माझं सर्व ठीक चालू आहे. पण आज तीस वर्षांनी मला थोबाडीत बसली. इतक्या वर्षाचे देणे मला आता फेडायचे. वेड लागते. सांगायचे आहे. पण सगळ्या आयुष्याचा पट एका तासात तुम्हाला कसं समजून सांगु? कसं बोलू ?खूप अंगावर आलेय. मला हे सहन होत नाही. लेखिका बाई मी हे तुम्हाला सांगू इच्छितो. ” तो “तुम्हाला कुटुंब असेल ना?” मी विचारल.

“ हो आहे. तीन तीन मुलं, एक बायको आहे पण दुरून पोरं साजरी!” तो म्हणाला.

“ तशी सगळयांच्या कथा ही तशीच असते. हे वाचण्याच्या वेडा तून मी बाहेर येऊन फिरते. झोप उडवून घेते. ”मी

“ हो मला पण तिचा प्राचीन मूर्ती सारखा सुंदर चेहरा, टपोरे डोळे आठवतात.

Compulsive urge of expression and communication, good style is writing. तुमच्याकडे कसं लिहिलं असतं ना! गर्दीत एकटे करणारे असे भाव त्या नायकाचे होते, असं मला वाटतं. ” तो म्हणाला. “टेकड्या सुंदर असतात म्हणूनच तर टेकडीवर देवीने देऊळ बांधलेले असते. माणसं त्या देवाना दोष देऊन आपल्या तटस्थ भूमिकेचे समर्थन करतात. आपण खंबीर झालो नाही म्हणून फसलो. जीवन म्हणजे दुखावले जाणे, दुखावण्याची शक्यता असते. पण मी दुखावलो गेलो होतो. हे मला आज तीस वर्षांनी खूप बोचत असतं. ” तो मला.

“ मला पटत. माझ्याकडे पण मी लिहिलंय ना, ’पुढच्या क्षणाला कोणाचा निरोप आपण घेणार असतो, आपल्याला सुद्धा तेव्हा कळत नसतं’ मी.

“ पण आमचं चुकते हे देव जाणत होता ना !जखमांना घाबरायचं तर घरात बसायला लागेल. मी माझ्या अशा जखमा कधीच कुरवाळत नाही. ती न भेटण्याची चुटपुट आयुष्यभर पुरली. हो तुमचे लिखाण म्हणजे निवडक अनुभव सांगणे. पटते” तो मला म्हणाला.

“ प्रेम संपून तीस वर्ष झाली तरी आज ते विसरलेले कण विरलेले धागे मला खोलवर रुततात. प्रेमाची व्याख्या समजावतात.

जी तेव्हा कळली नव्हती. तिने तो फोटो दिला नाही, फोटो दिला की फोटो माणसाकडे राहतो आणि व्यक्ती निघून जाते हा गैरसमज होता की सत्य होतं. पण अजूनही वाटतं ती जवळ आहे. हे वाक्य तुमच्या कथेत होतं. ''तो

" ती सुंदर होती?''मी

"पण एका घावात मी तिला मारलं. ब्रेक अपने! मी तिचे जीवनात अनिश्चितता आणली. सृष्टीशी मैत्री अथवा शत्रुत्व यामुळे दैवाधीन झालो. पण जीवन मला जमलं नाही. हो मी एक संदेश देऊ इच्छितो. ' प्रियकर-प्रेयसी नो, दोघात कुणालाही नकार द्यायचा असेल तर प्रत्यक्ष भेटून सांगा. प्रत्यक्ष भेटा. गैरसमज नको गैरसमजातून प्रेमाची वाट लागते. हे फार प्रेम पण नको. सर्व संपल, याचा अर्थ, पण का संपलं ते समजत नाहीये. संपलं हे मनाला समजावून सांगून मन ऐकत नाही. '' तो म्हणाला.

" तुझ्या आई वडिलांनी गैरसमज घडवले असतील. रडून-रडून हट्ट पूर्ण होतो. त्यांनी तिला बद्दुवा दिली का?'' मी विचारलं.

"Parents think that they hurt others, but actually they hurt both including their own progeny. we are humans

तुम्ही तुमच्च्या कथेत लिहिलंय ना, प्रेयसीची सुद्धा शिसारी येऊ शकते. तशी मला त्या काळी आई-वडिलांची प्रेयसीची पूर्ण जगाची विचित्र शिसारी आली. माणसं भांडण करतात. हिशोबाचा वचपा काढतात. आणि लहान मुलांना बदडतात. बायकांना डावावर लावतात. तोंडदेखलं म्हणतात. मी तुझ्यासोबत आहे हो !आणि मी तुझी साथ कधीच सोडणार नाही. Fake! पण हल्लीच्या या नवीन काळात कुठलीही कमिटमेंट नसते. खेळ खेळणारा खेळत राहतो. जिंकणं आणि हरणं हे प्रेम असतं का ?या जगात वेदना अनंत असते. ताजी नवी-जुनी, खूप जुनी, पटते?”

तो मला हातवारे करत समजावत होता. जवळच्या रेल्वेकडून, दुकाना मधली लोक माझ्याकडे बघत होती. पण त्याच्या बोलण्यात काहीतरी मुद्दा होता.

“ सोडून द्या. कदाचित तुमचं तिच्याशी लग्न झालं असतं, तरी तुमचं पटलं नसतं. ” मी त्याला म्हणाले.

“ हो आता मला मनाला हे असंच समजवावा लागणार आहे. ” तो म्हणाला.

“प्रेयसीला पूर्णविराम आला याची खात्री झाली. आता पुढे काही नाही. पाऊल वाट सुद्धा नाही. मी माझ्या कथेत असे लिहिले आहे. तसे झाले का?”मी

“ हो बरोबर आहे. आम्ही दोघं निरनिराळ्या वाटेने गेलो. खूप मोठी चूक झाली. तो म्हणाला. ”

ट्रेन आली. तो पुरुषांच्या डब्यात चढला. मी बायकांच्या डब्यात चढले तो पाठमोरा दिसला. तो तोच होता माझा माजी प्रियकर, मला फसवणारा तो होता. तो रेल्वे स्टेशनवर भेटला. देव देव करून त्याच्या घरच्यांनी माझं वाईट व्हावे म्हणून प्रार्थना केली. पण वाईट दोघांचे झालं.

रेल्वेस्टेशनवर तो भेटला, ती भेट शेवटची होती. वर्तमानपत्रात तो हरवला आहे ही जाहिरात नंतर मी वाचली. तो रेल्वे स्टेशन वर ज्या खांबाच्या मागे बसायचा तिथे हल्ली दुसराच कोणीतरी, भरकटलेला किंचित वेडसर दिसणारा, माणूस बसलेला असतो. काळ बदलतो, व्यक्ती बदलतात. कथा त्याच राहतात.

***

# पाच मुलांची आई

सकाळी सकाळी फिरायला जाऊ या, म्हणून आम्ही तीन म्हाताऱ्या, मी ताई, उमा आणि दक्षा बेन ऊर्फ बा, आम्ही सोबत बागेत जाऊ लागलो. माझं ठीक होत आणि दुसरी एक उमा श्रीमंत होती. (ती रोज येत नाही)ती सतत फोनवर बोलत येते. ती हळवी नाही, ती उमा! आमचं दोघींचं कुटुंब मर्यादित होते. एकच मुलगा, एकच मुलगी आणि तेही परदेशी त्यामुळे आम्ही दोघी आपापल्या नवऱ्याबरोबर आपापल्या घरी राहत होतो. पण नवरा-बायको फिरायला जाणं सकाळी बोअर वाटायचं म्हणून हा मैत्रिणींचा ग्रुप जॉईन केला होता. तिसरी दक्षा बा सोबत असे. अतिश्रीमंत होती. ती अहंकारी होती. "पाच मुलाची आई आहे मी!"अस दक्षा बा थाटात सांगे. सुरुवातीला बर्याच अन्य बायका सातजणी उत्साहाने आमच्या या ग्रुप मध्ये आल्या. पण हळूहळू सकाळी उठवत नाही, सकाळची काम असतात, नवऱ्याचा नाश्ता बनवायचा असतो, अस फिरून आल्यावर शक्ती राहात नाही अशी काहीतरी कारणे सांगून सगळ्याजणी गळाल्या. तरी आम्ही तिघी टिकलो. एका वनाज हास्य क्लबमध्ये आमची ओळख झाली होती. दहाजणी होतो उरलो तीन!बाकीच्या असायच्या पण वनाज क्लबमध्ये पाच

मिनिटे आल्यावर ‘हसलं तर हसलं, नाहीतर बसल, आणि टाईमपास करुन गेले!’ अशा रीतीने बागेमध्ये भेटत होत्या. करोना आला आणि आमचा वनाज हास्यक्लब बंद झाला. बागेत फिरणे बंद झाले आणि ज्येष्ठ नागरिकांना अधिक भीती असल्यामुळे सगळे जण, आम्ही बायका बाहेर जाणं टाळू लागलो. तरीही मला व्यायामाची गरज असल्यामुळे आम्ही सकाळी फिरायला जात राहिलो. ‘‘करोनाला काय भ्यायचे?माझी मुल सेवा करायला धावून येतील. पाच मुलाची आई आहे मी!’’बा म्हणाली. तर मी उमा, बा तिघी! या जगात अहंकार कुणाला नसो? रस्त्यावरच्या झाडूवाल्यापासून अधिक देश चालवणाऱ्या पर्यंत सगळयांना असतो. आम्ही तिघी म्हाताऱ्या भयंकर अहंकारी होतो. तसे आमचा केवळ काही कारणामुळे एकत्र येणं झालं होतं. तरुण वयात जर आम्ही तिघी एकत्र आलो असतो तर कधीही जमलं नसतं. कामाचा कंटाळा आम्हाला तिघींना होता. शिवाय बोलता बोलता काहीतरी पण कुजके टॉन्ट करून एकमेकींना आम्ही जखमी पण करत असू. ” पाच मुलाची आई आहे मी!” या पालुपदाने तुम्हाला एकच मुल आहे हा टोमणा दक्षा बा देत असत. कंपनी म्हणून तरी ठीक आहे. थोडा बदल म्हणून आम्ही तिघींनी एकमेकांशी जुळवून घेतलं होतं.

मी लिखाण करते त्यामुळे माझी कंबर आणि मान नस आणि हात कायम दुखत असायचे. त्यावर माझ्या या दोघी मैत्रिणीनी सरळ सल्ला दिला

“लिखाण बंद कर काय त्या लिखाणात तुला मिळतं ?xerox खर्च आणि पेनचे पैसे सुद्धा मिळत नसतील. ऊगीच ते लिहून मान पाठ एक करते. ”उमा. बा मला म्हणाली.

“ अगं मला शेअर बाजारात लाखो रुपये मिळतात आणि तू तासन्तास मानमोडी करते आणि वर स्वतःच्याच पदरचे पैसे घालवते या लिखाणाबद्दल तुला जे मिळत असेल ना, ते तुझ्या प्रिंटरचे झेरॉक्स चे खर्चापेक्षा कमी असेल. ” “असू दे !आता काय करायचं ?मनात इतके विचार असले की ते लिहावेसे वाटतात. तर त्यात लिहून मोकळे होते, असं नाही पण काही काळ मला लिहावेसे वाटत. आतली ओढ मिळते. मजा मिळते. ”मी

“ हो पण आता कमी कर. मान पाठ दुखते. ते गरज आहे का तुला? पैसे न घेता लिहायची हो!”बा

“ पण मलाच लिहिलं की बरं वाटतं म्हणून मी लिहीते”मी

“ पण आता बंद कर. थोडी व्यवहारी हो. तू सांगते ना तुझ्या सासूबाई पूर्वी खूप स्वेटर विणायचे विणकाम भरत काम करायच्या.

वय वाढल्यावर त्यांनी बंद केलं. तसं तर कर. तुम्ही वय वाढले हे समजून घ्या “बा मला म्हणाली

“ तुझा कसा शेअर चा छंद आहे, तसा माझा छंद!लिखाण करते. विठ्ठलाचा अभंग मला आवडतो”मी

“ शेअरमध्ये लाखो रुपये मिळतात एवढी थाटात राहते. जाते चार-चार वेळा परदेशी जाते. मुलांना लाखो रुपयांची बक्षिसे देते आणि काय मजेत राहते. मला वाटलं तर मी रात्री थोडीशी ती होती ती घेते. ते चिकन मटन आणते. त्या हॉटेलात ऑर्डर करते. एकटी राहात असले तरीही मी जीवनाचा आनंद घेते पाच मुलाची आई आहे मी!”बा

“ताई तुझं तसं नाहीये. तुम्ही दोघं नवरा-बायको राहता मजेत राहत नाही” उमाने मला सांगितले. दक्षा बा, उमा दोघी मिळून ताई म्हणजे माझ्यावर हॅमर करत होत्या. पण मला काही माझं लिखाण सोडविणार नव्हते. एक वेळ सकाळी फिरायला जाणं मी सोडलं असतं, पण माझं लिखाण नसते. पेन महाराज खरंच सोडणे अवघड आहे. त्या पेन विणा त्रास होतो. किती वेदना होत असली तरी मी लिहीत राहिले. दक्षा बा ला मुलाकडे अमेरिकेला सुनेचा बाळंतपण झाल्यामुळे बोलावलं होतं. त्यामुळे दक्षा बा एकदम गळून गेली होती. आता पण थाटात राहतो पण परदेशात मजा घ्यायला हवी.

पूर्वी गेलेली आहे. आता यांनी जब्बर आग्रह केलाय म्हणून पण आता मी काही दिवस तिकडे जाऊन राहणार आहे. ''बा.

“ सहा महिने तरी !अगं बाळंतपण म्हणजे खाऊ वाटला का तुला? तुला या वयात झेपेल का? 68 वर्षाची झालीस ना तू !''उमा बाला म्हणाली. “इश्श! अडुसष्ट वर्षाची झाले तरी अजून माझं मन सतरा अठरा वर्षाच्या सारख आहे. आणि शरीर सुद्धा निरोगी आहे. लोक मला विचारतात पन्नाशीची आहात का?''बा.

“मी पण चांगली अजुन कडकडीत होवून येते. नोकरी करतात दोघे, सारे विकत घेतात. जमेल ते आणि तितकेच मी करते. मग पडते आपली जाऊन आरामात!''उमा

“हो, थोडा परदेश अनुभव परत परत घेऊन येणार आहे. '' बा

उमा म्हणाली “मला या वेळी घरात करायचा खूप कंटाळा आला होता. मग म्हणाले मी काही दिवस तर ना वृद्धाश्रमात जावून राहते. ''

“उमा, तिला एकटं राहून कंटाळा आला. तुमच्याकडे तरी तुम्ही नवरा-बायको आहात एकमेकाला. मला हा प्रश्न नाही पाच मुलाची आई आहे मी!'' बा

“ मला बोलायला कोणी नसतं. करोनाच बाहेर जाता येत नाही, फिरता येत नाही, मजा करता येत नाही. मी काही दिवस,

बदल, नवीन ओळखी हव्या म्हणून वृद्धाश्रमात जाणार आहे. अर्थात या बागेच्या जवळच वृद्धाश्रम त्यामुळे आपली भेट फिरायला जाताना होतच राहील. ''उमा

" बरं बरं'' असं म्हणून आम्ही तो विषय थांबवला.

" वृद्धाश्रमात काय जायचं ?माझी 5 लेकर आहेत. 5 मुलांची आई आहे मी !दक्षाबेन सगळ्यांची लोकप्रिय आहोत. 5 अगदी सुशिक्षित आणि सुसंस्कृत मुलं तिच्या पोटी जन्माला आली आहेत. ''बा

खरेच बा मस्त होती आणि पाच मुले तिने छान वाढवली होती. सगळ्या मुलांना चांगलं वाढवलं, तीन मुली दोन मुलगे सगळ्यांची लग्न झाली. घर थाटात करून दिली होती. ते दागिने सगळ्यांना वाटून दिले होते. त्या मुलांचे लग्न झाले असून संस्कारी भक्तीमय मुलींचे पण लग्न झालं होतं. पण रिमोट कंट्रोल काय नीट चालेना झाला. पाचवा मुलगा बायकोचे ताब्यात गेला जोरू का गुलाम असं म्हणावं किंवा बायकोचा बैल म्हणावं असं त्याचं वागणं सुरू झालं. असं दक्षाबेन सगळ्यांना सांगत होते. तरीही दक्षा मजेत असून आपल्या आपले छंद बाहेर फिरायला जाणं, भिशी, किटी पार्टी, हे सगळे तिचं पूर्ववत चालू होत आणि ती वरकरणी तरी आनंद दाखवत होती. तीनही मुली दक्षा बा ला मुलाचे घरी

पाठवत, मुलगे मग काही दिवस झाले कि मुलींकडे पाठवत. दागिने मुलींना दिले म्हणून मुलगे चिडत असत आणि सर्व प्रॉपर्टी मुलग्यांना दिली म्हणून मुली चिडचिड करत असत. एकूण वरकरणी सगळं ठीक होतं. तरी पाच भावंडे एकमेकांपासून मनाने दुरावलेली होती. उद्धट आणि भटक्या दक्षा बा त्यांच्या चिडचिड्या स्वभावामुळे एके ठिकाणी कंटाळली, कि दुसरी कडे जाई. दक्षा अशा सगळीकडेच नकोश्या होत्या. तरी पण खूप प्रॅक्टिकल आणि आनंदी जीव होती. फारसं डोक्याला लावून घ्यायची नाही. फारशी हळवी तर अजिबात नव्हती. एके दिवशी या पाचव्या सुनेचे भांडण झाल्यावर दक्षा त्यांनी ठरवलं की आपण इतर मुलांकडे थोडे थोडे महिने जाऊन राहू या. त्यांनी ठरवून, आपली अडीच अडीच महिन्यात वाटणी केली.

"मुलांनी करण्यापूर्वी आपण आपली स्वतःची वाटणी विभागणी करून घेऊ या. " अस म्हणून दक्षा बा मोठ्या मुलीकडे हजर झाल्या.

त्या मुलीची मुले लग्नाला आली होती. दक्षाबेन बऱ्यापैकी वयस्कर होती. ही मुलगी सुद्धा त्या चाळीशी ओलांडून गेलेली होती. वर ती आणि तिचा नवरा मुलाच्या लग्नाची चिंतेत होती.

अशा वेळी दक्षा तिच्याकडे पोहोचली. मुलीचे कपडे बघून शिरल्याबरोबर, दक्षा बा नी कुरकुर सुरु केली. मग भांडण झाली.

“सर्वीकडे मी नकोशी आहे.

मी मोठ केले या मुलांना”अस म्हणत दक्षा एकट्या राहायला लागल्या.

आता अमेरिकेत येऊन राहिलेल्या सुनेकडे आल्या.

“खूप मजा आहे. सून चांगली वागते. ”फोनवर सांगत.

असे दहा महिने झाले. उमा वृध्दाश्रमात, दक्षा बा अमेरिकेत नंतर संजानला मुलगी कडे होत्या. माझे फिरणे बंद झाले. अजुन सहा महिने झाले अन उमा आणि दक्षा दोघी आपापल्या घरी परत आल्या.

एक मुलाची आई असो कि पाच मुलाची आई असो. आई हल्ली नकोशी बनते. सर्व निराशाजनक वाटते.

आई एकटी उरते. दूर राहून मुलाचे हित चिंतते पण फरफटत राहते. आम्ही तिघी परत पूर्वी सारखे पहाटे उठून फिरायला जातो.

पण. दक्षा बा हल्ली म्हणत नाहीत,

“पाच मुलांची आई आहे मी!”

***

# रुदाली

रुदाली म्हणजे पैसे देऊन रडायला काही बायकांना बोलवतात. मृत्यू झाला कि सोयरे जम तात. ते रुदाली ला बोलावून घेतात. त्यातली मी ही आहे. वय 50 आहे. आज या नौगावी आले. या मंदिरात पूर्वी तांब्याची छोटी मूर्ती होती आता उंच दगडी मूर्ती आहे सामान्य लोक नौगावात आहेत. यांची कहाणी प्रातिनिधिक बोअर असते. पण मोठी नसते. कधीकधी तर ती सांगण्याचे पूर्वी मानवाची कथा संपलेली असते. मृत्यूने कथा फिजिकली संपते. मृत झालेली व्यक्ती कोण होती? मी कोणासाठी आज इथे रडायला आले होते? माझे बालपण या नौगावात गेले होते. आज माझे वडील वारले होते.

पण मला आज येथे कोणीही ओळखत नव्हते. समोर मंदिरात अजिबात सकारात्मक लहरी नव्हत्या. मला कुठेही कुणीही ओळखलं नाही. मी वीस वर्षांपूर्वी हे नौगाव सोडून गेले होते. शहरातील लोकसुद्धा पर्यटनाला या नौगावी वारंवार येतात. कारण की हे नौगाव सगळ्यांना आवडतं. हे नौगाव ही बाग मनात रुतते. आयुष्याच्या चढ-उतारात साथ देणारे बरेच लोक माझ्या आयुष्यात आले होते. वाटलं बऱ्यापैकी माणुसकी नौगावात शिल्लक आहे

आणि घ्या माणुसकीचा अनुभव घ्यायला तर लोक खेड्यात जातात. वेल, शेवगा, गुलमोहर, जास्वंद फुल आहेत. देवळाचा मूळ ढाचा तोच ठेवून देऊळ वाढलं आहे. उंच इमारती देवळा जवळ आल्या आहेत. धर्मशाळा बांधली आहे. तिथे लोक एकत्र जेवत बसतात. हेट स्टोरी ची लव स्टोरी व्हावी इतकी हवा छान आहे.

नौगावी अप्रिय भूमिका घेऊन वाद झाला. तरीही बरेच परिवर्तन या ठिकाणी या नौगावी घडत गेले आहे. बरे आहे. शहरात शरीर अस्वस्थ राहते. ईथे बरे वाटते.

रंग शिंपले ली दवाने भिजलेली फुलं तिथे पहाटे दिसतात.

आनंदाचे क्षण मिळतात. येताना बस मध्ये पेंटेड बेल सिनेमा लागला होता. मी तो बघत होते. या नौगावी मूर्ती सुंदर आहे. या गावात मी रुडाली म्हणून आज रडायला आले आहे. ती पिढी वेगळी होती आता सर्वजण त्रुटी युक्त स्वार्थी झाले होते. The grapes of wrath the novel was read here in a canadian library. विनामूल्य गोष्टी अनमोल असतात. इथे या नौगावात वाचनालयात मी खूप पुस्तकं वाचली. वाचनाचा आनंद खूप असतो. आई आठवते.

माझी माय जसे साजूक तूप घरासाठी केले तिने कष्ट खूप निर्णय घेतले बरोबर चूक

मग असे का घडले जीवनाचे रूप? पण तरीही आयुष्य वेगळया वळणावर वळत गेलं. चुलत भावाने पळवून मुंबईला नेऊन विकलं. तरुण असेपर्यंत नृत्य गायनाचे कार्यक्रम केले. आता म्हातारी झाल्यावर रुदाली बनले.

वर्ख लावून बाहुले नाचले
आटे खिळे झिजून गेले
चंद्राचा दिवा घेतला?
चांदण त्याला फसवतोय!!
पाहुणचार घेऊन गेले
किती फुकट खाऊन गेले
आता विसाव्याचे क्षण
वाड्याच्या का नशिबी आले?
माझ्या नशिबी हे का घडले?
भाऊबंदकी असे छळले,
वास्तूला कुणी शापले
के सेरा सेरा म्हंटले.
हे वाड्याचे वासे जळाले
लेकीला सारे घडले.

गुंजभर करून व्यवहार

गाव गाढव मडवणार.

त्याला कसे कळणार ?

आज वडील वारले म्हणून मी भाड्याने येऊन वाड्यात अंगणात रडते आहे. वाड्याला कसं कळणार हि रुदाली मी आपल्या वाड्याची आहे. या वाड्याची वारस आहे. वडील तर फोटोत जाऊन बसले. पण वडिलांनी सुद्धा माझी कधीही काळजी केली नाही. ती जबाबदारी घेतली नाही.

त्या क्षितिजापाशी वाट पाहशील माझी

हातात घेऊन ये फुले केसरी ताजी मी येते तिथवर आणि हरवून जाई मी संध्या तारा तिथे खिळूनी राही.

नाचगाण्याचे कार्यक्रम पण कोणी हौशीनी करत नसतं आणि रुदाली पण कोणी हौशीने करत नसतं. स्त्री सक्षमीकरणाच्या वल्गनाच आपल्या देशात चालू राहतात.

स्त्रीचे सत्य हे समाजाचे खोटे प्रेम, रुदाली सारखं खोटे रडत असतं.

# देव माझा माझा

मी कल्याणी बाई, ही माझी गोष्ट आहे. देव माझा माझा माझा, मी देवाचा!अस एक लाडका भजन आहे. मी तशी जेवढी अध्यात्मिक आहे, तेवढीच मौजमजा करणारी पण आहे. मी आणि माझे पती दोघजण बलारला आनंदात राहात होतो. लहान गोष्टीत आनंद होता. माझ्या वृत्ती आनंदी आहेत. दोन्ही मुलं परदेशी होती. सुना सह सुस्थित होती. नातवंड होती आणि मजेत होते. पती थोडेसे आजारी पडले आणि पतीचा मृत्यू झाला. मला एकटीला राहणं अवघड वाटू लागलं. अशक्य नाही पण अवघड होतं. पारंपरिक अशा या जुन्या पडक्या घरांमध्ये आम्ही रहात होतो. घराचं नाव होतं चंदनी महाल! या चंदनी महालाजवळ आलो की काही आनंदी आणि नकारात्मक लहरी सुद्धा माझ्या अंगावर दाटून येतात. असं कधीकधी मला वाटत असे. पण आर्थिक परिस्थिती दुसरे घर घेण्याची नव्हती. वाडा हवा म्हणून बिल्डर मागे लागले होते. हा बंगला मागत होते. पण या बंगल्यात इतरांचे पण हक्क असल्यामुळे आम्हाला तो बंगला पुनर्विकास करायला देणे जमलं नाही. अंगणात एक मोठं मुंग्यांचं वारूळ होतं. मुंग्यांच्या वारुळा अशुभ असत, असे लोक सांगतात. त्यामुळे बिल्डर पण काही दिवसांनी

आमच्या घराचा नाद सोडून देत असत. शिवाय या घरात अन्य कोणी हक्क सांगू शकतो त्यामुळे आम्ही गप्प बसलो. पाप-पुण्याच्या भन्नाट कल्पना जगात असतात. त्यामुळे मुंग्यांचे वारूळ अशुभ, औदुंबर झाड सोडून टाक असे सांगितले जाई. पण मला काही केल्या ते झाड तोडायची हिंमत होत नव्हती. वारसाहक्काने आलं होतं असं झालं होतं. या औदुंबराच्या झाडापाशी जाऊन मी देवाला सुख मागायचे. त्या उंबराच्या झाडाला दत्ताचे स्थान समजायचे. काय मागायचं कसं मागायचं हे ठरवून ठरवून मी औदुंबर वृक्षाच्या पाशी वेगवेगळया गोष्टी मागत आली आणि औदुंबर माझ्या सगळया इच्छा पूर्ण करत होता. वारसाहक्काने आलेल्या वस्तूंबरोबर शाप आणि आशीर्वाद पण येत असावेत. पूर्वी पूर्वजांच्या पाप-पुण्याचे काही तोटे काही असच आपणाला मला आले का? सुखाचे मूळ भूतकाळात असलं. तरी सुख मिळते ते वर्तमान काळात मिळतं. आणि ते मानन्यावर असते. इतरांना दिल्यावर मिळते वगैरे या गोष्टी शब्द असतात. पण सुख मिळून मिसळून घ्यावं लागतं. मन प्रसन्न ठेवावं लागतं पतीच्या मृत्यूनंतर काही दिवस मी ह्या आनंदयोग वृद्धाश्रमात राहायला आले. जेमतेम आठ हजार. रुपये महिन्याचे होते. माझ्या परदेशी असलेल्या मुलाने ते भरले आणि तो म्हणाला की “आई, एक महिना तुला बदल होईल. इतर लोकांमध्ये तुझं मन रमेल. मन रमेतो इथे राहा. ”

आनंद योग नावाच्या वृद्धाश्रमात आले. सुंदर खोली मिळाली. महिलांच्या विभागात एक सुंदर गायत्री देवीची मूर्ती अंगणात होती. त्याच्याभोवती ओटा होता. वड होता आणि तिथे बसून भजन व्हायची किर्तन चालायचं. वृद्धाश्रमात वृद्ध लोक होते. काही देव देवन करणारे होते. ती मालिका वगैरे बघायचे. आश्रमाच्या संचालिका हुशार होत्या. सरकारी नोकरीतून निवृत्त झालेल्या होत्या. त्या मला म्हणाल्या.

" काही दिवस तुम्ही राहा पण नंतर तुम्ही तुमच्या स्वतःच्या घरी राहा. एखादी कम्पेनीयन ठेवायची. तरुणी कंपनी ठेवा. दोन नोकर ठेवा. पण स्वतःचे हक्काचे एवढं मोठं घर, छान असताना वृद्धाश्रमात राहू नये. तुम्ही मन रमले की जावं. दोन नोकरांचे पोट भरण्यासाठी तरी जावं.

असं मला वाटतं. तरी तुम्ही हा अनुभव घ्यावा आणि मग ठरवा. खाण व पिणे मनासारखं करता येत नाही. वृद्धाश्रमात लहान खोलीत आपल्याला कसस होत. घर स्वतंत्र आहे. राहा. "

आपल्याला आपलं खाव, पुरी नान चालते. घरी कंटाळा आला कि सहली करा. अहंकार जपत, जीव वाहून कलाकुसर पाककृती करता येते. आता आपण कपाट उठून आवरुन पाहतो. सगळ्या गोष्टी करतो. ईथे बॅगमध्ये सामान ठेवले जाते. "त्या

“घरी काकी तुम्हाला सांगते, फक्त फोन टीव्ही आहे. शेजारी नाही”मी

“ईथे सुध्दा तुम्ही बघाल एवढीच करमणूक असते. तरी तुमचं तुम्ही बघा. एक महिना राहा दुःखातून सावरा आणि नंतर परत जा. ”त्या

मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे साधन! असं त्यांनी मला सांगितलं आणि त्यांच्या कामाला लागल्या. संध्याकाळी एक तास काकी ऑफिसमध्ये यायच्या. त्या वेळी अर्थव्यवहार वगैरे बघायच्या. मला असं वाटलं अशी जरी मी एक तासाची कुठे नोकरी केली तरी माझं मन रमेल. खरच मी माझ्या घरी राहायला काय हरकत आहे?ते बघू पुढे असं मी ठरवलं.

नवऱ्याबरोबर चाळीस वर्षे संसार केला होता. त्याच्या मृत्यूचे दुःख दोन दिवसात विसरणे शक्यच नव्हतं. नातेवाईक तीन दिवस झाले की गेले. चौथ्या दिवशी घर सुनं झालं. पाच दिवस काढले. वस्तू काढून टाकल्या. कपडे देऊन टाकले. घर नीट केले आणि त्यानंतर ते घर खायला उठलं. म्हणून मुलगा म्हणाला

“ मग वृद्धाश्रमात राहा” आणि मग मी वृद्धाश्रमात राहायला आले.

देव माझा माझा, अस सगळेजण म्हणतात. हे माझं ते माझं, ते माझं सर्व वस्तू माझ्या असे हावरटपण माणसाला असते. आणि बदल ईतर कुणात हवा. खरा बदल पण माझ्यातच हवा. माणसाने बदल स्वीकारायला हवा. हे देवा सगळ्यांचं भलं कर पण सगळ्यात आधी माझं भलं कर. भलं करुन माझं चांगलं होवु दे. माणूस एकटा कधीच सुखी राहू शकत नाही. त्याला कायम सुखात मनाला, दुःख वाटून घ्यायला कोणती सहवासी हवा. तो सहवासी सहवासी हवा असतो. एकटेपणा सेलमध्ये राहणे शिक्षा असते.

वृद्धाश्रमातील दिवस सुरू झाले त्याचा बदल बराच वाटत होता. हिमनगासारखी माणस वरवरची कळतात. आयुष्य 1मिनिटे मॅगी नसते. साधना असते. एकट्याने जेऊन माणसाला आनंद होतो नाही असं नाही, पण एकत्र जमून पार्टी करणं, हसत खेळत जेवण त्यातला आनंद वेगळाच असतो. ईथे एकत्र जेवत. घरी एकटे जेवणे कैदेत ठेवलेल्या गुन्हेगारासारखे वाटतं. कुणीतरी सोबत असावं ही सामान्य इच्छा असते. सर्वांचे सुखात सुख मानावे अस म्हणतात. म्हणजे थोडक्यात काय इतरांच्या सुखात सुख म्हणावं किंवा निदान इतरांच्या दुःखामध्ये आपण सुख मानू नये. सूर्यफुलाच्या कुशीत झोपले सारखा शांत माणसांनी झोपावं. पण काटे बनवून इतरांना टोचू नये. सर्व वयात माणसाला भीती असते पण जास्ती बाऊ करू

नये. प्रत्येक ती, स्त्री तिची कथा साधारणपणे तशीच असते. आम्ही दोन दोन बायका एका खोलीत एकत्र राहायला लागलो.

मन करा रे प्रसन्न

सर्व सिध्दीचे कारण.

Small things give big, little things give big happiness. ilusion भासमय जग. किर्तनकार बाई एका भजनावर पोट भरत होतया.

“ईतर भजन शिकले नाही.. संसारात मी बोअर झाले कि सहली करायची. ईतर अभ्यास केला नाही. ”त्या सरळ सांगत.

बरेच जण इथे असे होते ज्यांना वाटायचं गुणवत्ता महत्त्वाची नाही. नाव प्रसिद्ध असणे महत्त्वाचे आहे. ते त्यांची तीच तीच मत पुढे पुढे मांडत राहिले. एकच सर्वोत्तम गाणे किंवा भजन गात आणि इतरांची मते स्वतःच्या नावावर खपवले राहायचे. Sponsored views were put by them. show business fashion makeup entertainment was full attraction in all the society, at this age also.

पुढचा जन्म कोणी बघितला याच जन्मात मजा करून घेऊया असे म्हणत देवधर्म विसरणारे लोक पण बघितले होते. एका नटीची आई या वृद्धाश्रमात राहायला होती. लोक तिच्या अवतीभोवती

नाचायचे की आपलं नाव होईल किंवा तिला भेटायला कोणीही व्हीआयपी आले की पुढे पुढे व्हायचे. ही बाई स्वतःच्या घरी बोअरशी झाली होती म्हणून वृद्धाश्रमात आली होती. ती नाराज असे. तिला खरंच सांगायचं नव्हतं की ती व्ही आयपी ची कुणीतरी आहे. तिला वाटे ते लोकांना कळलं तर हसतील आणि तिला वाटलेल आपला अपमान होईल. पण त्या उलट तिला सगळा मान मिळाला.

जवळ एक देवळात जात. “अग अन्नपूर्णा देवीच्या देवळात या पूजा केली ना की घरी धनधान्य येतं. खायला-प्यायला माणसं येतात. स्वयंपाकी मित्र सहप्रवासी भेटतात” असं त्या देवळातली एक वृद्धा मला सांगत होती. मी घरी गेल्यावर एक वृद्ध स्वयंपाकीण कंपेनियन म्हणून ठेवावी अस ठरवले पण मला तिची ही भीतीच वाटत असे. माहित नाही काय झालय सगळ याचीच भीती वाटते. कशाचा निर्मळ आनंद घेता येत नाही. जगात प्रेम माया काय असते? मैत्री सुद्धा तशीच असते?काय घडते की माणूस मूर्ख बनून जातो.

मी काकींना म्हणाले. “जुने काहीबाही आठवत राहते. जीवनात अनपेक्षित वळणे येतात वाटते इथेच राहावे. कधी वाटते घरी राहावं घर सजवाव, एखादी सोबत महिला ठेवावी. ”मी

“ काहीतरी पॉझिटिव घडेल”काकी

“ सुन गरोदर होती असे वाटल्यास मुला कडे जाऊन राहता येईल. नंतर बाळाला सांभाळायच्या निमित्ताने आपली कायमची सोय होईल”मी

“ मग वाटलं तर हे घर पण विकून टाकून तेथे कायम राहू शकते”काकी

खूप स्वप्न पाहिली होतीTo give birth to a child is to give place for light to enter

मी शिकलेली आहे. मी परत काहीतरी अभ्यास करेन. क्लासेस घेईन एखादी पेईंग गेस्ट ठेवून. वाटले ईथेही इतर लोक माझ्या द्वेष करू शकतात. माझा राग राग करू शकतात. मला माझ्या रूपाचा अहंकर आहे. माझे केस गळतात म्हणून मी डॉक्टर कडे जात होते. त्यामुळे दुपारी जाई. त्यावेळी डॉक्टरच्या रस्त्यावर गर्दी नसे. मी सहज आरामात पोहोचे. ते औषध घेऊन आणि परत येत होते. पण दुपारची झोप झाली नाही की आजार्यासारखं कसतरी होते. झोप नाही घ्यायची म्हणून वाचनालयाच्या हॉलमध्ये जावं लागायचं. या आश्रमामध्ये सुद्धा काही जण होते ज्यांना त्या जागेशी अटॅचमेंट झाली होती. त्या साइटवर ते कष्ट करत. बागेत काम करत. संध्याकाळी चंद्र आणि सकाळी सूर्य बघत बसत.

‘मला ऑफिसमध्ये मित्र होते. घरी खायला यायचे पण मला काही ईथे भेटायला येत नव्हते. गुरु होते ते सेलिब्रिटी गुरु बनले. ’

शेजारी आणि मैत्रिणी मला भेटायला येईना झाल्या होत्या.

“काय करायचं ठरवलं?”काकी

“एक महीना राहते. ”मी कारण तोपर्यंत घरातली उदासीनता मला नको वाटु लागली होती. माझ्या शरीरावर माझे प्रेम आहे आणि त्यात चूक काहीच नाही. जीवनाला अर्थ असतो कारण ईश्वर शरीरी असतो. शरीर म्हटलं की सगळं हवं.

सुख हवं, कुठला तरी छंद हवा. चित्र काढणे गाना गाणे हवं. पेन्सिलने सुंदर सुंदर पक्षी पाऊस काढणे हवं. मी श्रीमंत नव्हते. पण सुखवस्तू होते. प्रत्येक गोष्टीची सवय होऊन जाते. सुरुवातीला वृद्धाश्रमात यायला नकोसा वाटत होता आता वृद्धाश्रम सोडून जावंसं वाटत नव्हतं. सोबत ची मैत्रीण थोडी बोल भांड होती.

“ मी म्हणेल तसं होणार” असं म्हणत असे.

“ जे होणार ते चांगलं होणार” असे मी म्हणत असे. तिच्या हट्टापायी तिला अपमान मिळे. प्रश्न सुटत राहिला पाहिजे यासाठी मी तिला उत्तर दिलं.

“ कधी माझं खरं कधी तुझं खरं”नाईलाजाने आणि तिच्याशी ठीक म्हणत तडजोड केली. माझे नाव या आश्रमात कल्याणी आजि अस पडलं होतं.

एक अडलेली गरजू वृद्ध स्त्री आश्रमात खोली मागायला आली. आश्रमात जागा नव्हती. मला तिची दया आली. मला तरी माझं घर होतं. मी पाहिजे तेव्हा माझ्या घरी जाऊन कुलूप उघडून घरात राहू शकते. ही बाई आता कुठे जाईल ?ती बागेत बसून रडत होती. त्या वेळी माझ्या मनात आलं

“आपण आपल्या आपल्या घरी परत जावं”

मी माझ्या माझ्या घरी परत आले. आता मी माझ्या स्वतःच्या घरी राहते. स्वतःचे घर असताना आश्रमात पडायची काय गरज आहे? एखादी नोकरदार मुलगी असली तर त्या तरुणीच्या सहवासात वेळ जाईल.

माझी जागा त्या बाईला दिली. ती फोन करत राहते. बरे वाटते. देव माझा माझा माझी काळजी वाहतोय.

मी घरी रमेन आणि खूष राहीन. मला खात्री आहे

***

# गडाख बंगला(शिबीर)

सलम सरांचे, भयकथा लिखाण शिबीर!''जाहिरात वाचून त्या गडाख बंगल्यात मी गेले. कर्जत गावांमध्ये गडाख बंगला ही एक प्रसिद्ध वास्तू होती. कर्जत रेल्वे स्टेशनपासून साधारणपणे वीस मिनिटे चालत गेल्यानंतर, घनदाट जंगलातील एका टेकाडावर हा बंगला अभंग शिळेवर बांधून फलक लावलेला होता. गडाख असं त्याचं नाव होते. गडाख त्यांचे वडील शिवाजी महाराजांच्या हाताखाली शिपाई होते.

जमिन बक्षिस मिळाली होती. आपला बंगला बांधून ते राहायला आले. परिसर हवा, नारळाची सुंदर सुंदर झाडे होती. ऐशी वर्षे झाली. गडाख बंगला सुस्थितीत होता. काही काही संस्था सहलीला किंवा विकेन्ड पार्टीला, नववर्षाच्या रात्री, दारू पार्टीला बंगला भाड्याने घ्यायचे.

गडाखाचा मुलगा काहीही काम करत नव्हता. वर वर बघायला मुलगा दिसायला देखणा होता. कष्टाळू होता पण तो पळून मुंबईला कधी तरी जाउन राहायला लागला. तो परत आलाच नाही. गडाख बाबाला तीन मुली होत्या. मुली खूप सुंदर असल्यामुळे त्यांची लग्न चांगल्या घरी झाली. पण बाबांनी काही त्यांना नांदु

दिल नाही. पैसे दागिने साथ दिली नाही. त्या तिघी जणी चांगल्या ठिकाणी नोकरी करायच्या आणि त्यांच्या पगारासाठी गडाख बाबांनी त्यांना संसारा बाहेर आणलं होतं. नवर्याला सोडून तिघी आल्या. त्या पतिदेवाला सोडून त्या काळात तिघी आल्या. छोट्या गावात मोठ्या प्रमाणात होणारी कुचंबणा सोसत आपापल्या परीने तिघीजणी आनंदी राहायचा प्रयत्न करत होत्या. पण तसा आपला समाज कूचक बोलण्यात आणि टोमणे हाणण्यात बराच प्रवीण असतो. त्याप्रमाणे त्यांना पण त्यांच्या समाजात लोक त्रास देत होते. या कागाळ्यात गडाख बाबांच्या मुलगा मुंबईला गेला होता. पण अचानकच तो काही वर्षानी आला आणि म्हणाला

“वाडा नावावर करा. पक्षी म्हणायला विकून टाका. ”

गडाख भाळला. बंगला विकला. पैसा गोळा करून तो सुपुत्र निघून गेला. त्या तीन मुलींची खूप होरपळ झाली आणि त्या कुठेतरी शहरात राहायला गेल्या. बंगला विकत घेतला होता त्या शेठने खरेदीखत केलं. मात्र त्याच दिवशी त्या शेठची आई वारली आणि ते काम अडकून पडले. मुली गेल्या. गडाख व नोकर राहायला होते. त्यानंतर एक वर्ष गेले. शेठ आले, त्यांनी काम सुरू करायचा प्रयत्न केला. त्या दिवशी शेठची पत्नी वारली. त्यामुळे त्याला हळूहळू तिथे अशुभ वाटले. अपशकुन होवून बांधकाम

काही होईना. गावठाणात वाईट प्रवृत्तीचे लोक असतात. तिथे दारू प्यायला घ्यायला यायला लागले. गडाख बंगला स्टेशन वरून चालत येईल असा जवळ एकांतात आहे, म्हणून तरुण-तरुणी आंबटशोकिन येवू लागले. नोकर राहायला होता. दाराशी या पाहुण्यासाठी चहा तसेच वडापावची गाडी लावली होती. आलेल्या पाहुण्यांना जेवण करून देत असे. त्यामुळे सहलीसाठी आदर्श जागा होती. अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे आणि एकदा तरी अमावस्याला मुद्दाम गडाख बंगल्यात जाऊन करण्याची टूम निघाली. काय करून अमावस्याला भुत फिरतात, याअंधश्रद्धेवर विजय मिळवण्यास मदत होणार आहे म्हणून अंधश्रद्धेचे कार्यकर्ते यांची तिथे हमखास कार्यशाळा होत असे. theme parties होत.

मी देखील अशाच एका कार्यशाळेसाठी गडाख बंगल्यात पोहोचले.

‘ We are puppets in God’s hand’ या विषयावर एक लेखन कार्यशाळा गडाख बंगल्यात ठरवण्यात आली. या कार्यशाळेचे नाव होतं ‘शोभादर्शक यंत्र’ नावाची ही कार्यशाळा होती.

‘To write horror stories भय कथांची कार्यशाळा होती. सलम कुमार नावाचे एक प्रसिद्ध चित्रपटात साईड रोल करणारे एक

लेखक अभिनेता घेणारी ही कार्यशाळा बंगल्यातच नेहमी ठरलेले काळी घ्यायचा. मध्ये गेली दोन-तीन वर्ष घेतली नव्हती. पण त्याचे नाव होते. पूर्वीपासून तो नेहमी तिथे अशी शोभादर्शक नावाची कार्यशाळा घेत असे. तरुण तरुणी असलेल्या शोभा दर्शक यंत्रा प्रमाणे एकच विषय देऊन, लिखाण शिबिराला गेलेल्या सर्व सहभागी व्यक्तींना तो कथा लिहायला बसवतात. भयकथा, लिहा. असे सांगत असे. खोटं पण असं लिहा जर कोणी वाचले की लोकांना ते खरे वाटले पाहिजे.

आम्ही आठ सहभागी गडाख बंगला येथे पोहोचलो. सलम सर आले. व्यक्ती मस्त होती. ओळख झाली.

भयकथा लिखित तत्व सांगितले.

1या सर्व भयकथा लिहीताना स्वतः घाबरू नका.

तुम्ही इथे आला आहात आठही जणांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भुताच्या कथा लिहा.

वॉचमन कम नोकर व त्याची पत्नी राहायला या हवेलीत होते.

“आम्ही पूर्वी पासुन या हवेलीत राहायला होते. खडान्खडा गडाख बंगला ची माहिती होती. आहे. गडाख, त्या ची बायको त्याच्या तीन मुली आणि परगावी राहायला असलेला सुपुत्र त्यांच्याकडे आश्रित असलेली एक आत्या आणि घरचा गडी

एवढ्या जणांचे अपमृत्यू ईथे झाले. त्यांची भुत आठवणीने हवेलीत बेबंद संचार करत असतात. त्यांच्या पैकी कोणी कुठल्यातरी रुपात टाहो फोडते धावताना तुम्हाला दिसेल आणि तुम्ही घाबराल"वॉचमन काका.

नाश्ता करून हॉल मध्ये कार्यशाळेचे ठिकाणी जाऊन बसलो. हॉल मध्ये पेंढा भरलेला गडाख सरदारनी मारलेला शिकार केलेला वाघ होता. सलम सर आले. भयकथा आराखडा शिकवला.

"अंधश्रद्धा म्हणून आम्ही त्या भुताकडे करतो तस दुर्लक्ष करायचं. पण भयकथा मात्र लिहायला पाहिजे. त्या कथेच्या अंगी शास्त्रीय पाया असला पाहिजे. अंधश्रद्धा नको. "

सलम सरांचे, भयकथा लिखाण शिबीरात आम्ही आठ जण सहभागी झालो होतो. महिलांसाठी कार्यशाळा मोफत होती. पाचशे रुपये सहा दिवस महाग नव्हती आणि पुरुषांना पण नाम मात्र पाचशे रुपये फी होती. त्यात जेवणखाण सगळं, कांदळवन सहल निसर्गरम्य ठिकाणी राहणे आणि त्या त्या वयात तरुण मुलांना आवडते ते होते. पहीला दिवस मोफत त्यामुळे बरीच गर्दी जमली होती. शेवटी सहा दिवसाची, चर्चा, ही कार्यशाळा पण अमावस्येला जोडून ठेवली होती. त्यामुळे पहिल्या दिवशीची मोफत गर्दी गेली. चार मुलगे आणि चार मुली असे आठ जण

आम्ही या कार्यशाळेला मागे हजर उरलो. खोली ताब्यात घेतली आणि स्थिर स्थावर झालो. मुलींची राहण्याची सोय जीना चढून पहिल्या मजल्यावरील कोपऱ्यातल्या दोन खोल्यांमध्ये करण्यात आली होती. दोन दोन मुली दोन खोल्यांमध्ये राहिलो आणि मुलांची सोय तळमजल्यावरील विरुद्ध दिशेच्या कोपऱ्यावर करण्यात आली होती. त्या चारही मुलांना चार स्वतंत्र खोल्या दिल्या होत्या. दोन-तीन दिवस तर एकदम मजेत गेले नंतर मात्र त्यांच्या मनात या लागल, अरे कथा हवी कल्पना करता यायला पाहिजे. गडाख घरी भुताचा अनुभव घ्यायचा प्रसंग यायला पाहिजे. ती कथा कशी लिहायची आहे? सगळ्यांनी आम्ही सलम सरांना विचारलं.

“काहीतरी कथा सांगा. भुताच्या सांगा ना. मला लिखाण काहीच सुचेना. ”मी

सलम कुमार आम्हाला कथा कशी लिहावी अनुभव कसा घ्यावयाच्या टिप्स देत होते. त्या गडाख बंगला येथे गूढ होते पण मला काही विषयच सुचत नव्हते. जंगलात रात्री बारा वाजता जायचं असं एकमताने ठरलं. वॉचमन काका आणि मुलं आणि मुली आणि सलम कुमार रात्री जाणार होतो. सलम आणि नऊ जणांचा ग्रुप एका घळीत जायचे ठरले. टॉर्च घेउन नऊ वाजता निघू

म्हणजे काहीतरी नवा आम्हाला पण अनुभव मिळेल आणि आम्हाला लिखाण करता येईल असा विचार होता.

पण रात्री साडेनऊच्या दरम्यान सलम कुमारनी निरोप पाठवला,

“मी येऊ शकत नाही तुमचे तुम्ही जा!”

मुली जाणार नाही म्हणून बोलत होत्या. मुलगे आम्ही जावं आता निघावं असा आग्रह करत होते. पण मुलांनी आम्हाला आधीच पोरी भित्र्या, घाबरत असतात असे म्हटल्याने बाकी तिघी तयार झाल्या. आम्ही बायका, विशेषतः मी घाबरत होते, पण जाऊ असं म्हणून आम्ही धीट पणा करून त्या मुलांच्या बरोबर गेलो.

जे पोहोचला. पण त्या चार मुलांमधला एक घाबरला.

“घुंगराचा आवाज येतो”ओरडला. मी त्याला म्हणाले,

“ बावळट मूर्ख करू ओरडु नको. माझ्या ओढणीला घुंगरु लावले आहेत. ”घुबडाच्या दिसले. वटवाघळांनी भरलेला वृक्ष दिसला. एक वृद्ध कंदील घेतलेला दिसला. वॉचमन काका सोबत होते. त्यांच्याशी बोलले.

बराच वेळ जंगलात फिरुन परत आलो. खाऊन झोपलो. दुसरा दिवस उजाडला. सलम सर आले. सलम सरांचे, भयकथा लिखाण शिबीर आहे हे!”

“ काय कथा सुचतात?. तुमच्या सोबत वॉचमन पण आले होते. आज एकटे जा. काय कोणाला कोणाला काय कथा सुचतील त्या लिहून काढल्या का?लिहा. ”सलम. पाच दिवस संपत आले होते. सर्व गोष्टी मिळत होत्या. व्हेज नॉनव्हेज जेवण जे काही हवं ते करायला थोडीफार मजा, मद्य नाईट आऊट मध्ये फिरायला जाणे. जागा मोठी होती. ग्रुप आहे त्यामुळे अनुभव वगैरे सगळं मिळत होतं. गडाख बंगल्याच्या समोर कमान होती. भुयार होते. शेवटच्या दिवशी सलम सरांसमोर कथा वाचून दाखवायची होती. आम्ही एकमेकांना शुभेच्छा दिल्या. समल सर व वॉचमन काका यांनी आम्हाला भुयारात नेले. आत गंगेची मूर्ती, नाग शिळा होती. सलम सर म्हणाले,

“आपापल्या कथा वाचून दाखवा. ”आम्ही दाखवत होतो. सर फारसे खुश दिसत नव्हते. एक नागपूर तिथे छतावर लटकून लागला.

. आम्ही घाबरलो. सलम सर म्हणाले.

“घाबरु नका. या कथा त्यात काहीही तथ्य नाही कारण हिंदी चित्रपटासाठी मी लिहिले आहे. या बोधकथा, भयानक वगैरे आहेत. पण त्यात काही दम नाही. ईथे बसून लिहा. मी बाहेर जाऊन येतो”

नाग लटकत छतावर फिरत होता. आम्ही लिहित बसलो. सलम सर परत पण आले. जेवायची सुट्टी झाली.

“जेऊन परत या. ”सलम सर.

जेवण छान होते.

“हे बरबट गडाखांना खूप आवडते”वॉचमन काका.

“मरुन माती झाली. आवडते म्हणून म्हणतात. एक मुलगा.

“ते आहेत ईथे आहेत”वॉचमन काका. जेवणानंतर सलम सर आणि रामसे सर आम्हाला सुधारणा सुचवणार होते. जेवण करुन शिबिर समाप्त होणार होते. सलम सर हे स्वतः हिंदी चित्रपटातील, भय चित्रपटामधले प्रसिद्ध पटकथा भयकथा लेखक होते. रामसे सर त्यांच्या चित्रपटांना सलम सरानी मदत केली होती. त्यामुळे रामसे आणि सलम सरांचं मार्गदर्शन मिळेल म्हणून खूष होऊन आम्ही रामसे चित्रपटांच्या आठवणी ताज्या करु लागलो. आम्ही आठवणी रमलो. जेवण झाल्यावर अर्धा तास ब्रेक ठरवला होता. त्याच्यानंतर आम्हाला सगळ्यांना सलम सरांनी गडाख बंगल्याच्या खालच्या प्रमुख खोलीत बोलावले. शिबिरार्थी जमवण्यात आलं त्या खोलीत गडाख त्यांच्या वाडवडिलांनी मारलेल्या वाघाची भुसा भरून ठेवला होता. भिंतीवरील पेंटिंग लावलं होतं फक्त मिणमिणते दिवे हा तिथला एक मोठा प्रॉब्लेम

होता. तिथे आम्ही सगळे जमलो. सलम सर येतील अशी वाट बघत बसलो. गप्पा मारत मारत तेच ते सांगितल्या बद्दल कंटाळा आल्यामुळे जो तो आपल्या खोलीत जाऊन आवरु लागला. आम्हाला परत जाण्यासाठी बस येणार होती. सलम सरांना परत नेण्यासाठी येणारी कार आली. आमची बस आली. त्या बसमध्ये त्या ड्रायव्हरला आम्ही सांगितलं की,

“ आम्हाला रात्री गाईड करायला सलम सर येणार होते पण ते आले नाही. गाडी चौकात थांबली. ड्रायव्हर म्हणाला,

“ मी सकाळी चहा फक्त घेतला आहे. ठेवतो. तुम्ही सगळेजण नाश्ता करून घ्या. सर ईथे मिटींग घेतील”

आम्ही बसमधून खाली उतरलो. जे मिळाले ते चालते म्हणत जेवलो. तिथे बोर्ड होता. 'सलम सरांचे, भयकथा लिखाण शिबीर'

मी म्हणाले

“ आम्ही तब्बल आठ जण सरांचे खास मार्गदर्शन घेतल्याशिवाय जाणार नाही. ” त्यावर ड्रायव्हरने आम्हाला त्या गाडीमध्ये बसवलं.

गाडी सुरु केली आणि सांगितलं “सलम सरांचा पाच वर्षापूर्वी मृत्यू झाला आहे. ”

“ मग आठ दिवस आमच्या सोबत सर होतं. ते कोण होतं?”मी

“ ते समंध होते. सर आणि भूत?खरतर दिवसाची वेळ होती तरी अंगावर ते ऐकुन काटा आला. आमच्या गाडीचा ड्रायव्हर पुढे झाला.

“ चला लवकर चला, अंधार पडला, लवकर चला”अस करू लागला. पण काही मित्रांना मात्र आता याच ठिकाणी पोहावे असे वाटत होते.

“राहु आणि उद्याच्या सकाळी जाऊ, संध्याकाळी जाऊ “एक मुलगा म्हणाला.

“ उद्या संध्याकाळी?निघा आता!”मी तिन्हीसांजेची मला खूप भीती वाटू लागली, पण पर्याय नव्हता. गाडी त्यांची होती आणि मुली भित्र्या नसतो अस या मुलीला त्या मुलांना दाखवायचे होते. पण ड्रायव्हर ओरडला. संध्याकाळच्या वेळी आम्ही गाडीत बसलो. कोपऱ्यावरच्या वडापाव वाल्या गाडी वाल्या कडे गाडी थांबवली. वडापाव विकतो तो म्हणाला,

“तुम्ही आणखी काय केलं?”

“ आम्हाला सलम सरांनी शिकवले. ” मी म्हणाले.

“तुम्हाला जास्त भ्रमात ठेवत नाही. सलम सरांचा मृत्यू होऊन कित्येक दिवस झालेत. आज पर्यंत समल सरांचे भूत तिथे वावरताना दिसते. बाई आणि तो वॉचमन तो पण एक मांत्रिक आहे.

पैशाचा पाऊस पडला वगैरे अशी काही काही खोटी आश्वासने देऊन तो लोकांना लुबाडतो. शिबिराला आलेले असतात. ''तो.

''तुम्हाला बोलावले. तर तुम्ही जाल?''मी.

''लोक जातात. तुम्ही आला. तरुणाचा सहवास त्या भूताला आवडतो. ''वडापाव वाला.

'' तुमचा आवाज ऐकला. तुमच्या सोबत हसलो खेळलो चेष्टा-मस्करी बघितली की बरे वाटते, असे सलम सर म्हणाले होते''मी.

''हो. सलम अतृप्त मेला. त्यामुळे त्याला तरुण सहवास खूप आवडतो. कार्यशाळेचा निमित्त सांगून लुबाडतो. सहवासाने खूष होतो. ''वडापाव वाला.

''मला पण गडाख सरांच भुत त्या परिसरात वावरत होते असे वाटले. ''एक मुलगा.

'' हे मात्र सत्य आहे. गडाख लढाईत पडून मेले. त्यांच्या भुताचा वावर आहे. ''ड्रायव्हर.

गडाख बंगल्याच्या लिखाण शिबिराला गेलो, ती कर्जत ची सहल विचित्र आणि भयावह झाली होती.

मी घरी पोहोचल्यानंतर हुश्श केलं. मित्र मैत्रिणी नंतर कधी भेटलो नाही. शिबिराला बोलावले त्यांनी भाष्य केलं,

“आम्ही ईव्हेंट केली. आमचा संबंध नाही. ”

त्यानंतर आयुष्यात आम्ही कधीही कुठली ही भयकथा लिहिली नाही. काल परत वर्तमानपत्रात जाहिरात आलेली आहे.

“सलम सरांचे, भयकथा लिखाण शिबीर!”

***.

# कथा सरिता(भाग्यवंती )

सरिता चा जन्म अतिशय शुभ मुहूर्तावर झाला होता. ''ही कन्या महा भाग्यवंती ठरेल'' ज्योतिषांनी सांगितलं. प्रत्येक व्यक्ती ही आपल्या परीने भाग्यवान, आपल्या नशीबाची असते. केरळ मधल्या आलेपूजा पासून थोड्या अंतरावर असलेल्या वेंबीनाड या गावी सरिता ऊर्फ भाग्यवंती आपल्या कुटुंबासह राहत होती. ही कथा म्हणजे भाग्यवंतीचा, एक स्त्री तिच्या जीवनाचा एक प्रवास आहे. म्हटले तर सुखांत आहे. लकी म्हणून सरिता नावाजलेली होती. देखणी, शुभशकूनी म्हणून सर्व शुभकार्ये असताना, तिला पहिल्यांदा बोलावत. मान देत. सरिता माहेरी लाडकी होती. लग्न झाले, मुलगा झाला. लक्ष्मण नाव ठेवले. तसे हे सामान्य सुखी जीवन आहे. पण ते तरी किती जणांना मिळते?

सरिता त्या दिवशी कृतज्ञता दिन साजरा करून गावाबाहेरच्या मंदिरात, सगळे जण जमले होते. तो काळ जुना होता. भारतीय लोकांना परदेशी जायचे वेड लागलं नव्हतं. तुरळक लोकांनी जाण्याला नुकतीच सुरुवात होण्याचा हा काळ होता. त्यामुळे परदेशी जाणाऱ्यांचे खूप अप्रूप होतं. अमेरिका म्हणजे काहीतरी ग्रेट

गोष्ट आहे, असा समज त्या गावात सगळीकडे होता. तरी बरं दुबईला काम करणारी बरीच जण त्या गावात होती.

पण पतिचा मृत्यु झाला. मुलगा फारसा हुशार नव्हता. दुर्भाग्याने घर सुने झाले. नशिबाचे फेरे पालटले. लोक अनलकी म्हणू लागले. तो काळ टांगे वाल्यांचा होता आणि गावातला सगळयात प्रसिद्ध टांगेवाला म्हणून भाग्यवंतीचा सुपुत्र लक्ष्मण टांगा चालवू लागला. लक्ष्मण आणि आई सरिता सज्जन म्हणून प्रसिद्ध होते. पण शिक्षण पूर्ण केले नव्हते. लक्ष्मण टांगा चालवून पोट भरुन लागला. एक वर्ष ठीक गेले. पण रस्ता खराब त्यामुळे टांगा लवकर खिळखिळा झाला. त्याच्या टांग्याच मागचं दार कधी नीट लागायचं नाही. कधी लागलं तर अचानक माणसं/ सवारी आत बसलेले असताना अडकून जायचं. पण गावाला टांगा सुख देई. लक्मण व सरिताचे पोट भरे. सरिता चिडचिड करी. माय लेकाचे पटेना. रिक्षा सुरु झाल्या नव्हत्या. टांगा प्रवासात काळजी त्या मागच्या दाराची होती. तरीही तो गावातल्या एकमेव टांगा प्रवासाला होता. त्यामुळे बाळंतपण, आजारपण, मुलांना शाळेत पोचवणं, लग्न, सामान भरणे या सर्व कामासाठी लक्ष्मणचा टांगा वापरला जात असे. भाग्यवंतीला मुलाला डॉक्टर करायचे होते पण नवरा वारला, पोटासाठी लक्ष्मण टांगा चालवू लागला. नवरा वारल्याचे दुःख करत, भाग्यवंती सरिता जगत होती. जवळ आपला मुलगा आहे.

इतक मोठा सुख सोबत आहे ही जाणीव त्यावेळी तिला झाली नव्हती लक्ष्मण वर चिडचिड करायची भांडायची रागवायची

भार्यावियोगः स्वजनापवादो ऋणस्य शेषं कृपणस्य सेवा |
दारिद्र्यकाले प्रियदर्शनं च विनाग्निना पञ्च दहन्ति कायम् ||

पतीचा वियोग; आपल्याच जवळच्यानी दोष देणं; कर्ज फेडायचं शिल्लक असणं; कंजूष माणसाची सेवा [नोकरी] करायला लागणं आणि आवडते लोक गरिबी आली असताना भेटायला येणं, या पाच गोष्टी आग नसून सुद्धा होरपळवतात.

भाग्यवंती चतुर व्यवहारी होती. नातेवाईक सुद्धा दुर्दैवाने दुर्मीळ झाले. पण ठीक होते.

Rational thinking must increase in women. they must be flexible. if communication is bad you should stop it. you should have the liberty to say no.

लक्ष्मण टांगा चालवून बऱ्यापैकी काम होत होता. एक छोटीशी खोली भाग्यवंती साठी त्याने विकत घेतली होती. पण दोन वर्षात टांग्याचे दिवस गेले. एका गाववाल्याने रिक्षा घेतली. लक्ष्मणचा धंदा कमी झाला. अजून दोन रिक्षा आल्या आणि टांगवाले लक्ष्मण यांचा भाव कमी झाला.

सरिता स्वतःला कोसु लागली. स्वतला भाग्यवान समजणारे थोडे असतात. तर समोर असणाऱ्या माणसांचे भाग्य बदलत राहाते. सद्भाग्य दुर्भाग्य होतं किंवा दुर्भाग्यातच सारे जीवन बदलते. सुखात सहभागी होणारे सरिताला टाळून जात. कसेतरी किंवा आपल्या मनाविरुद्ध आपल सामान्य जीवन चालू असते.

माणूस तसाच खूप भाग्यवान आहे आणि खूप भाग्यवान नाही, असं नसते. मिश्रण असते. असे जीवन लक्ष्मण जगत होता. सरिता मुलाचे लग्न करायचे साठी स्थळ बघत होती. पण जमत नव्हते. पोटापुरते पैसे मिळत होते.

काळ बदलला. गावात रिक्षा जेव्हा आल्या. लक्मणला टांगा चालवायला लाज वाटु लागली. व्यसन लागली.

परदेशात जायचे स्वप्न लक्ष्मणला बोलावू लागले. सुतार काम करायची नोकरी दुबईला मिळाली. लक्ष्मण दुबईला गेला. सरिताला बरे वाटले. मुलगा परदेशी गेला हे ती आनंदाने सांगे.

भाग्यवंती सरिता एकटीच वेम्बीनाडचे खोलीत उरली. एकटेपणा हे सत्य असते. वर्तमान बोअर करतो पण भूतकाळ आनंददायी असतो ना!लक्ष्मणने तिकडे एका तरुणीशी विवाह केला. अंतर वाढत चालले आहे. सरिता थकले आहे.

‘गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी’ अस म्हणत भाग्यवंती सरिता दिवस काढते.

ही कथा भाग्यवंती सरिताची आहे. एका आईची आहे? का आपली? कृतज्ञता दिनाबद्दल देवळात देवाला धन्यवाद देत बसणाऱ्या भाग्यवंती सारख्या अनेक स्त्रिया या देशात जगात कानाकोपऱ्यात पसरलेल्या आहेत. जेव्हा हातात सुख असतं तेव्हा ते कळत नाही आणि ते निसटून गेल्यावर कळतं ‘अरे सुख तर आपल्या हातात होतो’ आणि मग आपण खंत काढत बसतो.

लक्ष्मणच्या पत्राची, फोनचे परत येणार याची सरिता वाट बघते. प्रत्येक भाग्यवंती सरिताची हीच कहाणी आहे का?

कथा सरिता मूळ गाभा ठेवुन वाहत असते.

शुभांगी पासेबंद यांचे अन्य प्रकाशित साहित्य

१. मयूरमासा कादंबरी - 2012 - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईतर्फे (नवोदित अनुदान योजने अंतर्गत, हार्ड कॉपी) मायबोली प्रकाशन मुंबई

२. नाते शब्दांचे -ललित - 2014 पुणे-हार्ड कॉपी. घरकुल प्रकाशन पुणे

३. मुलीही जन्माला येऊ द्या- ललित-2015- द. कृ. सांडू पुरस्कार बक्षिसपात्र -पुणे-हार्ड कॉपी घरकुल प्रकाशन, पुणे.

४. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक 2015 बुकगंगा डॉट कॉम. उद्वेली बुक्स

५. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथासंग्रह - इ-बुक - 2016 बुकगंगा डॉट कॉम, विनामूल्य

६. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

७. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह – 2016 बुकगंगा डॉट कॉम

८. जाईन मी विचारीत रानफुला- स्तंभ संग्रह – 2016 बुकगंगा डॉट कॉम

९. राहू दे घरटे- इ कादंबरी- 2016 विनामूल्यwww. esahity. com

१०. मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

११. कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य-विनामूल्य

१२. आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य-विनामूल्य

१३. Why did I fall in love? novel, Amazon. com, Create space, ई बुक. २०१२. 3$

१४. मधुर दंश कथासंग्रह - नवल प्रकाशन २०१६ पुणे, हार्ड कॉपी

१५. बेलाची पाने-स्तंभ संग्रह- ई बुक-बुकगंगा डॉट कॉम-२०१७एप्रिल

१६. रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

१७. केशरबाग-विचक्षण प्रकाशन= ई बुक स्तंभसंग्रह- जुलै २०१७ शिरपुर=

१८. कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे==२०१७अनघा प्रकाशन ठाणे

१९. दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८

२०. कशाला ऊद्याचि बात -कथासंग्रह=पुणे-2018 नवल प्रकाशन

२१. Unholy water. bookganga. com. ईबुक.

२२. तू ऐकतो आहेस ना? ई बुक कवितासंग्रह = Bookganga. com

२३. नक्षत्रबन =अनाहत प्रकाशन पुणे=कथासंग्रह=पुणे-2019

२४. प्राजक्ताची फुले, स्तंभसंग्रह. ई-साहित्य 2019

२५. त्या तिथे पलिकडे कथासंग्रह, नवल प्रकाशन, पुणे2019

२६. स्वरसावल्या कथासंग्रह. अनघा प्रकाशन, ठाणे, 2019

२७. माझा मधुसंचय ईसाहित्य, स्तंभ 2020

२८. परिकथेतील राजकुमारा ईसाहित्य कादंबरी : सप्टेंबर 2020

२९. सागरकिनारे: ऑडिओ बुक ई साहित्य. कथा-संग्रह. www eSahity. com

३०. या सुखांनो या, उद्वेली बुक्स 24/11/2020

३१. मन शुध्द तुझं, स्तंभ संग्रह २०२१ हे पुस्तक

३२.साधी माणसे स्तंभसंग्रह बुकगंगा डॉट कॅाम.विनामूल्य

33 सुखसंवाद हे पुस्तक स्तंभ संग्रह- ईसाहित्य

34. डाव मांडून मांडून मोडू नको-कथासंग्रह- आगामी,पुणे,नवल प्रकाशन

३5. पॅरिस स्पर्श, पर्यटन आगामी पुणे

36 डाव मांडुन मांडुन मोडु नको.आगामी

37 पाचुची बासरी

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत. ठाणे नगर वाचन मंदिरात वाचनासाठी उपलब्ध आहेत.

ई साहित्यची पुस्तके विनामूल्य उपलब्ध आहेत.

काही पुस्तके प्रकाशकांकडे विक्रीसाठी आहेत.

***

Biodata-2021 3१-03-2021

1. Shubhangi Chandrashekhar Paseband, Phone: 9869004712, 02225345992

2. M. Sc. B. Ed. Certificate course in Journalism, Diploma in performing Arts.

3. About 400 columns published in Loksatta, Dainik Aikya (satara), Prahaar, Pudhari, Gramodhhar (satara), Gavkari (Nasik).

4. Address: 202 Anandi Bhuvan, Veer Savarkar Marg, opp. Maharashtra Vidyalaya, Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012.

6. I Write stories and articles, Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya…Marathi, Kya Itni Buri Hoon Mai Maa- Hindi (both with message to stop female foeticide), Manachi Mashagat (about mental health), Pasaydaan (telling students about fraternity)

7. Other appreciations and prizes: TMC Samaj Sevika Puraskar 2008, Maharashtra Deep Puraskar

2008, Maharashtra deep puraskar 2009, Samata sahitya academy, Savitribai Fule puraskar 2008.

8. Mumbai Marathi Granth Sangrahalaya Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016

9. D. K. Sandu, best book award 2016,

10. Thane Municipal Corporation, Thane Gaurav puraskar 2016.

11. First novel Mayurmasa was published in Navodit Anudaan Yojna of Maharashtra Rajya Sahitya Sanskriti mandal 2012.

12. Waman Rege puraskar 2020.

13. Blog writing in a different creative way.

Till 15. 10. 2020, 30 books of various genre published (List Enclosed)


## शुभांगी पासेबंद यांची पुस्तके.

ज्या कव्हरवर क्लिक कराल. ते पुस्तक हजर होईल.

























Biodata-2020 19.5-2020




1.Shubhangi Chandrashekhar Paseband,

Phone:9869004712, 02225345992

2. M.Sc. B.Ed. Certificate course in Journalism

Diploma in performing Arts

3.about 350 columns published on loksatta, dainik aikya(satara), prahaar, pudhari, gramodhar(satara), Gavkari(Nasik)

4. Address

202, Anandi Bhuvan, Veer Savarkar Marg

opp Maharashtra Vidyalaya

Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012

6. I am Writing stories and articles in various magazines, with a social message.

7. Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya…(Marathi), Kya Itni Buri Hoon Mai Maa (Hindi) (both with a message to stop female foeticide)

Manachi Mashagat (about mental health) Pasaydan (telling students about fraternity)

8. Other appreciations and prizes

TMC Samaj Sevika Puraskar 2008

Maharashtra Deep Puraskar   2008

Maharashtra deep puraskar    2009

Samata sahitya academy, Savitribai Phule puraskar  2008


9.Mumbai Marathi Granth Sangrahalaya

Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016

10|d.k.sandu, best book award 2016,

11Thane Municipal Corporation,Thane Gaurav puraskar 2016

□□□□□









## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.

## शुभांगी पासेबंद यांचे हे ई साहित्यवरचे तेरावे पुस्तक.

शुभांगी पासेबंद या एक ज्येष्ठ लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. आजवर त्यांची तीसहून अधिक पुस्तके विविध मान्यवर प्रकाशनांतर्फ़े प्रसिद्ध झाली आहेत. त्यांना आजवर अनेक साहित्यिक व सामाजिक पुरस्कारांनी नावाजले गेले आहे. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत.

पण शुभांगीजी आपली काही पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख

(५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।